ગ્રં. ૦૨૧૧૭૨૦૧
૨૭

REFBK-0014847

REFBK-0014847

# साहित्य आणि समाज

( निबंध )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
क्र. ७४८४९
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे स्थळप्रत
अनुक्रम ८३९९३ वि: श्री. व्या
कपाट ........ नों. दि. ८/३/६७

लेखक

**श्री. ना. चाफेकर**

( रमातनय )

' ओघळलेलें मंगळसूत्र ', ' समाज जीवन ',

' ज्ञान आणि विज्ञान ', ' वन्दनीय महाशय ',

या पुस्तकांचे कर्ते.

REFBK-0014847

REFBK-0014847

मूल्य आठ रुपये

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संदर्भ योजना
१९७०

सन १९६५.

प्रकाशक
श्री. ना. चाफेकर
२६४।३ शनिवार
ओंकारेश्वर रस्ता,
वझे वाडा, पुणे २

सर्वाधिकार लेखकाधीन

मुद्रक
र. भ. निगुडकर
प्रकाश मुद्रणालय,
२९५।४ सदाशिव, पुणे २.

# असें मीं लिहिलें !

जगांतील कोणत्याही साहित्याचा आणि समाजाचा सगळाच मार्ग अड-खळत–ठेंचाळत आलेला आहे. माझ्याहि ‘ साहित्य आणि समाजा ’चा अनुभव निराळा नाहीं.

मराठींत अप्रसिद्धाला जड विषयावरील लेखन प्रसिद्ध करणें फार कठीण आहे. तथापि कांहीं संपादक त्याला अपवाद होते. पूर्वीच्या ‘ सह्याद्रि ’ मासिकाचे संपादक श्री. दि. वि. काळे व ‘ काळ ’ दैनिकाचे संपादक श्री. शं. रा. दाते ह्यांनीं मला चांगलें उत्तेजन दिलें. हीं दोन नियतकालिकें वंद पडल्यामुळें माझा फार मोठा आधार तुटला. अलिकडील काळांत ‘रोहिणी’ मासिकाचे श्री. वसंतराव काणे ह्यांचा उल्लेख करणें अवश्य आहे. प्रस्तुत ‘ साहित्य आणि समाज ’ प्रकाशांत आणण्यास श्री. काणे ह्यांची आस्था फार उपयोगी पडलेली आहे. ह्या संपादकत्रयाचें ऋण मी कधीं विसरणार नाहीं.

आणखी दोन विद्वानांनीं मला खरेंखुरें घडविलें आहे. विद्वान् टिळकभक्त कै. केशव लक्ष्मण ओगले आणि अजमीरच्या सरकारी कॉलेजचे व्हाइस-प्रिन्सिपल कै. प्रो. वामन नारायण गोडबोले हे दोघेहि अत्यंत तर्कशुद्ध विचारसरणीचे गाढे विद्वान् होते. या उभयतांचें ऋण शब्दानें फिटण्या-सारखें नाही. हे उभयतां विद्वान् माझे चालते बोलते संदर्भग्रंथ होते.

‘ साहित्य आणि समाज ’ प्रकाशांत येण्यास प्रकाश मुद्रणालयाचे श्री. निगुडकर हेच केवळ कारण आहेत. माझेवरील त्यांचा लोभ व त्यांचे अंगचो चिकाटी यांशिवाय या ग्रंथाचें प्रकाशन अशक्यच होतें.

चित्रकार श्री. जोशी, केसरीचे श्री. जयंतराव टिळक ह्या स्नेहल मंडळींनीं सहाय्य केलें नसतें तर माझा ‘ साहित्य आणि समाज ’ आपणां वाचकांपर्यंत इतक्या लवकर येणें कठीण होतें. ह्या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहें.

२६४/३ शनिवार, वझे वाडा, पुणें २
ज्येष्ठ शुद्ध ३, शके १८८७

श्री. ना. चाफेकर

# अनुक्रमणिका


१. मराठी शुद्धलेखनाची भाषाशास्त्रीय पार्श्वभूमि ... १
२. मराठीचें भवितव्य ... .... .... २७
३. भाषाशैलीचें रहस्य .... .... ... ४०
४. सौंदर्य : आत्मनिष्ठ कीं वस्तुनिष्ठ ? .... ... ४७
५. श्लील व अश्लील : कांहीं विचार ... .... ५३
६. साहित्यांतील सौंदर्य .... ... ... ६०
७. पंडिता रमाबाई ... ... .... ६६
८. कांहीं राष्ट्रीय समस्या ... .... ... ७१
९. आजच्या समाजसंघटनेचें सूत्र ... .... ... ८४
१०. ,, (उत्तरार्ध) ... .... .... १०२
११. जीवन ... .... .... .... ११०
१२. श्री. ज. स. करंदीकर यांचे निवडक लेख व निबंध .... १२३
१३. जातीयतेची मीमांसा .... ... .... १४२
१४. आमचे सद्गुण वांया जात आहेत .... ... १६३
१५. संस्कृतीचें संक्रमण आणि मिश्रण ... ... १७०
१६. भिक्षा ... ... .... ... १७६
१७. प्रजाधिष्ठान राज्यपद्धति .... .... ... १८६
१८. सेक्युलर स्टेट ... ... .... २०२
१९. नव्या पिढीचीं पाउलें ... ... ... २११
२०. जिवंत ललित वाङ्मय ... .... .... २२३
२१. माझी व्यथा ... ... .... .... २२९

संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम

# १. मराठी शुद्धलेखनाची भाषाशास्त्रीय पार्श्वभूमि

महाराष्ट्र साहित्य परिषदेनें १९३० सालीं तडजोडीच्या भूमिकेवर जी नवीन शुद्धलेखन-नियमावलि तयार केली तिचीच वाढविलेली आवृत्ति म्हणजे गतवर्षी परिषदेतर्फे तथाकथित शुद्धलेखन महामंडळानें उदार बुद्धीनें ठरविलेले १४ नियम. १९२८ सालीं कै. न. चिं. केळकर यांनीं केलेल्या बंडाच्या शमनार्थ आणि केवळ एकवाक्यतेसाठीं म्हणून किंचित् तत्त्वच्युति पत्करली तिचा फायदा घेऊन प्रातिनिधिक अशा महामंडळाच्या नांवाखालीं अशिक्षितांच्या सोयीकरितां विशिष्ट विद्वानांनीं मराठी शुद्धलेखनाचीं तत्त्वेंच झुगारून दिलीं आहेत. या वादांतून कांहीं नवीन अपसिद्धान्त जोमानें पुढें येऊं पहात आहेत. 'शुद्धलेखन हें लिहिणाऱ्याच्या सोयीसाठीं आहे. व्याकरणांतील किचकटपणा लेखनांत आणूं नये. आपण बोलतों तसेंच लिहावें, उच्चार करतों तसेंच लिहावें. ग्रांथिक भाषेची अडगळ आतां दूर केली पाहिजे. बोलीचें लेखन हेंच ग्रांथिक भाषेची जागा घेण्यास अधिक शास्त्रशुद्ध व व्यवहार्य आहे. संस्कृतवर्णमाला अशुद्ध असून आजच्या कालास ती गैरसोयीची आहे. रोमन लिपि अधिक शास्त्रशुद्ध व सोयीची आहे. तिचाच स्वीकार करणें श्रेयस्कर आहे. संस्कृतपंडितांचाच उच्चार शुद्ध व प्रमाण हा समज काढून टाकला पाहिजे. कोणताहि अडाणी मनुष्य जें सहजपणें बोलतो ( व कदाचित् लिहितो ) तें ध्वनिशास्त्रदृष्ट्या व भाषाशास्त्रदृष्ट्या बरोबर असल्यानें त्याचें बोलणें शुद्धच मानलें पाहिजे.' इ० इ०

शुद्धलेखनांत आतांपर्यंत जी तडजोड घडवून आणण्यांत आली त्यांत लिहिणाऱ्यांची सोयच मुख्यत्वेंकरून पाहण्यांत आलेली आहे. म्हणूनच त्यांत व्याकरणाच्या दृष्टीनें विसंगति निर्माण होते. व्याकरण गौण व अनावश्यक ठरविलें तर अनुस्वार, ऱ्हस्व, दीर्घ यांची अडगळ वाटणें साहजिकच आहे. पण सुशिक्षितांस व्याकरणच अनावश्यक वाटूं लागणें ही आश्चर्याची गोष्ट आहे. अशिक्षितांस त्याचा कंटाळा यावा किंबहुना तें डोक्यावरून जावें हें आम्ही ओळखतों. पण सुशिक्षितांस शुद्ध लिहिण्यावाचण्याचा कंटाळा येत असेल तर ते शिकतात कशासाठीं ? आणि त्यांच्या सोयीसाठीं विद्वानांनीं मराठी भाषेचें शास्त्रच बदलूं पाहावें याचें त्याहून आश्चर्य वाटतें !

वास्तविक शुद्धलेखनाचा आधार व्याकरण आहे. व्याकरण भाषाशास्त्राच्या अनुषंगानें चालतें. म्हणजे पर्यायानें शुद्धलेखनाचा पाया भाषाशास्त्र म्हटल्यास वावगें होणार नाहीं. म्हणून भाषाशास्त्राच्या पार्श्वभूमीवर शुद्धलेखनाचा विचार झाला पाहिजे. भाषेची गंगोत्री दुर्गम असल्यामुळें व भाषा प्रवाही असल्यानें कोणत्याहि भाषेला तिच्या गतजीवनापासून अलग करणें वास्तविक अशक्य आहे. किंबहुना भाषेची घडण तिच्या गतजीवनावरून हळू हळू तयार झालेली असते. तिला आदि नाहीं आणि कर्ताहि नाहीं. अशा स्थितींत मराठीची आजची वर्णमाला मूळ संस्कृतची आहे म्हणून ती त्याज्य मानणें कितपत योग्य होईल ? संस्कृत, प्राकृत, महाराष्ट्री आणि मऱ्हाटी हे मराठीच्या भाषाशास्त्रांतील ढोबळ टप्पे पाहिले म्हणजे संस्कृत हें मराठीचें गतजीवन आहे हें मान्य करावें लागेल. या दृष्टीनें मराठीला संस्कृतची अडगळ वाटूं नये.

प्राथमिक शाळेपासून महाविद्यालयापर्यंत मराठीच्या शिक्षणांत व्याकरणासंबंधीं जी अनास्था दिसून येते त्यामुळें अमाप पसरलेल्या शिक्षितांस आणि भावी विद्वानांस मराठी लेखन सुलभ करूं देणें आणि त्यांच्या लेखन-

प्रमादांस मान्यता देणें एवढीच सोय शुद्धलेखनाच्या कार्यांत पाहिलेली आहे, असें दिसतें. परंतु केवळ सोय पाहाणें यापेक्षा शुद्धलेखनामागें भाषाशास्त्राची फार मोठी पार्श्वभूमि आहे हें विसरून चालणार नाही.

**मराठी स्वतंत्र भाषा नाहीं :**

ज्याप्रमाणें इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, रशियन इत्यादि भाषा स्वतंत्र नाहींत त्याप्रमाणेंच हिंदी, गुजराथी, बंगाली, मराठी याहि भाषा स्वतंत्र नाहींत. युरोपीय भाषांना लॅटिन व ग्रीक भाषांना डावलून स्वतःची स्वतंत्र घटना तयार करतां येणार नाहीं. युरोपीय भाषांची वाक्यरचना, शब्दांचीं रूपें आणि शब्दरचना हीं सर्व लॅटिन व ग्रीकच्या आधारावरच तयार झालेलीं आहेत. लॅटिनचें व ग्रीकचें हें मातृऋण युरोपीय भाषांना विसरून चालणार नाहीं. त्याचप्रमाणें लॅटिनशीं स्वतंत्र सुभाहि त्यांस निर्माण करतां येणार नाहीं. आर्य भारतीय भाषांचेंहि तसेंच आहे. आर्य भारतीय भाषांची शब्द-रचना, वाक्यरचना व शब्दांचीं रूपें हीं संस्कृतच्याच आधारावर उभारलेलीं आहेत. हिंदींतील बडा किंवा बुड्ढा, सिंधींतील बुडो किंवा वडो, बंगालींतील बुड किंवा बड, गुजराथींतील वडो, गोव्याच्या मराठींतील व्हड हे सर्व शब्द संस्कृतमधील एकाच वृद्ध या शब्दापासून तयार आहेत. त्याचप्रमाणें मराठींतील आठरा, हिंदींतील अठारह, पंजाबींतील अठारा, बंगालींतील आठार, ओरियांतील अठर, गुजराथींतील अढार किंवा अराड, सिंधींतील अडह, काश्मिरींतील अर्दह्, सिंहलींतील अटलोस आणि ह्या सर्वांच्याहि पूर्वी प्राकृतांतील अट्ठारस हे सर्व संस्कृत 'अष्टादशन्' याच शब्दाचे अपभ्रंश आहेत. "... सर्व रूपभेदांचें मूळ सर्वत्र एक रूपाचें होतें, आणि त्याचें मूळ म्हणजे सर्व प्राकृतांची मूलभूत अवस्था त्याचप्रमाणें सर्व (आर्य भारतीय) भाषांतील धातुरूपेंहि सर्व प्राकृताच्या मूलभूत धातुरूपांपासून झालेलीं आहेत." (ब्लोककृत मराठी भाषेचा विकास, पृष्ठ ४० — प्रो. परांजपे) विभक्तीचे प्रत्यय, शब्दयोगी अव्ययें, सर्वनामें, संख्यावाचक शब्द,

क्रियापदाचीं रूपें, धातुसाधितें, इत्यादि वाक्याचे घटक हे संस्कृतवरूनच आलेले आहेत. " ... मराठी वाक्यरचनेचे मुख्य नियम जवळ जवळ संस्कृत वाक्यरचनेप्रमाणेंच आहेत. वाक्याच्या मांडणीच्या दृष्टीनें किंवा त्यांतील घटकावयवांच्या, कारक संबंधाच्या किंवा क्रमाच्या दृष्टीनें कांहीं महत्त्वाचे नवीन प्रकार मराठींत दृश्यमान होत नाहींत. " ( प्रो. परांजपे ). साहजिकच आहे. भाषा ही काळाच्या प्रवाहांतील एक भाग असतो. प्रवाह सारखा वाहत असतो. प्रवाहाप्रमाणें भाषेलाहि स्थैर्य नाहीं. जर प्रथम मराठी बोलणारा समाज हा प्राचीन पूर्वजांचा वंशज असेल तर त्यांच्या भाषेचा उगम त्याच्यापासून कसा होणार ? भाषा हा पूर्वजांनीं दिलेला वारसा आहे. तो मागील अंकावरून पुढें चालू राहत असतो.

तात्पर्य, मराठी संस्कृतपासून स्वतंत्रपणें फुटूं शकत नाहीं. फुटूं म्हटल्यास मराठीला आपला स्वतंत्र संसार चालवितां येणार नाहीं. तसें करावयाचेंच म्हटलें तर विश्वाचें स्वतंत्र मूलभूत निरीक्षण करावें लागेल. विश्वांतील प्रत्येक मूलभूत घटनेस मूळ संज्ञा ठरवावी लागेल. त्याचप्रमाणें प्रत्येक क्रियेस स्वतंत्र मूळ धातु निर्माण करावा लागेल. प्रत्येक घटनेचा निरनिराळ्या प्रकारांनीं व्यवहारांत उपयोग केला जातो. त्या प्रत्येक प्रकारास निराळा अर्थ प्राप्त होण्यासाठीं प्रत्येक संज्ञेस निरनिराळीं रूपें देणें क्रमप्राप्त आहे. उदा० ' गाय ' ही संज्ञा घेतली तर गाय या शब्दाचा वापर अनेक प्रकारांनीं आपणांस करावा लागतो. गाय दूध देते. गाईला चारा घालतों. गायीनें शिंग मारलें नाहीं. गायीसाठीं चांगला गोठा हवा. गायीपासून पुष्कळ उपयुक्त पदार्थ आपणांस मिळतात. गायीचें दूध पौष्टिक असतें. गायीमध्यें दोष मिळणें कठीणच. हे गायी ! मी तुझे किती उपकार मानूं ! इ० प्रकारांनीं ' गाय ' या संज्ञेस संस्कार करावे लागतील. म्हणजे विभक्ति ठरवाव्या लागतील. असे एकूण किती संस्कार म्हणजे प्रकार होऊं शकतात तें निश्चित करावें लागेल. प्रत्येक संज्ञेच्या अन्तीं जितके स्वर वा व्यंजनें येतील त्या

प्रत्येकाच्या सोयीनें वरील संज्ञेत संस्कार करतांना एक नियमित बदल करावा लागेल. म्हणजे सामान्यरूपें तयार करावीं लागतील. संज्ञेप्रमाणेंच क्रिया-वाचक धातूंचें वर्गीकरण करून त्यांचीहि संस्कारास सोयीची अशी अनेक प्रकारांनीं विकृति करावी लागेल. तीहि कांहीं ठराविक नियमानेंच करावी लागेल. वस्तु किंवा भावदर्शक आणि क्रियादर्शक मूळ संज्ञा तयार झाल्यावर अर्थनिश्चितीसाठीं, व्यवहारांतील व भावनेंतील सूक्ष्म छटा दाखविण्यासाठीं त्या उभयतांच्या जोडीला आणखी कांहीं संज्ञा तयार कराव्या लागतील. त्यांचा वापर नियमानें निश्चित करावा लागेल. केवळ दोन संज्ञांनीं भागत नाहीं. उदा० मी खातों. यांत काय खातों ? केव्हां खातों ? कसा खातों ? कशाकरितां खातों ? खाण्याचे वेळीं मनांत भावना काय असते ?

मी आंबा खातों. मी चैनीकरितां आंबा खातों. मी चैनीकरितां पुष्कळ हापूस आंबे खातों. मला लागेल तेव्हां मी पुष्कळ हापूस आंबे खात असतों. मीं पूर्वीं कधीं खाल्ले नव्हते पण आतां मात्र यापुढें हापूस आंब्याशिवाय दुसरें कांहीं खाणार नाहीं. ज्यांना फळांचा आस्वाद हवा त्यांनीं हापूसचाच आंबा खावा. त्यांनींच खावा. आम्हीं तर खावाच. हापूसचा आंबा कोणीं खाल्लाच नाहीं तर त्या आंब्याचें दुर्दैवच ! अरेरे! त्याला दुसरें कांहीं मिळालें नाहीं तर नुसत्या कच्च्या दोड्या कैरीवरच ( आंब्यावरच ) त्याला दिवस काढावा लागला !

तात्पर्य, दोन संज्ञांच्या खुंटांमध्ये अनेक गडी उलटे सुलटे बसवावे लागतील. नको त्यांना खो द्यावा लागेल. प्रत्येक वस्तुदर्शक, भावदर्शक व क्रियादर्शक संज्ञा व त्यांचा प्रत्येकाचा लवाजमा यांचें स्थानहि निश्चित करावें लागेल. म्हणजे विशेषणें, क्रियाविशेषणें तयार होतील. एवढें झालें म्हणजे भाषायंत्र चालू होण्यास प्रत्यवाय नाहीं. पण पुढें नवीन नवीन अनुभूति येत जातात. त्यांची सोय भाषेंत करावयास हवी. त्या नवीन अनुभूतींना नवीन संज्ञा, त्यांच्या विकृती, त्या तयार करण्याचे नियम इतकी तयारी

त्या भाषेची असावी लागेल. नवीन अनुभूति जुन्या अनुभूतिवरून कोठें चपखल बसते तें दाखविणाऱ्या किंबहुना जुन्या अनुभूतीवरूनच नवीन अनुभूतींच्या संज्ञा तयार होत असतात. अशा नव्या व जुन्या अनुभूतींचा दुवा सांधतां आला नाहीं तर भाषा आणि संस्कृति दोनहि खुंटतील. म्हणून पूर्वानुभूतीवर नवागत अनुभूतीसाठीं नवीन संज्ञा बनविण्याचें सामर्थ्य आपण नवीन तयार करीत असलेल्या स्वतंत्र मराठी भाषेंत म्हणजे तिच्या घटनेंत असलें पाहिजे. वास्तविक भाषा ही पूर्वपरंपरेंतूनच पुढें बाळसें धरीत असते. नव्या स्वतंत्र भाषेंत संस्कृतनें सुरू केलेली जुनी परंपरा मुळींच गृहीत धरतां येणार नाहीं हें सर्व पत्करून स्वतंत्र भाषा निर्माल्यांत नवभाषानिर्मितीचें सामर्थ्य आहे काय ?

अशी स्वतंत्र भाषा कृत्रिम बनविणें सर्वथा अशक्य आहे हें डॉ. कालेलकरांसह सर्व पुरोगामी भाषाशास्त्रज्ञ मान्य करतील. अर्थात् आहे हीच भाषा तिच्या ' पारतंत्र्या 'सह मान्य करण्यावांचून गत्यंतर नाहीं. परंतु मराठीच्या ' स्वातंत्र्या 'चा अभिनिवेश आणून संस्कृतचें ऋण झिडकारून देणाऱ्या मराठीच्या 'स्वतंत्रप्रज्ञां'स असें विचारावेंसें वाटतें कीं त्यांची ही 'स्वातंत्र्या'ची तळमळ मराठीच्याच अभिमानांतून उगम पावली आहे काय ? कीं स्वतंत्र बुद्धिवादाच्या नांवाखालीं मराठीची लिपि व मराठी भाषा ही त्याज्य ठरवून रोमन लिपीचें व रोमन भाषेचें म्हणजेच पर्यायानें रोमन संस्कृतीचें पाणिग्रहण करावयाचें आहे ? डॉ. कालेलकरांच्या ' ध्वनिविचार ' या ग्रंथाचा विचार केला असतां आमची ही शंका रास्त असल्याचें सहज दिसून येईल. अशा भाषाशास्त्रज्ञांस मराठीच्या शुद्धीकरणावर बोलण्याचा कितपत अधिकार पोंचतो हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

मराठीची संस्कृत घटना गृहीत केल्यावर संस्कृत प्रत्ययांचे अपभ्रंश मान्य करावयास हवेत. त्यांचे अवशेष ठेवण्यांत भाषेचा इतिहास सुरक्षित ठेवला जातो. अवशेष कायम ठेवण्यांत आणखी एक सोय होत असते. त्यामुळें

अर्थबोध स्पष्ट होत असतो. भाषा प्रवाही असते. ह्या प्रवाहांत हळूहळू शब्दांचे उच्चार बदलत जातात. अशा वेळीं ते विकृत उच्चार आणि रूपें मूळ संस्कृत रूपापासून भिन्नता दाखवितात. उदा० दिव्याचा ( कंदिलाचा ) व दि(ं)व्याचा ( दिव्य वस्तूचा ) या ठिकाणीं संस्कृत नियमाप्रमाणें जोडाक्षरा-पूर्वीच्या अक्षरावर जोर येतो. पण पुढें मराठींत हा नियम सरसहा चालू राहिला नाहीं. सामान्य रूपांत हा नियम मोडला जातो. 'दिव्याचा' हा शब्द संस्कृत व मराठी दोन्हींत बाह्यतः सारखा दिसला तरी संस्कृत मूळ शब्द दिव्य आहे आणि मराठी मूळ शब्द दिवा आहे. म्हणून 'दिव्याचा' हे संस्कृत व मराठी दोन्ही शब्द खरे उच्चारानुसारीच आहेत. म्हणून 'दिव्य' याच्या सामान्यरूपाचे वेळीं 'दि' वर जोर दिला पाहिजे. देहान्त ( शिक्षा ) आणि देहांत ( सप्तमी ) ह्यांत परसवर्ण न लिहिला तर अर्थभेद होणार नाहीं. कोंवळा ( कोमल ), कांहीं ( किमपि ), सांवळा ( श्यामल ), आंवस ( अमावस्या ), चांफा ( चंपक ) इत्यादि शब्दांत संस्कृतचे अवशेष राहिलेले आहेत. आज आपण त्यांतील अनुस्वार उच्चारीत नाहीं म्हणून काढून टाकले तर आपण व्युत्पत्तीचा ठेवाच काढून घेतल्यासारखें होईल. शिवाय प्रत्येक बोलींत उच्चार भिन्न भिन्न होत असल्यामुळें उच्चारानुसारी लेखनांत विचारविनिमयास अडचण पडेल तें वेगळेंच. सर्व बोलींचें मूळ संस्कृतच असल्यामुळें संस्कृतनिष्ठा सर्वांस समान भूमिकेवर येण्यास साहाय्यीभूत होईल.

**ध्वनि आणि लेखन :**

जगांतील निरनिराळ्या समाजांच्या इतिहासाकडे दृष्टिक्षेप टाकला असतां बऱ्याच वेळां असें दिसतें कीं आधीं ध्वनि, भाषा, लिपि व नंतर भाषाशास्त्र तयार झालेलें आहे. भारतीय भाषाशास्त्र प्रथमतः तयार झालें. त्या भाषा-शास्त्रांत मूलध्वनींचें निश्चितीकरण व नियमीकरण झाल्यावर मग लिपि अस्ति-त्वांत आली. डॉ. कालेलकरांनीं आपल्या 'ध्वनिविचारां'तहि हेंच मत मांडलें

आहे. (पृष्ठ १५४). मूलध्वनींचा म्हणजे मूळ स्वर व व्यंजनें यांचा अभ्यास करून ते निश्चित व नियमित करून त्यावरच संस्कृत भाषा व लिपि यांचा विकास झालेला आहे. संस्कृतांतील शब्दरचना ही मूळ वर्ण व तिचे वैयाकरणी विकार यांवर उभारलेली असून बहुंशीं धातूंवरून वैयाकरणी विकार होऊन सिद्ध झालेली आहे. कांहीं मूलभूत संज्ञा सोडल्या तर संस्कृतची शब्दसंपत्ति बहुधा अशीच आहे. ही शब्दसंपत्ति वर्धिष्णु असून ती व्याकरणावरूनच वाढत गेलेली आहे. मुळांत संज्ञा आणि प्रत्यय तरी कसे आले हा प्रश्न आज गौण आहे. कारण त्या मूळ उगमाचा प्रभाव संस्कृतमध्यें पुढें नामशेष होऊन व्याकरणाच्या सिद्धान्तावरच संस्कृत प्रगल्भ होऊं लागली. केवळ बोलींतून एखादा शब्द किंवा रूपें भाषेंत येऊन बसलीं असें क्वचितच घडलें आहे. त्यामुळें संस्कृतच्या वर्णमालेचा व भाषाशास्त्राचा विचार करतां प्रचलित बोलीवर आधारलेलें आजचें चालू ध्वनितत्त्व निरुपयोगी ठरेल.

याउलट मराठी व इतर आर्य भारतीय भाषांचें आहे. या भाषा बहुंशीं बोलींतूनच निर्माण झालेल्या आहेत. मराठीची शब्दरचना ही संस्कृतप्रमाणें मूलसंज्ञेवरून व तिच्या वैयाकरणी विकारांवरून तयार झालेली नसून बोलींत जे सक्षम व सकस घणारे ध्वनी प्रभावी असतात त्यांवरून झालेली आहे. यामुळेंच लॅटिन किंवा संस्कृतप्रमाणें मराठी शब्द नवीन परिभाषेला पाहिजे तसा विकारक्षम नाहीं. ग्रांथिक भाषेचा त्याग करून बोलीचाच स्वीकार करण्यानें भाषेमध्यें ही एक मोठी उणीव राहणार आहे. मराठीचा जन्मच अपभ्रंशांत आहे. अपभ्रंश हा बोलींतूनच होत असतो. अपभ्रंश म्हणजे ध्वनींचा संक्षेप. उदा० अमावस्या–आंवस, सुवासिनी–सवाशीण, सुगृहिणी–सुग्रण.

हा संक्षेपहि पद्धतशीर होत असतो. अपभ्रंशांत वृद्धिक्षय झाला नाहीं तर एकूण मात्राकाल कायम ठेवून वर्णांची सोयीला येईल तशी उलटापालट केली जाते. ही सोय कोणती याला मात्र त्रिकालाबाधित नियम नाहीं. मात्रा

प्रवाही आहे याचा अर्थ ध्वनी अस्थिर असतात. ध्वनी स्थिर असते तर उच्चारपद्धतींत कालपरिस्थितीपरत्वें भेद पडत गेले नसते. संस्कृतांतील दोन निकट स्वरांचा शक्यतों संधीनें एक स्वर करण्याकडे असलेली प्रवृत्ति प्राकृतांत मूळ संस्कृतांतील व्यंजनाचा क्षय करून दोन स्वर निकट आलेले दिसतात. याउलट त्यापुढील मराठी बोलींत शब्दांतील एकूण स्वरसंख्याच कमी करण्याची प्रवृत्ति बळावलेली दिसते. हा स्वरक्षय मराठी बोलीचा विशेष आहे. उदा० सरकाराला—सर्कार्ला, देऊळांत—देवूळांत; त्याचप्रमाणें मूळ स्वरान्त शब्द व्यंजनान्त करण्याकडे मराठीची सर्हा पद्धति आहे. हरकत्, तबीयत्, विलायत् याप्रमाणें मराठीनें संस्कृतचे प्रवीण्, मस्तक्, संगम्, क्लिमिश्, पुस्तक्, तत्राप्, अथाप्, इ० शब्द व्यंजनान्त केले आहेत. संस्कृत-प्रमाणें आजहि फ्रेंच भाषेनें स्वरान्त शब्द कायम ठेविले आहेत. तर फारशी-प्रमाणें इंग्रजींत शब्द व्यंजनान्त ठेवण्याकडे अधिक कल आहे. उदा० फारशी इष्क्, दिल्नूर, हर्कत्, इंग्रजी डिस्मिस्, डिस्टिंग्विश्, बिल्डिंग्, डिस्पेन्सरी इ० इंग्रजी भाषेपेक्षां इंग्रजी बोली अधिक संक्षेपक आहे. इट्स् (its), डोन्ट (don't) विली (विलीयम), इझिंटिट (is not it).

याप्रमाणें बोली ही साधारणतः ध्वन्यनुसारी असते. बोलीप्रमाणेंच अपभ्रष्ट भाषा. ध्वनि हा अस्थिर असतो. बोलींतील ध्वनि याला 'चालू ध्वनि' म्हणूं आणि संस्कृत वर्णमाला ज्या ध्वनींवर आधारलेली आहे त्यांस 'मूळ ध्वनि' म्हणूं. मूलध्वनि निश्चित आणि नियमित केल्यावर जी वर्णमाला होते तीच प्रमाण मानावयास हवी. ध्वनींचा उपयोग वर्णनिश्चितीकरितां आहे, शब्दरचनेकरितां नाहीं. कारण भाषा वर्णांवर आधारलेली असावी लागते. चालू ध्वनीनें सिद्ध होणारी अपभ्रष्ट शब्दरचना भाषेचा मूलभूत घटक होऊं शकत नाहीं. परंतु चालू ध्वनीच्या अपभ्रष्ट शब्दरचनेवर भाषाशास्त्र उभें करूं म्हटलें तर मात्र संस्कृत वर्णमाला आणि त्यांतून उगम पावणारें व्याकरण, व्युत्पत्ति इ० सर्वच वेडेंवांकडें दिसूं लागेल यांत शंका नाहीं. आणि मग

बालबोध वर्णमाला आणि बाराखडी हीं अशास्त्रीय वाटून रोमन लिपि ग्राह्य वाटूं लागते. ( डॉ. कालेलकर ).

वरील विवेचनावरून हें ध्यानांत येईल कीं, ध्वनीवर लेखन अवलंबून ठेवतां येत नाहीं. ध्वन्यनुसारी लेखन म्हणजे संक्षिप्त लिपि (Short hand) म्हणावयास प्रत्यवाय नाहीं. संक्षिप्त लिपि एकाची दुसऱ्यास वाचतां येत नाहीं. संक्षिप्त लिपीमुळें समूळ वर्ण-लोप होईल. सुव्यवस्थित लिपि ही मनुष्याची प्रगतावस्था आहे असें मानतात. वर्णलोप म्हणजे पर्यायानें लिपिलोप, प्रगतीकडून परागतीकडे जाणें. थोडक्यांत, संक्षिप्त लिपि म्हणजे केवळ बोली. ध्वन्यनुसारी लेखन याचा अर्थ प्रगत मराठी भाषेचा विनाश करून रोमन लिपीच्या मार्गातील एक कांटा दूर करण्याचें शास्त्रीय हत्यार.

**भाषेंतील पोटभेद :**

भाषा दर दहा मैलांवर बदलते, असा एक भाषाशास्त्रांतील अनुभव आहे. या प्रादेशिक भेदाप्रमाणें भाषा-भेदाचीं इतरहि अनेक कारणें आहेत. व्यवसायाप्रमाणें भेद निर्माण होऊन त्या त्या व्यवसायाची परिभाषा आपोआप तयार झालेली असते. उदा० नाविक, महसुली, लष्करी, सुतारी, लोहारी, गवंडी, शिंपी, हिशेबी इ० व्यवसायभेदाप्रमाणें अनेक प्रकारांनीं भाषेमध्यें भेद निर्माण होऊन त्या त्या बोलींची त्यांतल्यात्यांत एक विशिष्ट भाषणी, व्याकरण आणि वाक्प्रयोग तयार झालेले असतात. जो प्रदेश परभाषेच्या सीमाभागाशीं जुळून येतो तेथें त्या त्या सीमा बोलीशीं त्या परकीय भाषांचा संयोग होतो. त्यामुळें त्या परभाषेंतील शब्द, शब्दप्रयोग इ० गोष्टी आपल्या सीमा-बोलींत मिसळल्या जातात. इतकेंच काय, उच्चाराची पद्धतीहि उचलली जाते. याप्रमाणें बोली स्थानिक स्वरूपाची असते. ग्रांथिक भाषा ही या सर्व बोलींना एकत्र आणणारी असते. तिचें स्वरूप स्थानिक नसतें. ती प्रत्येक बोलीच्या लहरीप्रमाणें बदलत नसून मूळ एक असलेल्या संस्कृतवरून आलेल्या व्याकरणाच्या नियमाप्रमाणें बांधली गेलेली असते.

या भाषाभेदांचें स्वरूप अनेक मार्गांनीं तयार होत असतें. कांहीं वेळां शब्द तोच असतो. परंतु तो निराळ्या अर्थानें किंवा छटेनें वापरला जातो. कैक वेळेला सबंध वाक्य शब्दशः आणि व्याकरणशः एकच असतें. परंतु त्यामुळें एका बोलींत होणारा अर्थ दुसऱ्या बोलींत एकदम भिन्न होतो. उदा० कोंकणांत ‘ वरणांत कोल्हं हागलं ’ असा एक वाक्प्रचार आहे. त्याचा पुणेरी भाषेंत अर्थ एक आणि कोंकणांत आवारांत गुरूं आलें असा होतो. कांहीं वेळां शब्द तोच असून त्याचीं रूपें मात्र भिन्न होतात. म्हणजे प्रत्यय भिन्न असतात. उदा० मीं, मिनीं, त्याला, त्यासनी. कांहीं वेळां परकीय शब्दांस मराठी प्रत्यय लागतात आणि कांहीं वेळेला शब्दहि परका व त्याचे प्रत्ययहि परके. विभक्ति भिन्न वापरलेली असते. मूळ संस्कृत शब्द एकच असून त्याचे अपभ्रंश भिन्न असतात. ठाणें जिल्ह्यांत दिडकी म्हणजे १/४ जुना आणा. देशावर पैसा म्हणजे १/४ जुना आणा. ठाणें जिल्ह्यांतील वन्य लोक दिडकीला दिरकी म्हणतात. हा ‘ ड ’ चा ‘ र ’ बऱ्याच ठिकाणीं होतो. त्याचप्रमाणें ठाणें जिल्ह्यांत नासरी हें एक कल्पित नाणें आहे. त्याची किंमत १/२ दिडकी ( १/८ आणा ). देशावर पै प्रचारांत आहे. तिची किंमत १/३ पैसा ( १/१२ जुना आणा ). अन्यत्र खालील भेद पाहा. इकडे–हकडं, पुढें–फुडं. मासनी=मी ची द्वितीया. मिनीं=मी ची तृतीया. देशावर शौचास जाणें, कोंकणांत परसाकडे ( परस म्हणजे आवार ) जाणें, कोकणांतील वन्य लोक झाड्याला जाणें, असा शब्दप्रयोग करतात. पुण्यांत परांजप्यांकडे जातों असें म्हणतात. सांगली-मिरजेस–परांजप्यांच्यांत जातों, असें म्हणतात. तसेंच पुण्यांत फार–अति झालें ( जेवतांना एखादा पदार्थ आग्रह करून पुष्कळ घातल्यास ), यास सांगलीमध्यें गर्दी झाली असें बोलतात. पुण्याकडे तूं काय करतो आहेस याला नागपुराकडे तूं काय करून राहिला आहे, असा प्रयोग करतात. साधारणतः पांढरपेशा वर्गांत निरोप देतांना ये असें म्हणतात. वन्य वर्गांत जा असें वापरतात. पांढरपेशा वर्गांत पाणी, गाणें, तेथें असें

बोलतात तर वन्य वर्गात पानी, गानं, तत (थ) असें म्हणण्याचा प्रघात आहे. पाऊस पडला याचे ऐवजीं वन्य लोक पानी पड ( र ) लं असें म्हणतात. फारशींतील वख्त हा शब्द फक्त खालच्याच वर्गानें घेतला. तख्त हा मात्र पांढरपेशाला आपल्या योग्यतेचा वाटला. त्याचप्रमाणें पाट लावणें, पदर लागणें हे वाक्प्रचार फक्त वन्य लोकांतच रूढ आहेत.

हे झाले शब्दप्रयोग करण्याचे प्रकार. आतां अेखादी गोष्ट किंवा वस्तुस्थिति सांगावयाची झाली तर ती सांगण्यांत किती फरक पडतो हें पाहण्यासारखें आहे. कथनाची पद्धतीहि बोलीप्रमाणें बदलते हें त्यावरून कळून येईल.

कै. हरि नारायण आपटे यांनीं Wilson Philological Lectures या व्याख्यानमालेमध्यें मराठी, तिचा उगम आणि वाढ या विषयावर दिलेलीं व्याख्यानें १९२२ सालीं प्रसिद्ध झालेलीं आहेत. त्यांतील पृष्ठें ३७ ते ४० मधील नमुने पाहा.

A certain man had two sons, and the younger of them said to his father, "father, give me the portion of the substance that falleth to me." And he divided unto them his living.

या इंग्रजी उताऱ्याचे हे १४ मराठी नमुने.

**( १ ) पुण्याचें मराठी**— कोणे एके माणसास दोन मुलगे होते. त्यांतील धाकटा बापाला म्हणाला, "बाबा, जो मालमत्तेचा वांटा मला यावयाचा तो दे." मग त्यानें त्यास संपत्ति वांटून दिली.

**( २ ) विजापुरी मराठी**—

कुनि योक मानसाला दोन ल्योक होते. त्यांतला ल्हानगा बापास म्हटला, बाबा, माजे वाटणीचा माल मला दे. मंग त्येन वाटनी करून दिली.

( ३ ) धारवाडा वाला—

एका मनुष्याला दोन मुलगे होते. आणि त्यांपैकीं धाकटा मुलगा त्याच्या बापाला म्हणाला कीं, बाबा, जिन्दगीपैकीं माझे हिश्श्याला येणारा भाग मला दे. तेवा त्याचा बाप आपला जिंन्गी विभाग करून दिली.

( ४ ) कोळी ( कोंकण ) बोली—

एका माणसाला दोन सोकरे होते. त्यामनचा धाकटा सोकरा बापासला जापला, बापुस, माजा धनाचा वांटा माना देस. तदं बापासजून धन वॉंटिलॅं.

( ५ ) कुणबी ( मुंबई ) बोली—

येके मानसाला दोन पूत होते. त्यानचा धाकला पूत आपलं पायसला बोतला, पाय, मजा धन वांटा माना द्यास. तवां त्याच्या पायसजून धन वॉंटिलॅं.

( ६ ) कुणबी ( ठाणें ) बोली—

. कोनी एका गिरिस्ताला दोन सोकरे होते. त्यामनचा धाकला बापासाला बोतला, बा, जो काय इष्टकिचा वाटा मला दियाचा तो दे. मग त्येन त्यांला जिनगानी वांटुनशानी दिली.

( ७ ) कुणबी ( पुणें जिल्हा ) बोली—

कोना एका मनुक्षाला द्वान मुलग व्हत. त्यांतला धाकला बापासनी म्हंगाला, बाबा जो जिनगीचा वांटा मला यायचा त्यो दे. मंग त्येन त्याला जिनगानी वांटुनशानी दिली.

( ८ ) परभी ( दमण, ठाणें ) बोली—

कोणी एक माणसाला दोन पोरं होती. त्यांतला लाना बापाला बोलला, बाबा, जो दौलतीचा भाग मला येयाचा तो दे. मग त्याजून त्याला दौलतं वांटून दिल्हीं.

( ९ ) धनगरी ( ठाणें जिल्हा ) बोली—

कुन्या एका मानसाला दोन ल्येक हुत. त्यांतला ध्याकला आपल्या बाला म्हनला, बा, मना मालमत्तेचा केव्याटा देतोस ते दे मना. बानं ती संपदा

त्येला वांटून दिली.

( १० ) सावंतवाडी ( कोंकणी )—

एका मनश्यक दोन चेडे आसले, आणि तांतलो धाकटो बापायक म्हणों लागलो, पाय, माका येवो तो संसाराचा वांटो माका दी. मागीर ताणें तांकां आपलो संसार वांटून दिलो.

( ११ ) कुडाळा कोंकणी—

एका माणसाक दोन झील होते. तेतुरलो न्हानगो बापाशीक म्हणूक लागलो,...

( १२ ) वऱ्हाडी वणी ( Wun ) जिल्हा बोली—

एका मानसास दोन पोर होते. त्यांतला लहान पोरग बापास म्हने, बाबा माझ्या हिस्श्याच माल मला देऊन टाक. तेव्हां त्यान आपल्या जिनगीच्या दोघा पोरांत वाटन्या केल्या.

( १३ ) नागपुरी ( जि. नागपूर ) बोली—

कोन्या एका मानसास दोन पोर होते, त्यांपैकीं लहान बापास म्हनाला, कीं, बाबा, जमेंत माहा जो हिस्सा असल तो मज दे. त्यानें धन वांटून देल्ल.

( १४ ) कारवारी—

एका गृहस्थास दोघ जना पूत आसिले. तांतुले पैकीं सानु आम्हा गेल्या बाप्सुकडे म्होनचा लागलो, आण्णा, मागेल्या वाट्या कायेवची तितली आस्ती माका दी. आनि तान्ने आप्‍ना गेली आस्तिताका वांटून दिली.

तरी यांत मराठीच्या सर्व बोली आलेल्या नाहींत. वरील नमुन्यांतील कित्येक शब्दांचा अर्थहि पुष्कळांस समजणार नाहीं.

**ग्रांथिक भाषेची आवश्यकता :**

एकाच संस्कृतीच्या समाजांत एकाच भाषेचे अनेक पोटभेद निर्माण होतात, हें आपण पाहिलें. या सर्व पोटभेदांवर आणि अधिकाधिक काळावर मात करून परस्परांस विचारविनिमयाचें अधिकाधिक सुगम आणि समान

साधन असणें आवश्यक तर खरेंच, पण तें प्रगत समाजाचें लक्षणहि आहे. वन्य जातींत अशी सोय नसल्यामुळें त्यांच्या विचारांची उंची आणि कल्पनेचें क्षितिज या गोष्टी कूपमंडूकाप्रमाणें अत्यंत संकुचित असतात. समाजाची प्रगति त्यांतील जनतेच्या बौद्धिक आणि मानसिक प्रगल्भतेवर अवलंबून असते. बौद्धिक आणि मानसिक व्यापाराचें क्षेत्र जितकें मोठें तितका त्याच्या प्रगतीला वाव अधिक. बौद्धिक आणि मानसिक व्यापाराचें भाषा हें एकच क्षेत्र आहे. भाषा जितकी प्रगल्भ तितकें विचारविनिमयाचें साधन सामर्थ्य-शाली. यासाठीं एकाच संस्कृतीच्या एकच भाषा बोलणाऱ्यांत समान माध्यम असणें आवश्यक आहे. मराठी संस्कृतीचे सर्व लोक मराठी बोलतात. परंतु भाषेच्या पोटशाखा आपण पाहिल्या तर दिसून येईल कीं, तात्त्विक विचार-विनिमय सोडून द्या, परंतु साधा व्यवहारहि समजणें किती कठीण आहे. जर निव्वळ बोली प्रमाण मानली तर कोंकणी माणसाला नागपुरी बोलणें समजणार नाहीं, कोंकण्याचें खानदेश्याला समजणार नाहीं; आणि मग अखिल मराठी जनतेच्या सांस्कृतिक प्रगतीला अडथळा झाल्याशिवाय राहणार नाहीं.

ज्याप्रमाणें एकाच काळांत अनेक भाषाभेद आहेत त्याप्रमाणें कालान्तरानेंहि भाषाभेद निर्माण होत असतात. अशा वेळीं मध्यवर्ती भाषाशास्त्राच्या नियमांस (प्रत्ययभेद, अर्थभेद आणि व्युत्पत्तिभेद यांस) अनुसरून शास्त्रसिद्ध केलेलें व्याकरणच अर्थबोध करून देईल.

उच्चारानुसारी आणि बोलीच्या सोयीवर आधारलेलें व्याकरण हें स्थानिक, संकुचित, अस्थिर आणि पदोपदीं व्यवहारांत अडणारें असें होईल. भाषेचा प्रवाही गुणधर्म लक्षांत घेतां अशा व्याकरणास त्याच्या अस्थिर, स्थानिक आणि एकांगी नियमांमुळें व्याकरण म्हणतां येईल कीं नाहीं हा प्रश्नच आहे. अर्थात्, व्याकरणाचा प्रश्न हा बोलीपुरता मर्यादित नाहीं. प्रत्येक बोलीस—ती वन्य असो अथवा नागरी असो—तिला तिच्या-

पुरतें व्याकरण हें असतेंच. प्रश्न आहे तो हा कीं, जर अशा बोलींतून एखादा सार्वजनिक स्वरूपाचा विचार सांगावयाचा असेल किंवा ग्रथित करून ठेवावयाचा असेल तर तो इतर बोलींत समजेल काय?

व्याकरण हें व्यवहारांत कदाचित्, विशेषतः अशिक्षितांस, एक मोठी अडगळ वाटत असेल यांत शंका नाहीं. अडगळ वाटण्यास कारणहि आहे. कारण असें कीं, प्रत्यहीं व्यवहारांत त्यामुळें सोय होत नसून अडचणच होते. कारण व्यवहारांतील बोलणें हें सापेक्ष असतें. बोलणाऱ्याची भूमिका ऐकणाऱ्यास माहीत असते. त्यामुळें बोलणारा उपयोग करीत असलेल्या शब्दांस अधिक स्पष्ट करण्याची आवश्यकता नसते. दुसरें असें कीं, तें बोलणें हें व्यवहार घडतो त्या वेळचें आणि तेवढ्याचपुरतें असतें. बोलणाऱ्याच्या उच्चाराचा परिचय ऐकणाऱ्यास बहुधा झालेला असतो. जर कदाचित् ऐकणारा अपरिचित असेल तर थोड्याशा परिचयानें आणि किंचित्शा खुलाशानें ऐकणाऱ्याला अर्थबोध होऊं शकतो. शिवाय व्यवहारांत आपण मोघम बोलत असतों. इतकें कीं, संभाषणांतील एखादें विचारपूर्ण असलेलें वाक्य बाजूला काढून त्रयस्थास ऐकविलें तर त्याचा त्याला कांहींहि बोध होणार नाहीं. बोलणाऱ्याचा उच्चारहि अस्पष्टच असतो. शब्दांचे उच्चार अस्पष्ट असणें हा नागरी बोलीचाहि गुण आहे. बोलतांना वाक्योच्चाराचा आणि शब्दोच्चाराचा संक्षेप करणें हा तर प्रत्येक मानवप्राण्याचा जन्मसिद्ध हक्क आहे.

बोलींत भाषेचा वापर हा व्यवहारासाठीं असल्यामुळें आणि त्या वेळीं भाषेपेक्षा व्यवहाराला महत्त्व अधिक असल्यामुळें बोलणाऱ्याच्या भाषेला साहजिकच गौणत्व येतें. अशा वेळीं तो संपूर्ण वाक्य किंवा त्रयस्थाला सांगण्याच्या वेळीं ज्या सुस्पष्ट शब्दयोजनेचा उपयोग करील तसा उपयोग तो समक्ष संभाषणात करीत नाहीं. त्या वेळीं विस्तृत आणि सुस्पष्ट वाक्यरचना ही निरर्थक आणि कंटाळवाणी झाल्यावांचून राहत नाहीं. वेळेचा अपव्ययहि

त्यास जाणवेल. एवढेंच नव्हे तर हें अवधान न सांभाळणारा मनुष्य अव्यवहारीच ठरेल. आलंकारिक, विचारपरिप्लुत, विद्वत्ताप्रचुर असें बोलणेंहि व्यवहारांत जवळ जवळ अशक्यच. तसें असलेंच तर डॉ. जॉन्सनसारखा मनुष्य—त्याच्या गाढ व्यासंगाबद्दल आदर राहूनहि—विक्षिप्तांतच मोडला गेला. आमच्या मतें सॉक्रेटिसहि याच वर्गांत मोडेल. प्रवचन किंवा व्याख्यान हें बोलीप्रमाणें मुखोत्पन्न असलें तरी त्याला ग्रांथिक भाषेचें थोडेंसें वळण असतें. परंतु तेव्हां भूमिकाच स्वतंत्र असल्यामुळें अनौचित्य किंवा अव्यवहारीपणा तेथें येत नसतो. सॉक्रेटिस प्रवचनें न देतां लोकांस व्यवहारांत अडवून बोलीच्या भूमिकेंतून तत्त्वज्ञान सांगत असे. त्यामुळें तो प्रथम जरी अव्यवहारी आणि विक्षिप्त समजला गेला तरी पुढें तो उपद्रवी ठरूं लागला. प्रचलित श्रद्धेला धक्का देणाऱ्या नवीन विचारांची त्यांत भर पडली, आणि या सर्वांचा परिणाम देहान्त शिक्षेंत झाला. लोक तत्कालीन न्यायाधीश आणि सरकार यांस दोष देतात. परंतु आम्हांस तसें वाटत नाहीं. आजहि एखादा अनोळखी मनुष्य रस्त्यांत भेटला आणि एकदम सरकारविरुद्ध बोलूं लागला तर तुम्हांस—तुम्ही त्या मताचे असलां तरी—तें आवडणार नाहीं. कारण अनौचित्य म्हणून आणि तुमच्या व्यवहारांत अडथळा येतो म्हणून. प्रथम तुम्ही मनाचा संयम ठेवून ऐकाल. पुढें व्याद वाटूं लागेल. शेवटीं उपद्रव देतो म्हणून पोलिसकडे तक्रार कराल. सॉक्रेटिसनें प्रवचनें दिलीं असतीं तर लोकांनीं त्याला पाठिंबा दिला असता. तुम्ही बाजारांत कपडा किंवा दागिना विकत घ्यावयास निघालांत. वाटेंत अनोळख्यानें कुठें चाललां म्हणून विचारलें. तुमच्या उत्तरावर तो जर, सोनें हें विष आहे, कपडा हा नुसता देखावा आहे, असें तुम्हांस थांबवून सांगूं लागला तर, त्याचा युक्तिवाद खरा असला तरी, या वेळीं कोण ऐकून घेईल ?

तात्पर्य, आलंकारिक किंवा विद्वत्ताप्रचुर बोलणें हें बोलींत शोभून दिसत नाहीं हें खरें. ग्रांथिक भाषेंत मात्र हेंच एक शोभादायक आहे.

बोलींत आपण फार खोल विचार मांडूं शकत नाहीं, त्याचप्रमाणें विचारांत मोजकेपणा आणि नेटकेपणाहि येऊं शकत नाहीं; एवढेंच काय, नवीन विचार लेखणीनें उतरविल्याशिवाय स्वतःचा स्वतःलासुद्धां त्याचा सुस्पष्ट बोध होत नाहीं. ग्रांथिक भाषेंतील हें विचारधन फार मोलाचें आहे. ज्या बोलींना लिपि किंवा ग्रंथ नाहींत त्या बोली स्वतः कमनशिबी तर खऱ्याच पण स्वतःबरोबर त्यांच्या संस्कृतीला कमनशिबी करतात, असा इतिहासाचा दाखला आहे.

**बोलींत बोलच कमी :**

बोली ही कधीं सुस्पष्ट आणि रेखीव रचनेची नसणार हें उघड आहे. त्याला कारणें दोन. एक म्हणजे बोलणारा इतका प्रतिभावान असतोच असें नाहीं. दुसरें असें कीं, जो ग्रांथिक भाषेंत शक्य होत नाहीं तो संक्षेप आणि संकेत बोलींत शक्य होतो. कारण बोलींत आपण नेत्रपल्लवी, करपल्लवी आणि स्वाभाविक अभिनय या जन्मसिद्ध कलांचा बराच वापर करतों. या कला आणि म्हणी हीं कोणत्याहि बोलीचीं भूषणें आहेत. सुदैवानें मराठीला हें लेणें भरपूर आहे. ज्यांना ग्रांथिक भाषा अवघड आणि अडगळ वाटते म्हणून जे ग्रांथिकचें महत्त्व कमी करून बोलींतील भाषा लेखनांत स्वीकारण्याचा आग्रह करतात, त्यांना कष्ट न करता विद्वत्तेचा बिल्ला लावावयास पाहिजे असेंच म्हटलें पाहिजे. कारण त्यांना बोलीचेंहि प्रेम नसतें. यांतील कितीजण जुन्या म्हणींचा बोलण्यांत उपयोग करतात ? किती लोक इंग्रजी टाळून जुने मराठी शब्द पुनः रूढ करण्याचा प्रयत्न करतात ? त्यांतील कोण कोण मराठींतून विचार करतात ? याचें उत्तम प्रात्यक्षिक आकाशवाणीच्या भाषेंत पाहावयास सांपडतें. ‘ काव्य ’ किंवा ‘ कविता ’ हा सुरेख शब्द टाकून इंग्रजी composition किंवा construction चें भाषांतर म्हणून ‘ रचना ’ हा शब्दप्रयोग करतात. त्यांचें ‘ गाणें ऐका ’ असें मराठींतून बोलण्याऐवजीं अमक्या चित्रपटांत ‘ त्यांना ऐका ’ ही इंग्रजी वाक्यरचना या लोकांस अधिक पसंत पडते. ‘ मंडळी ’ हा अस्सल मराठी

शब्द टाकून 'आणि इतर' हें 'and others' चें भाषांतर कशाला? आश्विन शुद्ध दशमी किंवा दिनांक ७ नव्हेंबर या ठिकाणीं 'किंवा' हें इंग्रजीच्या 'or' चें भाषांतर आहे. मराठी 'किंवा' याचा अर्थ विकल्प दर्शवितो. म्हणजे आश्विन शुद्ध दशमी असेल तर त्याच दिवशीं दिनांक ७ नव्हेंबर असणें शक्य नाहीं. हा खरा मराठी 'किंवा'चा अर्थ झाला. कलावन्त न म्हणतां कलाकार म्हणण्यानें हिंदीवरील प्रेम व्यक्त होतें काय? 'तुम्ही ऐकाल' ही इंग्रजीची पुनः लुडबुड कशासाठीं?

असो. बोलीच्या पुरस्कर्त्यांचा हा परधार्जिणेपणा घटकाभर सोडून दिला तरी बोली ही बोलकीपेक्षां मुकीच जास्त आहे. लहान मुलांस डोळे वटारून रागावणें, ज्या वेळीं दृश्य प्रतिकार शक्य नसतो अशा वेळीं किंवा प्रत्यक्ष प्रतिकार बोलून दाखविण्याच्या आधीं ती भावना मुखापेक्षां डोळ्यांवाटेच बाहेर पडलेली असते. दुःखी चेहरा हें मुकें काव्य आहे. त्याचप्रमाणें तारुण्यांतील नवीन प्रणयभावनेचा उगम केवळ डोळे आणि ओष्ठद्वयाची नाजूक आणि सूक्ष्म मांडणी यांतून केवढा मोठा आशय शब्दाशिवाय सांगत असतो! भीतीच्या पोटीं भेदरून गेलेला मुखवटा मुकेपणेंच तितकाच मोठा आशय व्यक्त करीत असतो. औत्सुक्यांतील नजरेची लकब, वात्सल्यांतील डोळ्याचें पाणी, आनंदातिशयांतील डोळ्यांचें डबडबणें, दीन विनवणींतील लोचनांची याचकता, मिष्किलपणांतील मिलाफ, तिरस्कारांतील नजरेचा नूर आणि प्रशान्त आणि प्रसन्न हृदयाचें प्रतीक, कमलनयनांतील शान्त प्रतिबिंब या सर्व मनाच्या विविध अवस्था केवळ निःशब्दतेनें मनुष्य व्यवहारांत प्रकट करीत असतो.

या नेत्रपल्लवीप्रमाणेंच बोलीचें आणखी एक अंग करपल्लवी. तिरस्कारानें हात झटकणें, घाई दाखविण्यासाठीं टिचक्या वाजविणें, आनंदानें टाळ्या वाजविणें किंवा टाळी देणें, रागानें हात उगारणें, प्रश्नार्थक हाताच्या पंजाची शंखाकृति हलविणें, जा किंवा ये अर्थानें चार बोटाची हालचाल

करणें, निरोप घेतांना हात उंचावणें, प्रेमभरानें पाठीवरून, केसांवरून हात फिरविणें, निराशेनें दोन्ही हात एकदम झटकणें, कथनाच्या आवेगाच्या वेळीं हात पुढें करणें, थांबविण्यासाठीं हात वर करून पंजा खालीं करणें, उत्तम अभिप्रायासाठीं आंगठा व तर्जनी यांचीं पुढील टोकें जुळवून हालविणें, इत्यादि अनेक भाव आपण एकाहि शब्दाचा वापर न करतां केवळ किंवा साह्य म्हणून हातानेंच व्यक्त करीत असतों.

आतां निःशब्द बोलहि पाहण्यासारखे आहेत. दुःखाच्या सुस्काराचा हंकार, 'सुटलों एकदांचा' या अर्थीं सुस्कार, तिरस्काराचा उ ऊंः !, थकव्याचा हुश्श, स्त्रियांच्या लज्जेचा इश्य, आणि आश्चर्याचा अय्या ! भीतीचा शंखध्वनि, समजलें या अर्थीं हं, प्रश्नार्थक आं ? आश्चर्याचा आँ ! आश्चर्याचा पण समजलें या अर्थीं उतरत्या स्वरांतील हंहंऽऽ ! दुःखाचा आवेग सहन झाला नाहीं म्हणून फोडली जाणारी किंचाळी, इकडे बोलाविण्याकरितां शुक् शुक्, दुसऱ्याला गप्प बसविण्याकरितां श् श् श्....दुःखदर्शक च् च् च् ! निराशा पुरी झाली कीं किंवा दुःखावेगाच्या शेवटीं ( असंच चालायचं आतां ) वरून खालीं, पुन्हां वर, खालीं अशी कमान घेणारा अखंडित सलग हंकार ( हंऽऽऽऽ ) इ० इ०

तात्पर्य, बोलींत बोलापेक्षां अभिनयच जास्त असतो. या अभिनयावांचून केवळ बोल निरर्थक ठरतात. किंबहुना बोलांचें महत्त्व आणि अर्थ त्यांच्या अभिनयावर अवलंबून असतात. अभिनय वगळला तर बोलांना अर्थ राहील कीं नाहीं याची शंका येते. 'ये' हा एकच शब्द किती अर्थांनीं उच्चारतां येतो ! शब्दकोशांत केवळ ये म्हणजे येण्यास सांगणें यापेक्षां निराळा अर्थ मिळणार नाहीं. पण बोलीमध्यें नुसत्याच कोशांतील अर्थाला किंमत नाहीं. प्रेमळ अभिनय करून 'ये' शब्द उच्चारणें, रागानें ये म्हणणें, मिष्किलपणें ये म्हणणें, हुकुमानें ये म्हणणें, विनवणीपूर्वक–याचनापूर्वक ये म्हणणें, आनंदानें ये म्हणणें, प्रणयांतील हांक देतांना ये म्हणणें इ० अनेक प्रकारांनीं

ये या एकाक्षरी शब्दाला अर्थ आहे. व्यवहारांत केवळ कोशांतील अर्थ पाहून ये म्हटलें तर किती अनौचित्य, अनर्थ माजेल ! त्याचप्रमाणें 'मीं आंबा खाल्ला' हें वाक्य विशिष्ट पद्धतीनें उच्चारलें तरच त्याला औचित्यपूर्ण अर्थ व्यवहारांत येईल. घरांत एका गृहस्थानें बारा आंबे विकत आणले. कांहीं वेळानें त्याला असें दिसलें कीं त्यांतील एक आंबा कमी आहे. तेव्हां त्यानें आपल्या मुलास हांक मारून विचारलें कीं, यांत एक आंबा कमी आहे, तो कोणीं खाल्ला ? तेव्हां एका मुलानें उत्तर दिलें, "**मीं** खाल्ला." या ठिकाणीं 'मीं'वर जोर देऊन तो बोलला. मधल्या वेळीं आईनें मुलास हांका मारून विचारलें कीं, कोणीं काय काय खाल्लें ? एका मुलानें उत्तर दिलें, "मीं **आंबा** खाल्ला." सायंकाळीं तो गृहस्थ कामावरून घरीं आल्यावर सर्वांनीं आंबे खाल्ले कीं नाहीं याची चौकशी त्यानें केली. तेव्हां प्रत्येकानें सांगितलें, "मीं **खाल्ला**." याप्रमाणें शब्द बोलण्याची, जोर देण्याची एक पद्धत आहे. ती सोडून बोलल्यास व्यवहार समजणें बरेचसें कठीण जाईल.

सारांश, बोलीवर अधिक भर देऊन आणि ती प्रमाण मानून तिला ग्रंथामध्यें बांधून ठेवली तर बोली बोलतांना जो प्रभाव पाडते तो ग्रंथांत पडणार तर नाहींच पण दुर्बोधता मात्र पदरीं आणील. कारण बोलीचा आत्मा बोल नसून अभिनय आहे. आणखी एक उदाहरण घेऊं. किंचित् फरकानें पण अन्याचदा अभिनयानें 'तूं काय केलेंस' या वाक्याचा आशय कसा बदलतो पाहा. "तूं काय केलेंस हें ! (भीति); '**तूं** केलेंस हें !' (त्यानेंच केलें आहे काय याची साश्चर्य प्रचीति); 'तू **काय** केलें आहेस' (कोणतें काम केलें यावर भर); 'तूं काय **हें** केलेंस ?' (हेंच काम त्यानें केलें काय याकरितां प्रश्न), 'तू काय **हेंच** केलेंस, झालें !' (एवढेंच काम करण्याबद्दल थोडीशी निराशा); 'तू काय काय केलेंस ?' (साधा प्रश्न).

**शुद्धाशुद्धविचार :**

आतांपर्यंत चर्चिलेल्या अनेक बाजूंनीं शुद्धाशुद्ध लेखनाचा विचार करणें

आवश्यक आहे. भाषेच्या बोली व पोटभेद या प्रत्येकाची घडण आणि व्याकरण स्वतंत्र असतें, हें प्रथम मान्य केलें पाहिजे. त्याचबरोबर जी ग्रांथिक भाषा तिचेंहि स्वतंत्र व्याकरण मान्य करावयास हवें. एका बोलींतील शब्द दुसऱ्या बोलींत तिच्या घडणीप्रमाणें नसेल तर तो शब्द त्या बोलींत अशुद्ध मानावयास हवा. व्युत्पत्तीचे किंवा प्रचलित उच्चारांचे सर्वसामान्य नियम न लावतां त्या भाषेंत अपभ्रंशाची धाटणी आणि संस्कृतवाणींतील उच्चारच गृहीत धरून एखादा शब्द शुद्ध किंवा अशुद्ध समजावा लागेल. उदा०— संस्कृत ‘ सिंह ’ याचा प्राकृतांत उच्चार ‘ सिंव्ह ’ असा होत असला तरी तो मराठींत अशुद्ध समजावा. भगिनीचा गुजराथींत ‘ बेन ’ व हिंदींत ‘ बहेन ’ असा अपभ्रंश होत असला तरी मराठीच्या प्रवृत्तीप्रमाणें तो ‘ बहीण ’ असा होत असल्यामुळें ‘ बहीण ’च शुद्ध समजावें. ‘ कोमल ’ याचें वन्य वर्गांत ‘ कवळं ’ किंवा पांढरपेशांत ‘ कोवळं ’ असा उच्चार असला तरी लोप झालेल्या ‘ न् ’चें अनुच्चारित अनुनासिक ठेवण्याची मराठी प्रवृत्ति अशा अनेक शब्दांवरून दिसत असल्यामुळें ‘ कोंवळें ’ हाच शब्द शुद्ध समजला पाहिजे. मराठीची घटना संस्कृतवरून आली आहे. म्हणून संस्कृत व्याकरणानें सिद्ध होणारे शब्द व त्यांचे विकार, मराठींत प्रचलित असलेले किंवा नवीन प्रचलित करावयाचे असल्यास, तसेच मराठींत उतरवावेत. उदा०—तत्त्व हा शब्द उच्चारांत ‘ त् ’चें द्वित्व येत नाहीं म्हणून ‘ तत्व ’ असा लिहूं नये. कारण त्याच्या मूळ अर्थास बाध येतो. तत् + त्व = तत्त्व. ‘ ब्रह्म ’ ह्या शब्दाचा प्रचलित उच्चार ‘ ब्रम्ह ’ असा आहे. म्हणून शुद्ध समजूं नये. कारण या ‘ ह्म ’तील ‘ ह्म ’ मण् ( म्हणणें ) चा अपभ्रंश होऊन आलेला नसून ‘ बृहत् ’ या धातूचें साधितनाम आहे. म्हणून ‘ ह्म ’ असाच लिहावा. ‘ ह्म ’ असा न लिहिला तर ‘ ब्रह्म ’ या शब्दाचा मूलार्थ ध्यानांत येणार नाहीं व मग आम्ही ‘ त्या ’ला ‘ ब्रह्म ’ म्हणत आलों म्हणून ब्रह्म म्हणावयाचें याशिवाय दुसरा युक्तिवाद सांपडणार नाहीं. पण

अमुक एका वस्तूला त्याच नांवानें कां संबोधावयाचें ? त्या वस्तूचा गुणधर्म सांगणारी ती संज्ञा असते म्हणून. 'तज्ज्ञ' हा शब्द 'तद् न्य' असा उच्चारूं नये, लिहूं नये. कारण 'तज्ज्ञ' याचा अर्थ तत् + ज्ञ = तें जाणणारा, असा होतो. मराठींत तज्ज्ञ ही संज्ञा कां आली हें यावरून समजेल. म्हणजे तज्ज्ञ या शब्दाचा अर्थबोध योग्य तो होईल. राहणें, वाहणें हीं रूपें प्रचारांत रहाणें, वहाणें अशीं असलीं तरी तीं अशुद्ध आहेत. कारण मूळ धातु राह्, वाह् असे आहेत. यास्तव राहणें, वाहणें असें लिहावें. जे मराठीच्या प्रकृतीच्या अनुसार मराठी विभक्तींचे प्रत्यय तयार झालेले आहेत त्या प्रत्ययांप्रमाणें व मराठीच्या सामान्य रूपाच्या नियमाप्रमाणें शब्दांचीं रूपें ग्राह्य समजावींत. जीं अव्ययें विभक्तींचीं रूपें आहेत त्या अव्ययांवर अनुस्वार द्यावा. उदा० त्यामुळें, याकरितां, योगें, संबंधीं इ०.

**मराठी शब्द मराठीच्याच घटनेंत बसला पाहिजे :**

प्रत्येक भाषेला स्वतंत्र धाटणी असते. प्रत्येक बोलीलाहि असते. ही धाटणी म्हणजे त्या भाषेची किंवा बोलीची ती घटनाच असते. ज्याप्रमाणें उपनयनसंस्कार झाल्याशिवाय ब्राह्मणाचा औरसपुत्रहि ब्राह्मण होऊं शकत नाहीं, म्हणजे तोंपर्यंत तो मुलगा शूद्र असतो, त्याचप्रमाणें भाषेचेंहि आहे. शब्दासहि संस्कार व्हावे लागतात. ते संस्कार ज्या घटनेचे असतील त्या बोलीचा वा भाषेचा तो शब्द होतो. आर्यभारतीय भाषा संस्कृतोद्भव आहेत. एकच संस्कृत शब्द अनेक मार्गांनी अपभ्रष्ट होतो आणि प्रत्येक भाषेची किंवा बोलीची अपभ्रंश करण्याची पद्धति वेगळी पण ठराविक असते. उदा० संस्कृत मध्य गुजराथींत मा, हिंदींत में, शिष्ट मराठी बोलींत मधें, अशिष्ट मराठी बोलींत मंदी. तो तो अपभ्रंश त्या त्या भाषेंत वा बोलींतच ग्राह्य मानला पाहिजे. केवळ संस्कृतवरून असाहि अपभ्रंश व्युत्पादिणें शक्य आहे. किंबहुना तो संस्कृतला अधिक जवळ आहे म्हणून भिन्न अपभ्रंश भाषेंत तो अपभ्रष्ट शब्द ग्राह्य धरतां येणार नाहीं.

तत्र या संस्कृत शब्दाचा निकटचा अपभ्रंश ' तत ' होतो. ' तेथें ' हा त्या मानानें फार दूरचा. परंतु तत ज्या बोलींत प्रचलित आहे त्या बोलींत नपुंसकलिंगी शब्द अकारान्त उच्चारतात. मराठींत मूळ अपभ्रष्ट शब्द तथ या तथला मराठी संस्कार देऊन शुद्ध केलें. मराठींत नपुंसकलिंगी एकारान्त संस्कार होऊन तथचा तिथें—तेथें झाला. शिवाय संस्कृतांतील मात्राकाल तथ या रूपांत महाप्राणानें प्रतीत होत आहे पानीयमूपासून आदिवासी पानी म्हणतात. शिष्ट मराठींत पाणी म्हणतात. डॉ. कालेलकर आदिवासींच्या ' पानी 'ला जास्त शुद्ध मानतात. परंतु शिष्ट मराठींतील न चा ण करण्याचा संस्कार झाल्याशिवाय 'पानी' ग्राह्य होणार नाहीं. म्हणून कोणताहि अपभ्रंश मराठीच्याच पद्धतीनें व्हावयास हवा व त्यावर घटनेप्रमाणेंच संस्कार झाला तर तो शुद्ध शब्द समजावा.

खरा वाद काय असावा ?

कालपरत्वें शुद्धलेखनांत सुधारणा करावी हें आम्हांस मान्य आहे. परंतु त्या सुधारणेनें लेखन अधिक शुद्ध व ताजें राहावें. त्यामुळें ग्रांथिक भाषा अधिक घोटीव व्हावी. नवीन सुधारणेनें व्याकरणदोष निर्माण होऊं नये. रूढीमुळें कांहीं आगंतुक अनुस्वार व ऱ्हस्वदीर्घ उत्पन्न होतात कीं ज्यांस व्याकरणाचा किंवा व्युत्पत्तीचा आधार नाहीं. हीं आगंतुकें नाहींशीं करावींत. प्रवाही भाषेचा कल लक्षात घेतां हितमूचें हीत, गुणःचें गूण, कविःचें कवी, विषमूचें वीष, इ० अन्त्य आणि उपान्त्य दोनहि स्वर ऱ्हस्व असलेले संस्कृत शब्द मात्राकाल कायम ठेवून दीर्घान्त करण्यास हरकत नाहीं. परंतु ग्रांथिक भाषेचें मध्यवर्ती स्थान लक्षांत घेतां हा स्थानिक अपभ्रंश वास्तविक मान्य होऊं नये. ग्रांथिक भाषेचें मध्यवर्ती व जास्तींत जास्त दीर्घायुषी स्वरूप पाहतां कालौघांत होणारे नवीन अपभ्रंश व मूळापासून दूर जाण्याची प्रवृत्ति जर रोखतां आली तर शुद्धलेखनांत सुधारणा करून ती रोखून धरली पाहिजे हें तर खरेंच पण त्याहूनहि शुद्धलेखनास अत्यंत महत्त्वाचें व नाजुक कार्य करावयाचें

आहे. तें म्हणजे ग्रांथिक भाषेचें सौष्ठव कायम ठेवून प्रचलित भाषेपासून ती दूर जात नाहीं ना, हें पाहणें. ग्रांथिक व बोली यांत समन्वय कसा राखावयाचा हा एक मोठा प्रश्न आहे.

ठाणें.

**‘ संस्कृत ’ कीं ‘ प्राकृत ’ ?**

सध्या गाजत असलेला शुद्धलेखनाचा प्रश्न हा केवळ अनुस्वार-कानामात्रेचा नाहीं. हा एक खोल व सनातन प्रश्न आहे. शास्त्रोक्त लेखन हें ग्राह्य आणि प्रमाण कीं केवळ नैसर्गिक बोली ही ग्राह्य व प्रमाण हा खरा प्रश्न आहे. त्याच्याहि पाठीमागें गेल्यास माणसानें ‘ संस्कृतपणें ’ वागावें कीं ‘प्राकृत’पणें हाच मूलभूत प्रश्न आहे हें दिसून येईल. अलीकडील दोनशें वर्षांत सर्व जगांतच भौतिक शोधांच्या अनुषंगानें अशी एक प्रवृत्ति निर्माण झाली आहे कीं ज्यांतून व्यक्तित्वाची जागृति, आत्मविश्वास आणि अहंकार पोसला गेला. शास्त्राच्या संशोधनक्षेत्रांत अर्थात्च हा गुण ठरला हें निर्विवाद आहे. परंतु जेथें संशोधन नाहीं, जेथें फक्त अनुकरण आहे अशा क्षेत्रांतूनहि या गुणांचा फैलाव झाला. मात्र तेथें तो दुर्गुण ठरत आहे. शास्त्रीय संशोधनाच्या क्षेत्रांत पुनर्निरीक्षण, अभ्यास आणि सिद्धान्तसाधना होती. त्या व्यतिरिक्त अनुकरण क्षेत्रांत म्हणजे सामान्य व्यक्तिजीवनांत केवळ आशंका, अश्रद्धा आणि बुद्धिभेद एवढेंच निर्माण होऊं शकलें. त्याचा परिणाम असा झाला कीं, शास्त्रोक्त आचार किंवा विचार गर्हणीय होऊन केवळ यथाभूत नैसर्गिक आविष्कार हाच जणुं मौलिक सिद्धान्त होऊन बसला. जणुं सामान्य मनुष्य शास्त्रीय प्रगतीनें अशास्त्रीय होऊं लागला !

मुखोत्पन्न ध्वनींचा अभ्यास करून, त्यांतील मूलभूत ध्वनींचें वर्गीकरण करून एक पायाभूत अशी वर्णमाला मानली गेली. भाषेंतील प्रत्येक शब्दाची घटना त्या चौकटींत बसविली. शब्दाचीं रूपें नियमबद्ध करण्यांत आलीं. त्यामुळें अर्थनिश्चिति सुलभ झाली. नवीन शब्दरचनाहि सुलभ झाली. वाङ्मयनिर्मिति सुकर आणि प्रगल्भ झाली. अशा तऱ्हेनें भाषा समृद्ध

झाल्यावर जिच्या पायावर हें सर्व होऊं शकलें ती मूळ वर्णमाला व तिचें व्याकरण हेंच आतां ओझें वाटूं लागून मनुष्य सहजपणें जें बोलेल ती बोलीच खरी, असा अशास्त्रीय सूर वाहूं लागला आहे; म्हणून उच्चारानुसारी लेखनच योग्य; व्याकरण आगंतुक आणि कृत्रिम आहे, या कल्पना लोकप्रिय होऊं लागल्या आहेत.

संस्कृत भाषा ज्या वेळीं ग्रंथनिविष्ट होत होती, सुसंस्कृत मनुष्यच ती भाषा ज्या वेळीं बोलत असे त्या काळांत अज्ञानी समाज प्राकृत भाषा बोलूं लागला होता. पण म्हणून प्राकृतांच्या सोयीसाठीं संस्कृतमध्यें मुद्दाम फेरबदल करण्यांत आला नाहीं. त्यामुळें संस्कृतच्या सौष्ठवांत कोठें कमतरता आली नाहीं. संस्कृतपासून प्राकृत झाली पण संस्कृत विकृत झाली नाहीं !

भाषेच्या नियमाप्रमाणें भाषा कालान्तरानें विकारवश होते. ही सहज झालेली विकारवशता भाषेंत विकृति न आणतां कालौघाप्रमाणें ती ताजी-तवानी ठेवली जाते. परंतु अडाणी लोकांसाठीं कृत्रिम सोयी करूं गेल्यास ती बदलत्या काळांत ताजी राहण्याऐवजीं विद्रूप मात्र होईल.*

---

* लॉर्ड रे महाराष्ट्र इंडस्ट्रियल म्युझियमच्या वतीनें वासंतिक शास्त्रीय व्याख्यानमालेंत मिति २६ मे १९६३ रोजीं दिलेलें व्याख्यान.

## २. मराठीचें भवितव्य

मराठी भाषेचा उत्कर्ष होण्यासाठीं मराठी जनतेचें जीवन निर्विघ्न आणि निरामय असावें हें ओघानेंच येतें. परंतु तेवढ्यासाठीं, म्हणजे मराठी जनतेचें जीवन निर्विघ्न होईपर्यंत मराठी भाषेचा उत्कर्ष खोळंबून राहावा असें नाहीं. सामाजिक जीवनांत असा खोळंबा होत नसतो. प्रवाह कधीं थांबून राहात नसतो. सर्व गोष्टी एकसमयावच्छेदेंकरून चालू असतात. कांहीं प्रवाह जोरांत वाहतील, कांहीं संथ वाहतील; कांहीं खळखळतील, कांहीं वांकडें वळण घेतील; कांहीं शुद्ध तर कांहीं गढूळ वाहतील. तात्पर्य, मराठी भाषेकरितां प्रयत्न करण्यासाठीं महाराष्ट्राचें जीवन निर्विघ्न होईपर्यंत वाट पाहाण्याचें कारण नाहीं.

वास्तविक मराठी वाङ्मयाची निपज भरपूर होत आहे. शिक्षणसंस्थांचा सुकाळ आहे. साहित्यपरिषदादि संस्थांची संख्याहि कमी नाहीं. त्यांचीं संमेलनें वा परिषदा दरवर्षी होतात; परंतु मराठी भाषेंत कोठें काय खटकतें आहे आणि त्यामुळें ती खुरटत चालली आहे याची जाणीव आम्हांस आहे हें दाखविणारें आमचे हातून कांहीं घडत नाहीं. याकरितां त्या दिशेनें प्रयत्न व्हावा असें फार फार वाटतें. साहित्यसंस्था, साहित्यसंमेलनें आणि साहित्यिक मराठीच्या रोपट्यास खतपाणी भरपूर घालीत नाहींत असें म्हणणें धाष्टर्याचें होईल. परंतु या खतामुळें त्या रोपट्यास नवीन नवीन पालवी फुटून नुसता पर्णसंभार वाढत आहे, ह्यावरच ते समाधानी आहेत असें दिसतें. रोपट्याला फुलें, फळें किती येतात आणि तें उंच वाढतें कीं नाहीं ह्याकडे कोणाचें

दृष्टि गेलेली दिसत नाहीं. खत घालण्यांत कांहीं दोष आहे किंवा पानावर न दिसणारी परंतु मातींत मुळाला लागलेली कीड आहे का, ह्याची छाननी करावयास पाहिजे. कांहीं खतें अशीं असतात कीं, तीं केवळ पर्णसंभार वाढवितात. कांहीं फुलें व फळें भरपूर देतात. मराठी भाषेंत अशा तऱ्हेचा कोठें दोष आहे किंवा काय, असल्यास तो काढून कसा टाकतां येईल, असा प्रयत्न चाललेला आमच्या तरी पाहण्यांत नाहीं.

मराठी भाषा मराठीच्याच पिंडांतून लिहिली बोलली जावी, मराठी वाङ्मय मराठी संस्कृतीच्याच द्वारां आविष्कृत व्हावें, अशी आंच आजच्या प्रथितयश साहित्यिकांत आहे असें वाटत नाहीं. या सर्व गोष्टींचा विचार केला म्हणजे मूळ मराठी भाषेच्या पिंडांत जन्मतःच कांहीं दोष आहे किंवा काय, महाराष्ट्राच्या मातींतच एखादी कीड लागलेली नाहीं ना, अशी शंका येते. याचाच विचार या लेखांत करण्याचें आम्हीं योजिलें आहे.

शब्दसंपत्ति आणि विचार व भावना प्रकट करण्याची शैली यांपासून मुखोद्गत भाषा निर्माण होते. नाम आणि क्रियापद हीं भाषेचीं दोन प्रमुख अंगें. नाम आणि क्रियापद यांच्या संयोगानें वस्तूविषयीं ज्ञान होऊं शकतें. परंतु मनुष्याला केवळ एखाद्या वस्तूचें ज्ञान होऊन भागत नाहीं. त्याच्या जीवनाचा बोध व्हावा असें असेल तर त्याचें अंतःकरण आणि बाह्य वस्तु यांच्या परस्परसंबंधानें जो परिणाम घडतो तो समजला पाहिजे. यालाच मानवी भावनेचें प्रकटीकरण असें म्हणतात. प्रत्यक्ष वस्तुस्थितीचें ज्ञान होणें आणि भावना व्यक्त करणें ह्या दोन स्वतंत्र गोष्टी आहेत. ज्या भाषेचीं हीं दोन्हीं अंगें सामर्थ्यशील आहेत तीच भाषा प्रभावी व चिरंजीव होऊं शकते.

मृत्यु ही एक वस्तुस्थिति झाली. पण तिचा माझेपैकीं कोणाशीं संबंध आला व तें मला माझेपैकींच दुसऱ्या कोणास सांगावयाचें झालें तर तो ‘ मृत्यु पावला ’ असें मी म्हणणार नाहीं. मी म्हणेन “ तो आम्हांला सोडून गेला. ” वस्तु आणि त्यासंबंधीं प्रसंगानें भावना व्यक्त करणें याचा

व्याकरणाच्या दृष्टीनें पुष्कळ वेळां कांहीं संबंध नसतो. 'मृत्यु पावणें' आणि 'जाणें' ह्या दोन शब्दांचा किंवा क्रियापदांचा परस्परांशीं काय संबंध आहे ? ही जी भावना व्यक्त करण्याची शैली ह्यांतच भाषेचें चिरंजीवत्व बरेंचसें सांठविलेलें असतें.

या शैलीप्रमाणेंच शब्दसंपत्तीवरहि भाषेचें चिरंजीवत्व अवलंबून आहे. जशी भावना व्यक्त करतां आली पाहिजे तसा शब्दहि निर्माण करतां आला पाहिजे. 'व्यापणें' वरून विष्णु, 'बृहत्' यावरून 'ब्रह्म', 'गम्' यावरून 'जगत्' इत्यादि धातूंपासून नामें साधण्याची संस्कृतची जी धाटणी आहे त्यामुळें संस्कृतमधील प्रत्येक शब्दांत एक गूढार्थ भरलेला आहे. त्याच्याच योगानें नवीन परिस्थितींत नवीन शब्द निर्माण करण्याचें सामर्थ्य संस्कृतला आलें आहे. ही शब्दांची आणि 'शैलीची' सृजनशीलता त्या भाषेंत एक प्रकारचें वैशिष्ट्य आणते. ही एक स्वतंत्र मोडणीच होऊन बसते. या मोडणीमुळेंच भाषा स्वतंत्रपणें जगूं शकते. अशा भाषेला 'स्वतंत्र' भाषा म्हणतां येईल.

संस्कृतचे धातू निर्लेप असल्यामुळें त्यांपासून साधित नामें सुकर आणि शोभिवंत होतात. प्रत्यय आणि नामापासूनहि साधले जाणारे धातू ही संस्कृतची दुसरी संपत्ति आहे. संस्कृतचीं हीं अवजारें शब्दांचें पीक उत्तम येण्यास कारणीभूत झालेलीं आहेत. तर संस्कृत भाषा जे लोक बोलत होते त्यांची सर्वांगांनीं समृद्ध अशी संस्कृति ही भावना व्यक्तविणाऱ्या शैलीस कारणीभूत झालेली आहे.

ज्या भाषेंत हें सामर्थ्य नाही त्या भाषेला दुसऱ्या भाषेवर अवलंबून राहावें लागतें. दुसऱ्याचीं वस्त्रें स्वतःच्या अंगाला ठाकठीक तर बसत नाहींतच परंतु दिसण्यांतहि बावळट दिसतात. अशा भाषेला 'दुय्यम' भाषा म्हणूं.

मराठी भाषा सर्व दृष्टींनीं दुय्यम भाषा आहे. वस्तुतः मराठी ही संस्कृतोद्भव आहे. ती दुय्यम कां राहावी तें समजत नाहीं. संस्कृत ही ज्या

आर्यसंस्कृतींतून उजळली त्या आर्यसंस्कृतीच्या उतरत्या कालांत संस्कृत भाषेपासून अपभ्रष्ट भाषा निर्माण झालेल्या आहेत. संस्कृतीचा भाषेवर परिणाम होतो तो तर हा नव्हे ना? तथापि संस्कृतची मौलिक संपत्ति मराठीनें कां घेतली नाहीं? मराठीचे धातू निर्लेप नाहींत. मराठीचीं क्रियापदें बहुधा कांहीं ना कांहीं रूपेंच आहेत. त्या रूपांना आणखी रूपें चिकटविणें जमत नाहीं. शिवाय रूपांचा लेप मौलिकता घालवितो. त्यामुळें संस्कृतप्रमाणें मराठींत धातुसाधितें तयार करतां येत नाहींत. रोमन लिपींत एकापुढें एक वर्ण जोडून अक्षरें बनतात त्याप्रमाणें मराठींत समासांचे अभावीं शब्दांपुढें शब्द जोडून वाक्य तयार करावें लागतें.

रामरक्षेंतील श्लोक पाहा.

ध्यायेत् ( १ ) आजानुबाहुं ( २ ) धृत-शरधनुषं ( ३ ) बद्धपद्मासनस्थं ( ४ ) पीतं वासो वसानं ( ५ ) नवकमलदलस्पर्धिनेत्रं प्रसन्नम् । ( ६ ) वामाङ्कारूढसीतामुखकमलमिलल्लोचनं ( ७ ) नीरदाभं ( ८ ) नानालङ्कारदीप्तं ( ९ ) दधतमुरुजटामंडनं रामचन्द्रम् ॥ आतां ह्याचें मराठी वाक्य कसें तयार होतें पाहा.

( १ ) ज्याचे हात गुडघ्यापर्यंत लांब आहेत. ( २ ) जो धनुष्यबाण धारण करणारा. ( ३ ) बद्धपद्मासन घालून बसलेला. ( ४ ) ज्यानें पीतांबर परिधान केलेला आहे. ( ५ ) ज्याचे डोळे नवीन कमलदलाप्रमाणें सुंदर आहेत. जो प्रसन्न आहे. ( ६ ) ज्याची दृष्टि डाव्या मांडीवर बसलेल्या सीतेच्या मुखाकडे लागली आहे. ( ७ ) ज्याची कांति मेघाप्रमाणें आहे. ( ८ ) जो अनेक प्रकारच्या अलंकारांनीं सुशोभित असून ( ९ ) मोठ्या जटांचें भूषण धारण करीत आहे अशा श्रीरामचंद्राचें ध्यान करावें.

संकृतांत समासानें व प्रत्ययानें बरेंचसें काम भागतें. भावना व्यक्तविण्याची शैली संकृतच्या मानानें मराठींत निकृष्ट आहे. ह्याला दोन कारणें— एक म्हणजे मराठी संस्कृतीच्या लोकांस पारतंत्र्यांत बरींच वर्षे खितपत पडावें

लागलें. त्यामुळें मराठी संस्कृति खुरटलेली आहे. ह्याचा मराठी प्रतिभेवर परिणाम झाला. साधारणतः शतकाशतकाला महापुरुष उदयास येत असत. परंतु संस्कृति जिवंत ठेवणें हेंच बहुधा त्यांचें कार्य असे त्यामुळें त्यांचा प्रभाव भाषेवर पडावा तितका पडला नाहीं. मराठींत प्रथमपासून आतांपर्यंत प्रामुख्यानें संतवाङ्मयच झालें. संतवाङ्मय लोकजागृतीकरितांच होतें, हें त्यांच्या वाङ्मयावरून स्पष्ट होतें. मराठींत पाणिनी–पतंजलि कां झाले नाहींत ? ह्याचाच अर्थ मराठी लोकांना कधींहि स्वास्थ्य लाभलें नाहीं.

दुसरें असें कीं मराठी लोकांचें जीवन बरेंचसें पारतंत्र्यांत गेलें असल्यामुळें पूर्वींच्या वाङ्मयांत भावना व्यक्तविण्याची शैली चांगल्या प्रकारें निदर्शनास आली असली तरी त्या त्या काळच्या परक्या राज्यकर्त्यांमुळें भाषेचा पगडा मराठीवर बसला व जुनें वळण मागें पडून नवीन भेसळ झालेली आहे.

मुसलमानी अमलांत बादशहा, दफ्तर, हुजूर इ० राज्यकारभारांतील शब्द; पोषाक, दुरुस्ती, हक्क, बेत इ० सामाजिक शब्द; बाज, खाना, बर, गीर, नवीस, दार, इत्यादि प्रत्यय हे सर्व फारशींतून मराठींत घुसले. इंग्रजी अमलांत टेबल, टाईम, कोर्ट, सोजीर, तिकीट, रूळ, कप, कोट, बायल; हे व शास्त्रीय सुधारणांमुळें रूढ झालेले फोनो, टेलीफोन, मोटार, सायकल, रेडिओ, इ०; मनोविश्लेषण, जीवनाचें तत्त्वज्ञान, सुनीत इ० वाङ्मयीन शब्द. शिवाय इंग्रजी कल्पनांचें मराठी भाषांतर–नक्राश्रु, नूतन वर्षाभिनंदन, हस्तांदोलन, चहापार्टी; पत्राचे मायने—प्रिय, विश्वासू इ० अगदीं किरकोळ कारणासाठीं आभार मानणें ( Thanks ), खेद ( Sorry ) प्रदर्शित करणें व शाबासकीच्या ऐवजी अभिनंदन करणें, शाळामास्तर, कायदेपंडित इ० मिश्रसमास या गोष्टी परकी भाषेच्या वर्चस्वाचीं उदाहरणें आहेत.

प्रवचन-कीर्तनें याऐवजीं अध्यक्ष नेमून व्याख्यानें देणें ही पद्धत आहे. आहेराचे ऐवजीं भेट म्हणणें, लग्नमुंजीचे वेळेस पानसुपारीस पार्टी अगर पेय

देणें, अक्षतीच्या ऐवजीं निमंत्रण-चिठ्या देणें, माल देण्याचे आधीं पैसे घेणें ( म्हणजे तिकिट ), आचार्य किंवा गुरु याऐवजी शिक्षक किंवा प्राध्यापक, मंडळी किंवा कुटुंब याऐवजीं सौभाग्यवती ( मिसेस ) म्हणणें इ० संस्कृति बदलल्याचीं लक्षणें आहेत. ही भेसळीची क्रिया आजहि अव्याहतपणें चालू आहे. नुसती भेसळच झाली असती तरी एकवेळ निभावून नेतां आलें असतें. परंतु आमच्यावर परकीयांचा, विशेषतः इंग्रजांचा इतका पगडा बसला आहे कीं राजकीय आधिपत्य गेल्यावरहि सांस्कृतिक आधिपत्य किती शतकें राहणार आहे याची धास्ती वाटते. इंग्रजपूर्व सत्ताधाऱ्यांनीं आमच्या देशावरच राज्य केलें असेल. परंतु इंग्रजांनीं आमच्या मनावर व बुद्धीवरहि सत्ता गाजविली आहे. अव्वल इंग्रजींतील मराठीच्या मोहऱ्यांनींच हा कित्ता घालून दिला आहे. लोकहितवादी, चिपळूणकर यांच्या लेखनांतून लोकजागृतीचा घोष असला तरी त्यांत इंग्रजी संस्कृतीचाच पाठपुरावा केलेला आढळेल. आगरकरांची समाजसुधारणा ही इंग्रजांचीच बौद्धिक नक्कल होती. त्याचप्रमाणें मराठीचें भाषाशास्त्रहि इंग्रजीचें अंधानुकरण करून तयार होत आहे. आगरकरांची वाक्यपृथक्करणाची आणि प्रत्यक्षाप्रत्यक्ष वाक्यरचनेची इंग्रजीमधून आणलेली पद्धति मराठीला वैय्याकरणी सौष्ठव आणणारी नाहीं. स्वातंत्र्यवीर सावरकरांचीं नवीन शब्दांपासून साधलेलीं नामसाधित क्रियापदें मराठीला न शोभणारीं आहेत. मराठींतील भाषाशुद्धीचा प्रयोग, शुद्धलेखनांतील आणि लिपींतील नवीन नवीन सोयी इ० मराठीच्या पिंडाला मारकच होतील अशी भीति वाटते.

मराठीची आजची वर्धिष्णू शब्दसंपत्तिहि मराठीच्या प्रकृतीस मानवणार नाहीं. शब्दसंपत्ति ज्याप्रमाणें संस्कृतसारखी निर्लेप धातूपासून वाढत जाते त्याचप्रमाणें परकीय शब्दांमुळेंहि वाढत जाते. भाषा ही नदीप्रमाणें आहे. तिच्या पात्रांत अनेक प्रवाह येऊन मिळतात. हें अपरिहार्यहि आहे. परंतु कितीहि प्रवाह आले तरी ते मूळ पात्रांत एकजीव होऊन ते त्या नदीचें

पात्रच वाढवीत असतात. भाषेंत येऊन मिळणारे शब्दप्रवाह असेच एकजीव झाले पाहिजेत. पण त्यामुळें मूळ भाषेची प्रकृति बिघडतां कामा नये. परका शब्द आला कीं तो नुसता येत नाहीं. उदा० हक्क या शब्दास आमच्या संस्कृतींत अधिकार आणि कर्तव्य हे शब्द आहेत. ते हक्क या शब्दापेक्षां अधिक उदात्त आहेत. तिकिट किंवा कूपन शब्द माल देण्याच्या आधींच त्याची किंमत वसूल करून देणारा आहे. रेल्वे किंवा पोस्ट यांची तिकिटें एकदां दिलीं कीं त्यांचा मोबदला योग्य दिला जातो कीं नाहीं ह्याची जबाबदारी त्या रेल्वे किंवा पोस्टावर नसते. प्रेमविवाह हा शब्द प्रेमविवाह रूढ होण्यापूर्वींच साहित्यिकांनीं सुरू केला. प्राचीन ‘ आचार्य ’ किंवा ‘ गुरु ’ ह्यांची योग्यता शिक्षक किंवा प्राध्यापक यांजकडून कोणी अपेक्षीत नाहीं. सामाजिक क्रान्ति हाहि शब्द असाच आहे. हे दोन शब्द वांझपणें एकत्र आलेले आहेत. जी गोष्ट आमूलाग्र आणि अचानक बदलली जाते, बदलण्याची क्रिया अत्यंत थोड्या वेळांत होऊन लगेच संपते तिलाच क्रान्ति हा शब्द लावतां येईल. राज्यक्रान्ति अशा तऱ्हेनें शक्य आहे. परंतु कोणताच समाज अचानकपणें, क्षणार्धांत बदलून ती बदलण्याची क्रिया दुसऱ्याच क्षणीं संपुष्टांत येणें अशा स्थितीला कधींच पोचत नाहीं. भारतीय समाजाचा पिंड तर कधींच असा नव्हता व नाहीं हें गेल्या १५० वर्षांत चांगलें प्रत्ययास आलें आहे. मनुष्यसमाजांत नेहमीं हळू हळू आणि थोडथोडाच बदल होत जातो. Social revolution चें वेड युरोपांतून आमचेकडे आणलें गेलें. परंतु तें फक्त प्रचारकी वाङ्मयांतच राहिलें. परकीय भाषेंतील संस्कृति त्या शब्दामागें येते. किंबहुना असें म्हणणें अधिक प्रशस्त कीं आधीं संस्कृति येते व मग तिचा द्योतक शब्द येतो. ‘ स्वतंत्र भाषेंत ’ परकीय शब्द केवळ नवीन परिस्थितीचे द्योतक म्हणून येतात. त्या शब्दांमुळें शब्दवृद्धीशिवाय भाषेवर इतर परिणाम होत नाहीं. इंग्रजींतील Direct व indirect वाक्यरचनेची पद्धति आगरकरांनीं आणली. त्यामुळें

' तो आपल्या घरीं गेला ' असें न म्हणतां ' तो त्याच्या घरीं गेला ' असें आतां आम्ही म्हणूं लागलों. ' I am afraid व I am glad that असे वाक्यप्रयोग अनुक्रमें एखादी वाईट गोष्ट सांगण्याचे पूर्वी व चांगली गोष्ट सांगण्याचे पूर्वी इंग्रजींत वापरतात. त्याचें अनुकरण करून आम्हीं ' मला अशी भीति वाटते कीं...' आणि ' मला आनंद होतो कीं......' असे शब्दप्रयोग रूढ केले. त्याचप्रमाणें इंग्रजी शब्दांचा मराठी वाक्यांत सर्रास उपयोग करणें. उदा० माझे **फादर बॉम्बेला** गेले. त्यांचें **लेटर** आलें आहे. आज मीं **डॉक्टरांकडून टायफॉइडचें इंजेक्शन** घेतलें आहे. आमच्या **मिसेस सिक** होत्या म्हणून आज **लीव्ह** घेतली आहे. **रेल्वेचें टाइमटेबल रिसेंटलीच चेंज** झाल्यामुळें आतां **एट-थर्टीनच्या लोकलनें ऑफिसमध्यें** अगदीं **इन्-टाइम** जातां येतें. या **एक्झॅमिनेशनमध्यें** मला **फर्स्ट क्लास** मिळणें अगदीं **इंपॉसिबल** आहे. हीं झालीं इंग्रजी नामांस मराठी क्रियापदें. आतां इंग्रजी क्रियापदांचा मराठी अवतार पाहा. वैद्य रोग्याला म्हणतो, " मी तुला एक्झॅमिन करतों. " त्या मुलाला मी बीट केलें ( मारलें ). ठराव पास झाला. गाडी मिस झाली. मी डान्स करतों. ललित वाङ्मयांत अशा मिश्र शब्दप्रयोगांचा भरणा विशेष असतो. याप्रमाणें मराठींत नवीन परकीय शब्दांनीं मराठीची वाक्यरचना बरीच बदलली, व्याकरण आणि भावना व्यक्तविण्याची शैलीहि बदलली. जुन्या शैली कालाच्या उदरीं गडप झाल्या. जुने शब्द अंधारांत गेले. कारण जुनी संस्कृतिहि लोपत चालली. मूठ मर्दाई ( गुंडगिरी पुंडावा ), उन्हाची लूक ( सन्स्ट्रोक ), झुंझुरकें किंवा चिमणचेटकें ( चिमण्याची चींव चींव ऐकविणारा सूर्योदया-पूर्वीचा थोडका काळ ), इत्यादि नादमधुर समर्पक शब्द आतां अदृश्य झाले. ' रात्रीं पडणारा पाऊस ' एवढया मोठ्या शब्दसंभाराऐवजी ' रातवा ' हा शब्द किती छान आहे ! प्रेमकलह या कृत्रिम शब्दास ' लाड झगडा ' हा किती गोड प्रतिशब्द आहे. पंक्तिप्रपंच करणें, सोंवळें-

भांडें टेवणें हे शब्दप्रयोग आतां कोणास माहित असण्याचें कारण नाहीं. कारण आतां पंक्तिहि नाहीं आणि सोंवळें तर त्याहून नाहीं. कांसोट्याचें पाणी प्यावें ही म्हण तर जिभेआडच झाली. शुद्ध आचाराचा आदर्शच खालीं आला तर कांसोटाच काय पण कोटसुद्धां इतका स्वच्छ आढळणार नाहीं! पण कांसोटा स्वच्छ राहण्यास आतां धोतरच कुठें जाग्यावर आहे? भाषा ही संस्कृतीची सावली आहे. परंतु राजकीय पारतंत्र्यामुळें राजकर्त्यांचे शब्द व शब्दप्रयोग येण्यास त्या शब्दांची सांकृतिक बैठक प्रथम तयार व्हावयास हवी असें नाहीं. अशा वेळीं संस्कृतिशिवायहि शब्द येऊं शकतात. 'स्वतंत्र भाषेंत' भावना व्यक्तविण्याच्या शैलींतून शब्द निर्माण करण्याची जी शक्ति असते तशी शक्ति 'दुय्यम भाषेंत' नसते. शब्दसंपत्ति या शैलींतूनसुद्धां वृद्धिंगत झाली पाहिजे. मराठीच्या नशिबीं हें भाग्य दिसत नाहीं. शब्दसंपत्ति आणि भावना व्यक्तविण्याची शैली यासंबंधींची ही अडचण मराठी वाङ्मयावर फार मोठा परिणाम करीत आहे.

इंग्रजपूर्व कालांत लोकजागृतीच्या निमित्तानें कां होईना, पण मराठी वाङ्मय चांगलेंच उजाळून निघालें होतें. त्या वाङ्मयाच्या लेखकांचें व्यक्तिमत्व तितक्याच श्रेष्ठ प्रतीचें होतें. आत्यंतिक कळकळ, तन्मयता, स्वभावाचा विशिष्ट बाणा आणि वर्ण्य विषयांतील पांडित्य या सर्वच बाबतींत त्यांचे ठिकाणीं गुणांचा उत्कर्ष झाला होता. वाङ्मय हें त्या लेखकांच्या उज्ज्वल ध्येयाचें साधन होतें, अभ्यासाचा परिपाक होता, तळमळीला वाट फोडून वाहणारा झरा होता. अभिजात वाङ्मयाच्या निर्मितीला आणखी काय पाहिजे?

अव्वल इंग्रजींत व नंतर वाङ्मयाचा सुकाळ झाला. वाङ्मय स्वतंत्र झालें. पैलू वाढले. मोजक्या लेखकांची मिरासदारी संपली. मागें पडलेलें, जुनाटलेलें मराठी वाङ्मय जगाच्या वाङ्मयाबरोबर येऊन आधुनिक बनलें.

'हें सर्व मान्य करूनहि मराठी वाङ्मयाचें भवितव्य धोक्यांतच आहे असें नाइलाजानें म्हणावें लागतें. प्राचीनांतून अव्वल इंग्रजींत व अव्वल इंग्रजींतून

चालू काळांत वाङ्मयाची उंची कमी कमी होत आहे. यापुढील काळांत मराठी वाङ्मय आणखी किती खालावणार आहे कांहीं समजत नाही. वाङ्मयाप्रमाणेंच लेखकांची उंचीहि अशीच खालावलेली दिसते. प्राचीनांतील ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास, वामनपंडित, मोरोपंत या उत्तुंग शिखरांचे पुढें अव्वल इंग्रजींतील न्यायमूर्ति रानडे, विष्णुशास्त्री चिपळूणकर, आगरकर, सावरकर, लोकमान्य टिळक, इतिहासाचार्य राजवाडे, डॉ. केतकर इत्यादि मंडळी डोंगर म्हणून तरी शोभतात. यांचेनंतर सन १९३५ पर्यंतचे लेखक कांहीं तरी टेकाडें वाटतात; पण अलीकडील काळांत सर्वत्र भुईसपाट झाल्याचा भास होतो. याला कारण आस्ते आस्ते तीव्र तपस्येचा होत चाललेला लोप!

उच्च तत्त्वांचे संस्कार ढिले होऊं लागले तसें वाङ्मयनिर्मितीस तपस्येची आवश्यकता असते ही कल्पनाच नष्ट होऊं लागली. विचारांची झेप तोकडी पडूं लागली. जीवनांतील क्षणिकतेला महत्त्व आलें. त्यामुळें वाङ्मयाचे विषय ‘ क्षणिक ’ झाले. यंत्रयुगाचा परिणामहि कांहीं थोडा झाला नाहीं. प्रसिद्धि-सुलभता अवास्तव वाढली. प्रसिद्धिलोलुपताहि वाढली. त्यामुळें अभिजात लेखक मागें पडला. चिरन्तन तत्त्वें सांगणारा ज्ञाता आणि अतिकाळांत पाहणारा द्रष्टा अडगळींत जाऊन पडला! पर्वतांचीं उत्तुंग शिखरें आणि सागराचीं अथांग क्षितिजें दृष्टीच्याच काय पण बुद्धीच्याहि आड जाऊन जवळचें टेकाड गगन-भेदी वाटावें, टेकाडाचा आडोसा दिगन्त क्षितिज बनावें, आनंदाची अत्युत्कट भावना आणि संकटांची परिसीमा, जीवनाचें साफल्य आणि वैफल्य, सार्थता आणि व्यर्थता सारें कांहीं तेवढ्यातेवढ्यांतच गर्दी करून राहावें अशी खुरटी अवस्था झाली. याचेंच प्रतिबिंब वाङ्मयांत पडलें. वाङ्मयांतील विचार उथळ होत चालले. लेखनांतील भाषेची प्रतिष्ठा नष्ट होत चालली. इंग्रजी अंमलामुळें वाङ्मयास नवीन वळण लागलें, याचेंच आम्ही बरेच दिवस कौतुक करीत राहिलों. वाङ्मय स्वतंत्र झालें खरें पण विचार पर-

तंत्रच राहिले. वाङ्मयाचा सुकाळ झाला पण उंची कमी झाली. पैलू पाडले पण तेज मंदावलें. संस्कृतचे बंध सुटले पण इंग्रजीची गुलामगिरी आली. मिरासदारी संपली पण अनभ्यस्तांचें पीक वाढलें.

प्राचीन वाङ्मयाचे विषय जरी जुने असले तरी ते अभिजात वाङ्मयास शोभतील असे भव्य आणि लोकाभिमुखी होते. मानवी जीवनाचा आदर्श आणि साधना यांचें दिग्दर्शन ज्यांत होतें, मनुष्याच्या जीवनांत पडोपडीं अडखळावयास लावणाऱ्या नैतिक समस्या उलगडण्याचा ज्यांत प्रयत्न होता, प्रपंचानें होरपळून उद्विग्न झालेल्या आणि मोहून मग्न झालेल्या मनुष्यास नवीन दृष्टि देऊन मनःशांतीचा मार्ग दाखविणारा दिलासा ज्यांत होता, ते समर्थांचा दासबोध, तुकारामाचे अभंग इत्यादि संतवाङ्मय म्हणजे तात्पुरती वेळ मारून सारवासारव करणारें पोकळ पांडित्य नसून कोणत्याहि युगांत, कोणत्याहि प्रसंगास, कोणाचीहि बुद्धि तरतरीत करील अशी हेमगर्भाची मात्रा होती. लोकांच्याच भाषेंत लोकांच्या श्रद्धेला आवाहन करून लोकांच्या जीवनाचें प्रतिबिंब उमटवून त्याचा अर्थ सांगणें हेंच अभिजात संतवाङ्मयाचें कार्य आहे. त्यांत तत्त्वज्ञानाचें निरूपण होतें. जुन्या सिद्धान्तास उजाळा होता. जुन्याच वृक्षाला नवीन मोहोर होता. नवीन प्रकाशहि होता. समाजाची धारणा सुधारण्याची त्यांत शक्ति होती.

आधुनिक ललित वाङ्मयाला नवीन विषय पुष्कळ लाभले. परंतु त्यांत इंग्रजीचीच नक्कल पुष्कळ आहे. तें लोकाभिमुखहि नाहीं. जे आमच्या समाजांत रूढ नाहींत व सामान्य व्यक्तीस परिचित नाहींत असे परंतु इंग्रजी समाजांत प्रत्यहीं रूढ असलेले विषय केवळ भाषांतरित होऊन आमच्या वाङ्मयांत—समाजांत नव्हे—रूढ झाले. आमच्या लोकांच्या जीवनाचें प्रतिबिंब उमटेल असे विषय बहुधा वाङ्मयांत नसत. प्रणय आणि सामाजिक क्रान्ति हे विषय आमच्या समाजास अद्यापिहि पारखे आहेत. परंतु आधुनिक मराठी वाङ्मयाच्या ह्याच गंगोत्री जन्मोत्री होत! विचारप्रवर्तक वाङ्मय

अव्वल इंग्रजींत जें निर्माण होऊं शकलें त्याचें प्रमाण नंतरच्या कालांत खालावलें. पहिल्या विद्वानांवर जुन्या संस्कारांची छाप अद्यापि कायम होती. त्याच्यांत बुद्धीची चमक दिसत होती पण त्यांच्या लेखनांत नवीन शिक्षणानुसार विषयांचा त्रोटकपणाहि जाणवत होता. त्यांची शैली भारदस्त होती पण विषयाची भूमिका तोकडी वाटत होती. इष्ट विषयांतील सर्वच विषय अभिजात वाङ्मयाला पुरेसे नव्हते. स्फुट लेखनानें वाङ्मयाच्या भव्यतेला एकदम आळा घातल्यासारखा झाला. लोकहितवादी, आगरकर यांनीं सामाजिक सुधारणेचा स्फुट-लेखांतून घोष चालविला; परंतु साग्र नवीन स्मृति लिहिण्याची कोणास कल्पना सुचली नाहीं. चिपळूणकरांनीं स्वतःला मराठी भाषेचा शिवाजी म्हणवून घेण्यांत धन्यता मानिली. परंतु ते मराठीचे 'पाणिनी' व्हावयास हवे होते. तसेंच संस्कृत व इतर विद्वानांविषयीं म्हणावेंसें वाटतें. त्यांचें पांडित्य अगाध होतें; परंतु मराठी वाङ्मयास व्हावा तसा त्यांचा उपयोग झाला नाहीं. कोणीं इंग्रजींतून लिहिलें तर कोणीं मुळांत लिहिलेंच नाहीं. मराठीला संस्कृतप्रमाणेंच व्याकरणाची भक्कम बैठक तयार करून एखाद्यानें तरी पाणिनी-पतंजली व्हावें आणि इतरांनीं भाषेची वाट मळवून द्यावी. पण तसें कांहींच झालें नाहीं. डॉ. केतकर आणि इतिहासाचार्य राजवाडे यांनीं मात्र बुद्ध्या मराठींत ग्रंथरचना करून मराठीला प्रतिष्ठा मिळवून दिली. मराठी वाङ्मयापेक्षां मराठी विद्वान अधिक श्रेष्ठ होते. वास्तविक ही स्थिति भाषेला पोषकच असते. परंतु मराठींत हिचा विपर्यास झालेला आहे. आतांच सांगितल्याप्रमाणें मराठी विद्वान लेखनाच्या भरीस फारसे पडत नसत. जे लिहीत, ते इंग्रजींत किंवा मराठींत त्रोटक लिहीत. जो स्वतः प्रकांडपंडित आहे; जो मराठींत लेखन करतो; ज्याच्या लेखनांत मौलिक विचार, भारदस्त लेखनशैली आणि भव्य विषय आहेत, ज्याच्या लेखनाच्या चतुःसीमाहि भव्य आहेत आणि ज्याच्या लेखनापेक्षां जो स्वतः अधिक श्रेष्ठ आहे अशा सर्व गुणांनीं युक्त असावें असा

संगमोत्सुक विद्वान विरळाच !

आजच्या मराठी वाङ्मयांत अभिजात वाङ्मयाचीं बीजें सहसा आढळत नाहींत. केवळ शास्त्रीय किंवा तात्त्विक विषयावर लिहिलें म्हणून तें वाङ्मय अभिजात या पदवीस चढत नाहीं. ग्रंथप्रकाशनाचें धंद्यांत झालेलें रूपांतर, तदनुषंगिक प्रसिद्धिसुलभता, योग्य शिक्षण आणि संस्कार यांचा अभाव यामुळें अभिजात वाङ्मयाची आशा खुंटते. प्राचीन मराठी वाङ्मय व संस्कृत वाङ्मय काळाच्या प्रमाणांत अत्यल्प आहे. काळमर्यादा लक्षांत घेतां अद्यापिहि मराठीच्या जननक्षमतेला पुष्कळ अवसर आहे."

परंतु परकीय सत्तेच्या वर्चस्वामुळें निर्माण होणाऱ्या संस्कृतीच्या मिश्रणावस्थेंत अभिजात वाङ्मयाचा लेखक निपजणें दुरापास्तच असतें. व्यक्तीच्या मानसिक आणि बौद्धिक संवर्धनाचें कार्य संस्कारांच्या कर्तव्यकठोर चाकोरींतूनच अधिक जोमानें चालतें. मिश्रणावस्थेंत पूर्वश्रद्धा लोप पावून नवीन श्रद्धा अद्यापि निर्माण व्हावयाची असते. मनाचा नैष्ठिक गुण नष्ट होतो. नवीन प्रवाह केवळ मनुष्याच्या प्रवाहपतितत्वामुळें अनिरुद्ध होतात. त्यामुळें आंचारविचारांत अस्थिरता व उथळपणा दृढमूल होतात. अशा स्थितींत सुदीर्घ तपस्येची कल्पनाच विरून जाते. मग अभिजात वाङ्मयास आवश्यक असणारें भव्य व्यक्तिमत्व कोठून दिसणार ?

एवढ्यासाठींच लहानपणापासून मुलांस शाळांतून आणि घरांतून संस्कारबद्ध करून टाकावें. शिक्षणाचें साधन आणि साध्य दोन्ही बदलावीं लागतील. मराठी घडण तयार करणारा 'पाणिनी' निपजावा लागेल. प्रथितयश साहित्यिकांना 'मराठी मराठींतूनच लिहूं' असा बाणा दाखवावा लागेल. 'जें लिहूं तें स्वतंत्र आणि तत्त्वशुद्धच लिहूं' अशी ग्वाही त्यांस द्यावी लागेल. तरच यांत सुधारणा शक्य आहे.

# ३. भाषाशैलीचें रहस्य

भाषाशैली म्हणजे मनांतील विचार स्पष्ट करण्याची पद्धति. लेखकाच्या स्वभावाप्रमाणें भाषाशैलीला स्वरूप येत असतें. शैली विचारांवर अवलंबून नाहीं. एकच विचार प्रत्येक मनुष्याच्या भिन्न स्वभावाप्रमाणें भिन्न मार्गानें मांडला जातो. मनामध्यें विचार करून मत ठरविण्याची पद्धतीच स्वभावावर अवलंबून आहे. ज्या पद्धतीनें विचार केला जात असेल त्याच पद्धतीनें तो लोकांपुढें मांडला जातो. म्हणूनच भाषाशैलीवरून लेखकाचा स्वभाव ओळखला जातो. हीच कल्पना पुढें वाढविली तर असें म्हणतां येईल कीं, भाषेवरून त्या समाजाची संस्कृति कळेल. शब्दच्छेद केलाच तर त्यांतून संस्कृतिदर्शन सहज होईल.

विशिष्ट शैली येण्यासाठीं भावनेची उत्कटता आवश्यक आहे. प्रत्येक भावनेला स्वतःचा एक विशिष्ट आविष्कार ठरलेला आहे. तो कोणत्याहि रूपानें बाहेर पडला तरी त्यावर भावनेची छाया दाट पडल्याशिवाय राहणार नाहीं. हलुवार अंतःकरणाचा मनुष्य कांहीं करूं लागला, बोलूं लागला कीं त्याचा स्वभाव त्यांतुन प्रतीत होत असतो. अर्थात् लिहितांनाहि तोच स्वभाव प्रतिबिंबित होणार. हलुवार मनाचा व कठोर मनाचा असे दोघे आजाऱ्याची शुश्रूषा करू लागले तर त्या दोघांच्या करण्यांत फरक स्पष्ट होतो. दोघेंहि एकाच प्रेमळ भावनेनें काम करतील. परंतु तें करितांना मात्र फरक दिसून आल्याशिवाय राहणार नाहीं. आजाऱ्याशीं बोलतांनाहि हाच भेद दिसून येईल.

'आपणांस स्वातंत्र्य मिळविलें पाहिजे' हा एकच विचार भिन्न स्वभावाच्या व्यक्ती आपापल्या परीनें कसा मांडतील पाहा. निधड्या छातीचे करारी आणि निर्भीड स्वभावाचे लोकमान्य टिळक म्हणतील, "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे. तो मी मिळविणारच." स्वभावाला धकाधकीचे प्रसंग सहसा न मानवणारे, किंचित् भिडस्त, सौम्य स्वभावाचे परंतु आंतल्या आंत जळफळाट होऊन शेवटीं उपरोधाचें शस्त्र धारण करणारे शि. म. परांजपे म्हणतील, "इंग्रज खरोखर किती गोड अंतःकरणाचे, कळकळीचे आहेत. स्वतःला त्रास झाला तरी चालेल पण दुसऱ्याचें हित त आधीं बघतील. दुसऱ्याला स्वतःचें हित कळत नसेल इतके ते बाल असतील तर त्यांना कधीं गोड बोलून तर कधीं थोडा शब्द पालटून इंग्रज त्यांस समजावून देतील. एवढ्यानेंहि भागलें नाहीं तर ते स्वतः त्यांच्याकरितां कष्ट सोसून त्यांचें हित साधून देतील ! आपण भारतीय लोक खरोखर फार बाल आहोंत. आपणांस नुसतें सांगून भागत नाहीं. ब्रिटिशांना आपल्याकरितां किती कष्ट सोसावे लागत आहेत ! पण ते सोसूनहि आपणाला ते स्वतः प्रत्येक गोष्ट करून देतात. जर ती आपण केली तर ती कशी वापरावयाची हें आपणांस कळणार नाहीं. कारण आपण लहान आहोंत, म्हणून आपला सर्व कारभार तेच बघत असतात. पण त्यांना तरी आपण असा किती त्रास द्यावयाचा ? बिचाऱ्या इंग्रजांचें आतां वय झालें आहे. पेन्शनीला आले आहेत. आतां त्यांना ही दगदग होत नाहीं. या उतार वयांत कष्टाळू म्हाताऱ्या बापाचे काय हाल होतात हें त्याच्या जिवावर उड्या मारणाऱ्या उनाड मुलाला काय कळणार ? तेव्हां असा उनाडपणा सोडून द्या आणि आपल्या मायबाप सरकारला ह्या वयांत तरी थोडी विश्रांति द्या." भावनाशून्य व तर्कानें निघणाऱ्या विचारांवर मदार ठेवणारे, चौफेर दृष्टि फेकून सारासार विचार मांडणारे न. चिं. केळकर सांगतील, "भरतखंड ही भारतीयांची भूमि आहे. इंग्रज हे इंग्लंडांत राहणारे रहिवाशी आहेत.

त्या त्या देशावर तद्देशीयांचाच हक्क असणार. तेव्हां हिंदुस्थानांत हिंदी लोकांचें राज्य असणें हें सयुक्तिक ठरेल." अत्यंत भावनाप्रधान व प्रेमळ मनाचे साने गुरुजी अशा तऱ्हेनें आपला भाव व्यक्त करतील : " भरतखंड ही माझी मातृभूमि आहे. त्या आईनेंच मला जन्म दिला. त्या आईच्याच दुधावर मी वाढलों. तिच्याच अंगाखांद्यावर बागडलों. त्या भूमातेनें माझ्या पाठीवर एकदां तिचा प्रेमळ हलुवार हात फिरविला कीं माझें हृदय पावित्र्यानें भरून जातें! त्या मातृदेवीकडे एकदां पाहिलें म्हणजे माझ्या साऱ्या जीवनाचीं दुःखें पार कुठें पळून जातात! ही भूमि माझी आई आहे. ही भूमि माझें जीवन आहे. ही भूमि माझें दैवत आहे. हिला मी मुक्त करणारच; नाहीं तर मी तिचा मुलगाच नव्हे. मग तिच्या अंगाखांद्यावर बागडायला, तिचं प्रेमळ दर्शन घ्यायला, तिला आई म्हणण्याला मला काय अधिकार आहे ?"

अशा तऱ्हेनें प्रत्येक व्यक्ति आपल्या मनाच्या ठेवणी–घाटणीप्रमाणें आपले विचार प्रकट करीत असते. शैली कधीं घोटून घोटून येत नसते. केवळ शब्दसमृद्धीनें ती साध्य होणार नाहीं. शैली भावनेंत आहे, शब्दांत नाहीं. ज्या लेखकांना मनाची एक विशिष्ट निश्चित घाटणी नाहीं, ज्यांना तळमळ नाहीं वा भावनेची उत्कटता नाहीं, भावनेचा भार मनाला सहन होत नाहीं म्हणूनच लिहावयास प्रवृत्ति होते अशी ज्यांची स्थिति नाहीं आणि केवळ विचारस्पष्टीकरणार्थ तर्कशुद्ध शब्दांची ओळ लावीत बसतात त्यांना भाषेची सफाई आणि तर्कशुद्धता साधली, पण शैली कधींहि साधली नाहीं. आणि ह्यांतच बहुतेक लेखक मोडतात. ह्याच्या उलट ज्याचें भाषावैभव बेताचेंच आहे, परंतु भावनेची उत्कटता आहे, त्याच्या भाषेला शैली येणारच. तथापि त्याचेजवळ भाषाप्रभुत्व नाहीं हें दिसेल. परंतु त्या दृष्टीनें थोडा प्रयत्न झाल्यास त्याची भाषा शैलीदार आणि सुखावह होईल. एखाद्या उत्कट भावनेनें प्रेरित झाल्यावांचून भाषेला एकसारखा ओघ

आणि तो ओघ ज्या भावनेच्या रसाचा आहे तो रसाळपणा असाध्य आहे. केवळ विचार कर करून कृत्रिम तऱ्हेनें केलेली शब्दयोजना आणि वाक्यरचना नीरस होते. भावनोत्कटतेनें लिहून झाल्यावर त्यावर पुन्हां एकदां हात फिरविला तर तें दुधांत साखर पडल्याप्रमाणें होईल.

भाषेवरून लेखक ओळखतां येणें हें त्या शैलीचें एक लक्षण आहे. भाषेंतून स्पष्ट होणारा विचार आणि त्याच्या प्रतिपादनाची पद्धति हीं मनाच्या विशिष्ट साच्यांतून बाहेर पडलेलीं असतात हें वर सांगितलेंच आहे. अर्थात् मनांतून उत्पन्न होणारी प्रत्येक गोष्ट विशिष्ट छापाची असणार हें उघडच आहे. रंगेल स्वभावाच्या प्रा. फडक्यांच्या लेखनांत शृंगारिक वर्णनें व सौंदर्यविलास आढळावा ह्यांत आश्चर्य नाहीं. सर्वसामान्य व्यावहारिक मोह होतांक्षणींच उच्च नीतितत्त्वांची आठवण होऊन मनांत चलबिचल उत्पन्न होणारे भिडस्त व पापभीरु कादंबरीकार वि. स. खांडेकर ह्यांच्या लेखनांत शब्दागणिक दोन मनांचा लढा प्रतीत होणें स्वाभाविक आहे. पोरवयांतील खोड्याळपणा व मिष्किलपणा बोकिलांच्या भाषेंत तंतोतंत उतरलेला वाचतांना मनांत गुदगुल्या झाल्यावांचून राहत नाहींत. माटयांच्या भाषेंतील दणकटपणा, स्वतंत्रपणा व निश्चितपणा त्यांची शारीरिक व मानसिक दणकट प्रकृति दोन ठोसे देण्याघेण्याची तयारी व स्वतंत्र वृत्ति व्यक्त करिते.

भाषाशैलीचें मूळ कशांत आहे व शैलीचे लेखक कसे निर्माण होतात याचा मानसशास्त्रीय दृष्ट्या शोध करणें मनोरंजक आहे. शैलीच्या लेखकाचा जीवनेतिहास ह्या दृष्टीनें पडताळून पाहणें उपयुक्त ठरेल. त्याच्या शैलीची कारणपरंपरा त्याच्या गतजीवनांतच मिळेल; कारण शैली ही मनोवृत्तीवर अवलंबून आहे, आणि मनोवृत्ति परिस्थितीनें संस्कारित असते. परंतु हेंहि खरें आहे कीं, प्राप्त परिस्थितीकडे पाहण्याचा दृष्टिकोन मूळ मनोवृत्तीवरच अवलंबून असतो. परिस्थितीचे वरचेवर आघात होऊं लागले म्हणजे मन

मनोवृत्तीवर त्यानुसार संस्कार घडत जातात. दारुण परिस्थितीशीं झुंजण्याचा प्रसंग खांडेकर, गोकील, साने, फडके व टिळक ह्या सर्वांनाच आलेला आहे. परंतु गोकिलांची वृत्ति तशीच कायम आहे असें वाटतें. संकट आलं असतां ते खिन्न होऊन बसतील, त्यांतून कसेबसे पार पडतील. पण तो प्रसंग निघून जातांच त्याकडे विनोदानें पाहून पुन्हां खोड्याळपणा करण्यास त्यांची तयारी आहे. खांडेकरांनीं आलेल्या संकटावर तात्त्विक चर्चाच जास्त केली असेल संकट निघून जाईल, परंतु त्याची काळजी खांडेकरांच्या डोक्यांत विचाररूपानें किती तरी काळ घुटमळत राहील. फडक्यांच्या मार्गांत धोंड आली असतां ते म्हणतील, " बरं झालं, तितकंच एक संकट कमी झालं. जसजशीं संकटं जास्त जास्त येऊन जातील तितकं यश जास्त जास्त जवळ येईल." आणि असें म्हणून ते पुढील उद्योगास नेटानें लागतील ! खांडेकरांप्रमाणें ते नसती चिकित्सा करीत बसून डोकें तापवून कधीं घेणार नाहींत. जसजशीं संकटें जास्त येत जातील तसतसा त्यांचा स्वभाव निढावत गेला असेल, बेफिकीर वृत्ति बळावली असेल. ह्याच्या उलट स्थिति साने गुरुजींची आहे. आलेलीं संकटें त्यांना अधिकच हळवे करून टाकतात. त्यामुळें सहिष्णुता व सहानुभूति हे दोन गुण त्यांच्या प्रेमळ स्वभावांत दिवसेंदिवस भर टाकीत जातात.

शैलीचे लेखक निर्माण होण्यासाटीं शैलीच्या स्वभावाचीं माणसें निर्माण होणें आवश्यक आहे. शैलीचा स्वभाव म्हणजे विशिष्ट व्यक्तिमत्त्व. व्यक्तिमत्वाच्या अभावीं भाषेला शैली येणें अशक्य आहे. अर्थात् व्यक्तिमत्त्वाच्या जोडीला वाङ्मयाची आंतरदृष्टि असावयास पाहिजे हें निराळें सांगावयास नको. मराठी वाङ्मयांत शैलीच्या लेखकांचें प्रमाण कमी पडतें याला बरींच कारणें आहेत. प्रसिद्धिसुलभतेनें त्यामुळें वाङ्मयाचें क्षेत्रफळ वाढलें असलें तरी उंची कमी झाली आहे. विद्यालयांतून वाङ्मयाच्या संवर्धनार्थ ज्या प्रकारचें शिक्षण द्यावयास हवें तसें शिक्षण विद्यार्थ्यांना

मिळत नाहीं. ह्या दोन कारणांमुळें वाङ्मयांत अनभ्यस्तांचा मुंळसुळाट होऊन वाङ्मयीन विद्वान् स्वस्त झाले. जाहिरातशास्त्र बळावलें. वाङ्मय-प्रसूतीसाठीं तपश्चर्या करावी लागते ही कल्पना लुप्तप्राय होत चालली. तुटपुंज्या चालू परिस्थितींतील विशेषतः राजकारणांतील माहितीवर काम-चलावू वाङ्मयसेवकास आपलें बस्तान बसविण्यास अडचण पडत नाहीं. ह्याच्या जोडीला सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे थोर व्यक्तिमत्त्वाचा अभाव ! बालपणीं असें सांस्कारिक शिक्षण मिळत नाहीं व आपण होऊन आपलें व्यक्तिमत्त्व वाढवावें ही धमक जवळजवळ कोणांतच नसते. अशा प्रकारचें शिक्षण देऊन समाजांत विशेष व्यक्तिमत्त्व असलेले पुरुष निपजावयाचे असतील वा स्वतःचें व्यक्तिमत्त्व वाढवावयाचें असेल तर जगांतील भूतपूर्व थोर व्यक्तिमत्त्वाच्या पुरुषांचें चरित्र सूक्ष्म दृष्टीनें अभ्यासिलें पाहिजे. गांधींइतके बुद्धिमान पुरुष हिंदुस्थानांत नाहींत असें नाहीं. त्यांच्याइतका शांतपणाहि कांहीं पुढाऱ्यांच्या अंगी आहे, आणि गांधींप्रमाणें सज्जनहि कमी नाहींत. परंतु महात्मेपण फक्त गांधींसच मिळालें ह्याचें कारण त्यांचें विशेष व्यक्तिमत्त्व. ह्या व्यक्तिमत्त्वांतून त्यांची भाषा प्रसवत असते. केवळ बुद्धिमत्ता म्हणजे व्यक्तिमत्त्व नव्हे; शांतपणा वा सज्जनता म्हणजेहि व्यक्तिमत्त्व नव्हे. व्यक्तिमत्त्व राहणीच्या, वागण्याच्या विशिष्ट लकबींत आहे. विशिष्ट सांस्कारिक मनाचा तो अभ्यासानें येणारा विशेषपणा आहे. विशेषपणा सहजसाध्य नाहीं.

महाकवीला अशा तऱ्हेचें व्यक्तिमत्त्व असावें लागतें. आजहि मराठी वाङ्मयांत असें व्यक्तिमत्त्व मुळींच नाहीं असें नाहीं. सूक्ष्मपणें पाहू गेल्यास तें बीजरूपांत कुठें कुठें वसत आहे. तथापि त्याची पूर्ण वाढ व्हावयास हवी आहे. माटे, खांडेकर इत्यादि फारच थोड्या लेखकांच्या सूक्ष्म वर्तनांत विशेषपणा जाणवतो. लो. टिळक राजकारणांत न पडते तर ते महाकवि झाले असते.

## ४. सौंदर्य : आत्मनिष्ठ कीं वस्तुनिष्ठ ?

सौंदर्य हें शास्त्र कीं कला ? सौंदर्य काव्याप्रमाणें शास्त्रहि आणि कलाहि आहे असें कोणी म्हणतील, पण हें विधान शास्त्रशुद्ध म्हणतां येत नाहीं. प्रत्यक्ष सौंदर्य ही कला असून त्या सौंदर्याची निर्मिति कांहींसें शास्त्र आहे. हें कोणत्याहि कलेविषयीं म्हणता येईल. काव्य ही कला त्याप्रमाणें काव्यनिर्मिति हें संपूर्ण शास्त्र आहे. शास्त्राच्या बंदांत जखडलेलें काव्यच काव्यत्व पावतें. जसें काव्याच्या रचनेचें-छंदोरचनेचें शास्त्र तसेंच काव्याच्या आत्म्याचें-भावनेचेंहि शास्त्र आहे. भावना पुष्कळ उत्कट आहे. परंतु ती योग्य शब्दांत उतरविण्याचें तंत्र माहीत नसेल तर तें काव्य उत्कृष्ट वठणार नाहीं. कारण हें भावनाविकासाचें तंत्र मानसशास्त्रावर आधारलेलें आहे. आणि मानसशास्त्र मानवी मनाला सर्व बाजूंनीं नसलें तरी कांहीं अंशानें आपल्या मुठींत धरूं शकतें. तेवढ्यावरून मानवी मनाची रूपरेषा पूर्णपणें कळते. सौंदर्याचे बाबतींत मात्र मानसशास्त्र आपला लगाम सैल करितें. सौंदर्यावर मानसशास्त्र बव्हंशीं अंमल गाजवूं शकत नाहीं. भावनेंत मनाचा नियमितपणा व निश्चितपणा दिसून येतो तसा सौंदर्यांत दिसून येत नाहीं. ठराविक परिस्थितीनें ठराविक भावनाच जागृत व्हावी आणि विशिष्ट भावनाशील मनुष्याचे विशिष्ट मनोव्यापार व आचार व्हावेत अशी निश्चिति सौंदर्याविषयीं देता येत नाहीं. कोणत्या वस्तूनें वा वस्तुसंगतीनें सौंदर्य निर्माण होईल व तें मनाला रुचेल ह्याचा खडा नियम करितां येत

नाहीं. जे नियम करितां येतील त्यांत विविधता, व्यापकता आणि अपवादात्मकता फार. सौंदर्यकल्पनेला कांहींच नियम नाहीं. जगांतील भिन्न भिन्न मनुष्यांच्या सौंदर्यकल्पनांत सारखेपणा फार विरळ आढळतो. एका मनुष्यसमाजास वाटणारी सुंदर वस्तु दुसऱ्या समाजाला सुंदर दिसेलच असें नाहीं. परस्परांस विरोधी अशाहि सौंदर्यकल्पना भिन्न समाजात आढळून येतात. एक वस्तु सुंदर व दुसरी कुरूप कां ह्याला शास्त्राधार नाहीं. वस्तूत सौंदर्य कशानें निर्माण होतें ह्यालाहि कांहीं कारण देतां येत नाहीं.

सौंदर्य वस्तूंत असतें कीं आपल्या दृष्टींत, म्हणजे पर्यायानें आपल्या भावनाशील मनांत असतें? सौंदर्याला निरपेक्ष असें स्वतंत्र अस्तित्व आहे कीं तें केवळ मानवी मनोव्यापारांचा पडसाद आहे?

ज्या अर्थी वस्तूंत दिसणाऱ्या सौंदर्याची मीमांसा निश्चितरूपानें करितां येत नाहीं—पक्कें शास्त्र बनवितां येत नाहीं—त्या अर्थी सौंदर्य वस्तूंत असणें अशक्य वाटतें. सौंदर्य वस्तूंत असणें ह्याचा अर्थ सौंदर्य हा त्या वस्तूच्या अनेक गुणधर्मांपैकीं एक गुणधर्म मानिला तर त्याला वैज्ञानिक स्वरूप येतें. वस्तूचे इतर सर्व गुणधर्म जर वैज्ञानिक शास्त्राच्या आधारानें जाणून घेतां येतात व निसर्गनियमाच्या शृंखलांत पूर्णपणें जखडून टाकितां येतात तर सौंदर्याचा समावेश इतर गुणधर्मांत कां होऊं नये? ज्याप्रमाणें इतर गुणधर्मांचें स्वरूप कळलेलें आहे त्याप्रमाणें सौंदर्याचें स्वरूप कळलेलें नाहीं. सौंदर्य म्हणजे काय हें कोणीच दाखवूं शकत नाहीं. त्या सौंदर्याचा मनावर झालेला परिणाम आपण दाखवीत असतों. परंतु असा परिणाम कां व्हावा, वस्तूंत कोणता गुणधर्म आहे म्हणून व्हावा, हें कांहीं सांगतां येत नाहीं. वस्तु हाताला जड लागते हा परिणाम सांगितला. त्या परिणामाचें मूळ ज्या गुणधर्माचा परिणाम तो गुणधर्म—जाडय ह्याचें स्वरूप आपणास आकलन झालें. वस्तूचा खडबडीतपणा हाताला लागतो हा त्या वस्तूचे अणुरेणु सारख्या पातळीत नसल्याचा परिणाम आहे. वस्तु हवेंत तरंगते हा त्या वस्तूच्या हलकेपणाचा

परिणाम आपणांस दिसला. त्या वस्तूच्या अणूंचें वजन कमी असून त्या एकंदर अणूंचें वजन—त्या वस्तूचें वजन, तीमुळें दूर झालेल्या हवेच्या वजना-इतकें असतें म्हणजेच त्या वस्तूचा आकार इतका मोठा आहे कीं, त्या वस्तूच्या वजनाइतकी क्षेत्रफळांत मावणारी पूर्वीची हवा त्या वस्तूच्या वजनापेक्षां हलकी आहे. परंतु एखादी वस्तु मला सुंदर दिसली तीं कां दिसली, तिच्या-मध्यें कोणता गुणधर्म आहे म्हणून दिसली असें ह्याचें उत्तर देतां येत नाही. तिच्यामध्यें दिसत असलेले गुणधर्म दुसऱ्या वस्तूंत घालून ( दुसऱ्या वस्तूच्या ठिकाणीं ) पाहिले तर ती दुसरी वस्तु सुंदर दिसेलच असें नाहीं. ह्याचा अर्थ सौंदर्य त्या गुणधर्मांत नाहीं. एक वस्तु मला जड लागते कारण तिचे अणु वजनानें जड व अतिशय निगडित बसविलेले आहेत. म्हणून वस्तु जड लागण्याचें कारण जर खरोखरच त्या अणूंच्या विशिष्ट गुणधर्मांत असेल तर तो गुणधर्म इतर कोठेंहि असला तरी तेथें हाताला जडपणा लागलाच पाहिजे. विज्ञानशास्त्राप्रमाणें व अनुभवानें असें घडतेंहि. म्हणजे वस्तूचा जडपणा त्या विशिष्ट गुणधर्मांत आहे हें सिद्ध झालें.

मोती कसा असतो हें ज्यानें पाहिलें नाहीं, त्याचें स्वरूप कशा प्रकारचें असतें हें ज्याला कळलेलें नाही, तो मोती शोधून काय आणणार ? त्याला मोती काय सांपडणार ? परंतु सौंदर्याचे बाबतींत उलट आहे. ज्याला सौंदर्य म्हणजे काय वस्तु आहे हें माहीत नाहीं त्याला सौंदर्याची प्रतीति सहज होऊं शकते. ‘ ही वस्तु मला सुंदर वाटते ’ असें अगदीं लहान मुलापासून मोठ्या माणसापर्यंत प्रत्येक व्यक्ति म्हणूं शकते. त्या प्रत्येकाला कारण विचारलें असतां तो म्हणेल, ‘ ही वस्तु वर्तुळाकार आहे, रंग गडद निळा आहे, हाताला अगदीं मऊ लागते व चकाकते.’ परतु ह्याच्यापुढें त्याची बुद्धि जाऊं शकत नाहीं. वस्तु गोल आहे, निळी आहे व चकचकीत आहे, मऊ आहे म्हणून ती सुंदर दिसली. ह्या तीन गोष्टी त्या वस्तूच्या सौंदर्याला कारणीभूत झाल्या. पण हें ठरविलें कोणीं ? ह्या तीन गोष्टी त्या वस्तूचे तीन

गुणधर्म आहेत. हे गुणधर्म सुंदर वाटणें हें त्या गुणधर्मांहून भिन्न आहे. ते सुंदर वाटण्याचें कारण काय ? हें सौंदर्य त्या गुणधर्मांचा गुणधर्म आहे कीं काय ?

कवि आपल्या भावनेनुसार निसर्गावर आरोप करीत असतो. वास्तविक निसर्ग हा संपूर्णपणें तटस्थ. तो कधींच कवीच्या भावनेप्रमाणें आपलें रूप पालटीत नाहीं. परंतु कवि आनंदी असला म्हणजे निर्झराचा झरझरणारा प्रवाह, वाऱ्यानें हलणाऱ्या लतावेलींचे निरपेक्ष आणि निर्हेतुक अंगविक्षेप, ऋतुमानाप्रमाणें पालवणारे, फुलणारे व वठणारे वृक्ष, प्राप्त परिस्थित्यनुसार चंचुरव करणारे पक्षी हे सर्व आपल्याप्रमाणेंच आनंदानें नाचत गाजत आहेत असें कवीला वाटतें. उलट पक्षीं कवि दुःखी असला म्हणजे तोच निसर्ग दुःखी होऊन कवीच्या दुःखाकरितांच वृक्ष पानांच्या रूपानें अश्रु गाळीत आहे, पक्षी कवीची करुण कहाणीच आकाशांतून ईश्वराला कंठ-रवानें सांगत आहेत, त्या दुःखांत सहभागी होऊन निर्झरहि धाय मोकलून रडत आहे असें कवीला भासतें. ह्या ठिकाणीं कवीला दिसणारें निसर्गाचें स्वरूप जीवन्त, भावनारूप वाटतें. त्या मानीव भावनाशील जीवाकडे पाहून कवीच्या हृदयांत भावनानुकूल सहसंवेदना निर्माण होतात. ह्या भावनानुकूल संवेदनांमुळेंच कवि निसर्गावर वरीलप्रमाणें आरोप करतो.

वस्तु सुंदर आहे हा आपण त्या वस्तूवर निसर्गाप्रमाणें आरोप तर करीत नाहीं ना ? एखाद्या वस्तूचा विशिष्ट आकार, रंग व मऊपणा आपणाला दृष्टींतून सुखदायी कां व्हावा ? आणि दुसरी वस्तु सुखदायी कां होऊं नये ?

सौंदर्याचा ऊहापोह करितांना सौंदर्यसुखाचा विचार करणें आवश्यक आहे. सौंदर्य ज्या एका मूळ गोष्टीवर अवलंबून आहे त्या सौंदर्यसुखाचें स्वरूप कळलें म्हणजे सौंदर्याचा सुगावा लागेल.

सौंदर्यसुख हा शब्दप्रयोग अत्यंत व्यापक अर्थानें वापरला जातो. सौंदर्य बहुधा डोळ्यांनीं आकलन केलें जातें. प्रत्येक प्रकारच्या सुखांत निरनिराळें सौंदर्य असून त्याला विशिष्ट कार्य आहे. तें कार्य समाधानकारक होऊं

शकलें म्हणजे वस्तु सुंदर आहे असें आपण एकदम मोघमपणें म्हणून टाकतों. ही समाधानक्षमता बहुधा प्रथम डोळ्यांनींच जाणतां येते. म्हणून सौंदर्य हें सामान्यतः डोळ्यांकडून आकलन केलें जातें. खाद्यपेयांची रुचि, आसनाचें व वसनाचें मार्दव, कोमलता, वस्तूचा सुगंध, इत्यादि गोष्टींचें कार्य अनुक्रमें जिव्हा, त्वचा व घ्राणेंद्रिय या इंद्रियांकडून केलें जातें. त्या त्या वस्तूंचें सौंदर्य मान्य करण्यांत एक प्रकारचा निश्चितपणा व विशिष्ट कार्याची इष्टता यांवरूनच या वस्तूंचा उपयोग स्पष्ट होत असतो. अमुक एक खाद्यपदार्थ सुंदर आहे कारण तो रुचकर लागतो. म्हणजे जिव्हेची अपेक्षा—लालसा—तृप्त करतो. तसेंच त्वचा व घ्राणेंद्रिय यांचें आहे. ह्या इंद्रियांची अपेक्षा व कार्य स्वतंत्र आहे. परंतु केवळ नेत्रानंद देणारें सौंदर्य कोणती कार्यक्षमता दर्शवितें ? त्या नेत्रांचें कार्य काय ? त्वचेला वस्तु सुंदर लागते कारण त्वचेकडून केली जाणारी मार्दवाची अपेक्षा ती सफल करते. परंतु डोळ्यांना स्वतंत्र कार्य व त्याची अपेक्षा नाहीं. नयनेतर इंद्रियें ' मना 'पासून अगदीं स्वतंत्र असतात. दोघांच्या अपेक्षा भिन्न असून अलग आहेत. डोळ्यांचें मात्र तसें नाहीं. डोळे हे मानसमंदिराचें प्रवेशद्वार आहे. डोळ्यांतून मानस-मंदिराचें अंतर्दर्शन संपूर्णपणें होतें. तेंच डोळ्यांचें कार्य. तेव्हां निसर्गांतील एखादें दृश्य सुंदर दिसतें ह्याचें कारण शोधूं गेल्यास आपणांस नेत्रद्वारांतून मानसमंदिरांत प्रवेश करावा लागेल. तेथील गाभाऱ्यांतच नेत्रसौंदर्याचें अधिष्ठान दिसून येईल.

वरील विवेचनावरून सौंदर्याचे दोन भाग पाडतां येतील. एक सक्रिय सौंदर्य व दुसरें निष्क्रिय सौंदर्य. ज्या वस्तूपासून एखाद्या इंद्रियाला उपभोग मिळतो त्या वस्तूचें सौंदर्य सक्रिय म्हणतां येईल. परंतु ज्या सुंदर वस्तूपासून कोणतीहि अपेक्षा नाहीं, कार्य नाहीं, पण सुंदर म्हटल्यावांचून राहवत नाहीं तें निष्क्रिय सौंदर्य. निष्क्रिय सौंदर्याचा मनाकडे फार निकटचा संबंध आहे. सृष्टिसौंदर्य, चित्रलेखन सौंदर्य निष्क्रिय म्हणतां येतील. स्त्रीसौंदर्य हें

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.



अर्थात् उभयपदी सौंदर्य आहे.

ह्या ठिकाणीं 'सक्रिय' व 'निष्क्रिय' ह्या शब्दांचे अर्थ विशिष्ट आहेत. ही कार्यक्षमता सुलभतेवर वा दुर्लभतेवर अवलंबून नाहीं. वस्तूचें सौंदर्य सुलभतेवर अवलंबून नाहीं. श्रीखंड सुंदर झालेलें असेल तर तें मी सुंदरच म्हणेन, मग तें मला खावयास मिळो वा न मिळो. श्रीखंडाची सौंदर्यपरीक्षा करणारी जी मानवी जिव्हा तिला तें मिळूं शकलें आणि रुचकर लागलें तर तें श्रीखंड सुंदरच ठरेल कारण जिव्हेकडून केलेली मधुरतेची अपेक्षा तें श्रीखंड पुरी करूं शकतें. ही अपेक्षा जिव्हेवर श्रीखंड ठेवल्यानें ज्या क्रियेमुळें पूर्ण झाली–जिव्हेचें समाधान झालें ती क्रिया–प्रत्येक इंद्रियानुरूप–येथें अभिप्रेत आहे. मानवी जिव्हेलाच जर श्रीखंड अलभ्य असतें तर श्रीखंड सौंदर्यनिरपेक्ष होतें. तें सुंदरहि नव्हतें व वाईटहि नव्हतें. कारण श्रीखंडाची रुचि जरी तीच कायम असली तरी त्या रुचीचा चांगलेवाईटपणा हा मनुष्यामुळें आला आहे. सौंदर्य म्हणजे ती रुचि नव्हे–तिचें मनुष्यानें ठरविलेलें चांगलेवाईटपणा.

वस्तूच्या सक्रिय सौंदर्याविषयीं गूढ असें कांहीं नाहीं. जी वस्तु मला रुचकर लागत नाहीं ती मी केव्हांहि सुंदर म्हणणार नाहीं. वस्तु रुचकर असल्यास तिला मी सुंदर म्हणेनच. दगडावर बसण्यापेक्षां मखमलीच्या गालीच्यावर बसणेंच मला जास्त आवडेल. कारण उघडच आहे. परंतु निष्क्रिय सौंदर्याचें कोडें मात्र उलगडत नाहीं. वर जें सौंदर्याचें विवेचन केलें आहे तें ह्याच निष्क्रिय सौंदर्याचें. प्रश्न पडतो तो ह्याच सौंदर्याचा. निसर्गांतील एखादाच देखावा जास्त आवडावा आणि दुसरा आवडूं नये ह्याला कारण काय ? सुंदर देखावा पाहून माझ्या कोणत्या इंद्रियाची लालसा पूर्ण होते व सुख मिळतें ? सुख मिळालें असल्यास तें कोणत्या कार्यामुळें मिळालें ? डोळ्यांना वाईट दिसणारा देखावा कोणत्या इंद्रियाला दुःख देतो ? आणि तें कोणत्या प्रकारानें ? घाणीला [illegible] सुंदर म्हणवत नाहीं; कारण

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

त्या वासामुळें त्या सौंदर्याचें कार्यस्थळ जें नाक त्याला दुःख होतें.

निष्क्रिय सौंदर्याचा उलगडा करावयाचा झाल्यास एक कल्पना सुचते. वर आपण पाहिलें आहेच कीं निष्क्रिय सौंदर्य नेत्रांकडून घेऊन तें मनाकडे पोंचविलें जातें. तेव्हां निष्क्रिय सौंदर्यवस्तूचा व मनांतील भावनांचा कांहीं-तरी संबंध असला पाहिजे. निरनिराळ्या भावनांचीं विशिष्ट प्रतीकें ठरलेलीं असावींत. तें प्रतीक ज्या वस्तूंतून प्रतीत होईल ती वस्तु सुंदर दिसते. सौंदर्यांतहि निरनिराळ्या भावनांना निरनिराळें स्थान आहे. तें तें प्रतीक ती ती भावना जागृत करीत असतें. उदा० गुलाबी रंग शृंगारभाव व्यक्त करतो. तिकोनी आकार तिरसटपणा वा रागीटपणा दर्शवितो. भिन्न भिन्न मनोवृत्तींच्या आवडीनिवडीला मानसशास्त्रीय कारणमीमांसा आहे.

# ५. श्लील व अश्लील : कांहीं विचार

आतां वाङ्मयांतील अश्लीलतेसंबंधीं चर्चा करणें म्हणजे शिळ्या कढीला पुनःपुनः उकळी देण्यासारखें आहे. परंतु कढी भुरकणारे दरवेळीं नवीन असतात, त्यामुळें नाइलाज आहे. शिवाय, हें शास्त्रीय युग आहे ! न जाणो, पुनःपुनः उकळण्यानें यासंबंधींहि रसायनशास्त्रांत एखादा नवीन शोध लागावयाचा !

अश्लील म्हणजे केवळ लैंगिक नव्हे. त्या शब्दामागें संस्कृतीचें विशिष्ट अंग आहे. कडक निर्बंध घालून विवाहसंस्था निर्माण करून जरी मनुष्याच्या कामवासनेला मान्यता दिली असली तरी ती मान्यता जशाच्या तशा कामवासनेला नसून त्या वासनेच्या विशिष्ट संस्कारित उपयोगाला दिलेली आहे. या कामवासनेचा मान्य वा अमान्य असलेल्या कोणत्याहि उपयोगाचा अनुचित उल्लेख चार शिष्ट-सुजन एकत्र बसले तर त्यांच्या त्या सुसंस्कृत मनाला रुचणार नाहीं. ही मनाची वृत्ति पिंडे पिंडे भिन्न मति मान्य करूनहि जगांतील कोणत्याहि समाजांतील शेंकडा नव्वद सद्गृहस्थांचे ठिकाणीं आढळेल. त्याचप्रमाणें कौटुंबिक वातावरणांतहि हें वारें स्थिरावण्यासारखें नाहीं. कुटुंबांत अनेक माणसें असतात. त्या प्रत्येकाचे दुसऱ्यांशीं विशिष्ट प्रकारचे धागे जोडले गेलेले असतात. प्रत्येकाच्या संबंधींची भावना निराळी. जिव्हाळा ही एक समान गोष्ट त्यांचेमध्यें असली तरी त्या जिव्हाळ्याचा कार्यकारणभाव निराळा असतो. तो कितीहि निराळा असला तरी

निसर्गतःच त्यांत कामवासनेचा अंश नसतो. मूळ कामवासनेनें एकत्र आलेले पतिपत्नी पुढें आपल्या कुटुंबांत समरस झाले म्हणजे त्यांच्या लैंगिक नात्यालासुद्धां पुष्कळच मर्यादा पडतात. जेथें कामवासना अभिप्रेत नाहीं तेथें तिचा आविष्कार अगदींच ओंगळ आणि शरम आणणारा वाटतो.

**बाजारी वृत्तीची जोपासना :**

कामवासना प्रत्येकाला कितीहि प्रिय वाटली आणि प्रसंगीं गोड वाटत असली तरी तिचा अस्थानीं उल्लेख तितकाच अप्रिय वाटतो कारण ती भावना अशी आहे कीं वेळेला ती मधाप्रमाणें वाटली तरी अवेळीं एरंडेला-प्रमाणें ती भासते हा जगांतील एकूण मनुष्यप्राण्याचा स्वभाव आहे. त्याकडे अगदींच दुर्लक्ष करून चालणार नाहीं. एक अमेरिकन मुत्सद्दी लंडनमधील एका सार्वजनिक बागेंतील तरुणतरुणींचा कामाविष्कार पाहून लज्जित होऊन पत्नीसह मागें फिरला असें वृत्त कांहीं दिवसांपूर्वीं प्रसिद्ध झालें होतें. तो कांहीं हिंदुस्थानांतील सनातन्यांचा सेनापति नव्हता, तो एक सुसंस्कृत गृहस्थ होता.

सांगावयाचें एवढेंच कीं चार शिष्टांचे समोर किंवा आपल्या कुटुंबांत बोलावयाची लाज वाटेल, घृणा वाटेल तें अश्लील.

अश्लील वाङ्मयाच्या मुळाशीं कामशास्त्रासंबंधीं स्पृहा नाहीं, वाङ्मया-संबंधीं आस्था नाहीं! बाजारांत माल खपविण्याची मात्र आस्था आहे. हें सर्वांनीं प्रामाणिकपणें कबूल केलें तर सुश्लील कोणतें, अश्लील कोणतें; तसेंच अश्लील हें अश्लील आहे काय, हे प्रश्न स्वतः अश्लील लेखकहि उपस्थित करणार नाहींत. कारण, त्यांनाहि वर वर्णिलेल्या मनुष्यांमधील भिन्न नात्याच्या भावना आहेत.

परंतु एकदां चोराला न्यायालयांत आणल्यावर चोरानें 'मीं चोरी कशावरून केली ? चोरी म्हणजे काय ?' असे प्रश्न विचारले तर त्यांचीं उत्तरें फिर्यादी पक्षाला देणें भागच आहे.

**अस्ताव्यस्त सामाजिक जीवन :**

कांहीं टीकाकार अश्लील वाङ्मयाविरुद्ध आघाडी उभारतांना दिसतात. परंतु या नवलेखकांस उत्तेजन प्रथम याच टीकाकारांनीं दिलें. अश्लील वाङ्मयाचा उगम आजच झालेला नाहीं. कमींत कमी गेल्या दोन पिढ्यांत याचा उगम दिसतो. गेल्या शंभर वर्षांत लोकहितवादी, न्यायमूर्ति रानडे, प्रि. आगरकर, इत्यादि समाजसुधारकांनीं व तत्कालीन ' द्रष्ट्यांनीं ' एकांगीपणें ज्या श्रद्धाहीन, ध्येयहीन, उथळ, निव्वळ तर्कट आणि केवळ अंधारांत चांचपडणाऱ्या पाश्चात्य विचारप्रणालीचा हिरीरीनें पुरस्कार केला, त्याचीच परिणति आजच्या ओंगळ आणि अस्ताव्यस्त सामाजिक जीवनांत झाली आहे. आजची अस्ताव्यस्त अविचारप्रणालि त्या द्रष्ट्यांच्या पाश्चात्य शिक्षणानें भारून गेलेल्या, विद्यालयें लोकप्रिय करण्याच्या हिरीरींत आहे. विद्यालयांतील मोकाट ' सोशल ' जीवन शिक्षण संपल्यावरहि अस्ताव्यस्त झालें तर त्यांत आश्चर्य काय ? हा सर्व खटाटोप विद्या सार्वजनिक मालमत्ता व्हावी, विद्यालयें आणि त्यांतील अध्यापक लोकप्रिय व्हावेत व मंडईप्रमाणें आपापलीं विद्यालयें भरघोंस भरून जावींत याकरितांच होता. संस्कारहीन विद्या आसुरी बनते, याचें हें उत्कृष्ट उदाहरण आहे.

प्रि. आगरकरांना स्त्रियांच्या उद्धारासाठीं त्याच्या स्वातंत्र्याचा आणि शिक्षणाचा जोरदार पुरस्कार करतांना हा दूरचा विचार मनांत आला नसेल कीं, ह्याचा परिणाम पुढें स्त्रीपुरुषांच्या बौद्धिक आणि सामाजिक अस्ताव्यस्त जीवनांत होईल. स्त्रीस्वातंत्र्याचा विनियोग स्त्रियांनीं आपल्याला जाचांतून मुक्त करून घेण्यापेक्षां कुटुंबांतून मुक्त होण्यासाठींच अधिक केला ! स्त्री-शिक्षणानें किती स्त्रिया विदुषी झाल्या ? किंबहुना कारकून, मास्तरणीच अधिक झाल्या आणि ज्या घरींच राहिल्या त्यांनीं गल्लोगल्लीं निकृष्ट वाङ्मयाचीं वाचनालयें उघडलीं गेलीं तेथें जाऊन गर्दी केली. न्यायमूर्ति रानडे यांनीं युरोपियन लोकांच्या तत्कालीन छद्मी आणि तकलादू

सामाजिक जीवनावर भाळून 'क्लब लाईफ इन इन्डिया' नांवाचा प्रबंध लिहून एक नवीन टूम समाजांत सुचवून दिली. पण त्या बिचाऱ्या रानड्यांना त्या वेळीं वाटलें नसेल कीं पुढें असे स्त्री-पुरुषांचे क्लब ठिकठिकाणीं निर्माण होऊन अनीतीचे अड्डे फैलावतील! सौ. मालतीबाई बेडेकर यांनीं 'केसरी'च्या १९६१ च्या दिवाळी अंकांत या क्लबांसाठीं सुज्ञ जनतेस जी हांक दिली तिचा आतां काय उपयोग? तात्पर्य, अश्लील वाङ्मयानें लोकांच्या विषयसुखांत भर तर नाहींच घातली पण कामशास्त्रांत अगदींच अडाणी ठेवून लोकांच्या नाजुक गुप्त भावना मात्र भरकटून दिल्या. एवढेंच नव्हे तर त्यानें कौटुंबिक आणि इतर सभ्य वातावरणाचा विचका केला. जें आम्हांस मिळावयास पाहिजे तें मिळत नाहीं आणि अनिष्ट तें मात्र उगाचच लुडबूड करीत आहे.

अश्लील वाङ्मयाचा मूळ उगम वर सांगितल्याप्रमाणें हे लेखक ज्या मुशींतून आले त्या नव्या युगाच्या संदेशांतील खोल सामाजिक क्रांतींत आहे तर आजचें निमित्त वाङ्मयाच्या बाजारपेठेंत आहे. शारीरिक, बौद्धिक आणि मानसिक समान योग्यता मानलेला समाजवाद आम्हीं स्वीकारला आहे. शिवाय अर्थशास्त्र ही आमच्या समाजवादाची बैठक आहे. तेव्हां प्रत्येक गोष्ट पैशानें मोजावयाची व पैशाकरितां मोजावयाची. कोणीं काय उद्योग करावा आणि कसा करावा ह्याला चातुर्वर्ण्याप्रमाणें बंधन नाहीं. मग वाङ्मय कोणीं लिहावें, कसें लिहावें आणि कां लिहावें ह्याला बंधन कोण घालणार?

### रसास्वादाचेंहि ठाम क्षेत्र :

अश्लील वाङ्मयांत उत्तान शृंगार व केवळ लैंगिक असे दोन भाग पाडले पाहिजेत. उत्तान शृंगार हा निदान किळस आणणारा नाहीं. पण केवळ लैंगिक गर्हणीयच वाटतो. पुरातन वाङ्मयांत उत्तान शृंगाराचीं वर्णनें निश्चितच आहेत. परंतु शृंगारिक वाङ्मयासंबंधानें एक गोष्ट लक्षांत

ठेवली पाहिजे कीं, शृंगार समजण्याचें वय झालें आणि ती वेळ आली म्हणजेच त्याची गोडी, आणि गुप्ततेनेंच त्याची गोडी राहते. उत्तान शृंगाराचें वर्णन हें वाङ्मयसौंदर्य निश्चितच आहे. पण सौंदर्याला उपभोग-क्षेत्राची अपेक्षा असते. त्या क्षेत्राशिवाय सौंदर्य हें सौंदर्यच असत नाहीं. जिलबी कितीहि उत्तम झाली तरी तिचें सौंदर्य ताटांतच अभिप्रेत आहे. जिलब्या सुंदर झाल्या आहेत म्हणून त्या गालिच्याप्रमाणें दिवाणखान्यांत जमिनीवर अंथरल्या तर? त्याचप्रमाणें सुंदर खताचा ताटांत उपयोग होणार नाहीं. सौंदर्याची व्याख्या त्या त्या वस्तूप्रमाणें कितीहि केली तरी मूलभूत एकच वाक्य त्या सर्व व्याख्यांचे पूर्वीं लावलें पाहिजे. तें म्हणजे Misplaced thing is a dirt. सौंदर्य म्हणजे रसांचा आविष्कार. प्रत्येक इंद्रियाचा रस स्वतंत्र आहे. एखादें चित्र कितीहि सुंदर असलें तरी तें कोणीं जिभेनें चाटून पाहणार नाहीं. कोणत्याहि इंद्रियाच्या रसाचा आस्वाद घ्यावयाचा झाल्यास मानसिक भूमिका प्रथम अनकूल लागते. वाङ्मयांत लैंगिकता आणल्यानें आपण एका गूढ सौंदर्याची हानि करतों हें पुष्कळांना समजत नाहीं. यामुळें आपण त्या विशिष्ट सौंदर्याचें उपभोगक्षेत्र बदलत असतों. मानसिक भूमिका अनकूल आहे किंवा नाहीं हेंहि आपण पाहत नाहीं.

**यांत्रिक प्रसाराचा घातकीपणा :**

वाङ्मयांतील अश्लीलतेची तरफदारी करतांना अश्लील लेखक साहजिकच पुरातन वाङ्मयांतील दाखले पुढें करतात. पुरातनकाळीं छपाईचीं यंत्रें नव्हतीं. हस्तलिखित प्रतीवरून विशिष्ट लोकच तें वाचीत. ज्यांना शृंगार समजूं नये अशांचे हातीं ती प्रत जाणें मुष्किल. आणि गेली तरी ती वाचतां किती जणांना येत असे? ज्यांना वाचतां येई ते सुसंस्कृत असत. कारण, आजच्या-प्रमाणें सुशिक्षित व सुसंस्कृत यांच्यांत तफावत नव्हती. त्यामुळें उत्तान शृंगारिक वाङ्मयानें अकल्याण होण्यासारखें नव्हतें. आज यंत्राच्या साहयानें अमाप प्रती प्रसूत केल्या जातात. प्रत मिळविणें अत्यंत सुलभ व कमींत कमी

खर्चांचें आहे. प्रती मिळण्याचीं ठिकाणें सार्वजनिक आहेत. ज्यांना प्रती मिळतात ते बहुतेक सुशिक्षित असतात पण सुसंस्कृत असतात असें नाहीं. अश्लीलतेपेक्षां अश्लीलतेचा प्रसार घातक ठरतो. अश्लीलतेपेक्षां तिच्या अनिवार्य ठरलेल्या यांत्रिक प्रसारानें ही घातकता वाढविली आहे. कारण, यांत्रिक प्रसारानें सामुदायिक दुष्ट प्रवृत्तींना उत्तेजन मिळतें. ज्या गोष्टीचा प्रसार करूं नये ती प्रसृत केली जाते, हाच गुन्हा. ती प्रत्यक्ष गोष्ट वाईट आहे कीं चांगली आहे, हा प्रश्नच नाहीं.

## अमृतकलशाची जपणूक :

कामवासनेस वाईट कोण म्हणेल? कामवासनेंतच सृष्टीची सृजनशीलता आहे. 'कामस्तदग्रे समवर्तताधि' असे नासदीयसूक्तांत म्हटलें आहे. निसर्गाचें पवित्र कार्य कामवासनेमुळेंच अखंड चालू आहे. ब्रह्मदेवानें सृष्टि निर्माण केली; आम्हीहि सृष्टीच निर्माण करतों. केवढी शक्ति ईश्वरानें आमचे हातीं दिलेली आहे! ज्या आदिशक्तीमुळें सृष्टि निर्माण झाली ती आदिशक्ति आमचे अंगीं वास करीत आहे हें केवढें आमचें भाग्य! कोणास सांगूनहि खरें वाटावयाचें नाहीं हें! नपुंसक हा किती अभागी प्राणी! अध्यात्मशास्त्रांत तर असें म्हटलें आहे कीं नपुंसकास ब्रह्मप्राप्ति नाहीं. कारण त्याचे अंगीं सृष्टीची आदिशक्ति वास करीत नाहीं. ब्रह्मदेवानें एकदां विश्व निर्माण केलें आहे. पण तें कोट्यवधि वर्षें चाललें आहे; आणि तें तसेंच पुढेंहि चालणार आहे; तें केवळ आमच्यामुळेंच. ईश्वरानें हें सातत्य राखण्यासाठींच प्रत्येक प्राण्यांत हा शक्तीचा ठेवा ठेवलेला आहे. एवढेंच नव्हे तर त्या शक्तींत माधुरीहि ठेवलेली आहे. ही शक्ति म्हणजे मधाचें पोळें किंवा अमृताचा कलश आहे! कल्पना करा कीं या शक्तींतून ईश्वरानें माधुरी काढून घेतली तर केवळ ईश्वराच्या इच्छेसाठीं किंवा आपलें पवित्र कर्तव्य म्हणून कोणीं प्रजोत्पादन केलें असतें का?

कामवासनेंतील माधुरी काढली तर कामपूर्तीसारखी गलिच्छ आणि

प्रसंगीं कष्टप्रद वस्तु मनुष्यानें तर कधींच स्वीकारली नसती. आणि मग मानववंशाचें सातत्य कधींच धोक्यांत आलें असतें. यदाकदाचित् कोणीं महात्म्यानें युगांतून एकदां जन्म घेऊन मनुष्यप्राणी औषधाला कां होईना पण तयार करून ठेवला असता !

परंतु कामवासना ही एक नैसर्गिक व पवित्र भावना ईश्वरानें दिलेली आहे. तिचा आपण सदुपयोग केला पाहिजे. ती वापरा, पण सांडून वायां घालवूं नका. कामवासना हें आपलें जीवन आहे. इतक्या मोलाचा हिरा असा रस्त्यावर टाकून मातीमोल करण्यांत काय मोठेपणा अगर सौंदर्यदृष्टि आहे ? ज्याला ह्या हिऱ्याची किंमत कळली नाहीं त्याला ती समजावून द्या आणि असें सांगा कीं, बाबा रे, हा हिरा फार मोलाचा आहे. ह्याचें तेज फार प्रभावी आहे. तो मातींत टाकून देऊं नकोस; जपून ठेव. त्याची वाच्यताहि करूं नकोस कारण, मौल्यवान वस्तूंनाच नेहमीं धोका असतो.

# ६. साहित्यांतील सौंदर्य

मराठीच्या साहित्यशास्त्राचा विचार करतांना साहित्यशास्त्र हें मूलभूत-शास्त्र नव्हे हें प्रथम लक्षांत ठेवलें पाहिजे. साहित्य मानवी जीवनावर आधारभूत आहे. प्रत्येक भाषेचें साहित्य वेगळें, प्रत्येक साहित्याची संस्कृति वेगळी, प्रत्येक संस्कृतीचा समाज वेगळा. त्या त्या समाजांतील जीवनाचें तत्त्वज्ञान आणि मनोधारणा हीं वेगवेगळीं असतात. त्या त्या तत्त्वज्ञानांतून आणि धारणेंतून मानवी जीवनाचे मानसिक आणि भौतिक व्यवहार चालू असतात. सामाजिक जीवनाची घडण इतिहासांतून घडविली जात असते. या इतिहासामुळें सामाजिक जीवन रसपूर्ण आणि रसरशीत बनतें. भाषा ही या जीवनाचें प्रतिबिंब आहे. ज्या मानानें जीवन सरस त्या मानानें भाषाहि सरस होते. म्हणून साहित्यशास्त्राच्या कल्पना आणि संज्ञा जीवनांतून उगम पावलेल्या असतात. त्यांचा उगम स्वतंत्र नाहीं.

साहित्यशास्त्रांतील समस्यांचा समाचार घेतांना साहित्यांतील संज्ञा प्रथम निश्चित करावयास हव्यात. रस, रसोत्पन्न आनंद, आनंदाची मीमांसा, कला—म्हणजे रसावतार, रसावताराचा हेतु किंवा उगम, वर्ण्य वस्तूचें सौंदर्य, वर्ण्य वस्तूची सत्यता, वस्तु आणि सत्य यांचा संबंध इत्यादि प्रश्न केवळ साहित्यिक भूमिकेवरून सोडवितां येणें शक्य नाहीं. परंतु कांहीं साहित्यिकांचें म्हणणें असें दिसतें कीं या विषयांत खोलांत जाऊं नये. जेथें वाङ्मयाची मर्यादा संपते तेथेंच ही चर्चा थांबवावी. कारण पुढें ज्ञानाचा प्रांत सुरू होतो.

प्रा. जोगांसारखे कांहीं साहित्यिक असें स्पष्ट म्हणत नसले तरी बहुधा सर्वत्र साहित्यविषयक चर्चेत हीच भूमिका घेतलेली स्पष्ट दिसते.

सौंदर्य व्यक्तिगत मानल्यास वर्ण्य विषयाविषयीं गोंधळ निर्माण होईल म्हणून सौंदर्य वस्तुगतच मानावें कारण ती कृति कोणी तरी पाहणार आहे व पाहावी अशी आज अपेक्षा आहे, म्हणून वाङ्मयाचा हेतु मूलतः स्वार्थ व प्रत्यक्षतः परार्थ आहे, असा गोळाबेरजी व समन्वयी विचार करणारा एक पूर्वपक्ष आहे. ' सत्यं ब्रूयात् ललितं ब्रूयात् ', सौंदर्याविषयीं आणि त्याच्या आविष्काराविषयीं आत्यंतिक व्यक्तिनिष्ठा असू नये, वाङ्मयाचा हेतु स्वार्थ आहे तसा परार्थहि असावा. साहित्याची अभिरुचि असणारा व तें समजण्याची पात्रता असणारा वाचक असावा व या वाचकाची अपेक्षापूर्ति साहित्यिकानें करावी, लेखनशुचिता सांभाळावी, इत्यादि सदिच्छांशीं अर्थात्च कोणीहि सहमत होईल. परंतु या सदिच्छांची मीमांसा केली जाते ती मात्र सर्वमान्य होईल असें नाहीं.

प्रा. जोग सौंदर्य वस्तुस्थित मानतात. त्याची मीमांसा करतांना ते म्हण-तात, निर्विवाद सौंदर्य हें कोणींहि पाहिलें, केव्हांहि पाहिलें किंबहुना कोणींहि केव्हाहि न पाहिलें तरी त्यामुळें त्या सौंदर्याला बाध येण्याचें कारण नाहीं. ताजमहाल आम्हीं कोणीं पाहिला नाहीं म्हणून तो सुंदर नाहीं असें नाहीं. समुद्राच्या तळाशी अनेक सुंदर वस्तू असणें शक्य आहे. त्या जरी आम्हीं पाहिल्या नाहींत तरी त्या सुंदर नाहींत काय ? सुंदर वस्तु ती सुंदरच. सौंदर्याची ही मीमांसा व्यावहारिक वाटते. तिनें तात्त्विक समाधान होत नाहीं. सौंदर्य हें वस्तुस्थित मानलें तर वस्तूचा तो गुणधर्म मानावा लागेल आणि तो भौतिकच असावा लागेल. पदार्थविज्ञानाप्रमाणें या गुणधर्माचें लक्षण काय ? तें कोणत्या ज्ञानेंद्रियानें ज्ञात होतें ? या प्रश्नांना समाधानकारक उत्तर नाहीं. आकार, रंग, रुचि, मार्दवता इत्यादि गुणांप्रमाणें स्वतंत्रपणें जो गुण दाखवितां येत नाहीं त्याला त्या वस्तूचा भौतिक गुणधर्म मानतां येत

नाहीं. हा गुणधर्म अतिभौतिक आहे असें मानलें तर सौंदर्य वस्तुस्थित होत नाहीं. एखाद्या वस्तूचा आकार सुंदर आहे असें म्हणतांना आकार हा पदार्थ-विज्ञानांतील गुणधर्म अभिप्रेत आहे. तो आकार म्हणजे लांबी, रुंदी, उंची यांचें एकूण दृश्य. विशिष्ट वस्तूची लांबी, रुंदी आणि उंची यांचें विशिष्ट प्रमाण असलें म्हणजे तो आकार सुंदर आहे असें आपण म्हणतों. या ठिकाणीं आकार या शब्दानें त्या वस्तूच्या विशिष्ट भौतिक गुणधर्मांचा आपण निर्देश केला. सुंदर या शब्दानें कोणता भौतिक गुणधर्म सांगितला ? किंबहुना तो आकार मला कसा वाटला हेंच सुंदर या शब्दानें सुचविलें. म्हणून वस्तु सुंदर नसून वस्तूची अनुभूति सुंदर आहे. सौंदर्य म्हणजे अनुभूतीचा अभिप्राय.

अनुभूति प्रत्येकाची निराळी असूं शकेल. पण निराळी म्हणजे तरी काय ? अनुभूतीच्या व्यक्ती तितक्या प्रती असूं शकत नाहींत. अनुभूतीचे प्रकार थोडे व ठराविक आहेत. त्या मानानें व्यक्ती अनंत आहेत. व्यक्ती व्यक्तिशः अनंत असल्या तरी त्यांच्या मनाची घडण ठरीव आहे. अनेक व्यक्ती समाजरूपी सूत्रांत गोवलेल्या आहेत. समाजाची जडणघडण व्यक्तीच्या मनाला नियंत्रित करीत असते. ही नियंत्रक शक्ति म्हणजे समान भावना. या समान भावनांमुळें व्यक्तीच्या अनुभूतीहि बऱ्याचशा समान असूं शकतात. प्रत्येक व्यक्तीची अनुभूति निराळी असते याचा अर्थ समाजांत ज्या कांहीं समान भावना व समान कल्पना प्रचलित असतात, त्यांतील निवड करणें हें व्यक्तीवर अवलंबून असतें. नाहीं तर व्यक्तींप्रमाणेंच अनुभूतीहि अनंत असत्या. पण तसें होत नाहीं.

अनुभूति समान असली म्हणजे अनुभूतीचा अभिप्राय असलेल्या सौंदर्याची कल्पनाहि समान असते. या कल्पनांची उच्चनीच प्रतवारीहि ओघानेंच आली. उच्च, नीच आणि स्वतंत्र असे तीन प्रकार या कल्पनांचे होतील. उच्च व नीच कल्पनांमध्यें सामाजिक सूत्र अभिप्रेत आहे. ‘स्वतंत्र’ या

प्रकारांत समाजांत प्रचलित नसलेल्या परतु व्यक्तीच्या केवळ बौद्धिक स्वातंत्र्यामुळें उद्‌भवलेल्या कल्पना मोडतात. अमुक एका वस्तूचें सौंदर्य ठरवितांना तें या तीन प्रकारांपैकीं कोणत्या तरी एका प्रकारात मोडतें. पैकीं जी नीच कल्पना आहे ती प्रतिष्ठा पावूं शकत नाहीं. जी स्वतंत्र कल्पना आहे ती समाजसूत्रांत कोठें बसते तें पाहून तिची ग्राह्याग्राह्यता ठरवावी लागेल व कालांतरानें तिला मान्यता मिळेल.

कोणत्याहि कलाकृतीची मान्यता समाजांतील प्रतिष्ठित रसिकांनीं तिचा आस्वाद घेऊन ठरावयाची. नंतर त्या कलाकृतीस प्रतिष्ठा लाभावयास थोडा-फ़ार कालावधि जाणें अवश्य आहे. परंतु आजच्या यांत्रिक युगांत प्रतिष्ठेच्या प्रक्रियेची उलटापालट झाली आहे. अज्ञ कलावंतांच्या निकृष्ट कलाकृतीला मान्यता येण्यासाठीं ज्यांना रसग्रहण समजत नाहीं अशा अज्ञापुढें यंत्राच्या साह्यानें ती ठेवली जाते. ती अज्ञांस आवडली म्हणजे लोकप्रियतेची खोटी प्रतिष्ठा मिळविली जाते. निकृष्ट कलाकृति लोकप्रिय होऊं लागली म्हणजे तज्ज्ञाचे डोळे उघडतात. ते टीकास्त्र सोडूं लागले कीं स्वतंत्र तत्त्वज्ञानाचा पोकळ पवित्रा पुढें टाकला जातो. मग तो एक स्वतंत्र पंथ होऊन अशा तऱ्हेनें निकृष्ट कलेची प्रतिष्ठा शाबूत राखली जाते. या द्वंद्वांत पुष्कळ वेळां अभिजात कलेला व तज्ज्ञ कलावंताला माघार घ्यावी लागते हें आपण पाहतच आहोंत. अज्ञातील लोकप्रियता हाच सौंदर्याचा निकष होत आहे.

परंतु एवढ्यासाठीं सौंदर्य हें वस्तुस्थित आहे व असावें म्हणजे कला-वंतांच्या वैयक्तिक स्वैर सौंदर्यकल्पनेला आळा बसेल हें म्हणणें मात्र योग्य नाहीं. कलावन्ताची कल्पना स्वैर असली तरी समाजाची समान कल्पना स्वैर नसते. अभिजात कलावन्ताला समाजाच्या समान कल्पनांना ड़ावलून चालत नाहीं. ‘स्वतंत्र’ कल्पना असेल ती प्रथम तज्ज्ञ रसिका-कडून मान्य झाली पाहिजे. यामुळें कलावन्ताच्या स्वैर कल्पनेला साहजिकच बंधन पडतें. म्हणून व्यक्ती तितक्या प्रकृती हा सिद्धान्त व्यवहारात [illegible]

होतो. मात्र हें साधण्यासाठीं अज्ञ जनांतील लोकप्रियता हा सौंदर्याचा निकष ठरूं नये. प्रा. जोग म्हणतात त्याप्रमाणें आपली कलाकृति कोणी तरी पाहणार आहे अशी कृत्रिम भावना व तर्कदुष्ट कल्पना मनांत बाळगण्यापेक्षां आपल्या कृतींत मानवाच्या समान भावना व समान समस्या यांचें दर्शन व मंथन केलेलें आहे एवढेंच कलावन्तानें पाहावें.

कारण कलेचा उगम मुळांत जीवनांतील समस्यांमध्यें आहे. तो निसर्ग-भयांत, अद्भुतरंजनांत किंवा नुसत्या कुतूहलांत नाहीं. प्राचीन काळीं निसर्गाच्या भीतीनें प्रार्थनेच्या रूपांत साहित्य निर्माण झालें; माणसाच्या प्राथमिक अवस्थेंत अद्भुताविषयीं ओढ असते. त्यांतून साहित्य उद्भवलें; जीवनांतील कुतूहलांत साहित्याचा जन्म झाला; इत्यादि कल्पना अर्धसत्य असून त्या उसन्या आणलेल्या आहेत. आमच्याकडे संस्कृत साहित्य हें प्राचीन आहे. ऋग्वेद हा अतिप्राचीन समजला जातो. त्या ऋग्वेदांत निसर्गाच्या भीतीपेक्षां निसर्गाची संपूर्ण जाणीवच स्पष्ट दिसते. एवढेंच नाहीं तर त्यांत निसर्गाला जिंकण्याची अपेक्षाच अभिप्रेत आहे. त्यानंतरचें पौराणिक वाङ्मय व बृहत्कथासागर यासारखें संस्कृत साहित्य हें अद्भुतानें भरलेलें आज दिसलें तरी त्या काळांत त्या लोकांस तें अद्भुत नव्हतें. मनुष्य जसजसा सुधारतो तसतसें त्याचें मन अद्भुतावरून वास्तवाकडे ओढ घेतें असें म्हणतात. पण आज आमच्यांत अद्भुत तर नाहींच पण अवास्तवता मात्र पिकली आहे. रहस्यकथा चित्रपटांत, ललितावाङ्मयांत बोकाळल्या आहेत. साम्यवाद, समाजक्रांति, लोकशाही इत्यादि सामाजिक आणि राजकीय कल्पना या अवास्तवतेचेंच लक्षण आहे. कांहींतरी अद्भुत म्हणजे अवास्तव प्रसिद्ध करणें जाहिरातदार व वृत्तपत्रकार यांचें माल खपविण्याचें हुकमी साधन आहे. ललितवाङ्मयांतहि अवास्तवच अधिक दिसतें. सत्य किंवा वास्तव यांच्या आविष्कारांचें वाङ्मयांत दर्शन घडविलें जातें तें सत्य नसतें. अद्भुतहि नसतें. सत्य म्हणजे काय हेंच मुळीं त्यांस समजलेलें नसतें. शिवाय प्रत्येक

सत्य – तें सत्य असलेंच तर – वाङ्मयांत उतरविण्यासारखें असतें काय हा प्रश्न आहे. तें अप्रयोजक नाहीं ना हें पाहणें अवश्य आहे. सौंदर्य हें वस्तुस्थित नाहीं असें मानलें म्हणजे सत्य हें सुंदर आहे कीं नाहीं हा वाद उपस्थित होत नाहीं. सत्य सुंदर नाहीं, तें रूपातीत आहे. अनुभूति सुंदर आहे. तिची स्मृति त्याहून सुंदर आहे. म्हणून अनुभूतीशिवाय निर्माण झालेलें साहित्य हें असुंदर म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.

ज्या साहित्यांत अनुभूतीचें प्रयोजन नाहीं, समान भावनांचा सांचा नाहीं, अवास्तवतेचा अवखळपणा टाळलेला नाहीं, आणि अशांची मान्यता गर्हणीय मानलेली नाहीं त्या साहित्याचा उगम किंवा हेतु निव्वळ यांत्रिक आहे असें समजावें.

# ७. पंडिता रमाबाई

हें पंडिता रमाबाईचें चरित्र श्री. देवदत्त नारायण टिळक यांनीं लिहिलें आहे. या ग्रंथांत चरित्रापेक्षां चरित्रनायिकेची वकिलीच अधिक आहे. पंडिता रमाबाई ख्रिस्ती झाल्या त्यावरून तत्कालीन समाजांत जें वादळ उठलें त्यांतील पंडिता रमाबाईंची बाजू मांडण्यासाठींच जणुं हा ग्रंथ लिहिला आहे.

लेखकानें फार बारकाईनें हें काम केलेलें आहे. त्यामुळें चरित्रनायिकेच्या स्वतंत्रपणें विचार करणें भाग पडतें. पंडिता रमाबाईचें चरित्र म्हणजे विकृत विद्वत्तेचा इतिहास आणि निव्वळ तात्त्विक शुष्कवादाची करुणकथा आहे.

प्रथम चित्पावन जातीचा थोडक्यांत इतिहास देऊन रमाबाईचें माहेर जें डोंगरे घराणें त्याची माहिती दिली आहे. वडील अनंतशास्त्री यांचेंहि थोडक्यांत जीवन चरित्र दिलेलें आहे. त्यानंतर वडिलांच्या पश्चात् रमाबाईच्या स्वतंत्र जीवनास सुरुवात होते. दीड-दोन वर्षांचें वैवाहिक जीवन, नंतरचे दिवस परदेश प्रवास, बाईचें ख्रिस्तीकरण, शारदासदनाचें कार्य व केडगांव अशा तऱ्हेनें रमाबाईच्या जीवनाचा थोडक्यांत आराखडा देतां येईल.

यामुळें पंडिता रमाबाईचा पिंड जो तयार झाला त्याची पार्श्वभूमि आपल्याला चांगली कळते. वडिलाच्या पश्चात् व पतिनिधनानंतर त्यांस आलेले समाजाचे अनुभवहि चरित्राच्या घडणीस मोठे आधारस्तंभ आहेत.

पंडिता रमाबाईचे वडील अनंतशास्त्री डोंगरे हे एक अत्यंत विद्वान संस्कृतज्ञ होते. स्वभावानें मानी आणि बुद्धीनें स्वतंत्र असा त्यांचा बाणा

होता. पण याबरोबरच ते अत्यंत अव्यवहारी होते. प्रवासांतच लग्न करून सर्व संसार प्रवासी बनविल्यानें हालअपेष्टा पदरीं आल्या. जवळचा पैसा प्रवासात व दानधर्मांत खर्च झाला. शेवटीं बिचाऱ्या त्या आईबापांस अन्नान्नदशा होऊन मरण्याची पाळी आली.

अनंतशास्त्री हे स्वतंत्र बुद्धीचे असल्यामुळें व परक्या प्रांतांत पूर्वीं राहत असल्यामुळें सामाजिक निष्ठा जाऊन त्या जागीं शुष्क बुद्धीवादानें जागा घेतली. सनातन्यांशीं केवळ बुद्धिवादानें वाद जिंकून आपल्या लहरीप्रमाणें परंतु सामाजिक व प्रचलित धर्माच्या विरुद्ध वर्तन करण्यांत त्यांना अभिमान वाटत होता. त्यांच्या कन्येंत हाच गुण शिरला होता. पितृनिधनानंतर रमाबाईंस सामाजिक हाल सोसावे लागले. परंतु महाराष्ट्रांत लोक त्यांस बोलावीत असतां येथें येऊन विवाह करून त्या स्थायिक कां झाल्या नाहींत ? पतिनिधनानंतरहि तीच गत ! रमाबाई ख्रिस्ती होण्याची मूळ पीठिका येथून सुरू होते.

रमाबाईंच्या अंगीं इतर विद्वत्ता वा दूरदृष्टि कांहीं नसावी. त्या केवळ पढिक संस्कृत पंडित होत्या. परंतु संस्कृतात काय तत्त्वज्ञान आहे याचें आकलन त्यांस झालेलें दिसत नाहीं. त्यांच्या सामाजिक सुधारणेसंबंधींहि हेंच म्हणतां येईल. बालविधवा व स्त्रीशिक्षण हे त्यांचे मुख्य विषय. त्या जरी ब्राह्मणसमाजाशीं एकरूप झाल्या नव्हत्या तरी त्यांस ब्राह्मण संस्कृति चांगली परिचित होती. बालविवाह व विधवांचा जाच हे प्रश्न सोडविण्या-साठीं त्या स्त्रियास घराबाहेर काढणें हें आमच्या संस्कृतीस कधींच धरून नव्हतें. याकरितां प्रिं. आगरकरांबरोबर सहकार्य करून लोकांत जागृति करून कौटुंबिक सुधारणा करणें अशक्य नव्हतें. स्त्रियांचीं हीं दुःखें होतीं हें मान्य; परंतु रमाबाईंचा रोख कातडीवरील एखाद्या फोडाकरिता सबंध अवयव कापून टाकण्याकडे होता. अरविंदबाबू घोष यांनीं आपल्या Foun... of Indian Culture या ग्रंथांत म्हटल्याप्रमाणे हिंदुसमाजाने ...

कांहीं चालीरीती अनिष्ट वाटल्या तरी त्यांचें मूळ अत्यंत उदात्त असल्यामुळें एकदम पाश्चात्य संस्कृति स्वीकारण्यापेक्षां त्या चालीरीती आहेत तशाच कांहीं काळ पत्करणें हितावह आहे कारण त्या अनिष्ट गोष्टीकरितां मूळ उदात्त संस्कृतीचा नाश व्हावयाचा. सुप्रसिद्ध इंग्लिश समाजशास्त्रज्ञ मेरी स्टोप्स् हिनें म्हटल्याप्रमाणें स्त्रियांचा विवाह जितक्या लवकर करतां येईल तितका चांगला. पहिलें मूल स्त्री वयांत आल्याबरोबर व्हावयास हवें. शिशुविवाह आणि जरठकुमारीविवाह हीं अर्थात्च या तत्त्वाचीं बांडगुळें आहेत. अविवाहित मुलगी १४ वर्षांची झाली कीं जुन्या लोकांस तें दडपण वाटावयाचें. याचें महत्त्व आपण त्या काळांत ओळखूं शकलों नाहीं. परंतु आजच्या पारशी मुलींची दीन अवस्था पाहिली म्हणजे आपली पहिली पद्धत किती चांगली होती हें समजेल. दुसरें असें कीं, रमाबाईंचा सारा रोष पुरुषांवर होता. पुरुषांनीं स्त्रियांना अज्ञानांत, जाचांत डांबून ठेवलें असें त्यांचें म्हणणें. पण रमाबाईंनीं निरीक्षण नीट केलें असतें तर त्यांस असें दिसून आलें असतें कीं स्त्रियांची दैन्यावस्था स्त्रियांनींच केली. पुरुषानीं त्यांना क्वचित् हातभार लावला असेल एवढेंच. शिवाय विधवांना घराबाहेर काढून स्त्रियांची जाच करण्याची प्रवृत्ति थांबेल असें मुळींच नाहीं.

शिक्षणाचे बाबतींतहि पंडिता रमाबाईची अशीच अदूरदृष्टि दिसेल. जर हिंदुस्थानचें खिस्तीस्तान करावयाचें असेल तरच त्यांना दूरदृष्टीच्या म्हणावें लागेल. कारण मेकॉलेनें म्हटलें आहे कीं, हिंदुस्थानांत राज्य करावयाचें असेल तर प्रथम स्त्रियांना शिक्षण द्या. म्हणजे त्यांची कौटुंबिक आणि धार्मिक श्रद्धा नष्ट होईल. लो. टिळकांनीं म्हटल्याप्रमाणें ब्रह्मदेशांत स्त्रीस्वातंत्र्य भरपूर आहे म्हणून तो देश परतंत्र राहिला नाहीं असें नाहीं ! किंवा तेथील स्त्रिया फार सुज्ञ आहेत असेंहि नव्हे. पारशी स्त्रिया ९० टक्के शिकलेल्या आहेत म्हणून त्यांच्यांत बुद्धिमत्ता, श्रेष्ठता व संस्कृति हीं प्रकर्षानें आहेत असा निष्कर्ष काढला तर तें वस्तुस्थितीचें विडंबन होईल. आपल्या स्त्रियांत

आज शिक्षणाचा प्रसार पुष्कळ झालेला आहे. त्या आपल्या सुशिक्षितपणाचा उपयोग कसा करतात? आपली कुटुंबसंस्था मोडकळीस येण्याचें कारण सुशिक्षित स्त्रिया हें एक आहे. स्त्रियांना संस्कृत शिकविल्याबद्दल अनंतशास्त्र्यांना बराच त्रास भोगावा लागला. त्यांनीं आपल्या बुद्धिवादानें तेव्हांच्या सनातनी पंडितांना हें पटवून दिलें कीं स्त्रियांना संस्कृत शिकविणें शास्त्राच्या दृष्टीनें गर्हणीय नाहीं. परंतु त्यांच्या कन्येकडे पाहिलें म्हणजे त्यांचें वचन तिनें खोटें पाडलें आहे असेंच म्हणावें लागेल. संस्कृताच्या शिक्षणानें जिची कुटुंबनिष्ठा व समाजनिष्ठा टिकूं शकली नाहीं तिला शिक्षण दिलें हें अयोग्यच झालें म्हणावयाचें. बालगुन्हेगारांच्या शास्त्रांत सांस्कृतिक परंपरेच्या चाकोरीबाहेर पडावयाची वृत्ति म्हणजे गुन्हेगार वृत्ति अशी व्याख्या दिली आहे. स्त्रियांच्या स्वातंत्र्याचे दुष्परिणाम आम्हांस आतां हळू हळू दिसूं लागले आहेत. अमेरिकेस ते आज प्रकर्षानें जाणवत आहेत. पण १८५७ च्या सुमारास इंग्लंडलाहि ते जाणवत होते. याचें एक उदाहरण पाहण्यासारखें आहे. बंडांतील नजिमुल्लाखान हा इंग्लंडमध्यें गेला होता. तो अत्यंत आकर्षक व रुबाबदार होता. इंग्लंडमध्यें अनेक श्रीमंत खानदानी स्त्रिया त्याच्यावर भाळल्या. हें वृत्त त्यानें मजेनें टाइम्सचा वातमीदार रसेल यास सांगितलें. रसेल खिन्न झाला व म्हणाला, " आम्ही स्त्रियांना स्वातंत्र्य जरा जास्तच देतों. "

असो. रमाबाईंच्या खिस्तीकरणास केवळ त्याच जबाबदार नाहींत. प्रि. आगरकरांसारख्या सुधारकांनीं रमाबाईंचें सदन चालविण्यास कां घेतलें नाहीं? किंवा त्यांच्या सहकार्यानें स्त्रियांचा प्रश्न कां सोडविला नाहीं? रमाबाईंच्या वागण्यावर लोकांनीं खूप टीका केली. परंतु धडाडीनें कार्य करण्यास व हा प्रश्न सोडविण्यास पुढें कोणीच आलें नाहीं. हा आमचाच दोष होता. बाईंचा दोष एवढाच कीं, त्यांस हिंदुधर्म समजूं शकला नाहीं. हिंदुधर्म समजणें फार कठिण आहे, म्हणून त्या धर्माचें सातत्य राखण्यासाठीं विशिष्ट आचार व परंपरा निर्माण करण्यांत आल्या. पुढें त्याचा विपर्यास झाला तर

तो तेवढाच दूर करणें अवश्य आहे. पण हा विपर्यास प्रत्येक धर्मांत होतो. बाईंना आमच्यांतील दुष्ट चाली जाणवल्या परंतु युरोपियन मिशनरी वेरियर एलविन यास हिंदुस्थानांतील ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या अन्यायाचा उद्वेग येऊन त्यानें आपलें मिशनरी काम सोडलें व येथील आदिवासीयांत तो रमला. आमच्यांतील जातिभेदावर त्या टीका करतात पण ख्रिती धर्मांत एकूण २५० च्या वर पंथ आहेत. इंग्लंडमध्यें तर अठराव्या शतकांत सरकारविरुद्ध असलेल्या पंथीयांस राजकीय हक्कहि देण्यास प्रतिबंध करीत असत व त्याकरितां एडमड बर्क यास भांडावें लागलें होतें.

तात्पर्य, पंडिता रमाबाईंचें कार्य हें चुकीच्या समजुतीनें व चुकीच्या मार्गानें चाललें होतें. असहाय स्त्रियांच्या ख्रिस्तीकरणानें तर बाईंच्या दयाबुद्धीचीच शंका येऊं लागली होती. परंतु लेखकानें लो. टिळक, आगरकर, न्यायमूर्ति रानडे या सगळ्यांना नांवें ठेवून पंडिताबाईंची एकतर्फी बाजू मांडलेली आहे. त्यामुळें या चरित्रग्रंथास उणीव प्राप्त झाली आहे. विसंगत घटनांची संगति लावून देणें व खोलवर रुजलेल्या गैरसमजाचें निराकरण करणें व त्याकरतां शक्यतों प्रमाणभूत लेखन ठेवणें असा इरादा प्रस्तावनेवरून दिसतो. परंतु ग्रंथ वाचल्यावर ग्रंथ तितक्या बारकाईनें लिहिला असला तरी त्यांत निःपक्षपाती चोखंदळपणा नसून बाईंची वकिलीच स्पष्ट होते. महाराष्ट्रीय कुटुंबाचा व धर्माचा त्याग करणाऱ्या रमाबाईंस जर महाराष्ट्राची तेजस्विनी म्हटलें तर संभाजीनें नाहक आत्महत्या केली असेंच म्हणावें लागेल. ग्रंथ परिश्रमपूर्वक व संशोधनपूर्ण आहे; परंतु ठिकठिकाणीं एकतर्फी विधानें, उदाहरणें व आधार यांमुळें चरित्र या दृष्टीनें ग्रंथाची प्रत कमी होते. शिवाय आजच्या मिशनऱ्यांच्या राष्ट्रघातकी कारवाया पाहिल्या म्हणजे असा हिंदुसमाजाविषयीं गैरसमज पसरविणाऱ्या ख्रिस्ती ग्रंथाबद्दल मन सांशक होतें.

## ८. कांहीं राष्ट्रीय समस्या

### राष्ट्रीयत्व :

राष्ट्रीयत्व ज्या मूळ कल्पनेवर आधारलेलें आहे ती ' राष्ट्र ' कल्पना मुळांत कमजोर आहे. राष्ट्र आणि राष्ट्रीयत्व यांची निश्चित व्याख्या कोणत्याहि राजकीय संहितेंत केलेली आढळत नाहीं. राष्ट्र या शब्दांत प्रामुख्यानें राजकीय चतुःसीमा अभिप्रेत आहेत तर राष्ट्रीयत्व या शब्दांत सामान्यतः वंश, धर्म व संस्कृति यांचा अंतर्भाव कमीजास्त प्रमाणांत असतो. राज्यशास्त्रांत जरी ही व्याख्या अखेरची व प्रमाण म्हणून सांगितली गेली नसली तरी जगांतील देशांच्या व्यवहारांत हीच व्याख्या प्रचलित असलेली दिसेल. देशाचें जें राष्ट्रीयत्व त्याच राष्ट्रीयत्वाचा मनुष्य देशाचा अध्यक्ष होऊं शकतो. इतर जनतेला तो अधिकार नाहीं. यांतच राष्ट्राच स्वामित्व निश्चित झालेलें असून त्यास सर्व देशांतून मान्यता मिळालेली आहे.

याच नियमाला अनुसरून हिंदुस्थानचा अध्यक्ष हा केवळ हिंदु आहे. हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यानंतर त्याला जगांतील स्वतंत्र देशाचें स्थान प्राप्त झालेलें आहे. त्यामुळें आंतरराष्ट्रीय राजनीतीप्रमाणेंच हिंदुस्थानला व्यवहार करणें अवश्य आहे. अशा स्थितींत हिंदुस्थानचें राष्ट्रीयत्व धर्मावर अवलंबून नसून जो जो या देशाचा नागरिक आहे तो तो राष्ट्रीय होय व हिंदुस्थानचें नागरिकत्व हेंच राष्ट्रीयत्व असें म्हणणें म्हणजे केवळ भोंगळपणा नसून खोटेपणाहि आहे.

तथापि कोणताहि लोकशाहीवादी मनुष्य हिंदु हें राष्ट्रीयत्व म्हणून मानावयास तयार होत नाहीं. याला कारणें अनेक आहेत. हिंदु, मुसलमान इत्यादिकांनीं एकमुखानें स्वराज्याची मागणी करावी हें इंग्रजांचें छन्नी आव्हान हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यपूर्वकालांत व्यापक राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेला प्रामुख्यानें कारणीभूत झालें. त्यांतील राजकीय डावपेंच वा शक्याशक्यता इकडे मात्र कोणींच पाहिलें नाहीं. व्यापक राष्ट्रीयत्वाची कल्पना ही मुख्यतः उत्तर हिंदुस्थानांतील लोकांची आहे. दक्षिणेंत ही कल्पना अद्यापिहि रुजलेली नाहीं. उत्तर हिंदुस्थानांत मुसलमानांची संख्या बऱ्याच प्रांतांत पुष्कळ असून तेथें हिंदु व मुसलमान एकत्र राहतात. त्यामुळें उभयतांचा एकमेकांवर संघटणाचा परिणाम झालेला आहे. ज्याची बुद्धि जगाच्या कोणत्याहि तत्त्वज्ञानावर, इतिहासावर सारखीच चालते त्यांनीं या केवळ स्थानिक परिस्थितीला बळी पडावें याचें आश्चर्य वाटतें. ही स्थानिक वा वैयक्तिक स्थिति हीच जणूं जागतिक तत्त्वप्रणाली आहे अशी अवास्तव कल्पना बरेच उत्तर हिंदुस्थानांतील पुढारी उराशीं बाळगून आहेत. दुसरें असें कीं, आमच्यांतील लोकशाहीच्या कल्पना या पारतंत्र्यांत आलेल्या आहेत. सर्वच नागरिकांचें पारतंत्र्याचें एकच दुखणें असतांना भेदभाव करणें हें आमच्या लोकशाही मनाला तितकेंसें रुचलें नाहीं. अर्थात् स्वातंत्र्याचा भरपूर अनुभव आल्यावर या कल्पना आपोआप मावळूं लागतात. तिसरें कारण असें कीं लोकशाहीच्या निवडणुकांतून मतसंख्या फुगविण्यास अशा व्यापक कल्पना राजकीय पक्षांस उपयोगी पडतात. त्यामुळें साधारणतः जे राजकारणाच्या रंगभूमीवर उतरलेले आहेत ते पक्ष व्यापक राष्ट्रीयत्वास विरोध करण्यास नाराज असतात. परस्परविरुद्ध राष्ट्रीय कल्पना असलेले पक्ष प्रसंगीं संधि साधण्यासाठीं एक होतात ही गोष्ट वरील विधानास पुष्टी देण्यास पुरेशी आहे.

तथापि आपल्या तत्त्वास बाध आणून व्यवहारांत बरेच राजकीय पक्ष विसंगति निर्माण करतांना दिसत असले तरी या मूलभूत व महत्त्वाच्या

प्रश्नावर कोणीहि उत्तर शोधण्याचा प्रयत्न करीत नाहींत. एकराष्ट्रीयत्ववादी असें म्हणूं शकत नाहींत कीं हिंदु हेच राष्ट्रीय. हिंद्वेतरांनीं देश सोडून जावें. उद्यां हिंदुत्वनिष्ठांचें राज्य झालें तर तेसुद्धां आपल्या पूर्वकालीन एकराष्ट्रीयत्वाची कल्पना जरा ढिलीच करतील. याउलट व्यापक राष्ट्रीयत्वाचे पुरस्कर्ते राज्यावर आले असतांना त्यांस हें कळून चुकलें कीं हिंद्वेतर हिंदुस्थानचे बाहेर ध्येय ठेवीत आहेत. त्यामुळें तोंडानें एकीकडे व्यापक राष्ट्रीयत्वाचा घोष करीत असतां त्यांस राज्यकर्ते या नात्यानें हिंद्वेतरांवर सक्त नजर ठेवावी लागते व अध्यक्ष हिंदुच करावा लागतो.

ही विसंगति लक्षांत घेतां व हिंदुस्थानला संभाव्य अंतर्गत धोके पाहतां आम्हीं राष्ट्रीयत्वाची नवी व्याख्या करावयास पाहिजे असें वाटतें. ही समस्या सोडविण्यासाठीं एकराष्ट्रीयत्व हेंच खरें राष्ट्रीयत्व मानावयास हवें. हिंदुस्थानचें राष्ट्रीयत्व हिंदुच. पण हिंदु कोण ? ज्याची संस्कृति हिंदु असून हिंदुस्थानलाच जो पुण्यभूमि मानतो तो हिंदु. बारकाईनें विचार केला तर हिंदुस्थानांतील आजचे खिश्चन व मुसलमान यांची संस्कृति अद्यापि हिंदूच आहे हें दिसून येईल. त्यांचा धर्म भिन्न असला तरी केवळ गतानुगतिक म्हणून तो त्यांजकडे आलेला आहे. खिश्चनांचें धर्मस्थान रोम असून मुसलमानांचें मक्का आहे. म्हणजे त्यांची पुण्यभूमि हिंदुस्थानचे बाहेर असून त्यांचें सूत्रहि बाहेरच आहे. हिंदुस्थानच्या राष्ट्रीयत्वास धोका आणणारी गोष्ट असेल तर हीच आहे. म्हणून आमची अशी सूचना आहे कीं, खिश्चनांनीं बायबलची उपासना करण्यास व मुसलमानांनीं कुराणाची उपासना करण्यास कोणताच प्रत्यवाय नाहीं, परंतु हिंदुस्थानांतील खिश्चनांनीं त्यांचा पोप हिंदुस्थानांतीलच निवडून त्यांचें पवित्र धर्मस्थान हिंदुस्थानांतच निर्माण करावें. खिश्चनांचीं सर्व सूत्रें हीं अशाच तऱ्हेनें केवळ हिंदुस्थानांतूनच चालावीं. त्याचप्रमाणे मुसलमानांनीं आपला मुख्य धर्मगुरु हिंदुस्थानांतील मुसलमानच निवडून त्याची मक्का हिंदुस्थानांतच निर्माण करावी. हिंदुधर्मांत अनेक उपासनासंप्र

आहेत. आम्ही कोणाच्या श्रद्धेचा अवमान करीत नाहीं हेंच यांतून सिद्ध होतें. अशा तऱ्हेनें हिंदुस्थानांतील विवाद्य नागरिकांचें राष्ट्रीयत्व हिंदुच होईल व पुण्यभूमि हिंदुस्थानच राहील. याच नियमानें इतर लहान लहान धर्मानुयायांचा प्रश्न सोडवावा. याला पोषक म्हणून हिंदुस्थान सरकारनेंहि कायदा करावा कीं हिंदुस्थानांत कोणत्याहि धर्मप्रचारास बंदी आहे. शारीरिक सक्ति किंवा अन्य विलोभनें इत्यादि धर्मप्रचारासाठीं जीं सूक्तासूक्त साधनें अवलंबिलीं जातात तीं बेकायदेशीर ठरवावींत. कोणत्याहि धर्मसंस्थेला परदेशांतून कोणत्याहि स्वरूपाची मदत मिळणें बेकायदेशीर ठरवावें.

**प्रान्तरचना :**

हिंदुस्थानची प्रांतरचना ही वास्तविक राष्ट्रीय समस्या होऊं नये. परंतु लोकशाहीच्या युगांत राजकारणाचें ध्येय बदलल्यामुळें प्रान्तरचनेचा राष्ट्रीय समस्या म्हणून बळी पडत आहे. देशांत सुव्यवस्था नांदावयाची ती देशाचे समृद्धीसाठीं नसून सत्ताधारी पक्षाचे समृद्धीसाठीं. ही समृद्धि साधण्यापायींच राजकारणांतील बहुतेक सर्व समस्या निर्माण झालेल्या आहेत. हें बदललेलें राजकारणाचें ध्येय जागृत जनतेनें लक्षांत घ्यावयास हवें. भाषावार प्रांतरचनेचा पुरस्कार करण्यांत आला तो पक्षाच्या हिताच्या दृष्टीनें. पुढें त्यास बगल देण्यांत आली तीहि पक्षाच्या हिताच्या दृष्टीनें. महाराष्ट्रांत तेढ निर्माण करण्यांत आली तीहि पक्षाच्या हिताकरितां. आणि आतां संयुक्त महाराष्ट्र निर्मिला तोहि पक्षाच्याच हिताकरितां. संयुक्त महाराष्ट्राच्या विरुद्ध अनेक मोटमोठीं तत्त्वें पुढें करून संयुक्त महाराष्ट्रवाद्यास कमी लेखलें गेलें. परंतु संयुक्त महाराष्ट्र निर्मितीस विरोध केला तो काय त्या तत्त्वांचें पालन म्हणून ? केवळ कुटिल कृत्यांवर सारवासारव म्हणूनच या तत्त्वांची खैरात केली गेली. त्यामुळें ज्या भूमिकेवरून संयुक्त-महाराष्ट्राचा प्रश्न चर्चिला गेला त्याहून निराळ्या भूमिकेवरून चर्चिणें अवश्य होतें. हिंदुस्थानांतील प्रान्त आणि प्रांतिक समाज हे कांहीं अमेरिके-

प्रमाणें दहा ठिकाणचे लोक केवळ राजकीय दृष्टया उपरेपणें एकत्र येऊन राहिलेले नाहींत. हिंदुस्थानांतील प्रांतांची परंपरा फार प्राचीन आणि स्वाभाविक घडत आलेली आहे. प्रांतिक समाज, प्रांतिक भाषा आणि प्रांतिक संस्कृति या तिन्ही गोष्टी उपऱ्या नाहींत. त्यांचा विकास त्यांच्याच इतिहासांतून घडून आलेला आहे. त्या सर्वांचा एक सब्रगोलंकार करणें समाजशास्त्राच्या विरुद्ध आहे. ही भिन्न भिन्न प्रांतीयता एकाच संस्कृतीच्या सूत्रांत गोवलेली आहे. ही प्रांतीयता एकसंघराष्ट्रीयत्वाच्या आड येण्याचेंहि कारण नाहीं. कारण त्या सर्वांची एकच संस्कृति असून पुण्यभूमिहि एकच आहे. भाषावार प्रांतरचनेकडे आज राजकाय दृष्टया पाहिलें जातें तें चूक आहे. भारतीय समाजरचना ज्याला कळली नाहीं त्यानें भारतीय प्रांतरचनेवर बोलण्यांत अर्थ नाहीं.

लोकसंख्या व बेकारी :

हाहि एक अखिल भारतीय स्वरूपाचा विवाद्य प्रश्न आहे. लोकसंख्येचे सरकारी आंकडे बऱ्याच कारणांनीं विश्वासार्ह वाटत नाहींत. त्यापेक्षां एखाद्या सामाजिक संस्थेनें हें कार्य अभ्यास म्हणून हातीं घेतलें तर अधिक उपयुक्त होईल. परक्या लोकांची आवक, जननसंख्येंत भर आणि दीर्घायुष्यांत वाढ या कारणांनीं लोकसंख्येंत भर पडत असते. लोकसंख्या वाढत आहे म्हणून आळा घातला पाहिजे असें म्हणतांना बाहेरून होणारी आवक थांबविणें अवश्य आहे. जननसंख्या वाढली तर लोकसंख्या वाढली असें खऱ्या अर्थानें म्हणतां येईल. ही जननक्षमता चालू पद्धतीनें अजमावतां येणार नाहीं; त्याकरितां जातवार व कुटुंबवार लोकसंख्या घ्यावयास पाहिजे. कांहीं जाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत तर कांहीं जातींची संख्या वाढलीच नाहीं असें स्थूल निरीक्षणानें आढळून येतें. खरी वस्तुस्थिति कळण्यासाठीं प्रत्येक जातीची स्वतंत्र मोजणी झाली पाहिजे. नाही तर आज असें आढळून येतें कीं, सरकारी आंकड्यांप्रमाणें एकूण लोकसंख्या

भरमसाट वाढलेली दिसते; पण एकेक जाती मात्र लहानच्या लहान राहिलेल्या आहेत. ही विसंगति आज कांहीं ठिकाणीं जाणवत आहे.

गांववार लोकसंख्या घेण्याची पद्धति सर्वत्र अवलंबिली जाते. परंतु एवढ्यावरून त्या गांवाच्या भौगोलिक मर्यादेंत एकूण घट-वाढ किती झाली हेंच कळेल. देशाच्या एकूण लोकसंख्येचा विचार करतांना केवळ लोकांच्या स्थलांतरावरून विचार करून चालणार नाहीं. एखाद्या गांवाची जननक्षमताच मोजणें अवश्य आहे. त्या गांवांतील रहिवासी व उद्योगधंद्यासाठीं बाहेर गेलेले स्थलांतरित यांच्या कुटुंबांचा विस्तार किती वाढला तेंच पाहावयास हवें. जशा जाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत तशीं कांहीं घराणीं निर्वंश होत आहेत किंवा दत्तक संततीवर चालत आहेत हीहि गोष्ट विसरून चालणार नाहीं. प्रौढ कुमारिकांतहि भर पडत चालली आहे. दीर्घायुष्यांत वाढ होत असेल तर मृत्यूच्या साधनांतहि भर पडत आहे. आतां पूर्वीप्रमाणें १०–१५ मुलें असणारी आई क्वचित्‌च दिसेल. लोकसंख्येचा दूरवर विचार करावयाचा झाल्यास येत्या पन्नास वर्षांत हीच परिस्थिति टिकून राहिली तर यापुढील पिढ्या कमजोर राहतील, अल्पायुषी होतील व अचानक मृत्यु येणाऱ्या रोगांस बळी पडतील. याशिवाय देशाच्या संरक्षणापासून स्वयंपाकघरापर्यंत जेवढें अधिक यांत्रिकीकरण होईल तितकीं वैयक्तिक व सामुदायिक मृत्यूचीं साधनें अधिक वाढतील. आजची रोगट राहणी, सत्त्वहीन कृत्रिम अन्न आणि रोगनिवारणासाठीं घेतलीं जाणारीं रासायनिक विषारी औषधें या सर्व गोष्टी पुढील पिढ्या कमकुवत करण्यास पोषकच आहेत.

सुमारें २०० वर्षांत जी अर्थशास्त्रीय व भौतिक प्रगति झाली आहे तींतून मानवी जीवनाविषयीं एक वेगळीच विचारप्रणाली प्रसृत झालेली आहे. स्वातंत्र्यपूर्वकालांत आम्ही इंग्रजांचे जित म्हणून त्यांचें तत्त्वज्ञान डोळे मिटून स्वीकारलें. पण स्वातंत्र्यानंतर त्याची डोळस छाननी होणें अवश्य आहे. सुमारें ४–५ वर्षांपूर्वीं अर्थशास्त्रीय परिषदेंत प्रि. गांगुली

यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत अर्थशास्त्रज्ञांना हाच इषारा दिला होता. ते म्हणाले होते कीं, २०० वर्षांपूर्वीचे जुने अर्थशास्त्रीय सिद्धान्त आतां पारखून व्यावयास हवेत. लोकसंख्येविषयींहि हाच नियम लागू पडतो. वास्तविक जमीन आणि मनुष्यबळ ही देशाची मूलभूत संपत्ति आहे. जमिनीचा उपयोग भरपूर आणि व्यवस्थितपणें केला तर मनुष्यबळ मिळेल तितकें हवेंच आहे. जितकें मनुष्यबळ अधिक तितकी जमिनीची उपयुक्तता अधिक; जितकी उपयुक्तता अधिक तितकें उत्पन्न अधिक, हा मूलभूत सिद्धान्त आज केवळ आगंतुक यंत्राच्या सोयीसाठीं दुर्लक्षिला जात आहे. मानवी जीवनाचें तत्त्वज्ञान किंबहुना मानवाचें अस्तित्वच यंत्राच्या सोयीनें ठरविलें जात आहे. यंत्र ही आजच्या जगाची अधिष्ठात्री देवता आहे. पण ती भस्मासुराचा अवतार आहे याची जाणीव आम्हांला नसली तरी पाश्चात्य विचारवन्तांस आतां होऊं लागली आहे. मनुष्यशक्तीचा कमींत कमी उपयोग करावा लागणें हें यंत्राचें मुख्य सूत्र आहे. अशा स्थितींत जास्तींत जास्त माणसांना काम मिळावें म्हणून जास्तींत जास्त यांत्रिक कारखाने वाढवावे असें म्हणणें कितपत सयुक्तिक ठरेल? एकदां यंत्र हें जीवनाचें अधिष्ठान मानलें कीं यंत्राला मानवेल एवढीच किमान लोकसंख्या कायम ठेवणें क्रमप्राप्तच आलें. यंत्राला मानवेल ती संपत्ति, बाकीची आपत्ति. शेतीची जमीन ही या तत्त्वज्ञानाचा एक बळी आहे. लोकसंख्या, काम आणि उत्पादन या तीनहि गोष्टी परस्परांशीं विशिष्ट प्रमाणांत राहणें अवश्य आहे. देशांतील उत्पादनाचीं साधनें अशीं हवींत कीं या तिहींचें प्रमाण योग्य राहील. नाहीं तर अनुक्रमें चढती लोकसंख्या, बेकारी आणि उत्पादन भरमसाट पडून राहणें हे प्रश्न उभे राहतात. यंत्रांचा उत्पादनाचें साधन म्हणून उपयोग केल्यानें लोकसंख्या, काम व उत्पादन यांत व्यस्त प्रमाण होऊन वरील प्रश्न ‘ आ ’ वासून उभे राहतात.

आजच्या लोकसंख्येचा बाऊ केला जातो तो या कारणानेंच. बेकारी

जाचक वाटूं लागली ती यामुळेंच. परंतु सर चिंतामणराव देशमुख यांनीं एकदां लोकसभेंत केलेलें विवेचन लक्षांत ठेवण्यासारखें आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें बेकारी वाढली नाहीं, बेकारी जाणवूं लागली आहे. याची मीमांसा करतांना एकत्रकुटुंबपद्धति नामशेष होऊन विभक्त कुटुंबपद्धति वाढत आहे; त्यामुळें पुष्कळ लोक उघडे पडले आहेत, असें त्यांनीं सांगितलें. बेकारीचा विचार करतांना केवळ अर्थशास्त्राचा विचार करून भागावयाचें नाहीं, तर बदलती सामाजिक परिस्थितिहि लक्षांत घेणें जरूर आहे.

बेकारीची नोंद करतांना केवळ उपरी पुस्तकी विद्या उपयोगी पडणार नाहीं. समाजरचना व चालू सामाजिक परिस्थितीहि विचारांत घेतली पाहिजे. गेल्या पन्नास वर्षांचा धांवता आढावा घेतला तर बेकार शब्दाची कल्पना कसकशी बदलावी लागत आहे हें समजेल. इंग्रजी राज्य सुरू झाल्यावर पुष्कळ नोकऱ्या सुरू झाल्या. परंतु अद्यापि शेती भक्कम होती. घरात एखादा मनुष्य नोकरीस लागलेला असे. बाकीचे शेतीकडे बघत. शिक्षणास नुकतीच सुरुवात झाली होती. थोडासा शिकला तरी नोकरी मिळे. परंतु एखादा शिकला पण नोकरीस नाहीं लागला कीं तो ' रिकामा ' वाटे. कारण तो शेतीला उपयोगी नसे. हा ' रिकामा ' मनुष्य चाळिशीला आला तरी त्याच्या नोकरीची कोणास चिंता नसे व त्यालाहि खाण्यापिण्याची अडचण नसे. परंतु हा ' रिकामा 'च. कारण याच वेळेपासून प्रत्येकानें स्वतः काम करून पैसे मिळवावे ही आजची कल्पना सुरू झाली होती. यानंतर सुमारें २५–३० वर्षांपूर्वीं मनुष्य पदवीधर होऊन ३–४ वर्षें नोकरीस लागला नाहीं तर तो ' बेकार ' या सदरांत पडूं लागला. कारण व्यक्तिस्वातंत्र्याची कल्पना या वेळीं अधिक फोफावली होती व मुलाला नोकरी लागली पाहिजे ही आंच बापाला व मुलाला दोघांनाहि होती. अलिकडे १०–१५ वर्षांत जेमतेम पदवी मिळेपर्यंत मुलगा तग धरूं शकत होता. पदवीधर झाल्याबरोबर तो बेकारांत मोडूं लागला. आणि आतां शाळेंतील मुलालासुद्धां काम

करून आपलीं फी-पुस्तकें भागवावीं लागतात. २-४ तास काम मिळालें नाहीं तर तो मुलगा कुटुंबाला भार वाटतो. समाजांतील खालच्या वर्गांत तर मुलगा किंवा मुलगी ८–१० वर्षांची झाली कीं नोकरीस लागतात. त्यांस नोकरी मिळाली नाही तर तीं मुलें आपल्या आईबापांस भारभूत होतात. तात्पर्य, समाजांतील राहणीची कल्पना, शेतीचा व एकत्रकुटुंबाचा तुटलेला आधार, आईबापांस कुटुंबपोषणास लागणारी मदत इत्यादि कारणांनीं पदवीधरापासून प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यापर्यंत 'बेकारांच्या' अनेक 'तऱ्हा' संभवतात. या सर्व गोष्टींचा विचार साकल्यानें करणें आवश्यक आहे. ५० वर्षांपूर्वी स्त्री 'काम करूं इच्छिणाऱ्यांत' मोडत नसे. आतां बेकारांत स्त्रीचाहि समावेश करणें आवश्यक आहे. गरजू सेवानिवृत्त हाहि आतां 'बेकार' झाला आहे.

यंत्रयुगात सर्व समाज नोकऱ्यांवर जगत असतो. जो नोकरी करणार नाहीं त्यास खावयास मिळणार नाहीं. नोकरीच्या उपऱ्या पैशानें स्वतःचेंच केवळ पोट भागविणें यंत्रयुगांत शक्य होतें. म्हणजे स्त्री, वृद्ध, तरुण, बाल, इत्यादि सर्व नोकरीच्या मागें असतात. याचा अर्थ समाजांतील जवळ जवळ प्रत्येक व्यक्तीस नोकरी मिळावयास पाहिजे. बेकारीची नोंद सध्यां याच तत्त्वावर केली जात आहे. परंतु वस्तुस्थिति अशी आहे कीं, जगांतील कोणतेंहि उत्तम सरकार समाजांतील प्रत्येक व्यक्तीला नोकरी देऊं शकत नाहीं. कृत्रिम नोकऱ्या निर्माण केल्या तर आर्थिक व्यवहारांत आणखीनच प्रश्न निर्माण होतात.

बेकारीचा प्रश्न समाजांतील माणसांची संख्या कमी करून किंवा कृत्रिम नोकऱ्या वाढवून सुटणार नाहीं. पूर्वीं सांगितलेंच आहे कीं जमीन आणि मनुष्यबळ ही देशाची मूलभूत संपत्ति आहे. परंतु शेतजमिनीकडे दिवसें-दिवस अधिक अधिक दुर्लक्ष होत आहे. शेतकरी पैशाच्या अभावीं ... भाव यावा म्हणून, शहराकडे ओढा म्हणून शेतीतून कमीत

काढीत असतो. जें उत्पन्न येतें त्याची बरोबर नोंद होत नाहीं. जी काय शेतीविषयीं खोटीनाटी, अर्धीमुर्धी माहिती मिळेल त्यावर सरकार देशांतील धान्योत्पादनाचा अंदाज बांधतें. शेतमालक किंवा शेतकरी या दोघांनाहि शेतांतून उत्पन्न काढावयास स्वारस्य राहणार नाहीं असे कायदे सरकार करीत आहे. शेती ओस टाकून कारखाने वाढविण्याचें धोरण घातक ठरेल. कारखान्यांना पोषक होईल असेंच धोरण सरकारचें आहे. शेतीच्या पोटावर पाय आणून कारखाने आपले हातपाय पसरीत आहेत. तथापि एका मौलिक तत्त्वाचें स्मरण करून दिलें पाहिजे. तें हें कीं शेवटीं मनुष्य कोळसा, लोखंड, किंवा नाणें खाऊन पोट भरूं शकत नाहीं. अन्न आणि वस्त्र या कोणत्याहि कालांत कोणत्याहि परिस्थितींत प्राथमिक गरजा आहेत. जो देश कोळसा, लोखंडाच्या धुरावर मदार ठेवतो त्याचें अन्न दुसऱ्याच्या हातांत राहतें. असें परावलंबित्व किती दिवस तग धरूं देईल ?

यासाठीं देशाचा राज्यकारभार आणि समाजाची रचना अशी पाहिजे कीं ज्यांत जास्तींत जास्त माणसांस पोटभर अन्न मिळेल. अन्नोत्पादनाचें साधन म्हणजे शेती. शेतीपासून जास्तींत जास्त उत्पन्न मिळेल व जास्तींत जास्त जमिनीचा उपयोग होईल असें उत्तेजन जनतेला सरकारनें दिलें पाहिजे. शेतसारा धान्यरूपानें गोळा करावा. शेतीमुळेंच एकत्रकुटुंबपद्धति टिकून राहील. आणि एकत्रकुटुंबांमुळेंच कमींत कमी अर्थोत्पादनांत पण भरपूर अन्नोत्पादनांतून पुष्कळ माणसें पोसलीं जातील. त्याच वेळीं जादा लोकसंख्या आपत्ति न वाटतां संपत्ति आहे याचा साक्षात्कार होईल. पण या गोष्टी साधण्यासाठीं सरकारनें आणखी साह्य करणें अवश्य आहे. तें म्हणजे कायद्याच्या रूपानें. माणसांवर लादण्यांत येणारे सर्व प्रकारचे कर असे आहेत कीं एकत्र राहत असलेल्या कुटुंबानेंहि तेवढ्यासाठीं विभक्त व्हावें. करआकारणींत बदल करून एकत्र कुटुंबास पोषक असे कर ठेवणें अवश्य आहे. त्याचप्रमाणें नोकऱ्यांचे बाबतींत. एकाच कुटुंबांतील मंडळीस एकाच गांवांत नोकऱ्या देणें व

बदल्या त्याप्रमाणें करणें हें सरकारला अगदींच अशक्य नाहीं. सध्या नवरा एका गांवांत, बायको दुसऱ्या गांवांत व चार मुलें आणखी निराळ्या चार गांवांत अशी नोकरीची पद्धति आहे. या सर्वांस एकाच घरांत राहण्यास अनुकूल परिस्थिति निर्माण करणें मनांत आणलें तर अशक्य नाहीं. केवळ ही गोष्ट साधल्यामुळें माणसांवरील खर्चाचा बोजा कितीतरी कमी होईल. दोन तीन ठिकाणीं बिऱ्हाडें ठेवण्यानें प्रत्येक कुटुंबास निष्कारण दुप्पट तिप्पट खर्च पडतो. सरकारनें एवढें केल्यास वैतागलेली जनता दुवा दिल्याशिवाय राहणार नाहीं.

## पंचवार्षिक योजना—रेल्वे :

आतांपर्यंत आपण कांहीं मूलभूत समस्यांची चर्चा केली. मूलभूत ह्या दृष्टीनें कीं त्यांचें महत्त्व त्रिकालाबाधित असून हिंदुस्थानच्या अस्तित्वावर त्यांचा परिणाम होणारा आहे. आता कांहीं तात्कालिक परंतु तितक्याच महत्त्वाचे प्रश्नांकडे वळूं.

हिंदुस्थान सरकारनें मोठमोठ्या पंचवार्षिक योजना आंखलेल्या आहेत. त्यांची अर्थशास्त्रीय योग्यायोग्यता अर्थशास्त्रज्ञ करीत आहेतच. परंतु योजनांचें फळ हें फक्त खर्चीं पडलेल्या अवाढव्य आंकड्यांतच सांगण्यांत येतें. प्रत्यक्ष फळाचें स्वरूप सांगण्याऐवजीं नुसत्या खर्चाचे आंकडे कशासाठीं ? कीं फळ हातीं लागत नाहीं, लोकांपुढें ठेवण्यासारखें नाहीं, आणि ठेवलें तर जनता अधिकारपदावर राहूं देणार नाहीं अशी भीति वाटल्यावरून केवळ खर्चाचे आंकडे प्रसिद्ध करून लोकांस फसविण्यांत येतें काय ? लोकांचे जिवावर निवडून आलेला एकहि खासदार योजनेच्या पैशाचा पैन् पैचा हिशेब मागत नाहीं आणि सरकार देत नाहीं ! परदेशांतून कर्जें काढून, लोकांच्या शरीराचे लचके तोडून जो पैसा गोळा होतो त्याचें काय होतें ? आज जीं कर्जें परदेश देत आहेत तीं कांहीं फुकट नव्हेत. कर्ज मिळालेला

पैसा उधळून टाकला, परतफेड करावयास हातीं कांहीं राहिलें नाहीं अशा वेळीं आज मदतीला धावून आलेलीं राष्ट्रें हिंदुस्थान गिळंकृत करावयास धावतील. लोकसभेंतील खासदारांनीं एक स्वतंत्र समिति नेमून योजनेच्या कार्यांची प्रत्यक्ष पाहणी करून तो वृत्तान्त जनतेसमोर ठेवला पाहिजे.

रेल्वेच्या बाबतींतहि सरकारचा अक्षम्य अपराध आहे. रेल्वेचे अपघात होतात त्यांस कारणें दोन. एक म्हणजे रेल्वे नोकर व सरकार यांच्यांतील तंटा. सरकारच्या आडमुठ्या धोरणामुळें रेल्वे नोकर जिवावर उदार होऊन बेफिकीर बनत आहेत. दुसरें कारण रेल्वेची यांत्रिक दुरुस्ती व तपासणी हेतुपुरस्सर दुर्लक्षिली जाते. कारण ज्या रकमेंतून यांत्रिक दुरुस्ती करावयाची ती घसाऱ्याची व नफ्याची रक्कम सरकार योजनेच्या नांवाखालीं गडप करीत आहे. प्रवाश्यांचा जीव घेऊन सरकार या रकमा योजनांसाठीं वापरीत आहे. हें अघोर कर्म केवळ लोकशाही आहे म्हणूनच होऊं शकतें. जनतेचे विश्वस्त ही भूमिका सोडून जनतेला पिळून काढणारा व्यापारी ही भूमिका एकदां सरकारनें घेतली म्हणजे दुरुस्ती न करतां जर लोक रेल्वेचा वापर करून रेल्वेचा धंदा जोरांत चालू देतात तर दुरुस्तींत पैसा निष्कारण कशासाठीं खर्च करावयाचा हा साधा अर्थशास्त्रीय तर्क कांहीं खोटा नाहीं. आणि म्हणूनच आहे त्याच साधनसामुग्रींत जास्तींत जास्त धंदा चालावा म्हणून सरकार रेल्वेची अतोनात जाहिरात करतें व भाड्यांत खोट्या सवलती देऊन लोकांना प्रवासास उद्युक्त करतें. जणु कांहीं सरकारनें जाहिरात केली नाहीं तर लोक दुसऱ्या कंपनीच्या रेल्वेंत बसतील व सरकारी रेल्वे ओस पडतील!

### तात्पुरतें कारभारी मंडळ :

हिंदुस्थान सरकार याप्रमाणें राज्यकारभार करण्यास अपात्र आहे हें अनेकविध मार्गांनीं सिद्ध झालेलें आहे. प्रत्यक्ष परिस्थिति, अकौंट्स कमिट्यांचे वृत्तान्त, विचारवंत खासदारांचीं लोकसभेंतील कांहीं भाषणें, अनेक चौकशी समित्या, सर चिंतामणराव देशमुखांच्या सात्विक तक्रारी,

इत्यादि अनेक गोष्टी सरकारची अकार्यक्षमता सिद्ध करण्यास पुरेशा आहेत. यांपैकीं कोणत्याहि तक्रारीस सरकारनें चोख उत्तर दिलेलें स्मरत नाहीं. कांहीं ना कांहीं गोष्टी सांगून आपली लंगडी बाजू सांवरून धरणें एवढेंच सरकारी उत्तरांतून प्रतीत होतें. यावरून जर कोणीं सरकारच्या हेतूबद्दलच शंका प्रदर्शित केली तर त्याचें समाधान कसें करणार ?

आंतरराष्ट्रीय गुंतागुंतीमुळें आमच्या राष्ट्रीय समस्या अधिकच उग्र रूप धारण करतील. मग अंतर्बाह्य कोलाहलांत होरपळून जाण्याची पाळी हिंदुस्थानवर येईल अशी धास्ती वाटते. यासाठीं आणीबाणीची परिस्थिति म्हणून युवराज किरणसिंगांनीं शेख अबदुल्लास बाजूला सारलें त्याप्रमाणें राष्ट्राध्यक्षांनीं मंत्रिमंडळ बरखास्त करून सर चिंतामणराव देशमुखांसारख्या मोजक्या ५-६ जणांचें एक तात्पुरतें कारभारी मंडळ नेमावें. त्यानें देशांतील आजचे प्रश्न सोडवून एक अशी घटना तयार करावी कीं ज्या घटनेंतून फक्त तज्ज्ञ व लायक माणसेंच सरकारवर निवडून येतील. कोणत्याहि पोकळ घोषणा करणाऱ्या स्वार्थी राजकीय पक्षास त्यांत वाव राहूं नये. सरकारचें अस्तित्व अडाणी जनतेवर अवलंबून ठेवूं नये. कारण सरकार जनतेला सुसंस्कृत करण्याऐवजीं अडाणी जनतेला मतांसाठीं खूश ठेवून सरकार स्वतःच अडाणी बनतें.

# १. आजच्या समाजसंघटनेचें सूत्र (पूर्वार्ध)

समाजसंघटना ही समुद्राप्रमाणें सुरुवात न सापडणारी वस्तु आहे. समाजाची घडी विस्कटली म्हणजे आभाळ फाटल्याप्रमाणें परिस्थिति होते. काय प्रथम केलें म्हणजे समुद्रांत टाकलेल्या कोळ्याच्या जाळ्याप्रमाणें फाटलेलें आभाळ जुळून येऊन खेंचून घेतां येईल हें जाणलें पाहिजे. आज असें कोणतें सूत्र असेल कीं जें ओढून खेंचलें म्हणजे लाबवर पसरलेलें समाजाचें जाळें, नाना तऱ्हेच्या व्याधि-उपाधींच्या पाण्यानें व आंतील माशांनीं जड झालेलें हें जाळें समाजधुरीणांच्या हातांत आवरून धरतां येईल ? आजचा आमचा समाज अशा अनेक अंगोपांगांनीं समन्वित झालेला आहे कीं त्या प्रत्येकाची सुधारणा स्वतंत्रपणें प्रथम व्हावयास हवी असें वाटावें.

### समाजाच्या दौर्बल्याचें निदान अचूक झालें पाहिजे :

परंतु आपण हें जाणून असलें पाहिजे कीं, अशा कितीहि प्रकारांनीं आपण सुधारणा करीत राहिलों तरी समाजाची एकंदर धारणा इष्ट दिशेनें होत आहे असें दिसणार नाहीं. कदाचित् त्या प्रयत्नांत श्रमशीलता असेल, त्वरा असेल, तीव्र इच्छाहि असेल; परंतु समाजाच्या नवीन इष्ट धारणेस तें सर्व अपुरें पडावें. अशा वेळीं आपण निश्चित असें समजावें कीं, गणिताचें सूत्र अद्याप हातीं लागलें नाहीं. नुसत्या इतस्ततः आंकडेमोडीनें गणिताचें प्रमेय सुटणार नाहीं. विघटित समाजाचें दौर्बल्य अशक्त माणसाप्रमाणें असतें. त्या वेळची परिस्थिति निरखून हें दौर्बल्य कशानें आलें आहे याचें अचूक

निदान लागलें तर काय केलें म्हणजे हें दौर्बल्य नष्ट होईल हें तेव्हांच समजून येईल. आजच्या विघटित समाजाचें दौर्बल्य कशांत आहे हें शोधून काढणें हेंच अग्रस्थानीं असलेलें आजचें कार्य आहे.

सुधारणेच्या मार्गांतील अडचणी :

अशा मूलगामी विचारपद्धतींत अडचणीहि ब-याच आहेत. राजकीय पक्षांतील कांहीं समाजविघातक अश्लाघ्य गोष्टी ही सर्वांत मोठी अडचण आहे. प्रचलित लोकशाहींतील अंध आणि लहरी मतदानानें होणाऱ्या निवडणुकीची पद्धति जाऊन त्या जागीं आय्. सी. एस्. प्रमाणें सुशिक्षित, अनुभवी व सदसद्विवेक असलेल्या समाजदक्ष अशा केवळ निवडक राजकारणी लोकांचें राज्य झालें व या पद्धतीच्या अभिनव लोकशाही परंपरेची राज्यपद्धति आली तर ही अडचण अंशतः दूर होण्यासारखी आहे. यानंतरची मोठी अडचण म्हणजे द्रव्याचा अभाव. ही अडचण बरेच अडथळे आणणारी आहे. देशांतील विचारवंत व धनिक-वर्ग यांनीं त्याचें निराकरण करावयास हवें आहे. धनिकांनीं पुढें सरसावून बाजू सावरून धरली नाहीं तर ते समाजाचा मोठाच विश्वासघात करतील ! सरकारची आसनस्थिरता, पक्षनिष्ठ राजकारणनिरपेक्ष सामाजिक व सांस्कृतिक नियोजन आणि व्यापारी सुव्यवस्था म्हणजे पर्यायानें जनतेची आर्थिक स्थिरता, या गोष्टी धनिक आपल्या समाजकर्तव्याला जागले नाहींत तर अशक्य आहेत. त्यांच्या अभावीं करूं घातलेल्या योजना कोलमडून पडतील. हें टाळावयाचें असेल तर राजकारणाच्या कोर्टांत खेटे घालून निष्कांचन झालेल्यांच्या या राजकीय भाऊबंदक्या सोडून देऊन विचारवंतांनीं व धनिकांनीं एकत्र येऊन समाजास हात दिला पाहिजे. श्रीमंत व्यापारी, समाजांतील ( माजी संस्थानिक व सरदारप्रभृति ) धनिक आणि इतर प्रतिष्ठित नागरिक इत्यादिकांनीं एकत्र येऊन महाराष्ट्राचा व एकंदर देशाचाच व्यापार देशाच्या बाहेर जात नाहीं याची दक्षता घेतली पाहिजे.

पुढील अडचण स्वाभिमानाचा अभाव. ज्या समाजाची सुधारणा आपण करावयास निघालों आहोंत त्या समाजाविषयीं आपली श्रद्धा अढळ पाहिजे. व्यापक राजकारणाच्या प्रभावी प्रचारानें आमचा स्वाभिमान तर गेलाच, परंतु दृष्टि व्यापक न बनतां ती अधिकच संकुचित झाली. याचें प्रत्यंतर आजच्या राजकारणांत स्पष्ट दिसत आहे. आपण कोण आहोंत, कोणत्या समाजांत आहोंत तें परीक्षावें आणि आपल्या समाजाविषयींचें आपलें कर्तव्य करावें. माझ्या कुटुंबाचें पालन-पोषण करितांना मला दुसऱ्या कुटुंबाचा द्वेष करण्याचें कारण राहत नाहीं. उलटपक्षीं शेजारधर्म स्मरून त्याच्याशीं सहकार्य करणें हेंच श्रेयस्कर असतें. परंतु राजकारण लढविण्याच्या भरांत ही भूमिका विसरून स्वतःच्या कुटुंबाचें पोषण म्हणजे दुसऱ्या कुटुंबाचें शोषण असा अपप्रचार करण्यांत आला; परंतु या स्वातंत्र्योत्तर काळांत त्या वादाचें कारण उरलें नाहीं. समजुतदार होऊन ज्यानें त्यानें आपलें समाजाविषयींचें कर्तव्य पार पाडणें यांतच राजकारणाचें खरेंखुरें चीज आहे.

ज्या धर्माची आणि समाजाची सुधारणा करावयाची त्याविषयीं आत्मीयता आणि त्याचा अभ्यास हीं आवश्यक आहेत. ज्यास आत्मीयता नाहीं, त्यांचें हें कार्य नव्हे. हिंदुधर्माविषयीं आत्मीयता आणि त्याचें धर्मशास्त्र हीं जनतेस–निदान तिच्या सुधारणा करूं इच्छिणाऱ्यास–अवगत करून देणें अवश्य आहे. त्या ज्ञानानेंच धर्म-सुधारणा शास्त्रोक्त होईल.

### विघटनारूपी त्रिदोष :

वरील अडचणी लक्षांत घेत असतांना आत्मविस्मरण वा आत्मवंचना हा एक महत्त्वाचा दोष आपल्या समाजांत आढळून येतो. स्वातंत्र्यपूर्वकालांत देशविमोचन हें एकमेव निकडीचें कार्य नजरेसमोर असल्यानें त्या काळांत साहजिकच राजकारणावर सर्व लक्ष केंद्रित झालें. त्यांतून तें लोकशाहीचें राजकारण ! वर म्हटल्याप्रमाणें पक्षोपपक्षांच्या एकांगी राजकारणास ऊत येणें

स्वाभाविकच होतें. गेल्या पंचवीस वर्षांत अंतर्गत दूषित राजकारणानें आमचें सामाजिक नुकसान फार झालें. तथापि तें सर्व आलेल्या स्वातंत्र्याची किंमत होती असेंच आम्ही धरून चालतों. यापुढील काळांत मात्र आमची सामाजिक हानि होऊं देणें अनिष्ट आहे. स्वातंत्र्योत्तर कालांतील सामाजिक संघटनेचें सूत्र शोधून काढण्याच्या दृष्टीनें स्वातंत्र्यपूर्वकालांतील राजकीय व सामाजिक परिस्थिति अर्थात्‌च लक्षांत घ्यावयास हवी. एकंदर विचार करतां आपल्याला असें दिसेल कीं सामान्य व असामान्य जनतेच्या आचारविचारांतून आपली संस्कृति लुप्त होत चालली आहे. राजकीय पक्षांच्या प्रभावामुळें सामाजिक बंधहि हळूहळू सुटत चालले आहेत. आणि तिसरा मुद्दा हा कीं समाजाची स्वनियंत्रणक्षमता नष्ट झाली आहे.

**समाजाच्या जीवनाचा मूलभूत सिद्धान्त :**

कोणत्याहि समाजांत कोणत्याहि कालांत थोड्याफार फरकानें निरनिराळे प्रश्न असतातच. समाज स्वनियंत्रणक्षम असला म्हणजे हे प्रश्न सुटूं लागतात; परंतु हे प्रश्न सोडविल्यानेंच केवळ विघटित समाज स्वनियंत्रणक्षम होईल किंवा त्याला स्वास्थ्य लाभेल असें नाहीं. एक प्रश्न सोडविला तर दुसरा उभा असतोच. शिवाय कोणताहि प्रश्न पूर्णपणें कधींच सुटत नसतो. कारण समाजांत स्वास्थ्य असलें तरी समाज गतिमान असतो हें विसरून चालणार नाहीं. या गतींतील ओघ टिकविण्यासाठींच समाज स्वनियंत्रणक्षम असावा लागतो. समाजाला कार्यक्षम करणें हें अग्रमहत्त्वाचें काम आहे. जेणेंकरून त्याला समाजत्व प्राप्त होईल, तो बाजारबुणग्यांच्या स्वरूपांतून शिस्तबद्ध लष्कराच्या स्वरूपांत येईल असें कांहीं केलें पाहिजे. या दृष्टीनें विचार करावयाचा तर समाजाचें सूक्ष्म परीक्षण करणें अवश्य आहे. त्याचबरोबर समाजाच्या जीवन-शास्त्राचे कांहीं मूलभूत सिद्धान्तहि पाहावयास पाहिजेत.

संस्कृतीच्या परंपरेनें समाजाच्या सीमा निश्चित होत असतात. सामाजिक व्यक्ती एकत्र येऊन राहण्यासाठीं व आपापल्या वंशांचें सातत्य टिकविण्या-

साठीं त्या परस्परांत कांहीं एक व्यवस्था लावून घेत असतात. त्या व्यक्ती स्वतःचें जीवन स्वतःच जगण्यास अपुऱ्या पडत असल्यानें त्यांचें वैयक्तिक जीवन हें परस्परांच्या समजुतीनें, परस्परांच्या साह्यावरच अवलंबून असतें. अशा तऱ्हेनें त्यांचें समष्टिजीवन तयार होत असतें. या परस्परांच्या साह्यानें तयार होणाऱ्या समष्टिजीवनाला अशा अनेक पिढ्यांच्या परंपरेनें एक विशिष्ट वळण व विशिष्ट घडण प्राप्त होत असते. हें वळण, घडण परस्परांच्या साहाय्यामुळेंच घडत असल्यामुळें व त्यावरच समष्टिजीवनाचें सातत्य अवलंबून असल्यामुळें हें वळण व घडण जणुं समष्टिजीवनाचें जीवन असतें. या समष्टि-जीवनाला बाध येईल तर समाजालाहि धोका आलाच असें समजावें. आज या 'जीवना'ला बाध येत आहे. पुढील धोका टाळावयाचा असेल तर आमच्या समाजाचें जें ' वळण व घडण ' आहे तें प्रथम सुरक्षित ठेवलें पाहिजे. आमच्या प्राचीन सामाजिक व्यक्तींनीं एकत्र येऊन राहण्या-साठीं व आपापल्या वंशांचें सातत्य टिकविण्यासाठीं परस्परांत जी व्यवस्था लावून घेतली आहे, जगण्यासाठीं स्वतःचें जीवन अपुरें पडलें म्हणून परस्परांच्या साहाय्यानें त्यांचें जें समष्टिजीवन तयार झालें, त्याची परंपरा म्हणजे जें त्यांचें ' जीवन ' तें आम्हीं आज टिकवून धरलें पाहिजे. आमची वर्णव्यवस्था व सांस्कृतिक परंपरा हें आमच्या समष्टिजीवनाचें ' वळण व घडण ' आहे. त्यानेंच आमच्या समाजाला समाजत्व प्राप्त झालें आहे. हें समाजत्व सुरक्षित झालें म्हणजे समाज कार्यक्षम होईल. आमच्या समाजाची स्वनियंत्रणक्षमता या ' वळण-घडणां 'तच आहे. या दृष्टीनें प्राचीन भारतीय संस्कृति व तदन्तर्गत वर्णव्यवस्था या दोन गोष्टी समाजाच्या आजच्या अवस्थेंत फार महत्त्वाच्या आहेत.

**संस्कृतीचें सातत्य :**

ज्या संस्कृतीचें संवर्धन करावयाचें ती संस्कृति म्हणजे काय याची थोडी तरी रूपरेखा आपल्या मनांत पाहिजे. कोणत्याहि संस्कृतीची व्याख्या खालील

तीन सूत्रांत देतां येईल :—

( १ ) मानवी जीवनाचें आत्यंतिक ध्येय,

( २ ) त्या ध्येयाचे मार्ग, आणि

( ३ ) त्या मार्गांत मनुष्यानें केलेली वैचारिक आणि भौतिक प्रगति म्हणजे संस्कृति.

भारतीय संस्कृति मानवी जीवनाचें आत्यंतिक ध्येय पारलौकिक मोक्ष हें मानते. त्या ध्येयाचा मार्ग अध्यात्म आणि या मार्गांत भारतीयांनीं केलेली भौतिक प्रगति म्हणजे त्याचीं धर्मतत्त्वें आणि त्यांवर आधारलेली चातुर्वर्ण्यात्मक समाजरचना. या समाजरचनेंतून व्यक्तीच्या आध्यात्मिक, ऐहिक आणि समष्टिजीवनाच्या उन्नतीच्या दृष्टीनें जी शिकवण दिली गेली ती शिकवण आणि त्या शिकवणीनें व्यक्तीची मनोरचना आणि ऐहिक पुरुषार्थसाधनेकरितां केलेले वैयक्तिक आणि सामाजिक व्यवहार, या सर्वांस भारतीय संस्कृति म्हणतां येईल. या संस्कृतीचें दृश्य स्वरूप आमच्या अध्यात्मतत्त्वज्ञानांत, धर्मशास्त्रांत, त्यामुळें निर्माण झालेल्या भारतीयांच्या सहिष्णु, आध्यात्मिक, सात्त्विक मनोरचनेंत, त्यांच्या विशिष्ट समाजरचनेंत आणि त्यांच्या विविध कला व विद्या, निरनिराळीं शास्त्रें, साम्राज्यें आणि निरनिराळ्या सामाजिक संस्था यांत आहे. याप्रमाणें प्रत्येक संस्कृतीच्या लोकांचीं जीवनसाधनें निरनिराळीं दिसतील, त्यांच्या यशापयशाचीं मूल्यें निराळीं दिसतील आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांचे जीवनसाध्याचे मार्ग भिन्नभिन्न दिसतील. अर्थात् त्याप्रमाणें मनोवृत्तींतील भेद स्पष्ट होईलच.

अर्थात् या भारतीय संस्कृतीचें संवर्धन करितांना संस्कृतीचीं तात्त्विक मूलतत्त्वें त्रिकालाबाधित असतात, तीं बदलण्याचें कारण नाहीं. संस्कृतीचीं जीं व्यावहारिक अंगें असतात तीं कालमानाप्रमाणें बदलावीं लागतील. उदाहरणार्थ, समाजरचनेचें स्वरूप थोडें बदलावें लागेल; जीवनाचीं साधनें बदलतील, पोशाख बदलेल. संस्कृतीचें अध्यात्मतत्त्व आजहि चालण्यासारखें

चातुर्वर्ण्याचीं बीजें आहेतच. आमच्याप्रमाणेंच त्यांकडे सामाजिक भेद आहेत. वास्तविक चातुर्वर्ण्याचें कार्य अपुरें राहिलें म्हणूनच हिंदुस्थानांत जातिभेद माजले. जातिभेद व जातिद्वेष नष्ट करावयाचे असतील तर चातुर्वर्ण्याचें अपुरें राहिलेलें कार्य पूर्ण करावयास पाहिजे असें डॉ. केतकरांचें यथार्थ म्हणणें आहे.

**चातुर्वर्ण्याची औपनिषदिक उत्पत्ति :**

बृहदारण्यकोपनिषदाच्या चवथ्या ब्राह्मणामध्यें चातुर्वर्ण्याची उत्पत्ति सांगितली आहे. तींत चातुर्वर्ण्यांतील दोन महत्त्वाचीं तत्त्वें ध्वनित केलेलीं आहेत. पहिलें तत्त्व समाजजीवनाचीं मूलभूत साधनें–प्रथम ब्रह्म एकटेंच होतें. त्या ब्रह्मानें 'मी ब्रह्म व्हावें' असें स्वतःलाच जाणलें. म्हणून तें ब्राह्मणरूपांत सर्व जगत् झालें. ( अहं ब्राह्मास्मीति । तस्मात्तत् सर्वमभवत् । ) परंतु तें एकटें ब्रह्म कर्म करण्यास पुरेसें होईना म्हणून त्यानें क्षत्रियास उत्पन्न केलें. ( तदेक ९ सन्न व्यभवत् । तच्छ्रेयो रूपमत्यसृजत क्षत्रं... । ) तरी तें ब्रह्म सर्व कर्म करण्यास समर्थ झालें नाहीं. म्हणून त्यानें वैश्यांना निर्माण केलें ( स नैव व्यभवत् स विशमसृजत... । ) तरी तें ब्रह्म सर्व कर्म करण्यास समर्थ झालें नाहीं. म्हणून त्यानें पूषणनामक शूद्र वर्ग निर्माण केला. ( स नैव व्यभवत् स शौद्रं वर्णमसृजत... । ) तरी तें सर्व कर्म करण्यास समर्थ झालें नाहीं. यापुढील ब्रह्माची कृति फार महत्त्वाची आहे. जगांत चार प्रकारचे मानव निर्माण करूनहि त्यांचें धारण-पोषण करण्यास ब्रह्म अजूनहि अपुरें पडलें. तेव्हां त्यानें 'धर्म' निर्माण केला ( स नैव व्यभवत् तच्छ्रेयोरूपमन्यसृजत धर्मं... । ) समाजजीवनाच्या मूलभूत साधनांत समाजनियंत्रण हेंहि अंतर्भूत केलेलें आहे !

**वर्णांचें नियतकार्य :**

चातुर्वर्ण्यावर आक्षेप घेतला जातो त्याप्रमाणें चातुर्वर्ण्यांत खरोखर सत्ताधीशांचें असंस्कृत व अबल अशा लोकांवरील वर्चस्व अभिप्रेत नाहीं,

किंवा जातिभेद माजवून त्यांतून उद्भवणारी द्वेषाची भावनादेखील त्याच्या मुळाशीं नाहीं. सर्व वर्ण ह्या निरनिराळ्या देवता आहेत व प्रत्येक वर्णाचें समाजांत स्वतंत्र महत्त्व आहे. ब्राह्मण हें सृजनाची इच्छा असलेलें ब्रह्म होय. क्षत्रिय म्हणजे इंद्रादि देवता होत ( क्षत्त्राणीन्द्रो वरुणः सोमो रुद्रः पर्ज्यन्यो यमो मृत्युरीशान इति । ). वैश्य हे वस्वादि देव ( देवजातानि गणश आख्यायन्ते वसवो रुद्रा आदित्या विश्वेदेवा मरुत इति । ) शूद्र म्हणजे पृथिवि. पूषा याचा अर्थ पृथिवी. कारण हें जें कांहीं सर्व त्याचें पोषण पृथिवीच करते ( पूषणमियं वै पूषेय ९ हीद् ९ सर्वं पुष्यति यदिदं किं च । ).

चातुर्वर्ण्याच्या व्युत्पत्तीमागील ही ध्वनित केलेली भावना लक्षांत घेण्यासारखी आहे. येथें धनी व दास असाहि भाव अभिप्रेत नाहीं. प्रत्येकाला स्वतंत्र स्थान असून प्रत्येक दुसऱ्याचा सेवक आहे, व सर्वजण परब्रह्माचे सेवक–उपासक आहेत. प्रत्येकाच्या ठिकाणीं परस्पर सेवक-भाव जागृत असला तरच सर्व समाजाचें धारण होतें. याच दृष्टीनें भगवद्गीतेच्या अठराव्या अध्यायांत श्लोक ४२, ४३ व ४४ यांत प्रत्येक वर्णाचीं कर्तव्यकर्में सांगितलीं असून ४५ व्या श्लोकांत स्वकर्तव्यरत मनुष्य मोक्ष मिळवितो, असें सांगितलें आहे व पुढे ४८ व्या श्लोकांत ' सहजं कर्म, कौन्तेय सदोषमपि न त्यजेत् । सर्वारम्भा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः ॥ " म्हणजे प्रत्येक वर्णाच्या कर्मांत कांहीं ना कांहीं तरी दोष हा असतोच. त्यामुळें आपलें कर्तव्य सोडून दुसऱ्याच्या मागें लागूं नये असें स्पष्ट बजावलें आहे. ( कारण तसें केल्यानें समाजांतील व्यवस्था बिघडून जाईल. )

### भेद म्हणजे द्वेष नव्हे :

आजच्याप्रमाणें जातिभेद नष्ट करण्याची भाषा बोलणाऱ्यांनीं प्रथम भेद म्हणजे काय व समता म्हणजे काय याचे अर्थ निश्चित करावयास पाहिजेत. भेद हा मुळांत द्वेषोत्पन्न कधीं नसतो. सामाजिक व वैयक्तिक भेद हे नैसर्गिक भेदांमुळें उत्पन्न होतात. नैसर्गिक भेद मनुष्याच्या कक्षेबाहेरचे आहेत. प्रत्येक

व्यक्तींचें कर्तृत्व, बुद्धिसामर्थ्य, मनःसामर्थ्य, शरीरसौंदर्य व आवड-निवड हीं सारखीं नसतात. मनुष्यामनुष्यांत भेद निर्माण होण्याचीं हीं मूलतत्त्वें आहेत. आणि हीं मूलतत्त्वें जगांत कोणत्याहि समाजांत आज दृष्टोत्पत्तीस येतात. जी गोष्ट नैसर्गिक आहे तीवर मनुष्याचा द्वेष कधी अवलंबून नसतो. जो कांहीं थोड्याफार प्रमाणांत दृष्टोत्पत्तीस येईल तो निष्कारण असल्यानें तो नष्ट करण्यासाठीं संस्कृतीसारखीं साधनें मानवानें निर्माण केलीं आहेत. काळा मनुष्य, गोऱ्याचा तो गोरा म्हणून द्वेष करीत नाहीं. कारण गोरेपण हें त्या गोऱ्या माणसाच्या इच्छेवर व सामर्थ्यावर अवलंबून नाहीं. परंतु दोघेहि परीक्षेंत एकाच श्रेणीचें व एकाच गुणाचें यश संपादन करून एकास पारितोषिक दिलें व दुसऱ्यास दिलें नाहीं, तर मात्र तेथें द्वेषभावना निर्माण होईल. किंवा एकाला शिकवणी ठेवली व दुसऱ्याकडे दुर्लक्ष केलें तरीहि द्वेषभावाला येथें स्थान आहे. किंवा प्रत्येक मनुष्य आपापल्या कर्तृत्वशक्तीप्रमाणें फलाची अपेक्षा करीत असतो. ती सफल न झाल्यास हा अपेक्षाभंग द्वेषास कारणीभूत होतो. अन्याय झाला असतांहि द्वेषभावना निर्माण होते. नैसर्गिक कारणामुळें निर्माण होणारी द्वेषभावना मनुष्यनिर्मित भेदांतून उद्भवणाऱ्या द्वेषापेक्षां फार सौम्य प्रमाणांत बिकट प्रश्न निर्माण करते. समाजांत एकाच यंत्रांतून काढलेल्या समप्रकृतीच्या व्यक्ति गृहीत धरून सर्वांस सारखें फळ द्यावें ही विचारसरणी न मांडतां प्रत्येकाचें कर्तृत्व व बुद्धिसामर्थ्य सारखें नसल्यानें व तें प्रत्यंतराला आल्याशिवाय कळत नसल्यानें, तशी संधि प्रत्येकास देणें हें एकच मानवाचें आपल्या इतर मानवबंधूंविषयीं कर्तव्य ठरतें. विश्वांत सर्वत्र समप्रकृति झाली तर विश्व जेथल्या तेथें स्थगित होईल. म्हणून आमच्या तत्त्वज्ञानाची भूमिकाच अशी मानण्यात आली आहे कीं विश्वाची धारणा विषम म्हणजे विभिन्न प्रकृतीची आहे. विश्वाची रचना विषमतापूर्ण आहे हें केवळ अभ्यासू बुद्धीचें निसर्गांतील निरीक्षण आहे. तें मानवाचें कृत्य नाहीं. परंतु ‘ सर्वत्र समदर्शन ’ हें

मात्र विषम विश्व सुखानें नादण्याकरितां भारतीय संस्कृतीनें निर्मिलेलें तत्त्व आहे. या तत्त्वाकडे प्रथम लक्ष पुरवलें पाहिजे.

**अस्पृश्यतानिवारण :**

आणि म्हणून समाजसुधारणा सार्वजनिक अथवा विस्तृत प्रमाणावर न करतां ती व्यक्ती-व्यक्तीच्या हृदयाशीं जाऊन करावी लागते. या सूत्राची आवश्यकता विशेषतः अस्पृश्यतेच्या प्रांतांत फार आहे. अस्पृश्यतानिवारणाचे प्रयोग हे आजपर्यंत प्रचाराचें फार मोठें साधन होऊन बसलें आहे. समाजसुधारणा सार्वजनिक किंवा प्रचारात्मक झाली म्हणजे त्यांतून हा मोठा दोष निर्माण होतो.

अस्पृश्यता-निवारणांत दोन मुख्य भाग पडतात. पहिला भाग त्याच्या अस्पृश्यतेच्या शुद्धीचा व दुसरा त्यांचे समाजांतील स्थान सुधारण्याचा. पैकीं अस्पृश्यतेच्या शुद्धीचा भाग मूलग्राही व महत्त्वाचा आहे. त्यांचें समाजांतील स्थान वाढविण्याचे उपचार किंवा उपाय पुष्कळ झाले आहेत, व आजहि होत आहेत. त्या उपचारांच्या मानानें अस्पृश्यता मात्र नष्ट झाली नाहीं. आणि हे उपचार असेच पुढें चालू राहिले तरी अस्पृश्यता कधींच नष्ट होणार नाही. त्यांच्या शुद्धीचे प्रयत्न मात्र व्हावे तितके झाले नाहींत. महाराष्ट्रांतील कांहीं मोजक्या व्यक्तींचे या प्रांतांतील प्रयत्न अर्थात् स्पृहणीय आहेत. परंतु त्यांनीं सुरू केलेली सेवेची परंपरा पुढें टिकली नाहीं व त्यांचें कार्य त्यांच्यापुरतेंच राहिलें. सामान्यतः अभ्यासू सेवावृत्तीचा अभाव सर्वत्र दिसून येतो. शुद्धिकार्याचा प्रसार झाला नाहीं याचें कारण त्या कार्याला खरीखुरी सेवा आणि त्याग यांची गरज आहे. त्यांत कोणतींहि विलोभनें नाहींत. राजकारणहि जिंकतां येणार नाहीं. अस्पृश्यांचें समाजांतील स्थान वाढविणें हें सुलभ, कीर्तिप्रद, आकर्षक व राजकारणास उपयुक्त असें होतें. त्यामुळें सहभोजनें, मंदिरप्रवेश, अस्पृश्याच्या वस्तींत जाऊन कांहीं करणें ह्या गोष्टी भराभर फैलावूं लागल्या. आणखी कोणीं शुद्धिकार्याचे जे प्रयोग

केले ते केवळ प्रयोग म्हणूनच राहिले, व जोंपर्यंत ते प्रयोगावस्थेच्या बाहेर पडून सर्रास रूढ झाले नाहींत तोंपर्यंत त्या प्रयोगांचा कांहीं उपयोग नाहीं. असे प्रयोग हें एक केवळ उपचारच होऊन बसतात.

कांही कां असेंना, गेल्या दोन तीन तपांत अस्पृश्यतानिवारण्याचे प्रयत्न पुष्कळ झाले यांत शंका नाहीं. तथापि सर्व शुद्धिकार्ये व उपचार यांनीं मिळून अद्यापिहि अस्पृश्यता नष्ट होत नाहीं. या विफलतेची कारणमीमांसा शोधावयास पाहिजे.

## ' अस्पृश्यते 'चा शास्त्रार्थ :

मुळांत अस्पृश्य ही कोणी जात नाहीं. अस्पृश्यता हा माणसाला चिकट-लेला गुण आहे. ज्याच्या अंगीं हा गुण आहे तो अस्पृश्य. हा गुण समाजात कोणत्याहि माणसाच्या अंगीं असूं शकतो. अस्पृश्य म्हणजे स्पर्श करण्यास अपात्र असा. शरीरानें गलिच्छ असणारा अन्याकडून स्पर्श केला जाण्यास अपात्र ठरतो त्याप्रमाणें कुकर्मी मनुष्यहि जवळ जाण्या-येण्यास अपात्र असतो. ह्याला कारणें दोन. एक त्याला जवळ न करण्यांत—आपल्या माणसांतून काढून दूर ठेवण्यांत—त्या मनुष्याला शिक्षा दिलेली असते. दुसरें म्हणजे त्याची कुसंगति लागून समाजांतील इतर व्यक्ती बिघडूं नयेत म्हणून ही दक्षता घेतलेली असते. कोर्टानें गुन्हेगार ठरविलेला मनुष्य समाजांत आपली पत घालवून बसतो म्हणजे काय होतें? समाजांतील लोक कोणत्याहि तऱ्हेनें त्या माणसाशीं व्यवहार करण्यास तयार होत नाहींत. या वेळी तो अस्पृश्यच असतो. अशा जन्मभर गुन्हे करणाऱ्या व्यक्ती सरकार हेरून ठेवीत असतें, व शेवटीं या सुधारलेल्या आधुनिक काळांतहि ' गुन्हेगार जाती ' म्हणून त्यांस समाजापासून अलग ठेवण्यांत येतें. अलिकडे मुंबई सरकारनें गुन्हेगारांच्या सुधारणेसाठीं नवीन कायदे करून त्यांस समाजांत घेण्याचें ठरविलें आहे. त्यांत त्यांना स्वतंत्र जात म्हणून वागविण्यांत येणार नाहीं व कायमचे वाळींत टाकण्यांत येणार नाहीं. परंतु ते जोंपर्यंत सुधार-

णेच्या शिक्षणांत आहेत तोंपर्यंत निराळेच ठेवले जाणार व हलु हलु त्यांस समाजाशीं मिसळत आणणार. ही एक प्रकारची अस्पृश्यताच व ती निवारण्याचा हा एक योजिलेला मार्ग! संसर्गजन्य रोग्यापासून आपण अलग राहतों तीहि अस्पृश्यताच. सोंवळ्यानें पूजा करणारा ब्राह्मण स्वतःच्या मुलास शिवूं देत नाहीं हीहि एकपरीची अस्पृश्यताच. आप्तेष्ट मृत झाला असतांचें सुतक किंवा मूल जन्मल्याचा सोहेर हीहि अस्पृश्यताच. यांत द्वेषोत्पन्न उच्च-नीच भावना अभिप्रेत असते काय?

## अस्पृश्यांची मूलपीठिका :

'अस्पृश्यता' हा अभावदर्शक शब्द आहे. त्याचा भावदर्शक प्रतिशब्द 'पावित्र्य' असा आहे. अस्पृश्यता पाळण्यांत पावित्र्यपालन अभिप्रेत असून तोच मूळ उद्देश आहे. 'अस्पृश्यता' या शब्दांत वा इतिहासांत द्वेषवाचक, अधिकारवाचक किंवा ज्ञातिवाचक असा कोणताहि ध्वनि नाहीं. त्या त्या व्यक्तींचें, इष्ट देवतेचें, वातावरणाचें व एकंदर संस्कृतीचें पावित्र्य टिकविणें हा शास्त्रकारांचा एकमेव उद्देश 'अस्पृश्यता' स्वीकारण्यांत दिसतो. मात्र चातुर्वर्ण्यप्रस्थापनेच्या सुरुवातीस कांहीं अनार्य जाती अस्पृश्यवत् गणल्या जात; परंतु मुळांत अपवित्र म्हणजे असंस्कृत असणें हा कोणाचा दोष नसून त्यांस तसेंच अपावित्र्यांत ठेवणें हा ठेवणाऱ्याचा दोष आहे. पूर्वीं असंस्कृताचा सुसंस्कृत केवळ सुसंस्कृतत्वाचें तिकिट घेऊन होतां येत नसे. असंस्कृताचा सुसंस्कृत करणें निदान जातींच्या बाबतींत फार मोठ्या कालांतराचा प्रश्न होता. त्याशिवाय त्या व्यक्तीची व समाजाची अंतःकरणशुद्धता अशक्य आहे. आर्येतर असंस्कृत जातींना सुसंस्कृत करण्याची पहिली पायरी म्हणजे त्यांस आपल्यामध्यें घेणें. या दृष्टीनें 'शूद्रो वर्णश्चतुर्थोऽपि वर्णत्वाद्धर्ममर्हति।' या वचनाप्रमाणें धर्मांत स्थान देणें महत्त्वाचें आहे. याहिपुढें जाऊन त्रैवर्णिकांनीं या चतुर्थवर्णीय कुटुंबांशीं विवाहसंबंध जोडले. असंस्कृताला सुसंस्कृत

करणें व नंतर त्याच्याशीं व्यवहार करून त्यास आत्मसात् करणें हें शास्त्रोक्त अस्पृश्यतानिवारण आहे. परंतु आज आम्ही समतेच्या समाधानासाठीं सुसंस्कृताचे असंस्कृत बनतों व नंतर त्यांतून अस्पृश्यतानिवारणाच्या ऐवजीं पावित्र्यनिवारण होतें. प्राचीन आर्यांच्या या अस्पृश्यतानिवारणाची परिणति ज्ञानेश्वरांच्या पूर्वीं झाली. 'या काळीं शूद्र हे सुविद्य, आचारसंपन्न, धर्मपरायण आणि बहुसंख्यांक होते.' ( निवडक लेख : संतांची कामगिरी—ना. गो. चापेकर ) शूद्रोद्धाराचें हें कार्य प्राचीन ऋषींनींच आरंभिलें होतें. या दृष्टीनें मत्स्यपुराणांतील पुढील वचन लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

कर्मभिः शुचिभिर्देवि शुद्धात्मा विजितेन्द्रियः ।
शूद्रोऽपि द्विजवत् सेव्य इति ब्रह्माऽब्रवीत् स्वयम् ॥

पुढील गौतमसूत्रहि वरील विधानास पोषक आहे.

आर्यानार्ययोर्व्यतिक्षेपे कर्मणः साम्यम् ।

त्याची परिणति ज्ञानेश्वरपूर्वकालांत होऊन ज्ञानेश्वरांपासून बौद्धधर्मानें बदललेल्या परिस्थित्यनुसार तेंच कार्य पुढें संतांनीं नव्या जोमानें चालू ठेवलें.

## अस्पृश्य जातिनिर्मितीचा इतिहास :

आतां आज प्रचलित असलेल्या अस्पृश्य जाती कशा निर्माण झाल्या याच्या इतिहासाकडे दृष्टिक्षेप टाकला तर 'अस्पृश्य' या शब्दाचा अर्थ आपल्याला स्पष्ट होईल आणि आजच्या समाजकारणांतील या विषयाच्या मतप्रवाहास कदाचित् नवीन दिशा दर्शविल्यासारखें होईल.

जो पुण्यकर्म करतो त्याला उच्च योनि प्राप्त होते; परंतु निंद्य कर्म करणाऱ्याला हीन योनींत जन्म घ्यावा लागतो असें छान्दोग्य उपनिषदांत पांचव्या अध्यायाच्या दहाव्या खंडांत म्हटलें आहे :—

तद्य इह रमणीयचरणाभ्याशो ह यत्ते रमणीयां योनिमापद्येरन् ब्राह्मणयोनिं वा क्षत्रिययोनिं वा वैश्ययोनिं वाऽथ य इह कपूयचरणा अभ्याशो

ह यत्ते कपूयां योनिमापद्येरन् श्वयोनिं वा सुकरयोनिं चांडालयोनिं वा ॥ ७ ॥

याचा अर्थ श्रुतिहीन कर्म करणाऱ्यांना हीन योनि येऊन ती एक जन्मसिद्ध जात मानतात. यांतहि हें लक्षांत ठेवावयास हवें कीं हें वचन पुनर्जन्म व कर्मसिद्धान्त यांवर आधारलेलें आहे. जर श्रुति हे दोन सिद्धान्त मानीत नसेल तर आधुनिक विचारप्रणालीप्रमाणें एकदां हीन कर्म करणारा मनुष्य जन्मभर व पिढ्यानुपिढ्या नेहमीं हीन कर्मेंच करीत राहतो व अशा तऱ्हेनें ही जातच होऊन जन्मसिद्ध अस्पृश्यता तयार केलेली आहे हें म्हणणें योग्य ठरेल. अत्रिस्मृतीमध्यें दहा प्रकारचे ब्राह्मण सांगितले असून त्यांत दुर्गुणी असणाऱ्या ब्राह्मणाला चांडाळ म्हटलें आहे.

क्रियाहीनश्च मूर्खश्च सर्वधर्मविवर्जितः ।
निर्दयः सर्वभूतेषु विप्रश्चाण्डाल उच्यते ॥ ३८१ ॥

पंचमहापातकी लोक असत त्यांस दंड व प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत (मनु. ९–२३५ ते २३९). जे लोक यांसहि दाद देत नसत त्यांस बहिष्कार हें एक मोठें शस्त्र त्या काळीं होतें. समाजनियंत्रणाच्या दृष्टीनें या बहिष्कारास फार महत्त्व होतें. 'सर्वधर्मबहिष्कृत' लोक अतिशूद्रांत गणिले जात असत व चातुर्वर्ण्य-बाह्यस्थितींत (म्हणजे समाजबाह्य) राहून निरनिराळे उद्योगधंदे करून त्यांस उदारनिर्वाह करावा लागत असे. याशिवाय खालीं दिलेलीं पंचमहापातकें करणाऱ्यांसहि हेंच शासन असे.

ब्रह्महत्या सुरापानं स्तेयं गुर्वंगनागमः ।
महान्ति पातकान्याहुः संसर्गश्चापि तैः सह ॥ मनु ११-५४.

स्वधर्मभ्रष्टांसहि हीच शिक्षा असे :—

न तिष्ठति तु यः पूर्वां नोपास्ते यश्च पश्चिमाम् ।
स शूद्रवत्बहिष्कार्यः सर्वस्मात् द्विजकर्मणः ॥ मनु. २–११३.

यावरून पाहतां पं. महादेवशास्त्री दिवेकरांचें विधान यथार्थ वाटतें. ते म्हणतात–'एवढें खरें कीं पातकजन्य पातित्य व क्रियालोपजन्य पातित्य

नाहींसें करण्याची एके काळीं कांहीं तरी व्यवस्था होती. या व्यवस्थेमुळें हे लोक पुन्हा वर येत असत; परंतु बौद्धधर्माच्या अमदानीमध्यें समाज-नियंत्रण करणारी शक्ति नष्ट झाल्यामुळें सर्व पतितांचा एक कायम वर्ग बनला. त्यांचे धंदेहि अगदीं घाणेरडे असल्यामुळें त्यांना भिन्न भिन्न संवयी व आचार जडून त्यांची स्ववर्णप्रवेशेच्छा नष्ट झाली व हा वर्ग कायम राहिला.' ( अस्पृश्योद्धारविचार—पंडित महादेवशास्त्री दिवेकर ).

**संशोधनाची नवीन दिशा :**

आणखीहि दोन व्युत्पत्ती अस्पृश्यांच्या आहेत. एक प्रतिलोम संकर व दुसरी डॉ. केतकरांच्या म्हणण्याप्रमाणें चातुर्वर्ण्याचें राहिलेलें अपुरें कार्य. परंतु त्याच्याशीं आपल्याला येथें फारसें कर्तव्य नाहीं. वरील उद्धृत वचनांवरून 'अस्पृश्य' शब्दाची व जातीची आपल्याला व्युत्पत्ति कळून येईल. अस्पृश्यतेंत दोन मुख्य तत्त्वें दिसून येतात. रानटी समाजांच्या सुधारणेचा मार्ग व पातक्यांना वळणावर आणणारें एक शस्त्र. हिंदु समाजाच्या संघटनेचा शास्त्रोक्त अभ्यास केला तर हें अपुरें राहिलेलें कार्य त्याच मार्गानें आजहि पुढें चालू ठेवतां येईल. अस्पृश्यतेची व्याप्ति फार मोठी आहे. त्यांत केवळ एक ठराविक जात नाहीं. 'अस्पृश्यते'च्या अस्त्रांतून ब्राह्मणसुद्धां निसटलेला नाहीं. 'अस्पृश्यते'चें शास्त्रोक्त वर्णन करावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, 'अस्पृश्यता' हें पुढें होणाऱ्या ब्राह्मणांचें व पूर्वी असलेल्या ब्राह्मणांचें कांहीं काळ एकत्र येण्याचें स्थान आहे. कारण अस्पृश्यता हें एक कार्य आहे. त्यांत प्राचीन रानटी जातींचा उद्धार आहे व पातक्यांना प्रायश्चित आहे. त्या पूर्वींच्या पातक्यांचा शोध करून त्यांस त्यांच्या मूलस्वरूपाची जाणीव करून देऊन त्यांची स्वस्थानीं प्रस्थापना करावयाची आहे. समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांनीं अस्पृश्य व्यक्तींच्या चालीरीती, त्यांचीं गोत्रें, त्यांचीं नांवें, त्यांचीं दैवतें, धार्मिक विधि, इत्यादि माहिती उपलब्ध करून घेणें आवश्यक आहे. त्यावरून त्या त्या व्यक्तींना

कांहीं संस्कारान्तीं परत स्वजातींत घेतां येणें सुलभ होईल. याशिवाय जे संकरोत्पन्न आहेत त्यांचीहि अशीच माहिती घेणें उद्बोधक होईल. त्यांस सुसंस्कृत करणें आपलें काम आहे. या अस्पृश्यांत मूळचे अनार्य लोक कोणते, तें त्यांच्या वरील माहितीवरून सहज काढतां येईल. अस्पृश्यतेचा अशा तऱ्हेनें अभ्यास होणें अत्यावश्यक आहे. त्यामुळें त्यांच्यांत आवश्यक त्या सुधारणा करणें सुलभ होईल. या ऐतिहासिक व धर्मशास्त्राच्या अभ्यासानें अस्पृश्यांविषयीं आपल्याला आपलेपणा वाटूं लागेल. अस्पृश्यांस स्वतःस सुधारून घेण्याची इच्छा होईल व त्यांसहि हिंदुसमाजाविषयीं आपलेपणा वाटावयास लागेल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ७३००३ वि: आ...

## १०. आजच्या समाजसंघटनेचें सूत्र (उत्तरार्ध)

मागील लेखांकांत आपण समाज–संघटनेच्या सूत्राची तात्त्विक भूमिका पाहिली व त्यांतच समाजांतील त्रिदोषांचें दिग्दर्शन केलें आहे. (१) सामान्य व असामान्य जनतेच्या आचारविचारांतून आपली संस्कृति लुप्त होत चालली आहे. (२) राजकीय पक्षांच्या प्रभावामुळें सामाजिक बंधहि हळुहळु सुटत चालले आहेत. आणि (३) समाजाची स्वनियंत्रणक्षमता नष्ट झाली आहे. ह्या त्रिदोषांचें निराकरण करण्यास संस्कृतीच्या सातत्याचें सूत्र सांगून त्याचें एक साधन वर्णव्यवस्था ह्याची आपण थोडी चर्चा केली होती. ह्या लेखांत वर्णव्यवस्थेचा उरलेला भाग, कुटुंबव्यवस्था, आश्रमव्यवस्था व सामाजिक अधिष्ठान ह्या उपायांची चर्चा करावयाची आहे.

**वर्णव्यवस्थेंतील औद्योगिक नियंत्रण :**

वर्णव्यवस्थेंतील आजचे प्रमुख दोष म्हणजे जातिभेद व अस्पृश्यता. ह्यांचा आपण मागील लेखांत विचार केलेला आहे. वर्णांच्या पुनर्व्यवस्थेंत केवळ धार्मिक व सामाजिक विचार नसून अर्थनियोजन हा एक महत्त्वाचा हेतु त्यांत अभिप्रेत आहे. वर्णांची पुनः स्थापना करावयाची झाल्यास यंत्राच्या साहाय्यानें भरभराटलेल्या आजच्या प्रचंड प्रमाणावरील कारखानदारीला प्रथम आळा घालावा लागेल. चातुर्वर्ण्यांत घरगुती लहान लहान धंद्यांनाच स्थान आहे. घरगुती धंद्यामुळें आर्थिक व औद्योगिक व्यवहार ह्यांचें केंद्रीकरण होऊं शकत नाहीं. केंद्रीकरणाच्या अभावीं औद्योगिक

व्यवहारांत मोठ्या प्रमाणांवर लाटा उत्पन्न होत नाहींत. जे कांहीं थोडे फार धक्के असतील ते जेथल्या तेथें स्थानिक व्यवहारांत असतील व त्यांचें प्रमाण व त्याचा परिसर मोठा नसल्यामुळें इतर बहुसंख्य जनतेस ते बाधक होत नाहींत. प्रत्येकजण स्वतंत्र उद्योग करणारा असतो. त्याचें भांडवल थोडें. त्याचा माल थोडा. ह्यामुळें अठरापगड धंदे करणाऱ्या अनेक लोकांची समाजाला जरूर लागते. आर्थिक संचय विभागून जातो. आजच्याप्रमाणें थोडक्या मनुष्यशक्तींत भरमसाठ उत्पादन, किंमतींत चढोओढ, मालाची अडवणूक, इ. प्रकारांना त्यांत वाव नसतो. औद्योगिक शहरांची दाटी मोडून प्रत्येक गांवांत ती विभागली जाईल. खेडीं ओस पडणार नाहींत, व त्यामुळें शेतीकडे दुर्लक्ष होणार नाहीं. उद्योगधंदे वैयक्तिक व लहान प्रमाणावर झाल्यामुळें यांत्रिक गिरण्यांप्रमाणें मालाचा पुरवठा भरपूर होणार नाहीं. म्हणून जास्तींत जास्त माणसांस कामें करावीं लागतील. बरेचसे बेकार कमी होतील. असलेल्या मनुष्यशक्तीचा जास्तींत जास्त उपयोग करून घेण्याची बुद्धि होईल व तसा वावहि मिळेल; जादा लोकसंख्येचा आंकडा भेडसावणार नाहीं.*

अर्थात् ह्याच्या जोडीला आजच्या कुटुंबव्यवस्थेसहि मुरड घालावी लागेल. त्याशिवाय वर्णव्यवस्थेंतील हे आर्थिक विचार सफल होणार नाहींत.

## एकत्र कुटुंबपद्धतीस प्रतिकूल काळ ?

आजच्या काळांत एकत्र कुटुंबाची भाषा काढली तर लहानापासून थोरापर्यंत सर्व हसूं लागतील आणि आधुनिक युगांत ही मध्ययुगीन कल्पना

* मोठ्या प्रमाणावरील यांत्रिक उत्पादनानें वस्तूंच्या किंमती कमी होतात तशा घरगुती उद्योगधंद्यांनीं किमती उतरत नसल्या किंबहुना त्या वाढल्या, तरी घरगुती उद्योगधंद्यांत मनुष्याची क्रयशक्तिहि वाढत असते. यांत्रिक उत्पादनानें तसें घडत नाहीं. वस्तूंच्या किंमती कमी करण्यापेक्षा मनुष्याची क्रयशक्ति कायम ठेवणें हेंच महत्त्वाचें आहे.

नव्या परिस्थितीनें अशक्य आहे, व्यक्तीच्या स्वातंत्र्यास ती बाध आणणारी आहे, असा ते युक्तिवाद करतील. एका दृष्टीनें हें खोटें नाहीं. परंतु 'आधुनिक काळ' म्हणजे तरी काय? ती कल्पना वज्रलेप आहे असें मात्र नाहीं. कारण आधुनिक काळ ह्या कल्पनेची चिकित्सा केली तर नवी औद्योगिक परिस्थिति व स्वतंत्रतेच्या कल्पना ह्यांहून "आधुनिक काळ" म्हणून कांहीं निराळी चीज नाहीं. त्यांतहि औद्योगिक परिस्थिति बदलतां आली तर इतर स्वातंत्र्यादि मानसिक भूमिकाहि आपोआप बदलूं लागतील. औद्योगिक परिस्थिांत ही कांहीं अशी दैवी गोष्ट नाहीं की जी मनुष्याच्या शक्तीबाहेर आहे. अर्थशास्त्र आणि सत्ता ह्यांनीं जर मनांत आणलें तर ही सर्व परिस्थिति पालटण्यास फारसा काळ लागणार नाहीं. स्वातंत्र्यादि कल्पना ह्या बिनबुडाच्या आहेत. कर्तव्यदक्षता, सहकार्य आणि सुसंस्कृतपणा ह्यांचा अभाव म्हणजे नवीन युगाच्या स्वातंत्र्यादि कल्पना होत. स्वतंत्रता हें जरी नव्या युगाचें लक्षण मानलें गेलें असलें तरी तें निरर्थक असल्यानें त्याचें प्रस्थ माजविण्याचें कारण नाहीं. औद्योगिक परिस्थिति कशी बदलतां येईल ह्याचा सविस्तर विचार पुढें करूं. तात्पर्य, औद्योगिक परिस्थिति बदलतां आली तर ह्या नवीन युगांतहि एकत्र कुटुंबपद्धति व्यवहारांत उतरविणें अशक्य नाहीं.

एकत्र कुटुंबावरील आणखी एक फोल आक्षेप :

एकत्र कुटुंबावर दुसरा एक आक्षेप असा येतो कीं स्त्रियांचा छळ व मुलांची कुचंबणा ह्या गोष्टी एकत्र कुटुंबांतच दृष्टीस पडतात. हें बरवर जरी मान्य केलें तरी स्त्रियांचा छळ स्त्रियांनीच केलेला आहे. ज्या सुनांनीं प्रथम छळ सोसला त्या पुढें सासवा झाल्यावर पुढील सुनांचा छळ करण्यास त्यांनीं कां प्रवृत्त व्हावें? स्त्रियांचा छळ पुरुषांनीं कधीं फारसा केलेला नाहीं. पुरुषांनीं तसा केला असता तर एकत्र कुटुंबावरील हा आक्षेप आम्हीं मान्य केला असता. "चार दिवस सुनेचे व चार दिवस सासूचे" ही म्हण

स्त्रियांनींच प.डली ना? मुलांची कुचंबणा हाहि आक्षेप तितकासा योग्य नाहीं. गेल्या शंभर वर्षांतील महाराष्ट्रांतील सर्व मोठ्या लोकांची नांवनिशी काढली तर आपणांस असें दिसून येईल कीं, साधारणपणें विभक्त कुटुंब-पद्धतीचा अवलंब झाल्यापासून म्हणजे अंदाजें पंचवीस ते तीस वर्षांतील ऐकूं येणारीं मोठीं माणसें हीं त्यामागील पिढींतील मोठ्या माणसांपेक्षां सर्वच दृष्टीनें पुष्कळ कमी पडतात. आजचीं त्याहून कमी पडतात. मुलांची कुचंबणा होत असती तर गुणांची वाढ विभक्त कुटुंबाच्या काळाच्या व्यस्त प्रमाणांत झाली नसती. त्यांतून दहा माणसांच्या घरांत किंवा सावत्र घरांत चालणारी धुसफूस ही त्या काळीं होती हें मान्य केलें तरी आजच्या विभक्त कुटुंबांच्या काळांतहि त्या वृत्तीचा अभाव कोठें आहे? हा कुटुंबपद्धतीचा दोष नसून मनुष्याच्या स्वभावाचा दोष आहे. सावत्र आई व बाप यांचे प्रश्न यापुढील काळांत तर अधिकच उद्भवणार. विभक्त कुटुंब जरी मान्य केलें तरी बाप आपल्या मिळकतीची वांटणी करील तेव्हांच तें विभक्त होणार. परंतु वांटणी करतांनाच सख्ख्या मुलांमध्यें बाप सावत्र आईची जागा घेऊन कांहीं मुलांस पोटाशीं घेऊन कांहींना तुच्छ लेखून दूर ढकलूं लागला तर तेथें कुटुंबपद्धति तरी काय करणार? एकत्र कुटुंबांत सांस्कृतिक परंपरेचें ज्ञान मुलांस होत असतें. उलट विभक्त कुटुंबांत शाळेंतील थातूर मातूर शिक्षणापलीकडे कसलेंच शिक्षण मिळूं शकत नाहीं. घर हें 'हॉटेल' झाल्यावर मुलांच्या सांस्कृतिक शिक्षणाकडे लक्ष देण्यास कोणास वेळ आहे? आणि देऊं म्हटलें तरी कोणत्या मुलाच्या बापास संस्कृतीचें ज्ञान असेल? याचाच परिणाम म्हणून समाजांत बाल-गुन्हेगार, बेजबाबदार मुलें यांची झपाट्यानें वाढ होत आहे. सारांश एकत्र कुटुंबावरील हे आक्षेप फोल आहेत.

### बेकारीवरील घातक कृत्रिम उपाय :

समाजापुढें बेकारीचा प्रश्न 'आ' वासून उभा आहे, त्याला तोंड कसें द्यावें याचा अचूक उपाय अद्यापि सांपडलेला नाहीं. नवीन सरकारी

योजना, नवीन जमिनींची लागवड व उद्योगधंद्यांस उत्तेजन, हे हयात असलेल्या बेकारांकरितां आज उपाय योजिले जात आहेत. नवीन बेकारच उत्पन्न होऊं नयेत म्हणून संततिनियमनाचा जारीनें प्रचार चालू आहे. तथापि असले उपाय तुटपुंजे तर आहेतच; पण ते समाजाला व व्यक्तीला घातक आहेत. त्यांतून समाजापुढें अनेक प्रश्न उद्भवतील. कारण सरकारी योजना व उद्योगधंद्यांस उत्तेजन देणें म्हणजे नवीन माल तयार करणें होय. त्यापोटीं बरेच लोक नोकरीस लागतील. कांही दिवस हें ठीक आहे. परंतु मूलभूत प्रश्न असा आहे कीं नवीन माल तयार होईल तो व्यक्तीला व समाजाला आवश्यक आहे का? येणारा प्रत्येक नवीन माल विकत घेण्याची व्यक्तीची आर्थिक ताकद आहे का? आणि जर हे कृत्रिम उद्योग चालू ठेवले तर त्यांचा खर्च सरकार किती वर्षें सोसणार आहे! शिवाय नको असलेला नवीन माल जादा काढून चालू मालाच्या उद्योगधंद्यांची गळचेपी होणार नाहीं काय? मग त्यांतून उत्पन्न होणारे आर्थिक प्रश्न आवरतां येतील काय? कृत्रिम संततिनियमनानें शरीरास अपाय होत नाहीं याची शास्त्रज्ञ खात्री देतील काय? आणि असें कृत्रिम साधनांनीं केलेलें नियमन दोन-चार पिढ्यांनीं त्या कालांतील लोकांच्या आरोग्यावर, सृजन-शक्तीवर व संभोगेच्छेवर अनिष्ट परिणाम करणार नाहीं याची ग्वाही कोण देणार आहे का? मग पन्नास वर्षांनीं आमच्या देशाची अवस्था काय होईल? गेल्या महायुद्धांत फ्रेंच मार्शल पेताँ यांना ‘आमची अगदींच थोडीं लहान मुलें’ म्हणून पराजयाची मीमांसा करतांना रडगाणें गावें लागलें, याचें स्मरण करून देणें आवश्यक आहे. जुनी समाजव्यवस्था व तदंतर्गत बंधनें मोडणाऱ्या रशियाला चांगली व भरपूर संतति निपजावी म्हणून स्त्री-पुरुष संबंध व त्याची पुढील कुटुंबादि व्यवस्था यांजकडे जारीनें लक्ष द्यावें लागलें आहे. शिवाय कृत्रिम नियमनानें संततीसंबंधीचें पावित्र्य नष्ट होण्यास वेळ लागत नाहीं. कारण संतति म्हणजे काय? आमच्या शरीरसुखांतून

अनिच्छेनें उद्भवणारी एक परिणति आहे, हा आधुनिक युगांतला तर्कशुद्ध विचार स्थिरावल्यावांचून राहत नाहीं. त्यांतूनच पुढें संततिसंवर्धनासंबंधीच्या कर्तव्यास थारा मिळणार नाहीं. ‘ संतति झाल्यास तिनें कावळा-चिमणीच्या पिलांप्रमाणें आपली पोटापाण्याची व्यवस्था बघावी, ती जबाबदारी आमची नाहीं.’ अनिच्छेनें होणाऱ्या आईबापांचा हा विचार. तर केवळ एक नैसर्गिक घटना म्हणून जन्मणाऱ्या मुलाचा विचार असा होईल कीं आई-बाप म्हणजे काय? शरीरसुख भोगणाऱ्या दोन व्यक्ती. त्यांनीं शरीरसुख घेतलें नसतें तर मी कशाला जन्माला आलों असतों? माझा जन्म ही केवळ एक नैसर्गिक घटना. तेवढ्यासाठीं निष्कारण त्यांच्याकडे मोठेपण कशासाठीं? त्यांनीं शरीरसुख घ्यावयाचें नव्हतें. तेव्हां जन्मदाते म्हणून त्यांचे मजवर कांहीहि उपकार नाहींत. कुटुंबव्यवस्था मोडून पडण्यास हा मुळांतच लावलेला सुरंग पुरेसा आहे.

### बेकारीचा प्रश्न कां उद्भवला? :

परंतु आमचा मुळांत प्रश्न असा आहे कीं, खरोखरच समाजांत इतकी बेकारी माजावी अशी परिस्थिति आहे काय? आज लोकसंख्या अतिशय वाढली आहे असा ओरडा केला जातो. सुमारें शंभर वर्षांपूर्वींपर्यंत देशाची लोकसंख्या वाढतच होती. आजच एकदम एकाची पस्तीस कोट झालेली नाहीं. शंभर वर्षांपूर्वींच्या काळांत इतकी बेकारी माजली होती किंवा नाहीं, याचा इतिहाससंशोधकांनीं तलास लावावयास हवा. परंतु आपणास आज एवढें निश्चित सांगतां येईल कीं, पूर्वींची लोकसंख्या कमी असली तरी निर्वाहाचीं साधनेंहि तितकींच कमी होतीं. जमीन नकाशावर भरपूर दिसत असली तरी त्या काळाच्या लोकांच्या कुवतीप्रमाणें माहिती नसलेली व लागवडीस नसलेली अशी जमीन किती शोधून काढली असेल त्याचीच शंका वाटते. कोठें गांव वसवल्यास त्याच्या आसपासच्या जमिनीवरच ते भागवीत असले पाहिजेत. तथापि सरकारी कचेऱ्या, उद्योगधंद्यांचें क्षेत्र हीं

फारच कमी होतीं. आज लोकसंख्या दुप्पट वाढलेली असली तरी निर्वाहाचीं साधनें दसपट तरी वाढलीं असतील. त्या काळांत बेकारी मुळींच नव्हती काय ? मग आजच बेकारीचा बाऊ कां वाटावा ?

याचें निदान असें आहे कीं बेकारी प्रत्येक काळांत असतेच. परंतु ती जिरविण्याची शक्ति समाजांत पाहिजे. पूर्वीच्या व आताच्या बेकारींत फरक असेल तर तो येथें आहे. पूर्वीची बेकारी समाजांत जिरून जात होती. आजच्या बेकारीचें पाणी जमिनींत मुरत नाहीं म्हणून तिचें डबकें सांचलेलें दिसतें.

## एकत्र कुटुंब–पद्धतींतील काटकसर :

सुमारें शंभर वर्षांपूर्वीच्या काळांत आजच्याप्रमाणें मोठ्या प्रमाणावर यांत्रिक उद्योगधंदे नव्हते. जे होते ते बारा बलुते व आणखी सहा धंदे मिळून अठरा-पगड जातींत होते. त्यांचें व्यापाराचें क्षेत्र जास्तींत जास्त गांवापुरतें व धंद्याच्या कामाचा व्याप कुटुंबापुरता. बाकीचा भर शेतीवरच असे. धंदा जातिबद्ध असल्यानें वंशपरंपरा असे. शेतीहि वंशपरंपराच चाले. आजच्या व्यवसायाप्रमाणें त्या कालचे व्यवसाय प्रत्येक पिढीला अपुरे नसत. त्यामुळें कुटुंब एके ठिकाणीं चिकटून राहण्यास गैरसोयीचें होत नसे. याचा परिणाम एकत्र कुटुंबपद्धतीवर अनुकूल झाला. एकत्र कुटुंबामुळें एका बिऱ्हाडाच्या खर्चांत अनेक जोडपीं राहूं शकलीं. उत्पन्न सामायिक असल्यामुळे थोडक्या खर्चांत बरींच माणसें पोसलीं जाऊं लागलीं. सुमारे ४०-५० वर्षांपूर्वीचा काळ हा पूर्वींचें शेतकरी एकत्र कुटुंब व आताचें नोकरदारांचें विभक्त कुटुंब यांचा संधिकाल होता. घरचें उत्पन्न भरपूर. तथापि कुटुंबांतील कांहीं माणसें घरचें उत्पन्न बघत व कांहीं नोकऱ्या करीत. मुलगी सांगून जायची म्हणजे मुलगा काय करतो याची चवकशी होत असे. नोकरीधंदा करीत नसला म्हणजे मुलगा ‘ घरचें बघतो ’ असें सांगत. अशा मुलास आपण ऐदी म्हणत असूं. तो स्वतः ऐदी असेलहि; परंतु समाज-

शास्त्राच्या दृष्टीनें त्यांत फार मोठा अर्थ होता. हाच ऐदी मुलगा आजच्या काळांत स्वतंत्र बिऱ्हाड करून बेकार म्हणून गणला गेला असता व अशाच अनेक ‘ स्वतंत्र बेकारांचा ’ मिळून एक संयुक्त प्रश्न आज उभा राहिला आहे. ज्याला वर समाजांत बेकारी जिरली पाहिजे असें म्हटलें त्याचें प्रत्यंतर या ‘ घरचें बघणाऱ्या ऐदी मुलाच्या ’ उदाहरणांत आहे. अशीं बेकार माणसें प्रत्येक कुटुंबांत जिरवितां आलीं पाहिजेत. आजच्या ‘ स्वतंत्र बेकारापेक्षां ’ एकत्र कुटुंबांतील पूर्वीचा ‘ ऐदी मुलगा ’ अधिक निश्चित व समाजाच्या दृष्टीनें अधिक निरुपद्रवी आहे. कारण तो उपाशी राहत नाहीं व समाजावर भार टाकीत नाहीं. उलटपक्षीं बापाबरोबर थोडीफार का होईना शेती बघत असतो.

इंग्रजी कारकीर्दीमध्यें आम्ही उद्योगधंद्यांचीं खोटीं निर्वाहाचीं साधनें स्वीकारलीं व स्वतंत्रतेच्या खोट्या कल्पनाहि ग्रहण केल्या. त्यामुळें कुटुंबांतील व्यक्तींचीं निर्वाहाचीं साधनें दूर दूर झालीं व त्या व्यक्ती एकमेकांपासून दूर दूर झाल्या. कुटुंब एकत्र राहण्यास आवश्यक अशी समान भूमिकाच नष्ट झाली. व जेथें हें झालें नव्हतें, एकत्र राहण्याची शक्यता होती तेथें स्वतंत्रतेचा कलि शिरला. ह्याचीं फळें आज आम्ही भोगीत आहोंत.

## विभक्त कुटुंबाचे दुष्परिणाम :

आजच्या आर्थिक हलाखीच्या दिवसांतच अडचणी निभावण्यासाठीं प्रत्यक्ष एकत्र कुटुंबाचा आश्रय घेतला नाहीं तरी त्याचें तत्त्व मात्र व्यवहारांत शक्य तेवढें उपयोजिण्याची अपेक्षा वाढत आहे. पैसा देणारा घरगुती पाहुणा स्वीकारणें ( पेइंग गेस्ट ), सहकारी पद्धतीवर एकत्र घरें बांधून सर्व बिऱ्हाडांची भोजनव्यवस्था सामायिक करणें, कांहीं स्नेह्यांनीं मिळून एकत्र बिऱ्हाड करून राहणें इत्यादि गोष्टी हेंच दर्शवितात. याशिवाय विभक्त कुटुंबांतील बाळंतपणें, पत्नीसहि नोकरी करावयास लावणें, लहान मुलांचें संगोपन, इत्यादि अनेक अडचणी आर्थिक व मानवी साह्याच्या अभावीं

सोसाव्या लागत आहेत. विभक्त कुटुंबांची आर्थिक व कौटुंबिक माहिती मिळविली तर तीं कुटुंबें सुखांत असतील असें त्यावरून दिसणार नाहीं. स्त्रियांच्या नोकऱ्यांमुळें सोसावी लागणारी निकृष्ट प्रकृति व होणारी संसाराची आबाळ, प्रत्येक गरज बाजारांत पैसे देऊन भागवावी लागत असल्यामुळें आवाक्याबाहेर होणारा खर्च, म्हातारे, पंगु व बेकार, यांच्या निर्वाहाचे प्रश्न, त्यांतून बेकारी, कुटुंबांत राहिलेल्या मुलांची आबाळ, त्यामुळें बेजबाबदार नवीन पिढीची वाढ, आसऱ्याच्या अभावीं कुटुंबांतून बाहेर पडलेल्या मुलांतून बालगुन्हेगारांची उत्पत्ति, इत्यादि अनेक सामाजिक प्रश्न विभक्त कुटुंबांच्या प्रसारामुळें फैलावले आहेत. युरोप व अमेरिकेंत या प्रश्नांना व यांतून निर्माण होणाऱ्या इतर लहान मोठ्या आपत्तींना तोंड देण्यासाठीं सरकारी संस्था निर्माण केलेल्या आहेत. रिमांड होम, सिक्युरिटी फंड, भिकाऱ्यांचे कायदे, विभक्त कुटुंबांत न मिळणाऱ्या सांस्कृतिक शिक्षणाकरितां लहान मुलांच्या निरनिराळ्या प्रकारच्या शाळा, इत्यादि अनेक संस्था काय दर्शवितात ? तेथील सरकारें आमच्या येथीलप्रमाणें निकृष्ट प्रतीचीं नाहींत म्हणून तीं एवढी तरी व्यवस्था करूं शकतात. तथापि हा सरकारांवर केवढा भार ! देशाच्या कठीण परिस्थितींत हा भार सरकार कुठपर्यंत सहन करणार ? एवढें करूनसुद्धां त्याचे परिणाम अपेक्षिल्याप्रमाणें होत नाहींत. सरकारी उत्तम अधिकाऱ्यांच्या दक्षतेंत वाढलेलीं संस्थांतील तान्हीं मुलें हीं निपुत्रिक जोडप्यांनी घरीं सांभाळण्यास नेलेल्या मुलापेक्षांदेखील निकृष्ट प्रतीचीं असतात असा अनुभव परदेशांचाच आहे असें नव्हे, तर पुण्यांतील संस्थांचाहि तोच आहे. अमेरिकेंत तर सामाजिक संरक्षणा ( सोशल सिक्युरिटी ) च्या विरुद्ध तेथील समाजशास्त्रज्ञ ओरड करूं लागले आहेत. एक म्हणजे त्याचा गैरफायदा घेणारीं पुष्कळ ऐदी माणसें निघूं लागलीं व दुसरें असें कीं या आयत्या मिळणाऱ्या सरकारी मदतीमुळें मनुष्याची स्वाभिमान-वृत्ति व कर्तृत्वशक्ति यांस बाध येऊं लागला आहे. आर्थिक स्वातंत्र्याच्या

भलत्याच कल्पना डोक्यांत घेऊन एकत्र कुटुंबाचा अव्हेर करणाऱ्या पाश्चात्य संस्कृतीनें एकत्र कुटुंबांची उणीव भरून काढण्यासाठीं कितीहि मलमपट्ट्या लावल्या तरी तें भागणारें नाहीं, हें तेथील समाजशास्त्रज्ञाच्या नजरेस आतां येऊं लागलें आहे. अंधपणें त्याच्या पावलावर पाऊल टाकणाऱ्या आम्हीं लोकानीं त्यांच्याकडे रोज काय चाललें आहे व कसें चाललें आहे याची दखल घ्यावी.

## समाज विघटित होतो म्हणजे काय ! :

समाज विघटित होतो म्हणजे काय होतें ? अगदी साध्या व थोडक्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास मनुष्याच्या जीवनाला असुरक्षितता येते व समाज-धुरीणत्व कमजोर बनतें. जीवन असुरक्षित कशाने होतें ? बेकारीने उत्पन्न होणाऱ्या लहानमोठ्या सर्व प्रकारच्या गुन्ह्यांच्या फैलावामुळे व आर्थिक अस्थिरतेमुळे समाजाच्या घटकत्वाच्या अधिकारांची पायमल्ली समाजधुरीणत्व कमजोर झाल्याने होते. सामाजिक घडीची अस्ताव्यस्तता हा त्याचा एकूण परिणाम आहे. बेकारी उत्पन्न होण्याचीं कारणें शोधून त्यांच्या अनुरोधाने उपाययोजना करावयास हवी. एकत्र कुटुंबपद्धतीमुळें थोड्या खर्चांत पुष्कळांचे संसार होतील. बायकांना नोकऱ्या करण्याची जरूर लागणार नाही. पुरुषांना तेवढ्याच जास्त जागा मिळतील. विभक्त कुटुंबपद्धति म्हणजे निर्वाहाचीं साधनें अडविणारी व आपल्या आसपासचीं माणसें उघडीं टाकणारी अशी दुहेरी जळू आहे.

## एकत्र कुटुंबाची मिळकत सामायिक पाहिजे :

हिंदु कायद्याच्या नव्या संहितीकरणांत एकत्र कुटुंबाच्या दृष्टीनें एक सुधारणा करावयास हवी. आजच्या वारसाहक्काने एकत्र कुटुंब टिकणें कालत्रयीं शक्य नाही. वारसाहक्कातच एकत्रकुटुंबास सुरुंग लावलेला आहे. मिळकतीची वाटणी करण्याने मिळकतीचा नाश होतो, व वांटणीच्या भांडणाचें बीज पेरलें जातें. नव्या हिंदु संहितेंत नियमच असा केला पाहिजे की

मिळकतीची वांटणी करणें हा गुन्हा आहे. सर्व मिळकत ( वडिलार्जित व स्वकष्टार्जित ) कुटुंबांत एकत्रच राहिली पाहिजे. मालकी सर्वांची सारखी, पण व्यवस्था फक्त थोरल्याने बघावयाची. मिळकतीच्या व्यवस्थेला तो जबाबदार राहील. इतर भावंडांनी थोरल्यास मदत करावयाची. मागे म्हटल्याप्रमाणें औद्योगिक परिस्थिति पालटतां आली तर सर्व भर शेतावर व घरगुती धंद्यांवर द्यावा लागेल. अशाने सर्वांस एकत्र राहण्यास लायक परिस्थिति निर्माण होईल. स्वतंत्र वांट्यांचा प्रश्नच नसल्यामुळे मुलांच्या बायकांस घरांत मिळवून घेण्याची बुद्धि आपोआप होईल.

कुटुंबांची माहिती घेत असतां कांहीं सत्तर-ऐंशी वर्षे वयाच्या गृहस्थांकडून त्यांच्या वडिलांच्या व आजोबांच्या वेळची घरांतील परिस्थिति सांगण्यांत आली त्यावरून आज शंभर वर्षें तरी स्त्रियांचा व पुरुषांचा स्वभाव कौटुंबिक बाबतींत कायम असलेला दिसून आला. कांहीं वर्षे एकत्र राहिल्यावर कर्त्या पुरुषाच्या उतारवयांत घरांत मिळकतीच्या वांटणीच्या बुजबुजीला वाचा फुटे व वांटण्या वेळेवर न झाल्यास गृहकलह माजे. सर्व बायका बाहेरून एकत्र नांदत असलेल्या दिसल्या तरी आंतून मिळकतीच्या वांटणीच्या दृष्टीनेच सर्व हालचाल चाले. भावांमध्येंहि याच वेळीं भांडणें होत. स्वतंत्र मालकीच्या हक्काची जाणीव असली म्हणजे हे सर्व हक्क एकत्र फार दिवस राहूं शकत नाहीत. हक्काचें मूळच काढून टाकलें तर मग भांडण कशासाठी होईल ?

### आश्रमव्यवस्था रूढ व्हावयास पाहिजे

कुटुंबव्यवस्थेनंतर आश्रमव्यवस्था हाहि एक सामाजिक प्रश्न सोडविण्याच्या उपयोगी पडणारा भाग आहे. आश्रमव्यवस्था कायद्याने व्यवहारांत आणण्यासारखी नाहीं. संस्कृतीच्या परंपरेची चाड हवी, असें आम्ही म्हणतों तें अशा ठिकाणी. ह्याशिवाय कोणीं काय शिकावें, संसार कसा करावा व सर्वसंगपरित्याग केव्हा करावा हें कोण कोणाला सांगणार ? श्रद्धा

हीच एक अशी आहे कीं, जी मनुष्याला त्याप्रमाणें आचरण करावयास लावील. परंतु श्रद्धा असणें ही कांहीं सोपी गोष्ट नाहीं. मनुष्याच्या तर्क-बुद्धीला तें पटलें पाहिजे. हें पटवून देण्याचें सामर्थ्य तत्त्वज्ञानांत असतें. म्हणून संस्कृति तत्त्वज्ञानावर उभारलेली आहे. खरें बोलावें, चोरी करूं नये, दया करावी हें सर्वच धर्म सांगतात. म्हणून ते सर्व एकच आहेत असें म्हणणें फसवणूक करून घेण्यासारखें आहे. केवळ ही नीति सांगण्यासाठीं आमच्या धर्माची स्थापना झालेली नाहीं. मनुष्याच्या बुद्धीला तत्त्वज्ञानानें अंतिम ध्येयावरील श्रद्धा पटवून देणें व त्याप्रमाणें आचरणांत उतरविण्याची सामाजिक व्यवस्था करणें एवढ्यासाठीं धर्माची स्थापना होत असते. प्रत्येक धर्माचा निराळेपणा येथेंच सामावलेला आहे. मागील लेखांत समाजांतील त्रिदोष दाखवितांना सामाजिक बंध सुटत चालले आहेत, हा एक दोष दाखविला होता. संस्कृतीची चाड नष्ट होऊं लागली म्हणजे सामाजिक बंध तुटूं लागतात. म्हणून आश्रमव्यवस्था व्यवहारांत येण्यासाठीं संस्कृतीची चाड असणें अत्यंत आवश्यक आहे.

ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम व वानप्रस्थाश्रम हे तीन आश्रम आज आपल्या दृष्टीनें महत्त्वाचे आहेत. ब्रह्मचर्याश्रमांत विद्या व संस्कृति यांचें शिक्षण घ्यावें लागतें. तरुण मुलें एका चाकोरींत गुंतवून ठेवलीं म्हणजे त्यांच्या उच्छृंखल वृत्तींना आपोआप लगाम बसतो. बाहेरच्या राजकारणाच्या लाटांपासून मुलें दूरच ठेवलीं पाहिजेत. एक विद्या म्हणून राजकारणशास्त्र त्यांस अवश्य शिकवावें. परंतु चालू पद्धतीच्या राजकारणाच्या व्यवहारांतून अलिप्त ठेवावें. मुलांच्या शक्तीचा राजकारण्यांनीं गैरफायदा घेणें अत्यंत वाईट आहे. आजच्या शिक्षणांत नेमकें उलट होत आहे. तें विद्येच्या दृष्टीनें निकृष्ट, सांस्कृतिक परंपरेच्या नांवानें पूज्यवत् आहे. त्याच्यामुळें मुलांचें व्यक्तिमत्त्व व बुद्धि यांचें संवर्धन होत नाहीं. या मुलांतूनच पुढें उद्याचीं मोठीं माणसें

निपजावयाची. गेल्या शंभर वर्षांतील व आजचे मोठे लोक यांच्या गुण-वत्तेंत व त्यामुळें मोठेपणांत फरक पडतो – मोठेपणाची उंची उत्तरोत्तर कमी कमी होत असलेली दिसत आहे. याची कारणमीमांसा मागें विवेचन केलेल्या एकत्र कुटुंबांतल्याप्रमाणेंच येथेंहि आहे.

गृहस्थाश्रमांत वंशवृद्धीकरितां संततिसंवर्धन, आश्रितांचा सांभाळ, नियत-वृत्ति म्हणजे आपल्या धर्माप्रमाणें ठरलेला व्यवसाय व दानतपही करावयास हवींत. यांत कौटुंबिक स्वास्थ्य व समाजहित साधावयाचें आहे. शांतिपर्वांत गृहस्थाश्रमाचे आचार सांगितले आहेत. ते आजच्या साम्यवादासहि लाज-विणारे आहेत. या दृष्टीनें गृहस्थाश्रमाचें महत्त्व फार आहे. त्याची स्वतंत्रच चर्चा करावयास हवी.

वेळीं निवृत्तीचें महत्त्व :

आपली गृहस्थाश्रमकर्तव्यांची धुरा वाहण्याइतपत मुलें मोठीं व कर्तीं झालीं म्हणजे ती त्यांच्या शिरावर ठेवून आपण संसारांतून वेळींच निवृत्त होणें जितकें कठीण तितकेंच महत्त्वाचें आहे. सांस्कृतिक श्रद्धा बलवत्तर असल्यावांचून हें शक्य नाहीं. कर्तव्यपरायणता सांस्कृतिक श्रद्धेतून उत्पन्न होते. सांस्कृतिक श्रद्धेची अधिष्ठात्री देवता तत्त्वज्ञान आहे. मनाची ही घडण लहानपणापासून शिक्षण व संस्कार झाल्यावांचून होत नाहीं. वेळ येतांच वानप्रस्थाश्रमाचा स्वीकार करणें हें कुटुंबाचा ऱ्हास टाळण्याच्या दृष्टीनें आवश्यक असतें. उतारवयांत द्रव्याचा किंवा अधिकाराचा लोभ ठेवूं नये. वय शंभरीला आलें व मुलें मोठीं झालीं तरी घरांतील भेदभावाचें राज-कारण व मिळकतीवरील अधिकाराचा लोभ यांत मन गुंतून गेल्यानें घरांतील एका चांगल्या धंद्याचा नाश झाल्याचें उदाहरण आम्हीं डोळ्यांनीं पाहिलेलें आहे. त्यांतहि आश्चर्य असें कीं, विद्वान् व सुसंस्कृत समजल्या गेलेल्या माणसांतदेखील कोणतीहि सुधारणा दिसत नाहीं! पूर्वी संस्थानिकांच्या बाबतींत असे बरेच अनिष्ट अनुभव येत असत. हेच अनुभव लहान मोठ्या

प्रमाणांत सामान्यतः प्रत्येक घरांत येतात. वयस्कर कर्त्या माणसाचें वर्चस्व घरांत साहजिकच असतें. हा कर्ता मनुष्य सरळ व अधिकाराचा निर्लोभी नसला तर कुटुंबाचा चिचका करण्यास तोच बहुधा कारणीभूत होतो.

**नियंत्रणक्षमता व प्रचलित समाजसुधारणा :**

पालटलेल्या औद्योगिक परिस्थितींत वर्ण व कुटुंब यांची पुनर्व्यवस्था प्रस्थापित करतां आली तर समाजास स्वनियंत्रणक्षमता प्राप्त होईल. परंतु संस्कृतीच्या परंपरेची जोपासना झाली तरच ती स्वनियंत्रणक्षमता वर्ण व कुटुंब यांच्या द्वारा शक्य आहे. कोणताहि सामाजिक प्रश्न सर्वत्र न पसरतां जेथल्या तेथें विरून जाऊं लागला म्हणजे समाज स्वनियंत्रणक्षम झाला असें थोडक्यांत म्हणतां येईल. सामाजिक प्रश्न सोडविण्याच्या कामीं समाजास स्वतंत्र संस्था काढून सामाजिक शक्तीचा व्यय करावा लागणें किंवा राजसत्तेस आपली शक्ति खर्च करावी लागणें, याचा अर्थ समाज दुर्बल आहे. असे बाह्यात्कारी उपाय सामाजिक प्रश्न सोडविण्याच्या कामीं निरुपयोगी असतात. सामाजिक सुधारणा व त्यांचें कार्य यांची आपण सूक्ष्म पाहणी केली तर असें दिसून येईल कीं, प्रत्येक प्रश्न हा त्या त्या विशिष्ट काळापुरताच असतो. तो काळ निघून गेल्यावर प्रश्न विरून जातो किंवा पहिल्या प्रश्नाच्या अगदीं उलट परिस्थिति होऊन त्यांतून नवीन प्रश्न निर्माण होतो. या नवीन परिस्थितींत नवी सुधारणा करूं पाहणारे नवीन कार्यकर्ते निर्माण होतात व पुनः हेंच चक्र सारखें चालू राहतें. सामाजिक सुधारणांची चिकित्सा करतांना आपणास आपल्या देशांत शंभर वर्षें व परदेशांत फार तर दोनशें वर्षें यापलीकडे मागें जातां येत नाहीं. यास कारणें दोन. साधारणपणें या शंभर–दोनशें वर्षांत ज्या नवीन युगाला सुरुवात झाली त्यांतूनच आजचे बरेचसे प्रश्न निर्माण झाले आहेत. दुसरें कारण असें कीं, पूर्वींच्या कालांत समाजास आपलें स्वरूप साकल्यानें कधीं पाहतां आलें नाहीं. प्रसिद्धीच्या साधनांचा अभाव व समाज एकत्र येण्याची दुर्लभता हें त्याला

कारण आहे. या सामाजिक जाणिवेच्या अभावीं त्या काळचे सामाजिक प्रश्न हे एका जातीपुरते किंवा गांवापुरते असत. त्या काळच्या परिस्थितीप्रमाणें प्रश्नांना वाचा न फोडतां ते सहन करणें ह्यांतच प्रश्नांची इतिश्री होत असे. अर्थात् हे प्रश्न मुरल्यासारखे वाटले तरी ह्याला समाजाची स्वनियंत्रणक्षमता म्हणतां येणार नाहीं. कारण हे प्रश्न आपोआप सुटत नसत. तथापि एवढें खरें कीं, आजच्यापेक्षां सामाजिक धार्मिक बंधनें जोरकस असल्यानें प्रश्नांची भेसूरता आजच्याप्रमाणें वाढली नाहीं.

## कांही सामाजिक सुधारणांचें परिशीलन :

आजपर्यंतच्या कांहीं सामाजिक सुधारणांचें परिशीलन केलें तर त्यांत हेंच दिसून येईल. इंग्रजी अंमल सुरू झाल्यावर आपल्या इकडे सामाजिक सुधारणांना सुरुवात झाली. उदाहरणादाखल म्हणून महाराष्ट्रांतील कांहीं सुधारणांचा विचार करूं. स्त्रियांच्या विवाहाची किमान वयोमर्यादा चौदाच्या आंत असूं नये ह्यावर केवढें रण माजलें ! कायदा करावा लागला. सबंध समाज हलून गेला. पुढें हा प्रश्न समाजाच्या अंगीं रुळून गेला व आतां उलट प्रश्न असा निर्माण झाला आहे कीं, विवाहाची कमाल–मर्यादा खालीं कशी आणतां येईल? आधुनिक आयांग्ल वैद्य व समाजशास्त्रज्ञ लहान वयांत विवाह होऊन मूल होणें हें स्त्रीच्या व कुटुंबाच्या दृष्टीनें हितावह असतें असें आतां सांगत आहेत. उशिरां विवाहाचीं अनिष्ट फळें भोगावीं लागत आहेत. विधवा–विवाहाकरितां किती दयाशील सुधारकांना आपलें रक्त आटवावें लागलें ! कालांतरानें आतां विधवा–विवाहास कांहीं महत्त्वच राहिलें नाहीं, व पहिल्याहून आतांची स्थिति अगदी उलट झाली आहे. स्त्रीशिक्षणाचेंहि तसेंच. स्त्रियांना शिक्षण मिळावें म्हणून आगरकरांनीं आपलें रक्त अक्षरशः आटविलें. न्यायमूर्ति रानडे यांनीं आपल्या पत्नीस शिक्षणाचा पहिला धडा दिला. आतां स्त्री-शिक्षण इतकें फैलावलें आहे कीं त्याचा अनिष्ट परिणाम स्त्रियांच्या प्रकृतीवर, वैवाहिक कल्पनेवर व कर्तव्यदक्षतेवर झालेला आहे.

विदुषी फारच थोड्या निघाल्या. त्या विदुषी म्हणून आपलें कर्तव्य बजावून गेल्या. परंतु सामान्य स्त्री कौटुंबिक व सामाजिकदृष्ट्या खालावतच चालली. सुशिक्षित स्त्रिया संसाराच्या कामीं निस्कृष्ट ठरल्या आहेत. शिक्षण मिळालें म्हणून स्वकर्तृत्वानें पुढें आल्या अशा स्त्रिया हाताच्या बोटावरसुद्धां मोजतां येतील कीं नाहीं याची शंकाच आहे. कांही स्त्रिया पुढें आलेल्या असतील, पण त्या स्वकर्तृत्वानें नव्हे तर पुरुषांच्या सुधारकपणाविषयींच्या भलत्या कल्पनांनीं त्या पुढें आलेल्या आहेत. पुरुषांतहि साक्षरता व शिक्षणाचा फैलाव व्हावा म्हणून थोडे प्रयत्न झाले नाहींत. परंतु खेडीं ओस पडण्यास, कौटुंबिक अस्थिरता येण्यास व नवीन पिढीची एकंदर सांस्कृतिक अवस्था खालावण्यास आजचें शिक्षणच कारण आहे. या सर्व गोष्टी सुधारणेचा केवळ परिपाक आहे असें नव्हे. हा कालाचा महिमा आहे. समाज हा नेहमीं तत्कालीन परिस्थितीचा अंशतः तरी दास असतोच. आपण आरंभ करतांना सद्धेतूनें जरी सुधारणा हातीं घेतों तरी त्या सुधारणेचा परिपाक अनिष्ट गोष्टींत कसा होणार नाहीं व झाल्यास त्याला मारक उपाय काय, याचा विचार त्या त्या वेळीं होत नाहीं. सुधारणा जेथें थांबावयास पाहिजे तेथेंच कशी थांबवावी हें कळलें पाहिजे. असा जर विचार प्रथमच कोणीं केला तर अशा सुधारणांस अशा प्रकारें कोणीहि हात घालणार नाहीं. या सर्व प्रश्नांचें मूळ व उपचार सामाजिक व सांस्कृतिक घडणींत असतात हें कळल्यावर त्या दृष्टीनें ते प्रयत्न व्हावयास हवेत हें पटेल. युरोपमध्येंहि अशा सुधारणांना शेवटीं आळा घालावा लागतो व तसें न केल्यास त्याचा अनिष्ट परिणाम घडत असतो हें अनुभवानें त्यांस कळून आलें आहे. समाज संरक्षणा ( सोशल सिक्युरिटी )-सारखी सरकारी संस्था; पण सरकारी उद्दिष्ट बाजूला सारून लोक त्याचा दुरुपयोग करतात त्यामुळें हिच्या बाबतींत आतां काय करावें असा प्रश्न तिकडील विचारवंतापुढें उभा राहिलेला आहे.

**समाजाचें अधिष्ठान सांस्कृतिक हवें :**

तात्पर्य, समाजाची स्वनियंत्रणक्षमता क्षीण होऊं लागली म्हणजेच सामाजिक प्रश्न उत्पन्न होऊं लागतात. म्हणून वरपांगी सामाजिक सुधारणा हा खरा उपाय होऊं शकत नाहीं. सांस्कृतिक रूपांतील सामाजिक बंधच असे जोरकस करावयास हवेत कीं त्यांतून समाज स्वनियंत्रणक्षम होईल. ही स्वनियंत्रणक्षमता केवळ एखाद्या कायद्यानें प्राप्त होणार नाहीं. स्वनियंत्रण-क्षम या शब्दांतच बाह्य उपचारांचा अव्हेर केलेला आहे. समाजनियंत्रण कायद्यापेक्षां सामाजिक अधिष्ठानावर अवलंबून असतें. हें अधिष्ठान लोप पावूं लागलें म्हणजे समाजांत अव्यवस्था सुरू होते. ही विस्कळित झालेली स्थिति आवरण्यास कायद्याची शक्ति अपुरी पडते. अशा वेळीं सांस्कृतिक अधिष्ठानच उपयोगीं पडतें.

**नवी स्मृति :**

परंतु आजच्या समाजसंघटनेच्या अनुरोधानें एकत्र कुटुंबपद्धति व वर्ण-व्यवस्था यांची पुनः स्थापना कशी करावयाची हा मोठा प्रश्न आहे. हिंदु कायद्याचें नवीन संहितीकरण होत आहे. त्याचें धोरण काय आहे हें निश्चित समजणें कठीण आहे. त्यांत हिंदूंच्या संस्कृतीचें सातत्य राखण्याचा कितपत प्रयत्न आहे याची शंकाच आहे. हिंदूंच्या समाजरचनाशास्त्राचें मौलिक तत्त्व कितपत स्वीकारलें आहे याचीहि शंका आहे. मग त्याला ‘ हिंदु ’ कोड म्हणण्याचें कारण काय तें समजत नाहीं. सामाजिक सुधारणाच करावयाच्या तर निराळ्या कायद्यांनीं करतां आल्या असत्या. परंतु त्यांत हिंदुत्वाचा निष्कारण बुरखा घेण्याचें प्रयोजन काय ? तथापि संस्कृतीचें सातत्य व समाज-रचनाशास्त्र यांच्या मूलभूत पायावर अधिष्ठित अशी नवी स्मृति तयार करावयास हवी. या नव्या स्मृतीनें आजचा हिंदुकायदा बाद होईल. नवी स्मृति व्यावहारिक वाद, त्यांचा निवाडा, शिवाय तात्त्विक पायाशुद्धि या दृष्टीनें परिपूर्ण पाहिजे. तशी ती झाल्यावर राज्यशासनानें सामाजिक व

धार्मिक निवाड्यांत व त्यांच्या वादांत हस्तक्षेप करूं नये. धर्मशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, स्मृतिपंडित अशा न्यायनिष्ठुर पंचांची ठिकठिकाणीं स्थानिक पंचायत असावी. गांव, तालुका, जिल्हा, प्रांत व देश असे क्रम ठेवून त्या त्या पंचायतीस व तिच्या निवाड्यांस सरकारी मान्यता असावी. हीं धार्मिक पीठें म्हणून गणलीं जावींत. अशा कार्यक्षम स्मृतीचा प्रयत्न विद्वानांच्या साह्यानें करण्यांत आला पाहिजे.

# ११. जीवन

जीवन हें हजारों वर्षें सतत चालत आलेलें आहे. कोट्यवधि व्यक्ती तीच गोष्ट चाखून सोडून गेलेल्या आहेत. परंतु प्रत्येक व्यक्तीला ती अद्यापिहि नवीन आहे. बहुधा अस्तित्व संपत आलें कीं जें खरें उपभोग्य ठरतें तेंच हें जीवन. अनादि कालापासून दररोज तुडवून जी जीवनाची वाट सफाईदारपणें वास्तविक मळलेली आहे ती रोज प्रत्येकाला नवीन असल्याप्रमाणेंच अडखळत चालावयास लावते.

याच न्यायानें एखाद्याला आपलें जीवन नाविन्यपूर्ण वाटलें, आश्चर्यकारक वाटलें तर मला त्यांत विशेष कांहीं वाटणार नाहीं. तेच स्वर, त्याच त्या ताना; त्याच साथी पण गवई बदलला कीं गाण्याची ढब बदलली. म्हणूनच तज्ज्ञ रसिक तेच ते स्वर, त्याच त्या ताना ऐकण्यासाठीं "वाहवा! वाहवा" म्हणून पुढें पुढें सरकत असतात. गाणाऱ्या गवयालाहि तेंच तें आळविण्यांत नवीन नवीन हुरूप येत असतो.

असेंच अडखळत ठेचकळत चालणाऱ्या श्यामच्या जीवनांतील या बोलताना आहेत. आतांपर्यंत अनेक व्यक्ती मला भेटल्या. पण या श्याममध्यें कांहीं विशेष होतें. व्यवहारांत कांहीं निमित्त घडतें म्हणून कांहींचे स्नेहसंबंध जडत असतात. पण ह्या व्यक्तीला पाहतांच मला असें वाटलें कीं याच्याशीं आपण स्नेह ठेवावा. श्यामच्या डोळ्यांत बुद्धीची चमक होती पण दिसण्यांत मंद शांत होता. ओठावर गोड स्मित असे पण चेहऱ्यावर निराशपणाची छटा होती,

वागण्यांत नम्रता होती, बोलण्यांत मार्दव होतें, स्वभावांत लाघवीपणा होता. तरीही मनाचा एकलकोंडेपणा झांकून जात नव्हता. श्यामचें व्यक्तिमत्व आकर्षक होतें तसेंच कुतूहलजनक होतें, त्याचा मंदपणा आणि निराशपणा हें केवळ त्याच्या व्यक्तिमत्त्वावर चढलेलें वारूळ असून त्या वारुळाच्या आंत एखादा वाल्मिकी ऋषि असल्याचा त्याच्या डोळ्यांतून मला भास होत होता. म्हणूनच मी श्यामकडे आकर्षिला जात होतों.

जसजसा श्यामशीं संबंध वाढूं लागला तसतसें, त्यानें न सांगतांच, त्याच्या जीवनाचें प्रतिबिंब त्याच्या वागण्यांत दिसूं लागलें. एखादें रोपटें दगडाखालून डोकें वर काढून यावें, दगडाच्या दडपणानें त्याचें पान खुरट-लेलें-दुमडलेलें दिसावें तसें त्याचें जीवन वाटलें. त्याच्या संभाषणांत निराशा-युक्त संयमाची दुमड होती. त्याच्या आनंदाविष्कारांत खुरटेपणा जाणवत होता. एकादे वेळीं चुकून आनंदाच्या ऐन भरांत तो जेव्हां येई तेव्हां आनंदानें चेहरा फुलण्याऐवजी सर्वांगाची ओढाताण झाल्यासारखी दिसे. भरधांव घोड्याला लगाम घातल्यावर त्याच्या तोंडाची व पायाची जी ओढाताण होते तशी ती मला वाटली. अशा वेळीं कोणी तरी त्याला आंतून मागें खेंचीत आहे असें वाटे. तो जरी फारसा बोलत नसला तरी त्याला कांही तरी पुष्कळ बोलावयाचें आहे असें स्पष्ट दिसे, किंवा तो साधें बोलूं लागला तरी बोलतो ह्याहून निराळें बोलावयाचें आहे हें चटकन् लक्षांत येई.

श्यामच्या या गूढ व्यक्तिमत्वामुळें माझें त्याच्या जीवनाविषयीचें सौहार्द-पूर्ण कुतूहल अधिकच वाढूं लागलें. मीं हें कुतूहल जेव्हां त्याचेजवळ व्यक्त केलें तेव्हां त्याच्या नेहमींच्या मऊ पण उदास शब्दांत त्यानें सांगितलें, “ हें तुला कसं सांगूं ? मीं जर सांगायचं म्हटलं तर बऱ्याच मोठ्या व्यक्तींना व नातलगांना दुखवावें लागेल. त्यांचेबद्दल मला आतां जरी आदर राहिला नसला तरी लाज आणणाऱ्या म्हणूनच त्यांस अप्रिय असलेल्या गोष्टी दुस-

त्याला सांगतांना त्याची मलाच लाज वाटेल. इतकं माझ्या अंगीं धैर्य नाहीं. खरं बोलण्याचं धैर्य नाहीं तसं खोटंहि बोलणं माझ्यानं होणार नाहीं."

त्याचे हे प्रांजळ, कळकळीचे पण स्वतःच्या जीवनाला ओळखून असणारे शब्द माझ्या हृदयाशीं जाऊन भिडले. त्याच्या भावनेशीं सहमत होण्याकरितां मीं त्याला दुजोरा दिला.

"पण मोठ्या लोकांत तरी खरं बोलण्याचं धैर्य कुठें असतं? लोकांना वाचावयास बरं वाटेल असंच लिहिलेलं मोठ्या लोकांच्या आत्मचरित्रांतून दिसतं. तुला मोठ्या माणसाप्रमाणें खोटं बोलायचं कारण नाहीं आणि खरं सांगायला भिण्याचंहि कारण नाहीं."

मोठ्या लोकांच्यावर केलेला आरोप त्याला रुचलेला दिसला नाहीं. त्यानें नाक मुरडतांच मीं पुरावा सादर केला.

"हें बघ श्याम, मोठ्या लोकांविषयीं तुझा असलेला आदर मला घालवावयाचा नाहीं. पण मीहि दुसऱ्यांना बरं वाटेल असं खरंखोटं बोलून स्वतःला मोठ्या लोकांच्या यादींत बसवीत नाहीं. पण नमुनाच पुढें केल्याशिवाय माझं म्हणणं तुला पटायचं नाहीं. एका आत्मचरित्रांत मीं असं वाचलं कीं, "बायकोची स्तुति करणें मला आवडत नाहीं." आणि जे बायकोची स्तुति व कौतुक करितात अशांची कांहीं उदाहरणें देऊन त्यांची भरपूर निंदा त्यांनीं केलीं होती. पण यापूर्वीच्या पानावर 'मी हिला गुरुस्थानीं मानतों, असं लिहिलं होतं. ही 'ही' कोण म्हणून शोध घेण्यासाठीं पुस्तक आणखी चाळून पाहिलें तेव्हां 'ही' म्हणजे आत्मचरित्रकाराची दिवंगत पहिली बायको असं समजलं.

अशींच सत्याची हातचलाखी करणारीं मोठ्या लोकांचीं बरींच आत्मचरित्रें मीं वाचलीं आहेत. म्हणून मला वाटतं, मोठीं माणसं खरं बोलतात हें खरं नाहीं. ते फक्त खरं बोलावयास सांगत असतात."

त्याला आश्चर्य वाटलें. माझें म्हणणें त्याला पटल्यासारखेंहि दिसलें. पण खवखव संपली नव्हती. तो म्हणाला, " तूं म्हणतोस तें खरं असेलहि, पण आपल्याला तेवढंच घेऊन बसायचं आहे काय? तुझ्या बोलण्याचं तात्पर्य इतकंच ना कीं मीं तुला बोचणारं शल्य सांगावं? "

" आणि सांगायचं म्हटलं तरी काय सांगायचं आणि काय नाहीं हा प्रश्नच आहे. पण कितीहि जपून बोललों तरी माझा ज्यांचेशीं बरावाईट संबंध आला त्या सर्वांचा उल्लेख त्या त्याप्रमाणं बरावाईट येणारच. "

" तूं त्यांना असा घाबरतोस कां? मी कांहीं त्यांच्याशीं भांडायला जात नाहीं किंवा कुठें सांगत बसत नाहीं. तुला मीं पाहिलं तेव्हांपासून तुझ्याबद्दल सहानुभूति वाटूं लागली म्हणूनच तुझ्याशीं मैत्री वाढविली. तुझं सालस आणि लाघवी वागणं मला लोभस वाटूं लागलं; पण त्याचबरोबर जसजसा तुझा सहवास वाढूं लागला तसतशी तुझ्याबद्दलची उत्सुकताहि वाढूं लागली. तूं कांहीं तरी लपवीत आहेस, तुला कोणी तरी मागें खेचीत आहे, कोणी तरी दडपून टाकीत आहे आणि आंतून तुला कसली तरी टोचणी लागलेली आहे, याची मला जाणीव होऊं लागली. तुझं हें गूढ समजून घ्यावं अशी इच्छा झाली. म्हणूनच तुला हें विचारीत आहें. "

" मला माणूस समजून माझ्याशीं इतक्या आपुलकीनें कोणी बोलेल असं वाटलं नव्हतं. माझ्याशीं दुसरा माणूस इतक्या आपुलकीनं बोलूं शकतो हें केवढं आश्चर्य मी आज पाहत आहे! "

" तुझी मीं निराशा करावी असं मला वाटत नाहीं. मी सांगेन, पण तूं मला छेडूं मात्र नकोस. कोणत्याहि व्यक्तीचा किंवा प्रसंगाचा उल्लेख न करतां केवळ मोघमपणें कांहीं तरी बोलेन. तुला काय घ्यायचं तें समजून घे — "

" नीति–अनीति, सुखदुःख आणि मानअपमान यांचे ढोबळ आडाखे बहुधा ठरलेले असतात— "

करुण कहाणीला सुरुवात झाली. " — परंतु त्यांच्यातलिकडे जाऊन कांहीं नाजुक अनुभव मुद्दाम साग्र सांगितल्याशिवाय कळत नाहींत. नरसिंहा-प्रमाणें कोणत्याहि ठराविक नियमांत न अडकतां अद्भुतरीत्या पण बेमालूमपणें जीवनाच्या उदरांत आपलीं तीक्ष्ण विषारीं नखें खुपसल्याशिवाय कांहीं दुःखें व अपमान राहात नाहींत.

"पुष्कळ वेळां हा नरसिंह इतक्या अवघड जागीं पण नाजुकपणें चपखल बसलेला असतो कीं त्याचीं नखें पोटांत शिरून आंतडीं बाहेर काढीत असतात हें कोणास सांगितलें तरी खरें वाटायचें नाहीं. प्रतिष्ठेची चाड नाहीं पण हांव आहे, पुरेसं धैर्य नाहीं पण अंतःकरण दुष्ट आहे, अशाच ठिकाणीं हा नरसिंह आपला कार्यभाग साधीत असतो."

"म्हणूनच कित्येक निष्पाप मुलांस अन्न असून उपास काढावे लागतात, आईबाप असून पोरकं व्हावं लागतं, घरदार असून भटकत राहावं लागतं, प्रतिष्ठित असून अंधारांत दिवस कंठावे लागतात, सौजन्यशील असून तिरस्कार सहन करावे लागतात, बुद्धि असून मागं राहावं लागतं, आणि शेवटीं सूज्ञ असूनहि वेड्यासारखं जगाकडे डोळे विस्फारून पाहत बसण्याची पाळी येते. आणि मग या मूषकदंशावर अशी फुंकर मारण्यात येते कीं, 'अहो, हा तसाच आहे. याचं आतडं जन्मतःच बाहेर आलेलं आहे!"

" मी लहानपणीं एक साधाभोळा पण उपेक्षित मुलगा होतों. त्यावेळीं माझा स्वभाव अगदीं गरीब हें चांगलं आठवतं. त्या काळांत मला कोणीं चांगलं म्हटलेलं आठवत नाहीं. मात्र जो बाहेरचा पाहुणा येई तो माझे-बद्दल चांगले शब्द काढी. हें कोणाला आवडत नसे. जरी घरांत कोणीं चांगलं म्हटलं नाहीं तरी त्याची जाणीव मात्र मला नव्हती.

" माझा कोणी तिटकारा करीत आहे किंवा तोंडदेखलेपणें वागत आहे ही कल्पना मला त्यावेळीं नव्हती.

"मीं बोलणीं खाल्लेलीं, दुसऱ्याच्या दोषाबद्दल स्वतः मार खाल्लेला, कोणी

आपल्याशीं कामापुरतेंच बोलत असलेलं, केव्हां सर्व मंडळी एकाद्या कार्यक्रमास जाई तेव्हां मला वगळलेला, माझ्याशिवाय इतर सर्व आपापसांत बरोबरीच्या नात्यानें—माझ्याएवढ्या मुलाशींसुद्धां खेळीमेळीनें वागलेले—हें सर्व मला चांगलं आठवतं.

" परंतु त्या वेळची प्रामाणिक भावना अशी कीं एक तर आपलं कांहीं तरी चुकत असेल किंवा वडील माणसं वागतात तें वडील म्हणून आणि आपल्या चांगल्यासाठीं वागत असतात.

" अशा भावनेमुळें जी जी नातेवाईक मंडळी घरीं पाहुणे म्हणून येई तिच्याविषयीं फार आपलेपणा वाटायचा. ती आली कीं आनंद व्हावयाचा. येण्याचा दिवस आधीं ठरलेला असला तर केव्हांपासून मनामध्यें त्याच दिवसाचा ध्यास !

" त्या मंडळींत मला जरी मिसळतां येत नव्हतं तरी त्यांची आपसांतील खेळीमेळी पाहूनच मला केवढा आनंद व्हायचा !

" पण हा अज्ञानांतला आनंद फार दिवस टिकला नाहीं.

" लवकरच खऱ्या जीवनाचा साक्षात्कार झाला. भावनांची उलथापालथ झाली. नातलगांसंबंधीं माझ्या मनांत अत्यंत तिरस्कार निर्माण झाला. माझ्या जगाचा—म्हणजे कुटुंबाचा बराच अनुभव आला. नीट निरीक्षण केलें, आणि घरांतील वातावरणासंबंधीं मनामध्यें कांहीं आडाखे बसविले.

" कुटुंबाच्या बाहेर खोटा प्रचार करून आपल्याविरुद्ध लोकांचीं मनें कलुषित केलीं जातात ह्याची जाणीव होऊं लागली. कोणी आमच्या साहितीचा भेटला कीं माझी विचारपूस करी, तो जे प्रश्न विचारी त्यावरून माझ्याबद्दल त्याला आधींच खोटी माहिती मिळाली आहे हें मला समजल्यावांचून राहिलें नाहीं.

" समाजांत सत्तेचीं स्थानें पुष्कळ असतात हें मला माहित होतें पण मोठें कुटुंब हीहि एक सत्ता आहे हें मला याच वेळीं कळलें. या सत्तेला घटना

नाहीं, कायदेकानू नाहींत, सरकारी अधिकारी नाहीं कीं त्याची औपचारिक कार्यपद्धति नाहीं.

"परंतु पिढ्यान् पिढ्या चालत आहे असें कुटुंब म्हणजे एक सत्ता आहे. हें एक लहानसें संस्थानच आहे. यांत एक सत्ताधीश असतो आणि जगरीतीप्रमाणें त्याच्याभोंवतीं तोंडपुजे लोक गोळा झालेले असतात.

"ज्यांचेशीं माझे पूर्वीं जिव्हाळ्याचे संबंध होते त्यांचेकडूनहि, घरांतील सत्ता माझेविरुद्ध आहे हें कळतांच माझेविरुद्ध राळ उडविण्यास सुरुवात झाली.

"आमचे स्नेहसंबंध चांगले होते म्हणून त्याचे मोबदल्यांत त्यांनीं माझे स्तुतिपाठ गावेत असें मीं म्हणत नाहीं. परंतु केवळ सत्तेला खूष करण्यासाठीं माझा बळी घ्यावा हें माझ्या मनाला लागल्यावांचून राहिलें नाहीं.

"एकानें तर गंमतच केली. त्यानें मीं रखेली ठेवली असल्याचें खोटेंच ठरविलें. त्यावेळी माझें वय जेमतेम वीस वर्षें असेल. मला घरांतून हांकलून लावण्यासाठीं या खोट्या बातमीचा कुटाळ लोकांनीं पुष्कळ उपयोग करून घेतला.

"अशा तऱ्हेनें जें कधीं बोललों नाहीं व जें कधी केलें नाहीं तें सर्वतोमुखी कसें होई आणि आपल्या चांगल्या गोष्टी कोणालाच कशा माहीत होत नाहींत याचाहि उलगडा होऊं लागला.

"बाहेरच्या जगांत आगत्य आणि आपलेपणा अनुभवास येतो पण घरांत मात्र तिरस्कार आणि उपेक्षा होते याचें कारण आपलेंच कांहीं चुकत असेल असे जें लहानपणीं वाटत होतें तसें नसून यांत कांहीं निराळेंच आहे याची कल्पना आली.

"ही माझी अवस्था मनांत सतत डांचत राहिली. कुवतीप्रमाणें प्रतिकार सुरू केला. आणि मी कांट्यासारखा सलूं लागलों.

"त्याचे परिणामहि भोगावे लागले. घरांतून हांकलून देण्यापर्यंत वेळ

आली. शेवटीं जन्मदात्या घरास रामराम ठोकावा लागला.

"आतां नवीन आयुष्य सुरू झालें. आतां माझ्यावर कोणाचें दडपण नव्हतें. स्वतंत्र बुद्धीनें विचार करण्यास व स्वतंत्र दृष्टीनें बघण्यास मी अगदीं मोकळा झालों.

"नवीन दृष्टींतून पूर्वीचें माझें घर एकदम निराळें दिसूं लागलें. पूर्वीच्या झांपडांत जें दिसूं शकलें नाहीं तें आतां सुस्पष्ट दिसलें. दडपणामुळें जो उद्वेग व भकासपणा त्यावेळीं जाणवला नाहीं तो उद्वेग आणि भकासपणा आतां उफाळून वर आला. या स्वतंत्र दिव्य दृष्टींत मला माझ्या घराचें जें दर्शन घडलें तें असें होतें :—

"एक दुष्टाचार्य. त्याच्या खास मर्जींतील निवडक नादान लोकांचा गट. या दोहोंची वारेमाप स्तुति करणाऱ्या आणि अंधपणें त्यांची 'री' ओढीत आगींत तेल ओतणाऱ्या इतर नातलगांचा घोळका. या सर्वांस प्रतिष्ठितपणा देऊन सर्वत्र तोंडभर स्तुति करणाऱ्या होयबांचा स्नेहसंघ, या सर्वांच्याहि खालीं नेहमीं अंधारांत ठेवलेला, उपेक्षित, गुलामवजा, तिरस्कृत असा एक शूद्र वर्ग.

"आपल्या कुटुंबाची ही 'समाजरचना' अशी होती. आणि आपला शूद्र-वर्ण होता.

"या 'शूद्रावस्थेंत' माझ्या मनावर कांहीं संस्कार झाले; त्यामुळें ज्या कल्पना, ज्या भावना अंतःकरणांत ठाम झाल्या होत्या त्या सर्व तावून सुलाखून नीट तपासून घ्याव्या लागल्या.

"स्वतंत्र बुद्धि चालविण्याचा नेटानें प्रयत्न करावा तेव्हां कोठें मनावरचें पहिलें 'शूद्रपटल' जरा दूर झालें; आणि मग शत्रुमित्रांचे यादींत बरेच फेरफार करावे लागले. चांगल्या-वाइटाच्या व्याख्या बदलाव्या लागल्या. स्वतःचें जीवन, स्वतःचें ध्येय, स्वतःचा मार्ग, जगांत वावरण्याची रीत हीं सर्व स्वतःचीं स्वतःच ठरवावीं लागलीं.

स्वतःच्या परिस्थितीचें सम्यक्ज्ञान होऊन महत्त्वाकांक्षेचें बीज रुजळें गेलें.

" शारीरिक कष्टाची परमावधि झाली. महिनेच्या महिने अर्धपोटीं. कधीं दोन-दोन तीत-तीन दिवस उपवास. ना घर ना दार, अशी स्थिति झाली. याच वेळीं पुढें सतत १९ वर्षें मनस्तापानें घर करून राहिलेली डोकेदुखी व निद्रानाश सुरू झाली.

" परंतु या प्रतिकूल परिस्थितींत मनाची उमेद खचली नाहीं. महत्वाकांक्षेचें बीज रुजलें होतें तें जोरानें फोंफावत चाललें. मनाची उभारी इतकी होती कीं अशा स्थितींतूनहि वाट काढण्याची ईर्षा सतत तेवत होती.

" क्षितिजावर अद्यापि अंधार होता. तरी भवितव्याची चिंता शिवलीच नाहीं. धडपड करणें एवढेंच माहीत. तोंड दाबून बुक्क्यांच्या मारानें आंतल्या आंत गुदमरून न जातां त्याच बुक्क्यांचा आवाज जगाच्या चव्हाट्यावर ऐकूं कसा जाईल आणि स्वतःचें अस्तित्व शाबूत राहून कर्तृत्वाची जाणीव जगाला देऊन बुक्के मारणाऱ्यांचे काळे झालेले हात व तोंड जगासमोर कसें येतील हाच ध्यास !

" घरच्या बुजगावण्याचा धाक मी भीक घालीत होतों तोंपर्यंत. पण एकदां छत्र झुगारून दिल्यावर बाहेरच्या स्वतंत्र जगांत या बुजगावण्याची काय किंमत ?

" एकदां हें बुजगावणें झटकल्यावर आपण आपलें स्वतंत्र जग निर्माण करूं शकतों, याचा नवीन अनुभव आला. त्यांतच निर्वाह आणि ध्येय यांची ओढाताण होऊं लागली. पण प्रतिष्ठेनें स्वतःच्या पायावर उभा राहत होतों यांतच मला समाधान होतें.

" पुढें पुढें जीवनाच्या स्थैर्याचे आभास उत्पन्न होऊं लागले. मनुष्यबळ आणि आर्थिक बळ जमूं लागलें. एकाकी जीवन संपलें. त्याचबरोबर प्रपंचाचा ताप म्हणजे काय तें समजलें. यशापयश व आशानिराशा यांचे धक्के सतत बसत होते.

"मनुष्य संकटावर मात करूं शकतो. त्याला काळावर मात करतां येत नाहीं. काळ सारखा धांवत आहे. आयुष्य मात्र एकदां थांबणार आहे. मनुष्य कितीहि धीराचा असला तरी त्याच्या धैर्यानें काळ थांबत नाहीं, आणि आयुष्य लांबत नाहीं. आयुष्य केव्हांहि संपण्याची भीति प्रत्येक धीर पुरुषाच्या मागें आहेच.

"आपली आकांक्षा आयुष्य संपावयाच्या आंतच पुरी व्हावी लागते.

"पण मित्रा, माझें पूर्वजन्मींचें पाप इतकें बलवत्तर होतें कीं यश सारखें लांबतच राहिलें.

"आलेलें बळ कमी पडूं लागलें. नवीन नवीन उपक्रम करण्यास बुद्धि, मित्र व द्रव्य यांचें साह्य हजर असे, पण मनाची पहिली उमेद आतां राहिली नव्हती. ऐहिक दृष्ट्या कष्ट कमी झाले होते; पण मनाची खंत सरली नव्हती. उभारी नष्ट झाली होती. माझ्या सहानुभूतांचा माझ्या कर्तृत्वावरील विश्वास वाढला होता. पण माझा माझेवरील विश्वास ढळून गेला होता.

"पुष्कळ वेळां संधि हात जोडून उभी असायची. पण तिचा उपयोग करून घेण्याइतका उत्साह राहिला नव्हता. कारण वैफल्यानें व निराशेनेंच मनावर पगडा बसविला होता.

"दुःसह परिस्थितीनें माझ्यावर मात केली होती. आणि माझें मन हतबल झालें होतें. नैराश्य, उदास, उद्वेग यांनीं मात्र आपलें बळ वाढविलें होतें. फलाची आशा न ठेवतां ( कारण आशा नव्हतीच ) उदासपणें कष्ट करीत होतों.

"मित्रांचा पैसा आणि साहाय्य व्यर्थ खर्चीं घालीत होतों. स्वतंत्र जगाच्या नवीन अनुभवांत जीवनावर जी श्रद्धा आणि आस्था होती ती आतां शिल्लक राहिली नव्हती. यश येणार नाहीं व महत्त्वाकांक्षा पुरी होणार नाहीं याच एका गोष्टीवर श्रद्धा खिळून राहिली होती.

"मित्रा, हें असं कां झालं तें मात्र विचारूं नकोस."

...९

" मित्रा, हें असं कां झालं तें मात्र विचारूं नकोस. " या त्याच्या भैरवीनें त्याचें करुण भावगीत संपलें असें वाटलें. त्याची कहाणी ऐकून वीस वर्षें नवऱ्याच्या वाटेकडे डोळे लावून बसलेली सावित्री नवरा भेटण्याच्या आधीं एकच दिवस अचानक प्लेगनें मेली या कै. माटे यांच्या मुक्यानेंच मेलेल्या सावित्रीची आठवण झाली. एवढ्यांत श्यामचे केविलवाणे ओठ हलले.

" मित्रा, माणसें अकालीं मरूं शकतात. कां कोणास ठाऊक, मलाहि माझ्याबद्दल असेंच वाटूं लागलें आहे.

" मनुष्याच्या जीवनाला कांहीं ना कांहीं कार्य असतें असें तत्त्वज्ञ म्हणतात. आपल्या जीवनाला कांहीं कार्यच नाहीं याची अनुभवानें जाणीव झाल्यावर जीवनसमाप्ति हेंच एक उरतें.

" म्हणून गाशा केव्हां गुंडाळावा लागेल याचा नेम नाहीं. तशी शारीरिक क्लेशाची भीति मला वाटत नाहीं. परंतु हा अर्धवट पडलेला पसारा टाकून जावें लागणार.

" लहान तीन मुलें, त्यांस सोडून कायमचें जावें लागणार. माझी सौभाग्यवती माझ्यामागें दिवस कसे काढील ? मी कायमचा निघून गेल्यावर हे सर्वजण माझी आठवण काढीत राहतील. त्यांना प्रत्येक ठिकाणीं माझी जागा रिकामी दिसेल.

" माझ्या पश्चात् हा संसार कसा चालेल ? कल्पनाच सहन होत नाहीं.

" स्टेशनवर आगगाडीची दिवसभर ताटकळत वाट पाहावी. संध्याकाळीं गाडी येईल. रात्री जेवावयास व झोंपण्यास घरीं पोंचूं. अशा आशेनें जेवणखाण ऐतागें करून गाडीकडे डोळे लावून बसावें. गाडी आतां येईल, मग येईल म्हणून उभ्यानेंच वाट पाहत बराच वेळ काढावा. पण शेवटीं, गाडीच कॅन्सल व्हावी !

" तशांतलाच प्रकार हा !

" किंवा पुस्तकाची प्रस्तावना शंभर पानें, आणि पुस्तक दोन पानेंसुद्धां

होऊं नये !

" तीन तपें उन्हातान्हांत वाट पाहत काढलीं. दरम्यान सहचारिणी मिळाली. मुलें लाभलीं. त्यांसहि आपल्याजवळ उभें करून वाट पाहावयास लावलें. शेवटीं ज्याचे जीवावर वाट पाहावयाची तो जीवनाचा कर्ताच अकस्मात् ' कॅन्सल ' होऊन बायकामुलांनीं ' हें काय ! ' म्हणून ' आ ' वासून भकास क्षितिजाकडे बघत उभें राहावें, असें तर होणार नाहीं ना अशी भीति वाटून जाई.

" विशिष्ट महत्त्वाकांक्षेनें प्रेरित होऊन अत्यंत कठीण व नाजूक प्रसंगांस न जुमानतां दिवस काढले. पण धडपड सुटली नाहीं. सर्व हालअपेष्टा एकाच ईर्षेनें सोसल्या. पण त्या सगळ्यांचें फळ मिळण्याच्या आंतच माझी जीवनयात्रा संपली तर असा दैवदुर्विलास माझ्यासारख्याच्या आयुष्यांत दुसरा कोणता असेल ?

" उंच झाडावरील फळ काढण्यासाठीं धडपड करावी. कांट्याकुट्यांतून मार्ग काढून झाडापर्यंत पोंचावें. नेट धरून वर चढून जावें. फळ असलेली फांदी धरून खालीं ओढण्याच्या प्रयत्नांत एका हाताची व पायाची मिठी सुटून धाडकन् खालीं पडावें असें तर होणार नाहीं ना ?

" आणि मग माझी महत्त्वाकांक्षा अदृश्यच राहील, माझी धडपड सुप्तच राहील आणि माझें अपमानित जीवन तेवढें जगापुढें उरेल. माझें दारिद्र्य तेवढें जगाच्या डोळ्यासमोर येईल आणि अफलित झालेलें, अपेशी, हलकें जीवन तेवढें लोकांसमोर नाचत राहील याचीच मला खंत वाटते.

" माझ्या अपेशी हीन जीवनाला कारण कोण होतें, तें कायमचें पडद्याआडच राहील. जगानें अपेशी म्हटलें तरी चालेल. निदान माझ्या मनांत कांहीं महत्त्वाकांक्षा होती आणि रुखरुख होती हें तरी त्यावरून दिसून येईल. परंतु तसें कांहींच न होतां निकृष्ट जीवन हाच माझ्या नशिबाचा स्थायीभाव समजून जगानें माझ्याकडे दुर्लक्ष केलें तर तें माझ्या मनाला जास्तच लागेल. "

बोलता करून या बिचाऱ्याला मीं नाहक दुखविलें असें माझें मलाच वाटूं लागलें. कारण आपलें बोलणें संपवून लगेच न सांगतां तसाच शून्य मनानें श्याम निघून गेला.

त्याच्या जड पावलांची मंद चाल किती तरी वेळ मी न्याहाळत होतों. त्याची ही रुखरुख रास्त होती. त्याच्या चेहऱ्यावरील भावनांचा आतां खुलासा झाला. इतके दिवस त्याच्याविषयीं वाटणारें कुतूहल संपलें पण करुणा वाढली. ' मी छेडणार नाहीं ' हें माझें वचन अजूनहि मीं मोडलें नाहीं. पण आतां छेडण्याची जरूरच काय ?

## १२. श्री. ज.स. करंदीकर यांचे निवडक लेख व निबंध

श्री. तात्यासाहेब करंदीकर यांचे हे लेख प्रसिद्ध करून त्यांच्या सन्मान-निधीनें एक मोठें कार्य करून ठेवलें आहे. ह्या महत्त्वाचें श्रेय निम्में श्री. तात्यासाहेब ज्या परंपरेंत वाढले त्या परंपरेस व निम्में त्यांच्या लेखन-गुणांस द्यावें लागेल. श्री. तात्यासाहेबांचे लेख वाचीत असतांना लोकमान्यांचें स्मरण वाक्यावाक्यांतून झाल्याविना राहत नाहीं. लोकमान्यांचे शिष्य असण्याची कसोटी हीच समजली पाहिजे. गांधींची गुरुकिल्ली त्यांच्या तंत्रांत होती तर लोकमान्यांची त्यांच्या तत्त्वांत होती. तंत्रानें यांत्रिक व मांत्रिक शिष्य डुकरिणीच्या पिलांप्रमाणें भराभर होतील यांत आश्चर्य नाहीं. पण तत्त्वानें लाभणारा शिष्य हा तात्त्विक तर खराच, पण विरळाहि ! गांधींचे चहाते असंख्य, तसेच लोकमान्यांचेहि असंख्य चहाते आहेत, परंतु चहाते हे ' .... मिष्टान्नं इतरे जनाः' याप्रमाणें असतात. तेव्हां त्यांच्यावरून ' कन्येच्या रूपाची'' परीक्षा करतां येणार नाहीं. गांधी शिष्यपरंपरेनें श्रीमंत होते. लोकमान्य त्या दृष्टीनें दरिद्री होते ! मान्य न करण्यांत काय हशील आहे ? पक्षद्वेष सोडून दिला आणि श्री. तात्यासाहेबांनींच वर्णिलेल्या ' केसरी ' च्या धोरणाचा सहानुभूतिपूर्वक विचार केला, तर लोकमान्य हयात असून संपादक नसतांना व त्यांच्या पश्चात्‌हि आजपावेतों ' केसरी ' एका विशिष्ट व अखंड धोरणानें इतकीं वर्षे चालविलेला आपण पाहतों, त्यावरून लोकमान्यांच्या प्रखर तत्त्वज्ञानाच्या व निष्ठावन्त तात्त्विक शिष्यांच्या तळपणाच्या

परंपरेचा कोणाहि पुढाऱ्यास हेवा वाटावा अशीच खरोखर परिस्थिति आहे. हें राजकीय नव्हे, ऐहिक नव्हे, पण तात्त्विक वैभव कांहीं टिळक-शिष्य म्हणविणाऱ्यांनाहि समजूं शकलें नाहीं. याचें कारणहि उघडच आहे. केळकर कितीहि ललित साहित्यिक असले तरी त्यांच्यांत टिळक दिसतात. श्री. तात्यासाहेबांच्यांत तर दिसतातच दिसतात. बाहेरील विलोभनें वा विरोध यांची पर्वा न करतां एकनिष्ठेनें तपंच्या तपें कार्यमग्न राहिलेल्या श्री. तात्यासाहेब करंदीकरांच्या या लेखांचें महत्त्व विशेष आहे हें निरपेक्षबुद्धीनें मान्य केलें पाहिजे.

लेखांचा हा पहिला खंड असून त्यांत ' महायुद्ध व परराष्ट्रीय राजकारण', ' देशांतील राजकीय घडामोडी ', ' आर्थिक व्यवहार ' व ' संपादकीय धोरण ' एवढे विषय वर्गवारीनें घेतले आहेत. श्री. तात्यासाहेब स्वतःच म्हणतात त्याप्रमाणें " वीसपंचवीस वर्षांनंतर आपल्या वृत्तपत्रांच्या, नियतकालिकांच्या जुन्या फाइली चाळल्या तर त्या वेळीं पुनश्च वाचण्यासारखें व संग्रहीं ठेवण्यासारखें जें लिखाण असेल तीच आपली वाचकांना व समाजाला खरी देणगी होईल " ( पृष्ठ २८३ ). अशा तऱ्हेचे हे सर्वच लेख आहेत. वीस वर्षांनंतरहि आज आपणांस ते वाचनीय आहेत हें एक त्यांच्या योग्यतेचें प्रत्यंतर आहे. कोणताहि विषय घ्या, त्यांत श्री. तात्यासाहेबांची कसोशी दृष्टीस पडते. त्यांत मनाचा नाटकीपणा नाहीं, बुद्धीचा उथळपणा नाहीं, आणि शरीराचा अंगचुकारपणाहि दिसत नाहीं. वर्तमानपत्रें म्हणजे विरोध्यांच्या उखाळ्यापाखाळ्या काढणें, स्वकीयांची जाहिरात करणें आणि चार इंग्रजी वर्तमानपत्रांचीं कशींबशीं मराठींत शिळीं भाषांतरें प्रसिद्ध करणें यापलीकडे ज्यांची ध्येयदृष्टि आणि कार्यशक्ति जाऊं शकत नाहीं, अशा आजच्या वर्तमानपत्रांनीं वरील गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

परराष्ट्रीय राजकारणांतील लेखांत ' फ्रान्सच्या शरणागतीची मीमांसा ', ' यांत कोणाचें काय साधलें !', ' महायुद्धाचें अखेरचें पर्व ' हे लेख विशेष

उद्बोधक व धारदार लेखणीचे आहेत, प्रत्यक्ष मार्शल पेताँ यानें केलेली आपल्या पराजयाची मीमांसा अत्यंत केविलवाणी, रोमहर्षक व आम्हांस उद्बोधक आहे. तो म्हणतो, “ फारच थोडीं मुलें, फारच थोडीं शस्त्रास्त्रें व फारच थोडे दोस्त हें आमच्या पराभवाचें कारण आहे. १९१८ सालीं आमच्या राष्ट्राला विजय मिळाला तेव्हांपासून त्यागाच्या वृत्तीपेक्षां सुखोपभोगाच्या वृत्तीला आमचे लोक जास्त मान देत आले आहेत. लोकांनीं त्याग थोडा केला व मागण्या मात्र पुष्कळ मागितल्या. श्रम टाळण्याकडेच लोकांचा कल वाढत चालला आहे. ” यावर श्री. तात्यासाहेब एक मार्मिक उपमा देऊन टीका करतात, “ घोडा कां अडला, पानें कां कुजलीं, भाकरी कां करपली, या तीनहि प्रश्नांचें ‘ न फिरविल्यामुळें ’ हें जसें एकच उत्तर देतां येतें, तसेंच वरील तीनहि प्रश्नांचें एकच उत्तर देतां येईल व तें हेंच कीं, त्यागापेक्षां भोगाकडे, कर्तव्यापेक्षां हक्कांकडे आणि समाजहितापेक्षां व्यक्तिस्वातंत्र्याकडे लक्ष लागल्याचा हा दुष्परिणाम आहे ” ( पृष्ठ २० ) याच्यापुढें लगेच मजुरांचे लाड पुरविण्याचा परिणाम म्हणून ते साधार कारणें देतात, “ आमचीं शस्त्रास्त्रें अपुरीं पडलीं. जर्मनीच्या सहा विमानांबरोबर फ्रान्सच्या एकेका विमानाला लढावें लागलें, अशी जी केविलवाणी कबुली मा. पेताँ यांनीं या वेळीं दिली तिच्यावरूनहि हें सामान्य तत्त्वच सिद्ध होतें. महायुद्ध उपस्थित होण्याच्या आधीं फ्रान्समधील कारखान्यांतून मजुरांकडून कामाची टाळाटाळ चालत आहे. मजुरांच्या कामाचे तास कमी करतां करतां आठवड्यांत अवघे चाळीस तास काम घेण्यांत येऊं लागलें. याचा दुष्परिणाम कसा भोवेल याचें भविष्य ता. २७ सप्टेंबर १९३८ च्या केसरींतील लेखांत पुढीलप्रमाणें वर्तविलें होतें. “ मॉ. ब्लम यांच्या चाळीस तासांच्या आठवड्यामुळें फ्रान्सचें लष्करी यंत्र पूर्णपणें पंगु झालें आहे. त्यामुळें जर्मनींत एका महिन्यांत जितकीं विमानें तयार होतात तितकीं विमानें फ्रान्समध्यें सबंध वर्षांत देखील झालीं नाहींत. विमानांची जी कहाणी तीच कहाणी

आरमारी जहाजांचीहि आहे.' यावरून वाचकांच्या लक्षात येईल कीं, मार्शल पेताँ यांनीं शस्त्रास्त्रांच्या तुटवड्याचें जें गाऱ्हाणें आतां गाईलें त्याचें बीज बऱ्याच पूर्वीपासून पेरलें गेलें होतें." ( पृष्ठ २१ ) यांत श्री. करंदीकरांची संपादकीय श्रेष्ठता डोळ्यांत भरते. संपादक हा सेनापतीप्रमाणें दूरदर्शी व तीक्ष्ण दृष्टीचा दिग्दर्शक असावा लागतो. श्री. तात्यासाहेबांनीं वरील उताऱ्यांत फ्रान्सला दूरदृष्टीचा जो इशारा दिला व जो शेवटीं खरा ठरला तोच इशारा आज एक तपानंतर आमच्या देशास लागूं पडणारा आहे. आमच्या देशांतहि मजुरांच्या कैवाराच्या नांवाखालीं संप चालू आहेत. मजुरांना व त्यांच्या पुढाऱ्यांस खूश करण्यासाठीं व थोपवून धरण्यासाठीं सरकार मजुरांच्या व शेतकऱ्यांच्या हितासाठीं म्हणून सांगितले जाणारे कायदे करीत आहे. ईश्वराजवळ हृदय पिळवटून आमची अशी प्रार्थना आहे कीं, आमचे पंत-प्रधान श्री. नेहरू यांजवर मा. पेताँप्रमाणें आपली करुण कहाणी रंगविण्याचा दुष्ट प्रसंग येऊं नये. ' फ्रान्सच्या शरणागतीची मीमांसा ' यांतील कारण-मीमांसेचा पूर्वार्ध नांव, स्थळ व काळ बदलून पुढेंमागें अक्षरन् अक्षरासह आमच्या देशाचा मृत्युलेख म्हणून उपयोगी पडणारा आहे. ' महायुद्धाचें अखेरचें पर्व ' यांत मुस्सोलिनीच्या शोचनीय अन्ताचें कारुण्यपूर्ण, आवेश-पूर्ण पण विवेचक वर्णन केलें आहे. मुस्सोलिनीचा ज्या वृत्तीनें अन्त केला ती हीनप्रवृत्ति आज आमच्याकडेहि पाहावयास मिळते. केवळ मतानें भिन्न म्हणूनच कदाचित् उद्यां त्याचें आपल्यावर वर्चस्व येईल या भेकड दुष्ट वृत्तीनें कोणाहि त्यागी व सन्माननीय पुरुषांचें नांव बदनाम करून जिवंत-पणीं धिंडवडे काढण्यास आम्ही लोकशाहीचे भोक्ते व तत्त्वज्ञानाचे पुतळे मागे पुढें पाहत नाहीं! आणि या साधर्म्यामुळें हा लेख वाचतांना अंतःकरण भरून येतें तसाच चेवहि येतो. श्री. तात्यासाहेबांच्या लेखणीसहि या वेळीं चेव आल्यावाचून राहत नाहीं. ती म्हणते, " मुस्सोलिनीला ठार केल्यानंतर त्याच्या देहाची जी अवहेलना करण्यांत आली ती अत्यंत किळसवाणी व

गर्हणीय आहे. ज्या मिलान शहरावर त्याचें अत्यंत प्रेम होतें, ज्या मिलान शहरवासियांनीं पूर्वी त्याला मानपत्र देऊन त्याचा गौरव केला होता, ज्या मिलान शहराला तो इटलीचें बुद्धिकेन्द्र समजे, ज्या मिलान शहरांतूनच त्यानें रोमवर चाल करून आपल्या हातीं अधिकारसूत्रें घेतलीं, त्याच मिलान शहरांत त्यांचें प्रेत उलटें टांगलें जावें, रस्त्यांत भिरकावून दिलें जावें, त्याच्या प्रेतावर बायकांमुलांनीं थुंकावें, लोकांनीं तें तुडवावें, इत्यादि प्रकार अत्यंत गलिच्छ व माणुसकीला न शोभणारे होत. याविषयीं कोणाचा मत-भेद असण्याचें कारण नाहीं. तो शत्रुपक्षीय असून जुलमी असेल, त्याची मतें कोणास पटणारीं नसतील, त्याच्या साम्राज्यतृष्णेच्या पायीं राष्ट्रावर युद्धाची आपत्ति ओढविली असेल, अथवा आणखी शेंकडो अपराध त्याच्या हातून झाले असतील. पण म्हणून इटालियनांनीं त्याच्या देहाचे जे धिंडवडे काढले ते कमी गर्हणीय ठरतात असें नाहीं. ज्यूलियस सीझरच्या मृत्यूबद्दल सूड घेणारा जसा ॲंटोनी भेटला तसा कोणी ॲंटोनी भेटेपर्यंतच त्यांच्या गमजा चालावयाच्या" मुसोलिनीच्या सामर्थ्यापुढें ज्यांची ब्र काढण्याची छाती नव्हती व जे मुसोलिनी गतप्राण झाल्यावर भेकड टीका करूं लागले, त्यांस कणखरपणें श्री. तात्यासाहेब बजावतात, "तो जीवन्त असतां त्याच्या-विरुद्ध एक शब्दहि बोलण्याची ज्यांची छाती नव्हती ते आतां त्यास भेकड, नतद्रष्ट, खुनशी, इत्यादि वाटेल त्या अपशब्दांची लाखोली वाहत आहेत. ज्यानें लहानपणींच प्रतिपक्षाला दगडानें ठेचण्यास कमी केलें नाहीं, शाळेंतील वादविवादांत 'राजा जुलमी झाला, तर तो देहान्त शिक्षेस पात्र ठरतो.' असें छातीठोकपणें ज्यानें सांगितलें, फोर्ली गांवच्या मेयरला भर सभेंत खिडकींतून फेकून देण्याची ज्यानें धमकी दिली, तुम्ही शिक्षा दिलीत तरी मी पुन्हा हें कृत्य करणार, असें ज्यानें न्यायाधीशांस बजावलें, जो खांद्यावर बंदूक टाकून गेल्या महायुद्धांत लष्करांत दाखल झाला, तोफा डागण्याचें काम स्वतः करीत असतां तोफ फुटून बेचाळीस जखमा झाल्या असतांना

क्लोरोफॉर्म न घेतां ज्यानें आपल्या अंगांतले तोफेचे तुकडे काढविले, विमान-विद्या आत्मसात् करण्याची ज्यानें मोठेपणींहि हाव धरली आणि कोणाच्याहि धाकदपटशानें ज्यानें आपल्या मताला कधींहि मुरड घातली नाहीं, तो मुसोलिनी भेकड होता, असें आतां त्याच्या पश्चात् जगास भासविणें हा मात्र भेकडपणा खरा."

करंदीकरांच्यांत टिळक दिसतात असें जें पूर्वी म्हटलें आहे तें 'देशांतील राजकीय घडामोडी' या विभागांत विशेषत्वानें प्रत्ययास येतें. या लेखांत ज्याप्रमाणें संपादकाचा लेखनगुण दिसतो त्याप्रमाणें ते लेख प्रसिद्ध करूं देण्यांत त्या वेळच्या ब्रिटिश राज्यकर्त्यांचेहि गुण पटल्यावांचून राहत नाहींत. हे लेख नांव, स्थळ व काल बदलून आज प्रसिद्ध केले असते तर ते पचले नसते. 'मोर्लेसाहेबांच्या आठवणी' या लेखावरून ब्रिटिशांच्या स्वभावधर्मावर बराच प्रकाश पडण्यासारखा आहे. एकंदर लेखावरून व आजपर्यंतच्या इतिहासावरून अशी शंका येते कीं, हिंदुस्थानावर राज्य करणारे ब्रिटिश व इंग्लंडवर राज्य करणारे किंवा तेथील नागरिक ब्रिटीश हे वेगवेगळ्या गटांतील असावेत. हिंदुस्थानावर राज्य करणारा इंग्लंडमध्यें एका विशिष्ट श्रीमंत व्यापाऱ्यांचा गट असावा. अर्थात् ते बहुशः व्यापारी लोक असल्यानें त्यांस घटना, लोकशाही कायदा वा माणुसकी यांची चाड क्वचित्च असणार. कंपनीच्या राज्यकारभारांत यांचें प्रत्यंतर येतें. शिवाय आजचेहि जागतिक व्यापारी त्यास पुष्टि देतच आहेत. हिंदुस्थानावर चाललेली दडपशाही ही इंग्लंड देशाच्या सभ्य नागरिकाच्या व्यक्तित्वांत न बसणारी आहे. तसें जर नसतें तर – "असल्या कलमांना जर मीं संमति दिली तर पार्लमेंटच्या बैठकीस सुरवात झाल्यानंतर मी तेथें एक तासभर तरी टिकूं शकेन काय?" "...... परंतु मला येथें जाब द्यावा लागतो ना? ... ... देशांत शांतता राखण्याकरितां असले हे कायदे आवश्यक आहेत हें वाक्य दिसावयास गोंडस दिसतें! परंतु तें पार्लमेंटच्या सभासदांच्या गळीं उतरत

नाहीं आणि त्यांच्या गळीं तें उतरविण्याचें हें पातक मी करणार नाहीं." "... ब्रिटिश मंत्रिमंडळ म्हणजे मूर्खांचा बाजार आहे असें जें ह्या ब्युरॉक्रसीला वाटतें तें मी कधींहि सहन करणार नाही." "पार्लमेंटचे दीडशे सभासद हद्दपारीच्या पद्धतीविरुद्ध तक्रार करण्याकरितां ॲस्क्विथ-साहेबांची मुलाखत घेणार आहेत. तेव्हां यापुढें तुम्हांस हद्दपारीचें शस्त्र सोडून द्यावें लागेल हें लक्षांत ठेवा." "... पार्लमेंटमध्यें प्रश्नोतरें झालीं; त्यांत अपराध्याला आरोप कळविल्याशिवाय अटकेंत ठेवणें आणि आपल्या-वरील संशय दूर करण्याची त्यांस संधि न मिळणें या दोषांवर ताशेरा झाडण्यांत आला. आणि ब्रिटिशांची न्यायपद्धति व हक्क यांविषयीं जी कल्पना आहे त्या कल्पनेमुळें चौकशीशिवाय शिक्षा करणें हें ब्रिटिशांना कधींहि रुचणार नाहीं असें सांगण्यांत आलें." (पृष्ठें १३० ते १३६) अशीं वाक्यें मोर्लेसाहेबांच्या तोंडून निघणेंच शक्य नव्हतें. त्यांच्या उदार-मताला पार्लमेंटचाच पाठिंबा होता असेंच म्हणावें लागतें. म्हणजे पार्लमेंट हेंच स्वत: उदार व सदनशीर होतें असेंच म्हणणें भाग आहे. मोर्लेसाहे-बांची जी शोचनीय अवस्था ब्रिटिश ब्युरॉक्रसीच्या वेळीं झाली ती अवस्था आजच्या लोकशाही स्वतंत्र राज्यांत कित्येकांची होत असेल. परंतु त्या एकाच्याहि तोंडून असें कधीं चुकून एकहि वाक्य निघालें आहे काय कीं हें संसदेस रुचणार नाहीं? मंत्रिमंडळ हा अन्याय करूं देणार नाहीं?–याचा अर्थ लेखणीनेंच स्वत: सांगितला पाहिजे काय? ब्रिटिश राजवटींत मोर्ले-साहेब जन्मास तरी येऊं शकला. आज तो जन्माच्या आधींच मरून जाईल!

'मुंबईच्या दंग्यापासून बोध घ्या' लेख आजच्या राजकारणाच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा व मूलगामी आहे. आजच्या राजकारणाची वाढ झाली तिचें मूळ गांधींच्या असहकारिता व अनत्याचारिता या तत्त्वात–या प्रसं-गांत आहे; व श्री. करंदीकर या मुळावरच घाव घालून स्वसंरक्षणक्षमता नष्ट करूं नका, संरक्षणांत स्वावलंबी झालें पाहिजे, असा प्रथमच इषारा

देऊन " .... आतां ही चळवळ पुनश्च अंगीकारण्यापूर्वी असहकारिता आणि आत्मसंरक्षण या प्रश्नाचा विचार करून या दोहोंचा मेळ कसा घाला-वयाचा तें त्यांनीं ठरवून टाकावें. या संबंधांत त्यांची विचारसरणी जनतेस पटेल व व्यवहार्य दिसेल तरच तिचा आतां यापुढें या तत्त्वावरचा विश्वास अढळ राहील " ( पृष्ठ १५६ ). हा इषारा किती अचूक ठरला आहे हें आज निराळें स्पष्ट करण्याची आवश्यकता नाहीं. या इषाऱ्याची दखल निर-हंकारानें वेळींच घेतली गेली असती तर गुंडागिरी, भोंदुगिरी, अव्यव-हारिता, अयशस्विता आणि अध्यात्मतत्त्वज्ञानाचें विडंबन या गोष्टी आज प्रतिष्ठा पावल्या नसत्या. बार्डोलीच्या सत्याग्रहाची दोन लेखांत केलेली मीमांसा मार्मिक आहे. बार्डोलीच्या सत्याग्रहाचें महत्त्व श्री. तात्यासाहेबांनीं एकाच वाक्यांत वर्णिलें आहे. ते म्हणतात, " सारांश, ही सत्याग्रहाची मोहीम हिंदुस्थानाच्या स्वराज्याच्या चळवळींत अत्यंत नमुनेदार अशीच मानली जाईल. आणि सत्याग्रह कोणीं केव्हां, कोठें, कशाकरितां आणि कशा प्रकारें करावा असा जेव्हां जेव्हां प्रश्न निघेल तेव्हां तेव्हां इतिहासकार उत्तम सत्याग्रहाचें नमुनेदार उदाहरण म्हणून बार्डोलीकडेच बोट दाखवील." तथापि आज डोळ्यापुढें प्रश्न उभा राहतो कीं, जर असें नमुनेदार अमोघ शस्त्र आम्हांस हस्तगत झालें होतें तर बार्डोलीनंतर जे जे स्वराज्याचे प्रयत्न झाले त्या त्या वेळीं तें शस्त्र कां वापरण्यांत आलें नाहीं ? त्या शस्त्राची केव्हां केव्हां चुणुक दाखविली गेली. परंतु विजयाची वाट दृष्टिक्षेपांत येण्याचे ऐन वेळींच तें शस्त्र म्यानांत कां घातलें गेलें ? एक तर पारतंत्र्य हें वरील शास्त्राप्रमाणें नमुनेदार सत्याग्रह करण्यास पुरेसें कारण नसावें किंवा स्वराज्य मिळविणें हें तरी ध्येय नसावें. याची निर्भीड, निरपेक्ष व सूक्ष्म मीमांसा भावी इतिहासकार केल्यावांचून राहणार नाहींत. ' सत्याग्रहाच्या युद्धाचा रणदुंदुभि वाजूं लागला ' व 'बेजबाबदार नोकरशाही व दुबळें लोक-मत ' हे दोन लेख वाचतांना ते आजच्या सरकारास उद्देशून लिहिले

आहेत काय असा भास होतो. परतु काळाची जाणीव घेतांच वीस वर्षांनंतरहि अनुकूल राज्यक्रान्ति होऊनसुद्धा तीच संभावना आजहि लागू पडावी, यांचें सखेद आश्चर्य वाटतें; तसेंच लेखकाच्या लेखनशैलीचा प्रभावहि जाणवतो.

यानंतर आर्थिक व्यवहारांवरील सर्वच लेख अभ्यासू आहेत. त्यांतील 'केली कोंडी पण झाला कोंडमारा,' हा शेठ चुनिलाल सुरैया या धाडसी व देशभक्त व्यापाऱ्यावरील लेख आजच्या समाजकंटक पण राज्यकर्त्या व्यापाऱ्यांस अत्यंत बोधप्रद आहे. 'संपादकीय धोरण' या विभागांत लोकमान्यांच्या परंपरेंत वाढीस लागलेली ध्येयप्रवणता दृष्टीस पडते. त्यांत दुसऱ्याच्या शिदोरीवर अवलंबून न राहतां स्वतंत्र विचारशैली व त्याला धरून ध्येयाचे स्वतंत्र मार्ग असलेले दिसून येतात. त्यांत परंपरेची पोपटपंची नसून स्वतंत्र व्यक्तिमत्त्वांतून उद्‌भूत होणाऱ्या प्रत्यक्ष कार्यप्रवृत्तीचा आविष्कार प्रत्ययास येतो.

श्री. तात्यासाहेब करंदीकर यांचे हे निवडक लेख म्हणजे मराठी वाङ्मयास एक अमोल देणगी आहे; वृत्तपत्रकारांस प्रत्यक्ष कृतीनें मार्गदर्शन आहे; त्या त्या काळांत अस्तित्वांत असणाऱ्या सरकारास झणझणीत अंजन आहे; आणि लोकमान्यांचा एक अवशेष आहे ! या पहिल्या खंडावरून असें वाटतें कीं, दुसऱ्या खंडांतील धार्मिक लेख सशास्त्र असतील, सामाजिक लेख विचारप्रवर्तक असतील, वाङ्मयीन लेख वाङ्मयाला इष्ट वळण लावणारे असतील, मृत्युलेख त्या त्या महाजनाच्या आयुष्याचा मार्मिक इतिहास असेल, आणि सांस्कृतिक लेख आजच्या आमच्या अंध मिश्र संस्कृतीचें कठोर परीक्षण करणारे असतील. तात्पर्य, ते लेख बुद्धीनें मूलग्राही, भावनेनें ज्वालाग्राही, पण विचारानें समतोल, दृष्टीनें दूरदर्शी, अंतःकरणानें उदात्त आणि लेखणीनें मनोरम पण भव्य असतील. या दृष्टीनें निवडक लेखांच्या दुसऱ्या खंडाची आम्ही वाट पाहत आहोंत.

## १३. जातीयतेची मीमांसा

राजकीय परिस्थितीमुळें 'जातीय' हा शब्दच अलीकडे अस्पृश्य वाटूं लागला आहे. राजकारणांतील ही 'जातीयता' सामाजिक विषयांत व तेथून धार्मिक विषयांत ढवळाढवळ करूं लागणार अशी भीति वाटत आहे. धर्मविरोधी लोक या वाहत्या गंगेंत आपला हात धुऊन घेत आहेत. कांहीं मूळचे सनातनी अथवा विचारी बदलत्या परिस्थितीला घाबरत आहेत; परिस्थितीच्या आधारानेंच वर आलेले दंड ठोकून उभे आहेत; तर सुविचारी मंडळी या 'उपऱ्या वादळा'विषयीं अगदींच उदासीन दिसत आहेत. या एकंदर परिस्थितीचा परिणाम असा झाला आहे कीं, 'जातीयतेचा' शास्त्रार्थ शोधून काढून त्याप्रमाणें निर्भीड बोलावयास कोणीच तयार नाहीं; किंबहुना यापुढील काळ आतां अजातीयतेचाच होय असें गृहीत धरून त्या उगवत्या सूर्यास नमस्कार करण्यापलीकडे कांहीच करतां येण्यासारखें राहिलेलें नाहीं असाच समज सर्वत्र फैलावलेला दिसतो. तथापि हें औदासीन्य आणि अगतिकता कोणासच हितावह नाहीं. एक उदासीनतेची भूमिका नाहीं तर पराभूताची; आणि याहून अगदीं निराळी म्हणजे तोफा डागून पवित्रा घेण्याची भूमिका. या सर्वच भूमिका फसव्या आहेत. जातीयवादाचा विचार करतां केवळ एका विशिष्ट जातीचा एकांगी विचार करून भागणार नाहीं. पराभूत वाटणाऱ्या एखाद्या जातीनें आता मागेच

राहावें किंवा सत्ताधिष्ठित जातीनें आपल्याच जातीचें ' परजातिनिरपेक्ष ' एकांगी वर्चस्व प्रस्थापण्याची मोकळीक घ्यावी ' असे तात्त्विक सिद्धान्त काढतांना अखिल-समाज-पुरुषाच्या शरीरांत त्यामुळें विकृति निर्माण होते आणि कोणताहि एकच अवयव कापला गेला तरी तेवढ्यानें सर्व शरीरात लंगडेपणा येतो, हें मात्र लक्षांत ठेवणें भाग आहे.

' जातीय ' म्हणून कोणाचा पुकार करतांना व त्याप्रमाणें त्याच्याविरुद्ध उपाय योजतांना ' जातीयतेंतील ' मूळ शब्द ' जात ' याच्या अर्थाचें परीक्षण करून तो ज्या संस्थेंतील शब्द आहे. त्या समाज-संस्थेंतील त्याच्या स्थानाकडे प्रथम लक्ष द्यावयास हवें. मत्सर व पक्षाभिनिवेश यामुळें जातीयतेचा खरा अर्थ दडला गेला. ' दाम करी काम ' म्हणून शास्त्राचें काम उरलें नाही. शिवाय हें युग प्रक्षोभात्मक विघटनेचें आहे ! विधायक संघटनेचें दिसत नाहीं. त्यामुळें ' जात ' ही सामाजिक संघटनेंतील महत्त्वाची घटक आहे हा सिद्धान्त लपून बसणारा भेकड दरवडेखोर ठरला. तथापि ज्या ठिकाणीं दामहि नाहीं व सत्ताहि नाहीं अशा ठिकाणीं शास्त्राला आपली वाचाळता सुरू करावयास कांहींच हरकत नाहीं.

### आजच्या जातीय वादाचें मूळ चातुर्वर्ण्यांत नाहीं

चातुर्वर्ण्यामुळें जातिभेद निर्माण झाले, जातिभेदांतून विषमता व विषमतेच्या पोटीं जातीय द्वेष फैलावला, ही कारणपरंपरा दाखविण्यांत येते. ती सकृद्दर्शनीं योग्य वाटण्याचा संभवहि आहे. परंतु वस्तुत: ती असंबद्ध आहे. ' हिंदु धर्मांतील चातुर्वर्ण्यामुळें जातिभेद निर्माण होतात ' हा पहिला दोष लोक दाखवितात. परंतु चातुर्वर्ण्याशिवाय मनुष्य-समाज जगूंच शकत नाहीं. चातुर्वर्ण्य सर्वच समाजात असतें. हिंदु समाजांतील चातुर्वर्ण्य आणि इतरत्र आढळणारें चातुर्वर्ण्य यांत भेद एवढाच कीं, हिंदु धर्मानें चातुर्वर्ण्यास शास्त्रांत मान्यता दिल्यानें आमच्याकडे धार्मिक जातिभेद असतील, तर जगांतील इतर समाजांत सामाजिक जातिभेद आहेत; म्हणजे जातिभेदाचें

मूळ हिंदूंचें चातुर्वर्ण्य हें नाहीं. दुसरें असें कीं, केवळ जातिभेदांतून विषमता निर्माण होण्याचें कांहींच कारण नाहीं. विषमता निर्माण होते ती प्रामुख्यानें आर्थिक व राजकीय सत्तेमुळें. या दृष्टीनें पाहतां आमच्याकडे वैश्य म्हणजे व्यापारी व पेशव्याच्या काळांत ब्राह्मणांबरोबर पुढें आलेले मराठे ( क्षत्रिय ) हेच लोक सुस्थितींत होते. म्हणजे इंग्रजी अमलापर्यंत मराठ्यांच्या कारकीर्दींत राजकीय कर्तृत्वांत किंवा व्यापारात ब्राह्मणेतर, विशेषतः मराठे हे समाजाच्या अग्रभागीं होते. उलटपक्षीं पेशवे आणि त्यांच्या आसपासची कांहीं सुदैवी ब्राह्मण मंडळी सोडली तर उरलेले सर्व ब्राह्मण बहुतेक आचारी, पाणके, वाढपे, भिक्षुक, उपाध्याय असेच होते. विद्येंतहि त्यांनीं म्हणण्यासारखी प्रगति केली नाही. तात्पर्य, जातिभेदामुळें ब्राह्मण विरुद्ध ब्राह्मणेतर यांच्यात विषम स्थिति उद्भवूं शकत नाहीं. कारण तिची जन्मदात्री निराळीच आहे. वरील त्रयीपैकीं विषमतेमुळें जातिद्वेष फैलावला, हें विधान अंशतः निस्संशय खरें आहे. पण त्याचा उगम ब्राह्मणांत नाहीं, जातिभेदांतहि नाहीं. त्याचें मूळ हें उपरें आहे हें आपण पुढें पाहूंच. हें मूळ उपरें असल्यामुळें ब्राह्मणेतरांनीं ब्राह्मणांवर निष्कारण रोष ठेवण्याचें कारण नाहीं, हें सर्वांत प्रथम स्पष्ट केलें पाहिजे.

### ब्राह्मणेतरांचा निष्कारण रोष

ब्राह्मणांनीं ब्राह्मणेतरांचें ब्राह्मणेतर म्हणून द्वेषपुरस्सर नुकसान कधींच केलें नाहीं. ब्राह्मण वर आलेले दिसतात ते त्यांच्या नैसर्गिक बुद्धिमत्तेवर, कोणाहि मराठ्यास बळी देऊन नव्हे. पण त्यांतूनहि ब्राह्मणेतरांचें जें नुकसान झालेलें दिसतें त्याला एकंदर सामाजिक परिस्थितीच जबाबदार आहे. जें नुकसान ब्राह्मणेतरांचें झालें तें ब्राह्मणांचेंहि झालें आहे. वसिष्ठ, अत्रि, काश्यप, इत्यादि थोर ऋषींचे वंशज म्हणून सांगणारे आजचे ब्राह्मण आचारी, पाणके, वाढपे, मधुकरी आपण पाहतों. त्यांना या दशेला कोणीं आणलें ? प्राचीन काळांत राजांचे गुरु होऊन सर्व समाजास पूज्यमूर्ति झालेले जे ब्राह्मण

त्यांचे वंशज आज साहेबाची नोकरी करून लाचारीनें पोट भरतांना पाहतों. या दुर्दशेचा विधाता कोण? सांगावयाचें एवढेंच कीं, मुळांतच जेथें सर्व समाज पोखरला गेला तेथें एखादें छिद्र कोणास कमीजास्त पडलें तर त्याचा अमुक एकावरच दोष कसा ठेवतां येईल? असल्या आपापसांतल्या दुहीनें समाजाचा खरा प्रश्न कसा सुटणार?

## ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाचीं तीन कारणें

जातीय द्वेष आणि विषमता या गोष्टी आज आमच्या समाजांत, विशेषत: महाराष्ट्रीय समाजांत, फैलावल्या आहेत यांत शंका नाहीं. परंतु गेल्या कांहीं वर्षांतील उलथापालथीबरोबर त्यांचीं जीं कारणें दिलीं गेलीं व त्यावरील जो उपाय – जातीयतेचें निर्मूलन – प्रसृत केला गेला तो मात्र अगदींच आततायी, अशास्त्रीय, अन्याय्य तसाच भेकड आहे. त्यांची कारणत्रयी वास्तविक निराळी आहे :–(१) ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर हा वाद इंग्रजी अंमलापासून इंग्रजांनीं सुरू केला हें पहिलें **राजकीय कारण.** ( २ ) इंग्रजी राज्याबरोबर आमची पहिली परस्परांशीं आपुलकीची वागणी, साधी राहणी व त्यामधील सांस्कृतिक परंपरेचें सूत्र हीं जाऊन इंग्रजी शिक्षणानें व इंग्रजांच्या थोड्याशाहि सहवासानें येणारा इंग्रजी पेशाचा अहंगंड, पाश्चात्य शिक्षण ज्यांना लाभलें नाहीं अशा आपल्या 'गांवढळ' लोकांविषयीं वाटणारा तिरस्कार व यांतून वागणींत व राहणींत आलेली कमालीची विषमता हें दुसरें **सामाजिक कारण.** आणि ( ३ ) या दोन कारणांमुळें निर्माण झालेलें एतद्देशीय **राजकारण** हें तिसरें कारण.

## भेदनीतींतून आर्थिक स्पर्धा

पैकीं पहिलें कारण इंग्रजांची भेदनीति. तीमुळें दलितांच्या किंवा मागासलेल्यांच्या उन्नतीकरितां म्हणून सरकारी नोकरींतील ब्राह्मणांच्या विरुद्ध अशा कांहीं जागा राखीव ठेवण्यांत आल्या. परंतु हें राजकारण नंतर सुरू झालें.

प्रारंभीं नवीन राज्याची घडी नीट बसवावयाची होती तेव्हां अत्यंत बुद्धिमान म्हणून गाजलेल्या चित्पावन ब्राह्मणांनाच प्रथम इंग्रजांनीं नोकऱ्या दिल्या आणि जम बसल्यावर मात्र मग भेदनीतीस सुरुवात केली. हिंदु आणि मुसलमान यांनीं एकमुखानें स्वराज्याची मागणी करावी हें इंग्रजांचें फर्मान सुटलें खरें. पण त्यापूर्वीच जसें ब्राह्मणांविरुद्ध ब्राह्मणेतरांस जवळ केलें, तसेंच हिंदूंविरुद्ध त्यांनीं मुसलमानांस जवळ केलें. म्हणजे इंग्रजांनीं हिंदूंना दिलेलें हें एक स्पर्धेचें आव्हानच होतें. इसापनीतील वारा व सूर्य यांच्या गोष्टीप्रमाणेंच हिंदी राजकारणाचा आजपर्यंत खेळ झाला. मुसलमानांस वश करण्याच्या स्पर्धेंत इंग्रजांबरोबर आम्हीं काय सामना द्यावा ? पण मुसलमानांच्या वशीकरणांत आजपर्यंत आम्ही पोहत आलों ! ब्राह्मणब्राह्मणेतर वादाचें क्षेत्र त्या मानानें अगदींच लहान. हिंदुमुसलमानांच्या वादाच्या छायेंत हा वाद बरेच दिवस खुरटलेलाच राहिला.

## इंग्रजी सस्कृतींतून अहंगंड, सामाजिक विषमता

दुसरें कारण इंग्रजप्रणीत सामाजिक विषमता. आमच्यांत जातिभेद पूर्वी होता व आजहि आहे. परंतु आजचें जातिद्वेषाचें स्वरूप पूर्वी त्याला कधींच आलें नव्हतें. समाजसत्तावादी आज मजूर--मालक व शेतकरी-जमीनदार असा वर्गविग्रह समजतात. हे वर्गभेद पूर्वीहि होतेच; परंतु धंद्यांतील कामाव्यतिरिक्त इतरत्र राहणींत व वागणुकींत समाजांत विषमता नव्हती. एकवार मजूर—मालक ‘ वाद ’ आज नवीन निघाला असें म्हणतां येईल; कारण तो आखाडाच नवीन खणला गेला. परंतु शेतकरी—जमीनदार हे तर पूर्वी होते. त्यांचे परस्परसंबंध सांस्कृतिक परंपरेच्या सूत्रानें व सामाजिक राहणी व वागणी यांमुळें दुरावले नव्हते. पूर्वी श्रीमंतीची राहणी केवळ सणावारास दिसून येत असे. एरवीं जेवणखाण, उठबस यांत भेद नव्हता. उलटपक्षीं दसऱ्याचें सोनें, संक्रांतीचा तिळगुळ, दिवाळीची भाऊबीज व लक्ष्मीपूजन, इ. सांस्कृतिक जवळिकांच्या उपायांनीं शेतकरी व जमीनदार

या दोन गटांतील वैमनस्याची तंदुरुस्ती ठेवली जात होती. कितीहि श्रीमंत जमीनदार असला तरी त्याला कुळाला तिळगूळ व सोनें देणें-घेणें यांत अपमान वाटत नसे. पोषाखांतील सारखेपणामुळें आपलेपणा उजळत होता. आज सर्वच वस्तुस्थिति निराळी आहे. मी जमीनदार असलों तर माझा बंगला माझ्या कुळाच्या झोपडीहून वेगळा—म्हणजे इंग्रजी पद्धतीवर, त्यांतील वागण्याची पद्धत इंग्रजाची. बोलण्याची पद्धत व रीतीभातीहि वेगळी — कुळाला न समजणारी; त्यामुळें तो साहजिकच लांब सरकतो. सुटाबुटांतला टेंच व इंग्रजी सहवासानें आलेल्या अहगंडामुळें इतरांत न मिसळण्याची तुसडी वृत्ति, 'एटिकेट'च्या नांवाखालीं आलेला नाटकीपणा व तुटकपणा आणि सुधारकी मतांमुळें वरील सांस्कृतिक जवळिकीला मिळालेला अर्धचंद्र, या सर्व कारणांमुळें असा कोणताच मार्ग उरला नाहीं कीं जेणेंकरून कुळांना जमीनदारांविषयीं आपलेपणा वाटावा. हीच स्थिति सर्व समाजाची झाली. ब्राह्मण हे जात्याच बुद्धिमान्, प्रागतिक स्वभावाचे, त्यामुळें ते इंग्रजांशीं लवकर तादात्म्य पावूं लागले. ब्राह्मणेतरास तें तितकेंसें जमलें नाहीं. अर्थात् ही सामाजिक विषमता मुळांत इंग्रजांनीं रुजत घातलेल्या ब्राह्मण-ब्राह्मणेतरवादास पोषकच झाली.

### सत्तार्थ अंतर्गत लाथाळी

तिसरें कारण एतद्देशीय राजकारण. यांत लोकशाहीच्या लाथाळीला पोषक असें स्थानिक नगरपालिका, स्कूलबोर्डें, कायदेमंडळें, राष्ट्रसभा यांतील पक्षोपपक्ष, निवडणुकीच्या पोटीं जन्मास आलेले निरनिराळ्या जातीचे पक्ष, यांमुळें वरील वादास रंग चढला.

### चवथें कारण – विस्कटलेलें चातुर्वर्ण्य

वरील तीन कारणांनंतर आणखी चवथें असें एक निराळें कारण आहे. इंग्रजी राज्यामुळें आमच्या समाजात विलक्षण क्रान्ति झाली. इंग्रजांपूर्वी चातुर्वर्ण्य आजच्यापेक्षा पुष्कळच नीट स्वरूपांत होतें. पण नंतर इंग्रजांनीं

आमचे घरगुती धंदे कायमचे बसवून टाकले. सरसकट इंग्रजी शिक्षण सुरू केलें. आणि नोकऱ्यांचा नवीन कारखानाच उघडला. इंग्रजी शिक्षणामुळें धर्मकारण लोप पावूं लागलें. ब्राह्मणांनीं आपलें ब्राह्मण्य सोडून ते सरकारी नोकरींत सामील झाले. ब्राह्मणेतरांचे धंदे बसून तेहि नोकऱ्या करूं लागले; आणि आपापसांत अनिर्बंध स्पर्धेला वाव मिळाला. ही पहिली स्थिती.

त्यानंतरची प्रगत स्थिती म्हणजे पाश्चात्यांच्या यंत्रसामग्रीवर ब्राह्मण यांत्रिक व इतर कारखाने घालूं लागले. आणि शेतकऱ्यांनीं शेती सोडली व ते नवीन भरभराटलेल्या शहरांत नोकऱ्या करूं लागले. तात्पर्य, आमची वर्णव्यवस्था पार पालटून गेली, समाज विस्कळित झाला. ब्राह्मणांचें ब्राह्मण्य नष्ट झालें. क्षत्रियांचें शौर्य गेलें. वैश्यांच्या धंद्यांत राम राहिला नाहीं व यांत्रिक प्रगतीनें शूद्रांचीं बरींच कामें त्यांच्या हातांतून गेलीं. एकंदरींत बेकारी वाढली. अस्ताव्यस्त पसरलेल्या उद्योग-धंद्यांमुळें आर्थिक विषमता व स्पर्धा भेडसावूं लागली. इंग्रजांच्या नादीं लागून आम्हीं चातुर्वर्ण्य झुगारून दिलें. त्याचीं हीं फळें होत. निराळ्या स्वरूपांत कां होईना, पण चातुर्वर्ण्य पुन्हा स्थिरावलें तर समाजाची घडी बसणें शक्य आहे. केवळ कृत्रिम समतेनें, उद्योगधंद्यांच्या राष्ट्रीयीकरणानें, इ० ब्राह्यात्कारी मलमपट्टीनें घडी बसणें कठीण आहे. कारण सामाजिक मूलभूत साधनें जर आपण डावलूं लागलों, तर त्या साधनांवर आधारलेला समाज तरी किती वेळ तग धरूं शकेल ?

**वांडगुळ्याकरितां झाडावर घाव ?**

आम्ही चातुर्वर्ण्याला मान्यता देतों म्हणजे पर्यायानें जातिभेद स्वीकारतों; याचा अर्थ जातिद्वेष अपरिहार्यच आहे व म्हणून त्याला आमची संमति आहे असा होत नाहीं. जातिभेद आणि जातिद्वेष या दोन स्वतंत्र गोष्टी आहेत. एकीचा दुसरीशीं कांहीं संबंध नाहीं. द्वेष ही जातीवरील दुरशी आहे. तिचा जन्म वर दिलेल्या तीन-चार आगंतुक कारणांत आहे. जाति-

भेद नसतांनाहि द्वेष अशक्य नाहीं. आज सर्वतोमुखीं झालेला जातिद्वेष तर अगदींच बांडगूळ आहे. त्याचा नायनाट करणें सत्ता हातीं असल्यावर कठीण नाहीं. कारण तो बराचसा भाडोत्री व आगंतुक आहे. अशा प्रकारचीं बांडगुळें समाजांत नेहमीं उगवत असतात. पण त्यावर मुळांत 'जात' च उखडून टाकावी हा कायदेशीर व योग्य उपाय नाहीं. वास्तविक जातीयतेंतच समाजाचें धारण आहे, पोषण आहे. भावा-भावांत भांडणें होतात म्हणून भाऊ-भाऊ जन्मासच येऊं देऊं नये, असा कायदा एखादें सरकार करतें काय? करणें शहाणपणाचें होईल काय?

## अपूर्णतेची जाणीव व सामाजिक एकतेची भावना

अशा परिस्थितींत ब्राह्मणाचें व ब्राह्मणेतरांचें कर्तव्य स्पष्ट आहे. अमुक एका जातीनें पूर्वीं आमचें नुकसान केलें असें म्हणून त्याचा या वेळीं सूड उगवणें योग्य नाहीं. त्यांतूनहि खरोखर नुकसान झालें असेल तर तें कसें भरता येईल इकडे लक्ष देणें जरूर आहे. सुशिक्षित ब्राह्मणेतरांनीं आपली जात सुसंस्कृत करावी. परंतु कोणताहि मनुष्य शिकून मोठा झाला कीं तो आपल्या जातीस विसरून जातो, असा साक्षात् अनुभव आहे. आणि हें प्रत्येक जातींत आहे. यासाठीं लोक सुशिक्षित करावे असें न म्हणतां सुसंस्कृत करावे असें म्हटलें आहे. लोकांना मद्यादि व्यसनांपासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करणें आवश्यक आहे. ब्राह्मणानीं तर चालू घडामोडीं-वरून भेकड सूर काढणें मुळींच योग्य होणार नाहीं. ब्राह्मण जाति संघटित होणें अत्यंत आवश्यक आहे. राजकारण सोडलें तर ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद बराचसा निवून जातो. राजकारण सोडून सामाजिक कार्यांस दोघांनीं मिळून हात घातला तर दुधांत साखर पडेल. हें आज अशक्य वाटतें. तथापि पूर्वीं हें बरेचसें शक्य झालेलें आहे. पुष्कळ ब्राह्मणांनीं ब्राह्मणेतरांना मदत केली आहे. आणि एकमेकांच्या संस्थांत एकमेकांच्या जातीस प्रवेश मिळाला आहे. म्हणजे ब्राह्मण व ब्राह्मणेतर हे एकाच समाजाचे घटक असून पूर्वीं

सांगितल्याप्रमाणें आपल्यापरी अपूर्ण असून समाजास दोघांची आवश्यकता आहे. ही जाणीव मनांत बिंबावयास हवी आहे.

## जाती स्वतंत्र होणें अवश्य आहे

प्रत्येक जाती ही आपापल्यापरी अपूर्ण आहे आणि तिला सामाजिक एकतेची जाणीव पाहिजे असें आपण म्हणतों आणि तसें म्हणतांना आपण 'समाज' म्हणून अशी एक वस्तु गृहीत धरतों कीं जिच्यांत अनेक जाती मिळून परस्परांस पूरक होतात आणि त्यांच्या विविधतेंत एकत्वाचें सूत्र असतें. ती 'समाज' ही वस्तु काय आहे हें प्रथम निश्चित झालें पाहिजे. परतु त्याच्याहि आधीं ही अनेक जातींची एक मोट बांधण्याची कल्पना या युगांत कितपत श्रेयस्कर किंवा शक्य आहे तें पाहणें आवश्यक आहे.

हिंदुस्थानांत पारशी, मुसलमान, ख्रिश्चन, ब्राह्मण, मराठा, अस्पृश्य इत्यादि अनेक लहान मोठ्या जाती आहेत. परंतु यांपैकी विशिष्ट जातीं-जातींतच वाद होतात. पारशी, मुसलमान, ख्रिश्चन या तीन जाती अगदीं अलिप्त असून राहिलेल्या जातींतच आपापसांत वाद होत असतात. हे वाद अर्थात् निकटसहवासोत्पन्न आहेत. म्हणजे पारशी वगैरे पहिल्या तीन जाती स्वतंत्र असून त्यापुढील ब्राह्मणादि जातीशीं आपला कांहीं संबंध नाहीं असें मानतात. उलटपक्षीं पुढील तीन जाती परस्परांपासून कांहीं ना कांहीं गोष्टींची अपेक्षा करीत असतात. म्हणजेच आपला एकमेकांशीं असलेला संबंध गृहीत धरतात. या तिन्ही जाती एका मोठ्या जातीचीं उपांगें होत असाच याचा अर्थ निघतो. तेव्हां सहज एकाद्याच्या डोक्यांत अशी कल्पना येईल कीं, पारशी, इत्यादि जाती जर अलिप्त राहून त्यामुळें वादातीत राहूं शकतात तर मराठा इ० जातिसंघांनींहि परस्परांपासून फुटून निघावें, एकीचा दुसरीशीं कांहीं संबंध नाहीं असा परकेपणा घेऊं द्यावा, म्हणजे भांडणाचें कारणच उरणार नाहीं. मग ब्राह्मण व पारशी यांचे जे संबंध आहेत तेच या जातींचे आपापसांत राहतील. परंतु हें म्हणणें व्यक्तीनें

कागदावर मांडणें जितकें सोपें आहे तितकें समाजानें आचरणांत आणणें कठीण आहे. कारण या जातींत हजारों वर्षांचा एकत्र कुटुंबांप्रमाणें घनिष्ट संबंध आलेला आहे. त्या इतकीं वर्षे ज्या देशांत राहत आल्या त्या देशाच्या रक्षणार्थ, सांस्कृतिक अभ्युदयार्थ खांद्यास-खांदा लावून झटल्या आहेत. धर्म या मोठ्या छत्राखालीं त्यांनीं आपला उदरनिर्वाह केला. परस्परांची परस्परांकडून गरज भागविली, जीवनांत सर्वांचा हातभार लागला, आणि एकमेकांकरितां एकमेक जीवास जीव देण्यास तयार झाले. एकत्र म्हणून नांदलेल्या हिंदुस्थान पाकिस्तानची फाळणी होतांच लगेच एकमेकांस परकी राष्ट्र मानण्याचें त्यांनीं ठरविलें; पण अनेक शतकांच्या घनिष्ट संबंधामुळें, या जाती परस्परांना परकीय मानूं म्हणतील तर तें जमणार नाहीं. कल्पना करूं कीं, या सर्व जाती परस्परांस परक्या झाल्या. त्याचे परिणाम काय होतील याचाहि विचार करावयास हवा. पारशी, मुसलमान, किंवा खिश्चन या जाती आपापल्यापरी स्वतंत्र आहेत. इतर जातींनीं त्यांच्यावर बहिष्कार टाकला तर त्यांचें कोणत्याच बाबतींत अडण्यासारखें नाहीं. कारण ती प्रत्येक जात म्हणजे एक स्वयंपूर्ण समाज आहे. ब्राह्मण, मराठा व इतर तत्सम जाती या परावलंबी आहेत. कारण या जाती एका स्वयंपूर्ण समाजाचे निरनिराळे अवयव आहेत. एका जातीनें दुसऱ्या जातीवर बहिष्कार टाकल्यास या ना त्या रूपांत त्यांस उपासमार सोसावी लागेल. फार तर नांव बदलेल, पण जातिसंबंध मात्र पूर्वीचेच कायम राहतील. कांहीं ते तोडणार तर कांहीं ते टिकविण्याचा प्रयत्न करणार. अशांत पूर्वी नसलेले आणखीच नवीन तट पडणार आणि असें झालें तर परक्यांच्या संभाव्य आक्रमणांत अशा जातीच्या जाती प्रसंगीं नामशेष होऊन जातील ! तेव्हां पारशी, मुसलमानाप्रमाणें अलग राहा हा हिंदु जातींना दिलेला सल्ला मूर्खपणाचा आहे.

## समाजकारण हें स्वातंत्र्यांतील आद्य कर्तव्य

या जाती एका मोठ्या जातीचीं उपांगें आहेत हें उघड आहे. उपमेनें बोला-

वयाचें तर एका मोठ्या वाड्याचे ते भाग आहेत. एखादा वाडा मोडकळीस आला म्हणून त्याच्या खांबांचाच किंवा भिंतींचाच कांहीं स्वतंत्र वाडा होत नाहीं. त्या भिंतीखांबांना जगाच्या बाजारांत तशी किंमतहि नाहीं. डागडुजी करावयाची तर दुरुस्त्या करून सगळ्यांचा मिळून फिरून संपूर्ण वाडाच तयार करणें इष्ट आहे. तेव्हां ज्या समाजाच्या घटनेंत या जाती उपांग म्हणून बसतात असें आपण धरून चाललों आहोंत, त्या समाजाच्या सीमा आणि स्वरूप निश्चित करावयास पाहिजेत. प्रथम समाज निश्चित झाल्या-शिवाय सामाजिक प्रश्नांना हात घालतां येत नाहीं. आणि स्वातंत्र्योत्तर कालांत सामाजिक प्रश्न हाच महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो. कारण स्वातंत्र्य आलें म्हणजे लढाऊ आक्रमक राजकारण गेलें. स्वातंत्र्यांतहि तशा प्रकारचें राजकारण चालू लागलें तर तें राजकारण नसून केवळ सत्ताभिलाष आणि मत्सर ठरेल. त्याशिवाय याला दुसरें नांव देतां येणार नाहीं. स्वातंत्र्यपूर्व कालांत देशभक्त व राजकीय कार्यकर्ते यांचें प्रामाणिक ध्येय एकच व तें म्हणजे स्वातंत्र्यप्राप्ति; म्हणजे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्यांचें विनाशक, प्रतिकारा-त्मक कार्यक्षेत्र संपुष्टांत येतें याच वेळीं विधायक कार्य चालू होऊन खऱ्या देशभक्ताची परीक्षा होते. ज्यांचें स्वातंत्र्योत्तर काळांत आक्रमक राजकारण हेंच कार्यक्षेत्र अद्यापि कायम राहतें ते देशद्रोही या संज्ञेस पात्र होतात. हें ‘ राजकारण ’ संपलें तर आज चालू असलेले सर्व वाद मिटून जातील. आणि बिकट सामाजिक परिस्थिति ‘ आ ’ वासून उभी आहे तिला तोंड देतां येईल. तात्पर्य, आतां आक्रमक राजकारण जाऊन विधायक राजकारण म्हणजेच समाजकारण आलें पाहिजे; परंतु समाजकारण करावयाचें तर तें समाजनिश्चितीशिवाय कसें शक्य आहे ? म्हणजेच प्रथम ‘ समाज ’ निश्चित करून घ्यावयास हवा. आणि त्याच्या मार्गांत अनेक अभावित आणि चम-त्कारिक अडचणी आहेत.

## समाजनिश्चितीची पहिली अडचण : जागतिक ऐक्य-कल्पना

समाजकार्य म्हणजे लोककार्य. तें करावयाचें तर त्याला समाजाची व्याप्ति निश्चित करण्याचें कारणच काय? समाजाची ही संकुचित कल्पना या वाढत्या जागतिक ऐक्याच्या युगांत काय उपयोग? अशीहि शंका निघणें कांहीं अशक्य नाहीं. खरें बोलावयाचें म्हणजे जागतिक ऐक्य ह्या निवळ मुलथापा आहेत. तत्त्वतः जागतिक ऐक्याची कल्पना कितीहि गोड वाटली तरी व्यवहारांत ती अशक्य आहे. 'ऐक्य' या कल्पनेमागें आर्थिक, सामाजिक व राजकीय असें तिहेरी ऐक्य अभिप्रेत आहे. जोंपर्यंत जगांत 'राष्ट्रवाद' जोमानें पेटले आहेत तोंपर्यंत सर्व जगताचें आर्थिक व राजकीय ऐक्य हें अशक्य आहे. याला निराळा पुरावा देण्याची आवश्यकता नाहीं. राहिलें सामाजिक ऐक्य. पण तेंहि अशक्य आहे. पृथ्वीचें विविधरंगी स्वरूप, त्याप्रमाणें विभागलेली मनुष्यजात, तदुद्भव भिन्न स्वभाव, भिन्न राहणी व भिन्न गरजा व या सर्वांमुळें साहजिकच प्रत्यक्षांत आढळणारा एकतेचा अभाव म्हणजे भिन्नत्व, या गोष्टी अगदीं निसर्गसिद्धच आहेत. या भिन्नत्वाच्या परिस्थितींत ऐक्याची फक्त एकच शक्यता आहे व ती म्हणजे आत्मिक किंवा मानसिक ऐक्याची. त्या ऐक्याचें स्वरूप म्हणजे अखिल मानवजातीबद्दल सहानुभूति बाळगणें व प्रेम ठेवणें — म्हणजेच केवळ स्वार्थाकरितां इतर मनुष्यांची हिंसा न करणें; उलटपक्षीं त्यांस शक्य तें साहाय्य करणें. वर वर्णिलेल्या चतुर्विध ऐक्याच्या बाबतींत कांहीं यशस्वी प्रयत्न झाले आहेत असें म्हणतां येईल किंवा कसें हा प्रश्नच आहे. जागतिक ऐक्याच्या गप्पा मारणारे थोडेथोडके नाहींत; पण हे बहुधा पोकळच असतात. कारण तें नांव घेऊन केवळ स्वतःच्या राष्ट्राचें व इतर बरेंच राजकारण साधूं पाहणारेच ते असतात. आर्थिक व सामाजिक ऐक्यांच्या दृष्टीनें समाजसत्तावाद्यांव्यतिरिक्त फारसे प्रयत्न झालेले दिसून येत नाहींत. मानसिक ऐक्याच्या दृष्टीनें धर्मांचे व 'समता-संघा' सारख्यांचे आपल्यापरी

प्रयत्न चालू असून ते अगदींच अल्प प्रमाणांत यश दाखवीत असतात. अर्थात् असल्या मानसिक ऐक्याच्या आड कोणत्याहि प्रकारचें समाजकार्य येत नाहीं.

## दुसरी अडचण : व्यापक राष्ट्रीयत्व

योग्य निश्चितीच्या आड येणारी दुसरी अडचण व्यापक म्हणून समजलें जाणारें भाबडें राष्ट्रीयत्व. ही 'व्यापक राष्ट्रीयता' हिंदुस्थानला घातकच ठरली आहे, असा हिंदुस्थानचा आजपर्यंतचा पन्नास वर्षांचा इतिहास स्पष्ट बजावीत आहे. त्या तथाख्यात 'व्यापक राष्ट्रीयतें' त 'व्यापकता' नाहीं व 'राष्ट्रीयता' हि नाहीं. त्यांत एकत्र आणणारें एकसूत्र नाहीं व स्फूर्ति देणारा स्वयंभूपणाहि नाहीं; त्याच्या अंगीं तात्कालिक कार्य साधण्याइतका जोम नाहीं व मागील आधार घेण्याजोगा इतिहासहि नाहीं; त्या राष्ट्रीय कल्पनेंत राजकारणी डाव नव्हता, तिला सत्याचा आधार नव्हता कीं सात्त्विकतेचा पाया नव्हता. म्हटलें तर हे तिन्ही गुण होते. पण ते असे होते—त्यांत राजकारण होतें पण त्यांतली धूर्तता नव्हती; सत्य होतें तें अभावात्मक होतें आणि सात्त्विकता होती ती आभासात्मक होती या राष्ट्रीयतेचा जयघोष जितक्या जोरानें झाला तितक्याच जोरानें तिच्या गतीचें पाऊल मागें पडत होतें. जितकी जाहिरात झाली तितकीच वस्तुस्थिती उद्वेगजनक होती. कल्पनेंत जितका व्यापकपणा होता, तितकाच प्रत्यक्षांत संकोच होत गेला होता. कारण असें कीं, या कल्पनेंत तत्त्वशुद्धता नव्हती व तिच्या व्यवहारांत शक्यता नव्हती. तिच्या कालांत राष्ट्रीय घटकांत ती स्वयंस्फूर्त नव्हती; सर्वांना खेचून एकत्र आणील अशी समाधान देणारी कोणतीहि आकर्षकता तींत नव्हती. एवढेंच काय पण पारतंत्र्याच्या समान संकटाखालीं दडपलें गेल्यामुळें उत्पन्न होणारें समानशीलत्वहि राज्यकर्त्यांच्या कुटिलतेमुळें आलें नव्हतें. किमानपक्षीं कार्य साधण्यापुरतें तरी एक व्हावें हे युरोपीय राष्ट्रांचे उदात्त स्वार्थी (एन्लायटन्ड सेल्फ् इंटरेस्ट) राजकारणहि

त्यांत कोठें आढळणें नाहीं.

## 'हिंदी' राष्ट्रीयत्वाची कसोटी

मग आपल्याला अभिप्रेत असलेली खरी समाज-निश्चिति कशी करतां येईल ? आपला समाज कोणता ? आपली राष्ट्रीयतेची कल्पना कोणती ? आपली राष्ट्रीयतेची कल्पना म्हणजे 'हिंदी' राष्ट्रीयत्व. हिंदी या शब्दानें हिंदुस्थानांत राहणारा एवढी व्याप्ति अभिप्रेत आहे; याचा अर्थ हिंदुस्थानांत राहणारा प्रत्येक मनुष्य हा राष्ट्रीय, हिंदुस्थान देशाचा नागरिक आहे. सध्याच्या हिंदुस्थानांत हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन, पारशी, अँग्लो-इंडियन व इतर परदेशी लोकदेखील राहात आहेत हें उघड आहे. इतर देशांतून परकीयाच्या आगमनावर नियंत्रण असतें. वाटेल त्याला देशांत घुसून राहतां येत नाहीं. परंतु इंग्रजांच्या राजकारणी धोरणामुळें त्यांनीं हिंदुस्थानांत येऊन राहण्यास, व्यापार-उदीम करण्यास कोणासहि परवानगी दिली! अर्थात् असे आलेले सर्व लोक कांहीं हिंदुस्थानच्या जीवास जीव देण्यासाठीं आलेले नाहींत. मुसलमान लोक अनेक शतकें येथें राहिले; पण ते अल्पसंख्याक असून त्यांच्या देशप्रेमाचें असें दर्शन कधींच घडलें नाहीं. निदान आतां घडत नाही हें तर सूर्यप्रकाशाइतकें स्वच्छ आहे. अशा स्थितींत तीस कोटि हिंदूंना डावलून मूठभर तिऱ्हाईत लोकांना खूष करण्याकरितां एखाद्या देशानें आपलें नांवगांव देखील बदलणें हें जगांतील कोणत्याहि देशांत कोणीं पाहिलेलें नाहीं. युरोपांतील कोणतेंहि राष्ट्र मूळ शुद्ध वंशाचें आज तयार झालेलें नाहीं हें खरें आहे. तथापि नवीन येणारे वंश जुन्यांत समरस होतात आणि जुन्यांच्या देशावर 'आपला देश' या भावनेनें प्रेम करितात तेव्हांच त्या सर्वांचें मिळून एक राष्ट्र होतें. अमेरिकेंतील वस्तुस्थिति तर उलट आहे. अमेरिकेंतील संस्थानें हीं स्वतंत्र राष्ट्रें म्हणजे भिन्न भिन्न समाज आहेत. ओढूनताणून सतरा जणांची आंवळ्याची मोट बांधलेली नाहीं आणि सामाजिक दृष्ट्या तीं अगदीं एकजीवहि होऊं शकत नाहींत. म्हणूनच तीं

सर्व संस्थानें एक न होतां निरनिराळीं राहिलीं. एक आहेत तीं फक्त राजकीय दृष्ट्या; आणि तेंसुद्धा कोणाची पायधरणी करून नव्हे; तर समानशीलतेची जाणीव होऊन स्वयंस्फूर्तीनें सामुदायिक संरक्षणाकरितां आपण होऊन आपल्या कांहीं अधिकारांवर पाणी सोडून त्यांनीं सर्वांचें मिळून एक सामुदायिक सरकार स्वयंस्फूर्तीनें स्थापन केलें. आणि आता जर कोणास अमेरिकेचें राष्ट्रीयत्व स्वीकारावयाचें असेल, तर त्याला प्रथम अमेरिकनत्व मान्य करावें लागतें व त्याप्रमाणें सर्व नियम पाळावे लागतात. पुष्कळ बाहेरचे लोक अमेरिकेंत जाऊन राहिलेले आहेत; परंतु अमेरिकेनें आपलें राष्ट्रीयत्व त्यांच्यासाठीं बदललेलें नाहीं; कीं त्यांच्या पाठीस लागून त्यांचें नांव आपण घेतलें नाहीं.

### समाज आणि राष्ट्र

राष्ट्र हें समाजाचेंच राजकारणी नांव आहे. राष्ट्र हें समाजाचें गृह आहे. समाज अस्ताव्यस्त असेल तर राष्ट्राची म्हणजे गृहाची धूळदाण उडालीच. समाजाशिवाय राष्ट्राला किंमत नाहीं आणि समाज हा एक अत्यंत सुव्यवस्थित असा मनुष्यांचा कळप आहे. कळपास स्वकीय व परकीय असा भेद अभिप्रेत आहे. नाहीं तर स्वकीय कोण व परकीय कोण हें न उमगल्यामुळें अलबत्यागलबत्या बाजारबुणग्यांची गर्दी होते. आणि समाजाला सांभाळणारा, पोसणारा कोणीच न उरतां समाजावर मात्र त्यांचा भार पडतो. अशा स्थितींत त्याचें सुव्यवस्थित स्वरूप जाऊन एका मांसाच्या तुकड्याकरितां भांडणाऱ्या व कोणी दगड मारतांच दहा दिशांस पळून जाणाऱ्या कुत्र्यांच्या जमावाचें त्याला स्वरूप येतें. म्हणून समाज आणि राष्ट्र याचें पूर्ण तादात्म्य पाहिजे. म्हणजे राष्ट्राचें संरक्षण करण्यासाठीं प्रथम समाज निश्चित झाला पाहिजे. समाजाचे जे घटक तेच राष्ट्राचे घटक असले पाहिजेत. अर्थात् राष्ट्र हें चार उपऱ्या लोकांस एकत्र बांधून होत नाहीं. व्यक्तींनीं राष्ट्र म्हणून एकत्र येण्यास एक इतिहास, एक

संस्कृति, एक परंपरा किंवा इतिहास नसल्यास एकत्र येण्याची व येऊन राहण्याची परिस्थितिजन्य तीव्र इच्छा, एक ध्येय, एक अंतःसूत्र, एकच लक्ष्य, एकाच विशिष्ट भूमीवर आसक्ति, हीं सर्व असावीं लागतात. याच गुणांनीं त्या व्यक्ती समाज म्हणून एकत्र राहूं शकतात आणि त्याच व्यक्ती म्हणजेच तो समाज एखाद्या भूमीवर सकारण प्रेम करूं शकतो व तिचा अधिकारानें उपभोग घेऊं शकतो.

समाजनिश्चिति

अशा रीतीनें समाजनिश्चितीचा प्रश्न हा सर्व महत्त्वाच्या प्रश्नांच्या सोडवणुकीला पायाभूत आहे. आज ज्याला जातिभेद म्हणून संबोधिलें जातें त्या जातीचें मूलगामी तत्त्व न कळल्यामुळें 'जातीयता नष्ट करा', 'जातींनीं परस्परांपासून स्वतंत्र व्हा', इत्यादि आरोळ्या वाङ्मयांत आणि व्यासपीठावर ठोकल्या जातात. त्या आरोळ्यांनीं भावना उद्दीपित होऊन सामान्य जनतेच्या अंगांत संचार उत्पन्न होऊं लागतो; आणि मूळच्या 'अनिष्ट' (!) जातिभेदानें जेवढा संहार केला नाहीं तेवढा संहार या नवीन जातीयता-विरोधी पक्षाभिनिवेशानें केला जातो. अशा तऱ्हेनें **द्वेष आपलें वेषान्तर करूं लागतो.** शिवाय सध्याच्या आर्थिक युगानुसार समाजाचे आर्थिक उच्च नीचतेवर कृत्रिम वर्ग पाडून वर्गभेद माजविण्यानें द्वेषाचें आणखी तिसरें वेषान्तर होतें तें निराळेंच. यावरून समाजनिश्चितीची कल्पना अद्यापि आपणांस उमगली नाहीं असें दिसून येतें. समाजधारणेचीं मूलतत्त्वें अद्यापि आपणांपासून फार दूर आहेत असें वाटतें. समाज एका जातीवर म्हणजे कोणत्या तरी एकाच गुणावर जगतो; मूळचा एकविध नसलेला समूह दडपशाहीच्या जोरावर एकत्र आणतां येतो किंवा आणलेला चालूं शकतो, किंवा समप्रमाणांत पैसे मिळविणारे तेवढे एक समाज म्हणून नांदूं शकतात, जे जे पैसे मिळवितात त्यांचाच एक समाज चांगला; असल्या कल्पना समाजनिश्चितीला विघातक आहेत. ज्यांत ऐक्यवर्धक समाजनिश्चिति

नाहीं त्या समाजांतील समाजघटकांत इतरांहून निराळें असें परस्परांना एकजीव राखणारें वैशिष्ट्य नाहीं. म्हणजे कोणीहि बाहेरच्यानें उपऱ्या आपलेपणानें म्हणून यावें आणि गांठोडें घेऊन पळून जावें! नवसमाजरचना करणाऱ्या, जातिहीन समजल्या गेलेल्या आणि जागतिक ऐक्याचे फवारे उडविणाऱ्या, रशियांतील रशियन राष्ट्रीयत्वाचें घटकत्व म्हणून कांहीं वैशिष्ट्य आहेच. वाटेल त्या उपऱ्या माणसाला तो केवळ मनुष्य आहे किंवा स्वतः श्रमून पैसे मिळवितो म्हणून रशियन राष्ट्रीयत्व प्राप्त होत नाहीं. धार्मिक समाज म्हणून नसला तरी राष्ट्रीय जात कांहीं नियमांनीं रशियानें निश्चित केली आहे. आणि या समाजनिश्चितीनंतरच रशियास निरनिराळे कायदे व सुधारणा करून आपलें सामर्थ्य वाढवितां आलें. याप्रमाणें विचार करून पाहिलें असतां कोणताहि समाज राष्ट्र म्हणून नांदण्यासाठीं त्यांत एकजिनसीपणा असावा लागतो. एकजिनसीपणा म्हणजे एकांगीपणा नव्हे. ती विविधतेंतील एकसूत्रता आहे, सर्वांगतत्परता आहे; त्याशिवाय समाज परिपूर्ण होत नाहीं. या विविधतेंत विस्कळितपणा नसून परस्परपूरकता आहे. हा खरा समाजधर्म न जाणल्यामुळें विविधतेंतच कांहीं विशिष्ट पुण्य आहे अशा व्यर्थ समजुतीनें विविधतेनें आणखीच विस्कळितपणा आणण्याचे जाणून वा न जाणून प्रयत्न होतात. तात्कालिक वादाच्या समाधानाकरितां व पक्षनिष्ठ राजकारण साधण्याकरितां समाज एकांगी बनविण्याचा घातक प्रयत्न होतो. निरनिराळे वाद, द्वेष व प्रश्न उपस्थित का होतात याची सूक्ष्म चिकित्सा न करतांच, राजकारणाचा फड जिंकण्याकरिता पुढारी म्हणविणारे लोक वरवर दिसणारा मोहक धोपटमार्ग स्वीकारून समाजाची सर्वांगतत्परता नष्ट करितात; आणि अपरिहार्य विविधतेंतील सुप्त एकसूत्र शोधून काढण्याचा मात्र कोणीच प्रयत्न करीत नाहीं. याचें एकमेव कारण म्हटलें म्हणजे समाजनिश्चितीच्या कल्पनाच कित्येकांच्या स्पष्ट झालेल्या नसतात, हेंच होय.

## हिंदुत्वाची कल्पना

हिंदुत्व ह्या शब्दाचेंदेखील तसेंच आहे आणि या शब्दाची स्पष्ट कल्पना येण्यावर समाजनिश्चितीचें कार्य बरेंच अवलंबून आहे. हिंदुत्वाच्या व्याख्या आजपर्यंत अनेकांनीं केल्या आहेत. स्वा. सावरकरांची सिलोनपासून काश्मीर-पर्यंतच्या भरतखंडास जो आपली पितृभू आणि पुण्यभू मानतो तो हिंदु, ही व्याख्या प्रसिद्धच आहे. जो आपणास हिंदु म्हणवितो तो हिंदु, वेदग्रंथांस पूज्य मानतो तो हिंदु, हिंदु संस्कृतीचा तो हिंदु, इत्यादि अनेक इतर व्याख्या ऐकल्या आहेत. तथापि या हिंदुत्वाच्या व्याख्या समाधानकारक वाटल्या नाहींत. आणि शेवटीं हिंदु हा शब्दच आगंतुक आहे म्हणून हिंदुत्व यालाहि कांहीं अर्थ नाहीं येथपर्यंत म्हणण्याचीहि कांहीं विद्वानांची मजल गेली ! यांतील कांहीं व्याख्या हिंदू कोणास म्हणावें याविषयीं कदा-चित् पूर्ण वाटतील. परंतु हिंदुत्व म्हणजे काय हा प्रश्न लोंबकळतच राहतो. मी हिंदु धर्माचा एकहि नियम पाळीत नसतां मला हिंदु काय म्हणून म्हणावें, हाहि बुद्धिवादी प्रश्न उपस्थित होत असतो. हिंदु म्हणजे काय, असा अस्तिपक्षी प्रश्न सोडविण्याचे हे प्रयत्न आहेत. परंतु हिंदु हा शब्द संस्कृति, धर्म, समाज, तत्त्वज्ञान व व्यक्ति या सर्व दृष्टींनीं अत्यंत व्यापक असल्यामुळें आणि हिंदु धर्माची बैठक सामाजिक व्यक्तित्वापेक्षां शुद्ध तत्व-ज्ञानावर अधिष्ठित असल्यामुळें, इतर धर्मांच्या नांवाप्रमाणें आमचा 'हिंदु' हा शब्द व्यक्ति वा समाज यांच्या मर्यादेनें बंधन घातलेला राहत नाहीं. इतर धर्मांचें अधिष्ठान व्यक्ति हें असून त्यामध्यें तत्त्वज्ञानास गौण स्थान आहे. हिंदु धर्माचें अधिष्ठान तत्त्वज्ञान हेंच आहे. तें तत्त्वज्ञान ज्यांना मान्य आहे ते हिंदु हें हिंदुत्वाचें स्वरूप नंतर आलें. तत्त्वज्ञानास ही वलयांकित नाममर्यादा नंतर झाली, म्हणजे व्यक्तीला तत्त्वज्ञानाचें — आता धर्माचें — घटकत्व मागाहून आलें. इतर धर्मांत धर्माचें घटकत्व प्रथम प्रस्थापित होऊन त्याचें पोषण करण्याकरितां किंवा त्याला भरघोंसपणा आणण्यासाठीं

तत्त्वज्ञानाचा उगम झाला. नामवलयांकित सरोवराची सीमा प्रथम आंखली जाऊन त्याला भरीवपणा येण्यासाठीं तत्त्वज्ञानाचें पाणी त्यांत यथाशक्ति नंतर घालण्यांत आलें, यामुळें इतर धर्मांची व त्यांच्या अनुयायांची व्याख्या करणें जितकें सोपें तितकेंच हिंदुधर्माची व त्याच्या अनुयायांची व्याख्या करणें फार कठीण झालें. यावरूनच इतर धर्मांची संकुचित दृष्टि आणि हिंदुधर्माची तत्त्वज्ञानाधिष्ठित विशाल दृष्टि हा महत्त्वाचा भेद दृष्टोत्पत्तीस येतो. आणि म्हणूनच हिंदुत्व म्हणजे काय, याची व्याख्या करीत बसण्यापेक्षां हिंदुत्व म्हणजे काय नाहीं याची व्याख्या करणें उचित आणि क्षम्य आहे.

## हिंदुत्वाची भरीव कल्पना

जो भारतीय तत्त्वज्ञान मानीत नाहीं, त्या तत्त्वज्ञानाचा दृश्याविष्कार जी संस्कृति त्या संस्कृतीचा ज्याला अभिमान नाहीं आणि तें तत्त्वज्ञान व संस्कृति ज्या भूखंडावर उदयास येऊन विकास पावली त्या भूखंडावर ज्याचें मातृवत् प्रेम नाहीं तो हिंदु नाहीं. याशिवाय जी मानव व्यक्ति जगांत शिल्लक राहते ती मनाने व नांवाने हिंदू आहे. मग तो कोणत्याहि धर्माचा, पंथाचा राष्ट्रीयत्वाचा आणि वंशाचा असो – तो हिंदूच आहे. केवळ मनानें व नांवानेंच नाहीं तर राष्ट्रीयत्वानें हिंदु आहे. ही जात नाहीं, धर्म नाहीं, व्यक्ति नाहीं. वर निर्देश केलेल्या प्राचीन भारतीय तत्त्वज्ञान व संस्कृति यांच्या शिकवणीनें तयार झालेल्या विशिष्ट मनःप्रवृत्तीला सहज परंपरेनें मिळालेली ' हिंदु ' ही संज्ञा आहे. हिंदू हें नांव प्रथम कोणीहि उच्चारो, परंतु तो शब्द ज्या मूळ संस्कृत शब्दांचा अपभ्रंश आहे तो सिंधु शब्द प्राचीन भारतीय तत्त्वज्ञान व संस्कृति यांच्या उगमस्थानाचें अभिधान आहे. हिंदु शब्दाबद्दल हिंदु मनाला अभिमान वाटण्यास ऐवढें कारण पुरेसें आहे. मग तें नांव परक्यांनीं दिलें असलें तरी बिघडत नाहीं. नांव परक्यांनीं दिलें म्हणून अभिमानास बाध येत असेल तर ' हिंदु ' ऐवजी ' सिंधु ' म्हणवून

आपणही शुद्ध व्हावें म्हणजे झालें.

## हिंदूंचें अधिष्ठान

हिंदूंचें अधिष्ठान राजकारणांत नसून धर्मात आहे. आणि धर्माचें अधिष्ठान अेखाद्या व्यक्तींत नसून तें तत्त्वज्ञानांत आहे. त्यामुळें हिंदु सहिष्णु, भूतदयाशील आणि परमार्थतत्पर आहे. म्हणून हिंदुत्वाला मर्यादा नाही. कृण्वन्तो विश्वमार्यम् हें त्याचें ब्रीद आहे. अर्थात् हिंदूवांचून जो मनुष्य शिल्लक राहतो तो जातीय ठरतो. साहजिकच विशाल आणि अुदात्त हिंदुत्वाचा ज्याला अभिमान नाही किंवा हिंदु म्हणवून घेण्यास ज्याला लाज वाटते, तो जातीयतेला अुत्तेजन देणारा व अत्याचारांना पोषक होणारा मनुष्य स्वतः जातीय व देशद्रोही समजला पाहिजे. त्याला या हिंदूच्या देशाचा नागरिक म्हणतां येणार नाही. परंतु हिंदु हा धर्मतःच सहिष्णु आणि आत्मवत् सर्वभूतेषु पाहणारा असल्यामुळे जो जो अहिंदु हिंदूच्या देशांत असेल त्याला योग्य तो आदरसत्कार करूनच वागवील. त्याला तो बाहेर हाकलून देणार नाहीं. अुलट त्याच्याशीं गोडी करून त्यास आपलासा करून घेअील. पण त्याच्यासाठी स्वत्व गमावणार नाही. कारण हिंदु दयाशील असला तरी तो नेभळट असणार नाही. त्याच्या तत्त्वज्ञानाचें ब्राह्मतेज अत्यंत प्रखर आहे.

## हिंदुत्व होच समाज – निश्चिति

हिंदुत्वाचें वरील विवेचन वाचून वाचकांस वाटेल की हिंदुत्व ही कवीच्या मनोराज्यांतील किंवा तत्त्वज्ञान्याच्या सुपीक मेंदूतील फक्त तत्त्वज्ञानांत दिसणारी अशी अेक अव्यवहार्य कल्पना आहे. वरवर पाहतां कदाचित असें वाटेलही; परंतु तात्त्विकदृष्टया ती शुद्ध आहे व प्रत्यक्षांत व्यवहार्य आहे हें तेव्हांच कळून येअील. ही कल्पना हजारो व्यक्तींनी अेकत्र येअून व्यवहार्य करून दाखविली आहे. म्हणूनच मूळ आर्यांचे हिंदु झाले. यांत कृण्वन्तो विश्वमार्यम् हेंच तत्त्व प्रतीत होत आहे. हजारो वर्षे अेकत्र पद्धतशीरपणें जीवन घालविल्यामुळें अर्थातच या अदृश्य कल्पनेला दृश्याविष्कार अुत्पन्न झाला. तत्त्वज्ञानाच्या अगाध सागराला त्याच्या भक्तांनी आपल्या अव्याहत भक्तीनें समाजाच्या सीमा घातल्या. तत्त्वशुद्ध विचारप्रणालीमुळें सर्वांचें वैयक्तिक

...११

आणि सामाजिक जीवन पद्धतशीर आंखलें गेलें. तथापि या सामाजिक सीमांनीं तत्त्वज्ञानाला अर्थात धर्माला मर्यादेचें बंधन घातलें नाही, तर त्याची मानवी व्यवहारांत किंमत वाढविली आणि निश्चित स्वरूप आणलें. समाजनिश्चिति करून तत्त्वज्ञानाचें सातत्य टिकविलें. जसे आर्यांचे हिंदु झाले तसे हिंदूंचे आणखी कोणी निराळे होतील. पण हें सर्व धार्मिक क्षेत्रावर. राजकीय क्षेत्रावर नाहीं. राजकारणांत संकुचित राष्ट्रकल्पनेचा मत्सर, द्वेष व सूड तर धर्मांत मानवतेची सहिष्णुता, प्रेम व आपलेपणा. राजकारणांत जातीय आणि जागतिक ऐक्य या गप्पा आहेत, तो ढोंगीपणा आहे. ज्यांना अंतःकरणापासून मानवतेची जाग आहे ते राजकारणांत कधीच पडत नाहीत. कारण सत्तेच्या बळावर मानवता साधावयाची नाहीं. कधीच साधावयाची नाहीं, यशस्वी होणार नाहीं.

## १४. आमचे सद्‌गुण वांया जात आहेत.

आमचें म्हणजे महाराष्ट्राचें, विशेषतः महाराष्ट्रांतील सुसंस्कृत वर्गाचें. औद्योगिक युग सुरू होत आहे. त्यांत पुन्हां लोकशाही युग. लोकशाहींत गुणांपेक्षा संख्येला महत्त्व अधिक आहे. या सर्व दृष्टींनीं हें कामगारांचे युग म्हटलें पाहिजे. फरेंच राज्यक्रांतीचे वेळीं एडमंड वर्कनें गुणांपेक्षां संख्येला महत्त्व देण्यांतील धोक्याचा इशारा दिला होता. दीडशें वर्षानंतरहि वर्कचें तें अरण्यरुदन अवाधित आहे ! असो. कामगार-युग म्हणजे प्रत्यक्ष घाम गाळणाऱ्या अर्धपोटयांचें युग नव्हे. कामगार-युग याचा अर्थ मनुष्य लक्षाधीश असो, भिक्षाधीश असो, सर्वांची एकच वृत्ति, ती म्हणजे जवाबदारी विसरून सूक्तासूक्त मार्गानें कमींत कमी श्रमांत जास्तींत जास्त स्वार्थ साधणें.

कामगार-युगाची ही व्याख्या कटु वाटली तरी ह्या युगाची प्रचीतीहि तशीच आहे. श्रम करणारा मजूर चोऱ्या करतो, कारकून पैसे खातो व लठ्ठ पगारदार अधिकारी लांच घेतो. तथापि या युगास सरकारी मान्यता आहे हें मान्य केलें पाहिजे. नाहीं तर या कामगार-युगाचा सरकारनें खोलवर विचार केला असता व युगप्रवर्तन घडवून आणलें असतें. परंतु ज्या अर्थी पैसे खाण्याचे नवीन नवीन रस्ते सरकार तयार करीत आहे त्या अर्थी कामगार-युगास मान्यता आहे हें स्पष्ट होतें. कामगार हे नेहमींच मालकांपेक्षां संख्येनें सहस्रावधी पटीनें जास्त असतात. त्यामुळेंहि इतकीं मतें गमाविण्यपेक्षां कामगार युगाचें तत्त्व निमुटपणें मान्य करणें सरकारास सोयीचें जात असावें.

एकदां कामगार–युगास मान्यता आली कीं, त्याबरोबर सर्व गुणदोष आपोआप आलेच. सर्व माणसें एकाच मापानें मोजलीं जातात. सर्वांचें कर्म

एकच. सकाळीं उठून डबा घ्यायचा व कामावर धांवत जायचें. सायंकाळीं दमून यायचें व झोंपायचें. पुन: दुसऱ्या दिवशीं तोच दिवस उजाडतो. या कामगारांच्या आयुष्यांत यापेक्षां दुसरें कांही नवीन घडत नसतें. घडवायचें नसतें. त्याला घरगुती जीवन नाहीं. घरच्या समारंभांत तो पाहुण्यासारखा असतो. आयुष्यांत दुसरी महत्त्वाकांक्षा नसते. एकच महत्त्वाकांक्षा म्हणजे सूर्याच्या उदयास्तांत व याच्या डबा नेण्याआणण्यांत कधींहि खंड पडूं नये ! हा कामगार ज्या कामावर काम करीत असतो त्याचे व्यतिरिक्त जगाच्या समाजाच्या आणि त्याच्या वैयक्तिक जीवनांत इतर कांहीं अंगें असतात याचा त्यास विचार करण्यास सवड नसते.

मनुष्य बुद्धिमान असो कीं निर्बुद्ध असो, कलावंत असो कीं केवळ हाडा-मांसाचा पुतळा असो, तत्त्वज्ञ असो कीं रांगडा असो, त्याच्या कार्यांत बदल नाहीं. त्यानें यंत्राला हात लावून जास्तीत जास्त काम काढणे. सब घोडे बारा टक्के ! अशा प्रकारच्या यांत्रिक प्रजेच्या राज्यांत जिवन्तपणा व चैतन्य तें काय असणार ? परंतु सरकारला याची जाणीव येण्यास अनेक तपें जावीं लागतात. वाईट हेंच कीं ही जाणीव प्रजेला मात्र तत्काल सतत डांचत असते.

प्रत्येक मनुष्याला ज्याच्या त्याच्या आवडीप्रमाणें व सामर्थ्याप्रमाणें जीवन चालवूं देणें हें सरकारचें आद्य कर्तव्य आहे. हें जर सरकारनें कर्तव्य मानलें नाहीं तर व्यक्तीचें जीवन पिचत तर राहीलच पण एकूण देशांतहि मरगळ येऊन सरकारला गाढवांचा गाडा हांकणें भाग पडेल.

या कामगार युगांत पैशाची सत्ता बलवत्तर असते. या सत्तेपुढें सरकारी सत्तासुद्धां मान तुकवीत असते. केवळ पैसा आहे व तो वर्धिष्णु राहावा म्हणून उद्योगधंदे भराभर निघत असतात. उत्पादित वस्तूंची समाजाला आवश्यकता आहे म्हणून किंवा आवश्यक वस्तू खऱ्या प्रतीच्या हव्या असतात म्हणून उद्योगधंद्याची वाढ कोणी करीत नाहीं. पैसा हा फक्त योग्य माण-साचेच हातीं येतो असेंहि नाहीं. किंबहुना अनुभव उलटाच येतो. बहुधा उद्योगधंद्यांचे मालक व सरकारी कारभाराचे मालक यांच्या नालायकीला आमचे सद्‌गुण आणि बुद्धिमत्ता बळी पडत असते. फारच थोड्या 'मालकांना' आपल्या कामाची तांत्रिक माहिती असते. त्यामुळें कामांतील तांत्रिक अडचणी

या 'मालकांना' कधीं समजत नाहींत. या अज्ञानाचे भरीला पैशानें प्राप्त झालेली स्वभावांतील सुलतानशाही येते. लहरीपणा ओघानेंच आला. वैयक्तिक व्यसनें, आवडी – निवडी, छंद यांचें वऱ्हाडहि कमी नसतें. कचेरीचें काम हें नेहमीं यांना स्वतःपुरतें दुय्यम प्रतीचें – फावल्या वेळाचें वाटतें. लहरी संभाळणें हें कामगाराचें पहिले कर्तव्य. कचेरीचें काम वेळेवर होण्यासाठीं जो आवश्यक अवधि लागतो तो लहरी पुरविण्यांत कामगारानें खर्च करावयाचा असतो; आणि काम वेळेवर न झालें तर त्याची जबाबदारी कामगारांवरच ! पैशानें स्वर्गसुद्धां विकत घेतां येतो अशी या अडाणी मूर्खांची परमश्रद्धा असते. तेव्हां या मर्त्य लोकांतील सद्गुणी माणसें म्हणजे कोणत्या झाडाचा पाला !

ईश्वरानें कांहीं माणसांचे अंगीं सद्गुण आणि बुद्धिमत्ता दिलेली आहे. तिला कांहीं तरी, जगाच्या उभारणींत कार्य असावें असें वाटतें. केवळ बोकडाच्या अजागळाप्रमाणें वायां जाणें इष्ट नाहीं. प्रत्येक बुद्धिमत्तेंतून आणि सद्-गुणांतून कांहींतरी उदात्त ईश्वरी कार्य साधावें अशी अपेक्षा असते. त्यापासून कोणाना कोणाचें तरी हित व्हावें. अनिष्ट वळण लागलें तर त्याला आळा घालण्यासाठीं सरकारी शासन असतें. चांगलें वळण लागावें म्हणून शाळा असतात. परंतु नालायक माणसांची लहर सांभाळण्यासाठीं आणि त्यानें केलेल्या चुका निस्तारण्यासाठींच आमची सारी बुद्धिमत्ता आणि सद्गुण खर्च होऊं लागले तर त्याला काय उपाय आहे ? देशाचें हें केवढें नुकसान नालायक मालक करीत आहेत !

या अडाणी मूर्खांच्या जगांत बुद्धीला आणि सद्गुणांना निराळें असें काहीं महत्त्व नसतें. जी गोष्ट त्यांच्या गावींहि नाहीं त्यांची किंमत त्यांस काय कळणार ? पण दुसऱ्याचे सद्गुण हे आपल्याच फायद्यासाठीं असतात आणि असें असेल तरच ते सद्गुण, एवढें मात्र त्यांस पक्कें समजतें. त्याचप्रमाणें त्यांच्याखातीं सद्गुणांना उदात्त गुण म्हणून मान नसतो. आपल्या स्वार्थाचें एक साधन एवढीच किंमत असते. अशा वेळीं बुद्धिमान व गुणी माणसाची काय नैतिक कुचंबणा होत असेल त्याची कल्पनाच केलेली बरी. गुणग्राहकता, बुद्धिमत्ता, तत्त्वनिष्ठा आणि सुजनता यांच्या दुर्मिळ संगमाचें स्थान क्वचित.

सर चिंतामणराव देशमुख मंत्री असताना त्यांच्या हाताखालीं काम करण्यांची ज्यांना संधि लाभली असे महाभाग मोठ्या भाग्याचे !

फरान्समध्यें राज्यक्रांतीचे वेळीं ज्याप्रमाणें केवळ अमक्याचा अमका म्हणून निरपराध जनतेस तुरुंगांतून वर्षानुवर्षे डांबून ठेवण्यांत आलें त्याप्रमाणें केवळ आम्हाला बुद्धिमत्ता आहे व आम्ही सद्‌गुणी आहोंत म्हणून आम्हाला वर्षानुवर्षे तुरुंगांत डांबून ठेवलें, तर आहे यापेक्षां कांहीं अधिक वाईट आमचें होणार नाहीं. नगरपालिकांचे कमिशनर, मंत्र्यांचे सचिव, निरनिराळ्या उद्योगांचे व्यवस्थापक हे सर्व याच केविलवाण्या मालिकेत मोडतात. असे कित्येक पामर विचारे पिचत पडले आहेत. यांची अजून ‘ युनियन ’ झाली नाहीं याचेंच आश्चर्य वाटतें.

हा झाला औद्योगिक तुरुंग. सामाजिक तुरुंग याहिपेक्षां मोठा आहे. लोकशाही सत्तेनें ज्यांच्या मागें लागावें असा कामगाराप्रमाणेंच अशिक्षित, मागासलेला या नांवाचा आणखी एक फार मोठा वर्ग समाजांत आहे. त्याची उन्नति करण्यासाठीं प्रत्येक लोकशाही सरकार झटत आहे. त्याचें फळ पुढीलप्रमाणें मिळत आहे. अडाणी नालायक माणसें अधिकारावर चढतात. त्यामुळें राज्यकारभार खर्चिक व अनागोंदीचा होतो. शाळा व इतर ठिकाणी त्यांचीच वर्णी लागते. त्यामुळें दुष्ट, असंस्कृत प्रवृत्तींना उगाचच प्रतिष्ठा मिळते. या नवीन वर्गाचा आपल्या लोकशाही सरकारवर इतका जबरदस्त विश्वास असतो कीं ज्यांना नोकऱ्या मिळतात ते बेभान होतात. ज्यांना नोकऱ्या मिळण्याची आशा आहे त्यांस स्वर्ग दोन बोटें उरतो. एवढेंच काय पण ज्यांना अजून नोकरी मिळाली नाहीं त्यांनाहि इतका माद चढलेला दिसतो कीं जणूं हेच पंतप्रधान झाले आहेत किंवा काय, अशी त्यांच्या वागण्याकडे पाहून शंका येते. त्याच्या उलट स्थिति सुसंस्कृत मनुष्याची आहे. तो आपल्या विषयांत कितीहि तज्ज्ञ असला तरी नोकरी मिळण्याची त्याला आशा नसते अगदीं हातांत हुकूम मिळाला तरीहि त्याची धाकधुक शिल्लक असते. नोकरी मिळाल्यावर त्यास फार जपून राहावें लागतें. जणू मानेवर टांगती तरवार. सुसंस्कृत मनुष्यास स्वतंत्र उद्योगास साह्य मिळतां मिळतां मारामार. एखादी विद्या अवगत असली तरी तिचें चीज होणार नाहीं. मनुष्य जितका

विद्वान तितकी सरकारांत जागा मिळण्याची त्याला आशा कमी. हा आपल्याला डोईजड होईल अशी भीति सरकारास वाटत असल्यास न जाणे.

याचा परिणाम असा झाला आहे कीं सुसंस्कृत, विद्वान् माणसें मरगळून जात आहेत. विद्वत्ता आणि सुसंस्कृतपणा 'औट ऑफ फॅशन' झाल्यामुळें नवीन पिढी तिकडे ढुंकूनहि पाहाण्यास तयार नाहीं. बुद्धिमान वर्गांत गुन्हेगारी व अनैतिकतेचे प्रमाण वाढत आहे. बुद्धिमत्ता व सुसंस्कृतपणा यांची फारकत झाली म्हणजे बुद्धिमत्ता वाममार्गी बनते आणि नेकीनें अशी फारकत होऊं दिली नाही तर त्यास हलाखींत अपमानित जीवन कंठावें लागतें. गुणवत्ता व बुद्धिमत्ता समाजाचे आदर्श असतात. हे गुण असणारीं माणसें गुणांचें प्रतीक म्हणून बाकीचा समाज त्यांजकडे पहात असतो. सुसंस्कृत वर्ग हें समाजाचें सुकाणु आहे. दिशा दाखविणारे दीपस्तंभ आहेत. पण सुसंस्कृतांचीच ही अवस्था झाल्यावर समाजाचें वळण आपोआप विघडतें. समाजाची कला, विद्या, संस्कृति, ऐहिक सुखसाधनें, पारमार्थिक ध्येय आणि या सर्वांचें फळ, प्रगती आणि स्वास्थ्य हीं समाजातील विद्वत्ता व गुणवत्ता यांवर अवलंबून असतात. पण सुसंस्कृतांतच मरगळ आली तर विद्वत्ता व गुणवत्ता लोप पावूं लागतात. जें उरतें तें फक्त विद्वत्ता आणि गुणवत्ता यांचें सोंग !

दारिद्र्यापोटीं अनेक बुद्धिमान व सद्गुणी माणसें अंधारांत दडलीं गेलीं आहेत. त्यांच्या होतकरू मुलांचेंहि भवितव्य अंधारमयच आहे. सुसंस्कृत मनुष्यास घेलवेल, मानवेल असें द्रव्यार्जनाचें साधन आज शिल्लक नाहीं. जें कांहीं थोडें-फार होतें तें कूळ कायद्यासारख्या कायद्यांनीं हिरावून नेलें आहे. समाजांतील बुद्धिमान व सुसंस्कृत वर्ग नष्ट करणारे असे कायदे होऊं लागले तर कायदे करणाऱ्या 'रामराज्या'च्या सद्धेतूबद्दलच शंका निर्माण होते. देशाचें बल बुद्धिमत्तेंत आणि संकृतींत असतें. हें बल जर नष्ट झालें तर देश नष्ट होण्यास वेळ लागत नाहीं हें प्राचीन रोमन साम्राज्याच्या ऱ्हासापासून तों कालच्या दुसऱ्या महायुद्धांतील फरान्सच्या पराभवापर्यंत जगाच्या इतिहासावरून स्पष्ट होतें. जें सरकार दुष्कृत्य जाणूनबुजून करतें त्यावर देशद्रोहाचा आरोप करणें कठीण नाहीं.

मागासलेल्या वर्गाची उन्नति साधणं हा प्रामाणिक हेतु त्या वर्गास पोकळ प्रतिष्ठा देण्यामागें आहे याबद्दल आम्हांस शंका आहे. जें चाललें आहें ते लाड चालले आहेत. म्हणजे असें कीं नालायक माणसास द्रव्य पुरवून आणि राजकारणांत वा सरकारांत मोठ्या जागा देऊन त्यास हरभऱ्याच्या झाडावर चढविणें. वरपांगी हें वर चढविणें तळांतून वर काढण्यासारखें वाटतें पण ही उडी शेवटीं चिखलांत रुतून पडण्याचीं चिन्हें आहेत. अशा रीतीनें देशाची सर्व सूत्रें जर नालायक माणसाच्या हातीं राहिलीं तर त्याची तितक्याच जोरानें प्रतिक्रिया झाल्यावांचून रहाणार नाहीं. आणि मग मात्र हा मागासलेला वर्ग कायमचाच मागासलेला राहील. सर्व सुधारक व कैवारी यांची अशी प्रामाणिक व ठाम श्रद्धा बसेल कीं मागासलेला मनुष्य मागासलेलाच रहाणें योग्य आहे. जर खरोखरच उन्नति साधावयाची तर त्यांची प्रथम सांस्कृतिक उन्नति करणें जरूर आहे. मनुष्य सुसंस्कृत झाला म्हणजे त्यास नीतीची चाड येते. आपलें कर्तृत्व सत्कारणींच लावावें अशी त्याची श्रद्धा होते. आणि आपलें कर्तृत्व आपल्याच पायांवर उभें राहून कमवावें अशी धारणा त्यांचे ठिकाणीं होते. असा सुसंस्कृत मनुष्य जगांत कोठेंहि कसाहि फेकला गेला तरी तो प्रतिष्ठेनें जगेल व कर्तृत्वानें चमकेल. मागासलेल्यास सुशिक्षित केलें पाहिजे म्हणजे तो सुसस्कृत होतो अशी खोटी समजूत सर्वमान्य झालेली आहे. मागासलेला सुशिक्षित झाला तर तो आहे त्याहूनहि वाईट होईल. मुळांत सुसंस्कृत मनुष्य सुशिक्षित होऊन वाह्यात झालेलीं उदाहरणें किती तरी आहेत. मग सुसंस्कृत करणें म्हणजे काय, हा प्रश्न उभा राहतो. या प्रश्नाचें सविस्तर उत्तर म्हणजे स्वतंत्र विषय आहे व तो येथें देणें अप्रस्तुत होईल. पण ' नेति ' इतकेंच सांगतों. सध्यां माणसास साक्षर किंवा सुशिक्षित करणें चाललें आहे, तें सुसंस्कृत करणें नव्हे.

महाराष्ट्राची वुद्धिमत्ता सर्वच वायां जात आहें असें नाहीं. अखिल भारतात ती भिन्न भिन्न क्षेत्रांत वावरत आहे. पण ही मागें राहून वावरत आहे. कोणाची तरी खुशमस्करी म्हणून वावरत आहे. कोणाची तरी नोकरी म्हणून वावरत आहे. ही बुद्धिमत्ता स्वयंप्रेरणेनें स्वयमेव मृगेंद्रता म्हणून कां वावरत नाहीं ? आमच्या कच्च्या मालाचा उपयोग करून तोच दिखाऊपणें आम्हालाच

विकावा ही ब्रिटिशांची नीति आजहि आम्हांला निराळ्या मार्गानें भोंवते आहे. केवळ दिखाऊपणांत तरबेज असलेल्या ब्रिटिशांनीं जगांत उद्योगपति म्हणून मिरवावें आणि आम्हीं मात्र मागासलेले म्हणून तोंड काळें करून राहावें हा न्याय न्यारा आहे! आमच्यांत बुद्धिमत्ता आहे, गुणवत्ता आहे. पण त्याचबरोबर शहाणपणाची आवश्यकता आहे. हें विसरून चालणार नाहीं.

# १५. संस्कृतीचें संक्रमण आणि मिश्रण

संस्कृति–संक्रमण हा विषय तात्त्विक दृष्ट्या मोठा गुंतागुंतीचा आहे. संस्कृति म्हणजे काय हें प्रत्येक सुसंस्कृतास माहित असलें तरी संस्कृतीची सर्वमान्य व्याख्या अद्यापि पाहाण्यांत आली नाहीं ही या विषयांतील पहिली अडचण आहे. भाषासंक्रमणाचेविषयीं ज्याप्रमाणें भाषाशास्त्री भाषेचें अस्थिरत्व मान्य करतात व त्याचा फायदा घेऊन कांहीं सुधारक साहित्यिक भाषेचें व्याकरण सोयिस्करपणें डावलतात त्याचप्रमाणें संस्कृति–संक्रमणाच्या तत्त्वाचा आधार घेऊन बुद्धिवादी संस्कृतिपालनाकडे दुर्लक्ष करीत असतात. मानवशास्त्रज्ञ असें सांगतात कीं, मनुष्यप्राणी बदलत आहे व बदलणार आहे. ज्याप्रमाणें त्याची शेपटी कालांतरानें गळून पडली त्याचप्रमाणें कित्येक लाख वर्षांनंतर आजचे कांहीं अवयव निकामी होऊन गळून पडतील. पण म्हणून कोणीं दांत किडले तर दुर्लक्ष करीत नाहीं किंवा पाय मोडला तर निष्काळजीपणा दाखवीत नाहीं. एखाद्यानें दरोडा घातला किंवा खून केला तर त्याची मानसशास्त्रीय चिकित्सा करून मानवी सहज प्रवृत्तीच्या आधारें त्या गुन्हेगारास न्यायाधीश दोषमुक्त करीत नाहींत.

जगाचा इतिहास असें सांगतो कीं, 'गाभा सोडून दिल्यास कोणत्याहि संस्कृतीचें स्वरूप जसेंच्या तसें फार काळ टिकत नाही.' त्याचप्रमाणें ज्या संस्कृतींचा प्रवाह डबक्याप्रमाणें अडून स्थानिकच राहिला त्या संस्कृती प्रगत झाल्या नाहींत. कालपरिस्थित्यनुरूप आचारांत फरक पडतो आणि कांहीं नीति कल्पनाहि बदलतात. विक्रमादित्याच्या काळांतील आचारनीति पेशवाईत राहिली नाहीं. पेशवाईतील आचारधर्म अव्वल इंग्रजींत लुप्त झाला

आणि ' अव्वल इंग्रजींतील धर्मप्रामाण्याचा स्वातंत्र्यानंतर लय झाला. या सर्व काळांत त्या त्या कारकीर्दींतील धर्ममार्तंड स्वतःला सनातनी समजत आणि नवीन अचार-विचारांना पाखंडी संबोधीत. तात्पर्य, स्वाभिमान आणि सनातनप्रियता या गुणांचा आदर ठेवूनहि हें मान्य केलें पाहिजे कीं आम्हीं न कळत नवीन प्रवाहांत ओढले जातों.

अशा तऱ्हेनें संस्कृतीचें बाह्यांग बदलत असतें. तें कसें बदलतें तें बदलत असतांना समजत नाहीं. संस्कृतीच्या बाह्यांगावर तात्कालिक प्रवाहांचा प्रभाव पडतो. तो प्रवाह तात्कालिक आहे हें त्या वेळीं कोणास समजत नसतें. किंबहुना त्या प्रवाहाचे पुरस्कर्ते तो प्रवाह हा जणुं संस्कृतीचा चिरंतन पाया असें आग्रहानें प्रतिपादन करीत असतात. तथापि कालाच्या ओघांत हे सर्व लुप्त होऊन जातात. जुन्या बाह्यांगाला चिकटूं पाहाणारे सनातनी आणि नाविन्याला संस्कृतीचें अधिष्ठान मानणारे सुधारक यांच्यांतील विसंवाद हाच खरा सनातन आहे !

गंगेच्या ओघाप्रमाणें अखंड प्रवाही राहाणें हाच संस्कृतीचा गुणधर्म यावरून प्रतीत होतो. पण त्याचबरोबर गंगेप्रमाणें सतत पवित्र प्रवाह राहावा हेंहि अभिप्रेत आहे. आगंतुक येणाऱ्या बाहेरच्या पाण्यानें मूळ गंगेचें पावित्र्य कमी होऊं नये; प्रवाहांत पडणाऱ्या गलिच्छ गोष्टी शुद्ध करण्याचें सामर्थ्य नित्य राहावें हेंच गंगौघापासून अपेक्षित असतें. संस्कृतीच्या संक्रमणांत मूळ पावित्र्य आणि शुद्धीकरणाचें सामर्थ्य नष्ट होत नाहीं. संस्कृतीचें संक्रमण तत्त्वतः मान्य करूनहि संस्कृतीचें मिश्रण गर्हणीयच म्हणावेसें वाटतें.

संस्कृतीची संक्रमणावस्था कालावधीची अवस्था आहे. ती कोणी मुद्दाम आणूं म्हटल्यानें येत नाहीं आणि थोपवूं म्हटल्यानें थोपविली जात नाहीं. देशांतील अंतर्गत दळणवळणानें, परकीय आक्रमणानें व व्यापारानें लोकांच्या पोषाखांत, खाण्यापिण्यांत व सामाजिक व्यवहारांत फरक पडत जातो. हा फरक पडला म्हणजे साहजिकच पोषाक, खाणें-पिणें व सामाजिक व्यवहार या बाबतींतील नीतिकल्पना बदलूं लागतात. परंतु असा फरक जो समाज स्थानिक राहातो; ज्याच्याशीं बाहेरच्या कोणा व्यक्तीशीं आक्रमण, व्यापार इ. निमित्तानें संबंध आला नाहीं, जो समाज लहानशा प्रदेशावर आणि त्या

प्रदेशांत भौगोलिक आणि नैसर्गिक विविधता नाहीं अशा प्रदेशावर वसलेला असतो असा समाज स्थितिप्रधान म्हणजे न बदलणारा असा राहतो.

अत्यंत कालावधीनें बदलणारें स्वरूप बदलतांना कोणाच्या लक्षांत आले तरच नवल. बदल लक्षांत येतो; पण ह्राच बदल पुढें मान्यता पावून संस्कृतीचें नवें स्वरूप होणार आहे हें मात्र कळत नाहीं. उदाहरणच घ्यावयाचें झालें तर महाराष्ट्रीय पोषाखाचें घेतां येईल. पेशवाईत रुंद घेराचें पागोटें, अंगरखा, उपरणें, धोतर व जोडा असा वेश होता. रुंद पागोटयाची लहान पगडी अव्वल इंग्रजींत होऊं लागली होती. ही लहान पगडी त्यावेळीं फॅशन म्हणून आली. अंगरख्याऐवजी शर्ट आला तोहि इंग्रजाशीं संबंधित असलेले किंवा संबंध आहे असें दाखविणारे फॅशन म्हणून घालूं लागले. पर्शियन कोट हा खरा आमचा नव्हे. पण तो पन्नास वर्षांपूर्वीं चांगला प्रतिष्ठित झाला होता. लहान पगडीच्या झिरमिळ्यांची पुढें लाज वाटून त्याहि फॅशन म्हणून काढण्यांत आल्या. कांहीं शिकलेले लोक तर इटॅलियन टोपी घालीत. तिची जागा पुढें साध्या घडीच्या टोपीनें घेतली. पण पुढें ती इतकी मान्यता पावली कीं टोपीशिवाय बाहेर जाणें अशुभ समजत. शुभकार्यास टोपी पाहिजेच. जोडयाचीं जागा बंदांचे बुट व पायमोज्यानें घेतली. पगडी, पर्शियन कोट, उपरणें, धोतर व खाली बूट-पायमोजे हा एकेकाळीं प्रतिष्ठितपणाचा थाट होता. हा थाट म्हणजे तत्कालीन प्रतिष्ठित 'कॉस्मॉपॉलिटन' पोषाखाचा एक नमुना होता. धोतर, उपरणें आणि अपभ्रष्ट पगडी आमची. शर्ट, बूट इंग्रजाचा व कोट पार्शी लोकांचा.

वर वर्णिलेल्या पोषाखांतील फरक सुमारें १०० ते १२५ वर्षांतील आहे. हा बदल म्हणजे सासवा- सुनांचा खोखोचा खेळ आहे. सासू सुनेचा जाच करते. ती सून पुढें सासू झाली म्हणजे ती आपल्या सुनेचा असाच जाच करूं लागते. हीच परंपरा पुढें चालते. नवीन होणारा बदल जुन्या पिढीला असभ्य वाटतो. जुनी पिढी कालांतरानें नाहींशी होते व नवीन पिढी सुप्रतिष्ठित होऊन बसते. त्याबरोबर तिचा पोषाकहि सुप्रतिष्ठित होतो. पण त्यापुढील नवीन पिढी नवीन पोषाक आणते त्याला मात्र ही पिढी मान्यता देत नाहीं. असेंच दर पिढीस चालतें. इतर आचारांतहि असाच बदल होत गेला.

आमच्या आजच्या सामाजिक स्थितीचें वर्णन याहून भारी आहे. यादृष्टीनें समाजांत आज प्रतिष्ठित होणाऱ्या कांहीं रूढींचा निर्देश करणें आवश्यक वाटतें. संस्कृतिपालनास अशक्य परिस्थिति निर्माण करणारें औद्योगीकरण एकत्र-कुटुंब-पद्धति मोडत आहे, जीवननिष्ठेपेक्षां अर्थनिष्ठेवर अधिक भर देत आहे. औद्योगीकरण आवश्यक आहे काय आणि असल्यास कशा प्रकारचें असावें हा अर्थशास्त्रीय विषय आहे. परंतु त्यामुळें समाजावर होणाऱ्या दुष्परिणामांची दखल घेणें अनावश्यक नाहीं. युरोप-अमेरिकेंतील जनतेस व विचारवन्तांस तेथील दीडशें वर्षांच्या औद्योगीकरणाचे दुष्परिणाम इतक्या वर्षांनंतर आतां जाणवूं लागले आहेत. असो. उत्तम इंग्रजी यावें व अधिकाराच्या नोकऱ्या मिळाव्या म्हणून मिशनरी शाळेतून आपलीं लहान मुलें पाठविण्याची एक टूम निघाली आहे. या गोष्टीचा सामाजिक आणि राष्ट्रीय दुष्परिणाम हीं मुलें मोठीं झाल्यावर दिसून येणार आहे. आमच्या बुद्धिभ्रंशाचें व न्यूनगंडाचें हें एक ढोवळ उदाहरण आहे. स्त्री-पुरुषांचीं खेळ खेळण्याचीं मिश्र मंडळें वाढत आहेत याची वेळींच दखल घेणें जरूर आहे. लष्करांत आतां पांढरपेशा सुशिक्षित तरुण पुष्कळ भरती होत आहेत. यांतील लष्करी दांपत्यांच्या वैवाहिक जीवनाबद्दल फारच धास्ती वाटत आहे. लष्करांतील सामाजिक जीवनाचें अद्यापि भारतीकरण झालें नाहीं. ही गोष्टहि धोक्याची आहे. शिक्षण सार्वत्रिक होत आहे. हे सर्व सुशिक्षित केवळ कारकुनी उमेदवार म्हणून बाहेर पडत आहेत. विद्येचा उपासक म्हणून स्वतंत्र वर्ग आतां नष्ट झाला आहे. संस्कृतीचा ठेवा विद्येचा उपासकच जतन करूं शकतो. इतर समाज त्याचें अनुकरण करीत राहतो. विद्येचा उपासक नाहींसा झाल्यावर इतरेजनांनीं कोणाकडे बघून चालावें ? समाजांतील कोणताहि प्रश्न केवळ राजकीय भूमिकेवरून हाताळीत आहोंत. परंतु राजकारण हें समाजांत स्थैर्य निर्माण करूं शकणार नाहीं. आहे ती घडी मात्र बिघडवील. राजकारणाच्या या मर्यादा आम्ही लवकर ओळखल्या नाहींत तर तें सामाजिक दृष्टयाच नव्हे तर राष्ट्रीय दृष्टयाहि घातक ठरेल.

इंग्रजी वर्चस्व असलेल्या सहवासामुळें आमच्यांतील हा बदल त्यामानानें फार झटकन होत गेला. इतका झटकन कीं या स्थित्यंतरास संक्रमण

म्हणण्यापेक्षां मिश्रण म्हणणें अधिक योग्य ठरेल.

संस्कृति-मिश्रणाची क्रिया कालावधीची नाहीं. ती अल्प काळांत होणारी आहे. दोन किंवा अनेक संस्कृतींचे लोक एकत्र आले, राहिले कीं परस्परांचे आचारविचार व तत्वज्ञान यांची देवघेव होते. संक्रमणावस्थेंत मूळ संस्कृतीचें सूत्र कायम राहतें. मिश्रणांत कोणत्याच संस्कृतीचें सूत्र राहत नाहीं. या मिश्र संस्कृतीचा पाया खोट्या मोठेपणाची हौस, व्यावहारिक सोय, फॅशन व मोह यांवर असतो. गेल्या सव्वाशें वर्षांत आमचें तत्त्वज्ञान बदललें. संस्कृतीचें सूत्र तुटण्याची पाळी आली. म्हणून या कालांतील स्थित्यंतरास मिश्रण हेंच नांव देणें योग्य होईल.

संक्रमणांत व्यावहारिक नीतिकल्पना बदलतील पण तत्वज्ञानाचें अधिष्ठान कायम असतें. त्यामुळें बाह्यांग बदललें तरी मूळ संस्कृतीचा गाभा अबाधित राहतो. मिश्रणांत व्यावहारिक नीति-कल्पनांना पत्ताच नसतो. पण तत्त्वज्ञानाचें अधिष्ठानहि नष्ट होतें. जुनें टिकत नाहीं आणि नवीन येत नाहीं. जीवनाचें अधिष्ठान कांहीं सनातन तत्त्व असणें हें उच्च संस्कृतीचें महत्त्वाचें लक्षण आहे. संस्कृति-मिश्रणांत असें सनातन तत्त्व शिल्लक राहत नाहीं. केवळ तत्कालीन व्यावहारिक गरज यापेक्षां त्या मिश्र आचारविचारामागे दुसरें कांहीं नसतें. संस्कृतीचें सूत्र लोप पावल्यामुळें स्वैराचारी प्रवृत्ती बेलगाम होतात. यांतच अनीति आणि गुन्हेगारी वाढत असतात. याचें प्रत्यंतर ज्या ज्या ठिकाणीं अनेक संस्कृतीचे लोक एकत्र राहतात किंवा त्यांची सततये-जा चालू असते त्या त्या ठिकाणीं पाहावयास मिळतें. कलकत्ता, हॉंगकॉंग, रंगून, सिंगापूर, मुंबई, दिल्ली, एडन, इ. शहरें संस्कृतीच्या अनिष्ट मिश्रणाचे उत्तम नमुने आहेत. पॅरिस व न्यूयॉर्क हीं शहरेंहि याच सदरांत मोडतील असें म्हणतात. अशा शहरांतून गुन्हेगारी किंवा अनीति इतकी सर्रहा चालू असते की त्यांत कांहीं विशेष आहे असें तेथील गुन्हेगारांना, नागरिकांना आणि सरकारलाहि वाटत नसतें. गुन्हेगारी आणि अनीति यांचें हीं शहरें जणु माहेरघरच झालेलीं असतात. ह्याला कारण तेथील सरकारें कमकुवत असतात असें नव्हे, तर तेथील लोकांची संस्कृति कमकुवत असते. सामाजिक स्वास्थ्य सरकारच्या कार्यक्षमतेवर अवलंबून नसून जनतेच्या संस्कृतीवर अवलंबून आहे. परंतु ज्याअर्थी सध्यांचीं

लोकशाही सरकारें राज्यांतील प्रत्येक क्षेत्रांतील सत्ता एकवटून ती कायदेशीर-पणें आपल्या हातीं ठेवण्याची धडपड करतात त्याअर्थी या सरकारांचा स्वतःच्या सामर्थ्याविषयीं भलताच गैरसमज झालेला दिसतो. जों जों या सरकारांचे हातीं सर्व सत्ता एकवटत जाईल तों तों समाजस्वास्थ्य अधिक बिघडत जाईल याचें ज्ञान आत्मपरीक्षणाशिवाय होणें अशक्य आहे.

संस्कृतीचें अनिष्ट मिश्रण सरकारी अधिकारी, व्यापारी आणि विद्यार्थी यांच्यांत प्रथम होतें. बाकीचा समाज आपला मोठेपणा व सुधारकपणा दाखविण्यासाठीं त्यांच्या मागोमाग हळूं हळूं जात असतो. लोकांच्या घरगुती जीवनांत स्वास्थ्य निर्माण होतें तें संस्कृतिपालनानें; बिघडतें तें संस्कृति-मिश्रणानें. लोकशाही सरकारला लोकांच्या घरगुती स्वास्थ्याशीं कांहीं कर्तव्य नसतें. आपलें आसन स्थिर करण्यासाठीं मतें मिळविणें, तीं मिळवण्यासाठीं लोककल्याणाच्या दिखाऊ योजना करणें, त्यासाठीं लोकांवर कर लादणें, लोकांनी कर द्यावेत म्हणून कृत्रिम गरजा निर्माण करणारी कृत्रिम अर्थ-व्यवस्था तयार करणें, आणि कृत्रिम पैशाची वाढ करणें, त्याचप्रमाणें आपल्या इभ्रतीला अगदीच धक्का पोंचू नये म्हणून दंगेधोपे झाल्यावर सशस्त्र पोलीस उभे करून दाखविणें इतकीं कर्तव्यें सरकारला पार पाडावीं लागतात. सरकारी धोरणांचा पाया केवळ हाच असतो. म्हणून लोकांच्या संस्कृति-पालनाकडे लक्ष देण्याची सरकारला जरुरी नसते. त्यामुळेंच वर वर्णन केलेलीं संस्कृति - मिश्रणाची केंद्रें म्हणजे जगांतील हीं नमुनेदार शहरें अनीति व गुन्हेगारी यांचीं माहेरघरें बनतात. हीं शहरें भिन्न संस्कृतीच्या सरकारांचे अधिकारी आणि व्यापारी यांचीं आगरें आहेत, हें सांगणें नकोच. परंतु कोणत्याहि सरकारला ही स्थिति घातक आहे.

# १६. भिक्षा

'वागर्थाविव संपृक्तौ वागर्थप्रतिपत्तये' असें म्हणून कालिदासानें शब्दार्थांस उगाचच सत्यवान्-सावित्रीचा मोठेपणा दिला आहे. शब्द आणि अर्थ यांचे संबंध सत्यवान्-सावित्रीप्रमाणें कधीं यावच्चंद्रदिवाकरौ राहिले आहेत काय? कालपरिस्थितीप्रमाणें शब्दांस निरनिराळे अर्थ प्राप्त होत नाहींत काय?

"ॐ भवति भिक्षां देहि" हे शब्द पूर्वी कानावर पडले म्हणजे अदबीनें आणि तत्परतेनें त्या अतिथीस भिक्षा घातली जात असे. झोळी पुढें करणारा अतिथि भिक्षा घालणाऱ्या स्त्रीच्या तोंडाकडे, तिच्या अंगावर असलेल्या दागिन्यांकडे आणि घरांत प्रवेश कोठून आहेत, आंत काय काय आहे आणि आंत गेल्यावर बाहेर उडी मारून कोठून निसटतां येईल या गोष्टींकडे ढुंकूनहि पाहत नसे. एवढेंच काय, झोळीत काय पडतें इकडेसुद्धा त्याचें लक्ष नसे इतका तो अतिथि निर्विकार आणि निरिच्छ असे. हा अतिथि कोणी संन्यासी किंवा कोणी बालब्रह्मचारी असावा असें त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसे. भिक्षा मागतांना लाचारी न दिसतां स्वाभिमानच दिसे. असा अतिथि आपल्या दाराशीं येणें हें त्या यजमानास भाग्य वाटे.

आज "ॐ भवति भिक्षां देहि" याचा अर्थ बदलला आहे. याचा भिकारी असा अपभ्रंश झाला आहे. दाराशीं भिकारी येणें ही एक यजमानाला कटकट वाटूं लागली आहे. या भिकाऱ्यांस लाजीरवाणें व लाचारी तोंड केल्याशिवाय भीक मिळणें कठीण आहे. त्याचप्रमाणें याच्या चेहऱ्यावर निरिच्छपणा व निर्विकार दिसण्याचेऐवजी नजर शोधक वा लाचार बन-

लेली असते. भिक्षेंतून होणारें उदरभरण हें यज्ञकर्म समजावयाचे ऐवजी उद्योगधंद्याचें साधन समजतो हें त्या भिकाऱ्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत असतें.

भिक्षा मागणें ही एक लाचारी आहे आणि दुसरें कांहीं पोट भरण्याचें साधन उपलब्ध झालें नाहीं म्हणजे भीक मागणे हाच .एक राजमार्ग, ही कल्पना जेव्हांपासून आली तेव्हांपासून भिक्षेमधील हा फरक सुरू झाला. आणि ही विचारक्रांति औद्योगिक क्रांतीमुळें झाली. प्रत्येक माणसानें काम केलें पाहिजे, प्रत्येक व्यक्तीला आर्थिक स्वातंत्र्य आहे या वैचारिक प्रचारामुळें आर्थिक स्वातंत्र्याचें आकर्षण लहानापासून थोरापर्यंत वाटूं लागलें. हें आकर्षण वाटूं दिलें नाहीं तर औद्योगिक युग अयशस्वी होईल. मोठमोठ्या कारखान्यांस कामास मजूर मिळावेत म्हणून तर ही युक्ति औद्योगिक युगाच्या प्रवर्तकांनीं काढली. सामान्य जनता या आमिषाला इतकी भुलून गेली कीं सारासार विचार नसलेल्या आणि दारिद्र्यानें व इतर बंधनांनीं जखडून गेलेल्या तत्कालीन पाश्चात्य जनतेचा तोल सुटून त्यांत आपलें वैयक्तिक व सामाजिक स्वातंत्र्य व अभिमान ती घालवून बसली! आणि काम करणें हें स्वाभिमानाचें प्रतीक होऊन बसलें. ज्याला काम मिळणार नाहीं तो दुर्दैवी ठरला. हें काम म्हणजे कला वा शास्त्र यांचा व्यासंग करणें नव्हे, हें, काम म्हणजे भूतदयेचें कार्य नव्हे, किंवा इतर सामाजिक कार्य किंवा देशकार्य नव्हे, देवकार्य तर त्याहून नव्हे. काम म्हणजे कारखान्यांत नोकरी करणें. गुलामगिरी करणें.

कसेंहि असो, प्रत्येक माणसानें काम केलें पाहिजे हा जणु नव्या औद्योगिक युगाचा दंडक झाला. आणि प्रत्येक मनुष्य काम मिळविण्याची धडपड करूं लागला. या काम करण्यामध्यें स्वतः काम करणाऱ्याला कांहीं रस नाहीं. त्या कष्टाचें व तयार झालेल्या मालाचें फळ त्याला मिळत नाहीं. माल तयार करण्यांत आत्मीयता नाहीं. कायद्याच्या कक्षेंत बसून ठराविक तास काम करून दाखविलें कीं दिवसाचा रोज लागू झाला. मग त्या मालाचें कांहीं कां होईना. कामहि यंत्राप्रमाणें ठराविक. त्यांत कमी जास्त कौशल्य दाखविण्याची जरूर नाहीं. जणुं निर्जीव यंत्रातील एक क्षुद्र खिळा; आणि

जन्मभर हेंच चालवावयाचें. अशीं कोटयवधि निर्जीव माणसें या आर्थिक स्वातंत्र्यांत काम करीत आहेत. या खोटया स्वाभिमानाच्या चक्रांत भ्रमति करीत आहेत. हीं निर्जीव माणसेंच औद्योगिक युगाचे आधारस्तंभ आहेत. यांचे अभावीं औद्योगिक युग कोलमडूं नये म्हणून अर्थव्यवस्था बदलली. चलनावर अधिक भर देऊन कामानें आधींच परतंत्र झालेल्या जनतेस आर्थिक दृष्टीनें पूर्ण गुलाम करून टाकलें. एवढेंच नव्हे तर औद्योगिका क्रांतिबरोबर बदललेल्या सामाजिक घडीचा फायदा घेऊन मानवी जीवनाचीं मूलतत्त्वेंच पार बदलून टाकलीं. चलन हें केवळ विनिमयाचें साधन होतें तें आतां जीवनाचें साध्य झालें. अर्थात् माणसाला तारणारी कर्तव्यबुद्धि, धर्म-बुद्धि यांचा लोप झाला आणि समाजांत प्रत्येक गोष्टीची किंमत चलनाच्या भाषेत पक्की करण्यांत येऊं लागली.

सामाजिक मूल्यें चलनावर मापलीं जाऊं लागलीं. त्याबरोबर माणसाच्या प्रत्येक कृतीचा अर्थ चलनांत बसवून दाखविला गेला. अर्थात् सर्व परंपरागत सामाजिक संस्था निरुपयोगी होऊन अडगळींत पडल्या. ज्या चलनाच्या चौकटींत बसेत ना त्यांची पार उचलबांगडी झाली. किंबहुना ज्या सामाजिक संस्था औद्योगिक युगास आव्हान देणाऱ्या ठरत होत्या त्यांचा समूळ नाश करण्याचा प्रयत्न झाला.

युरोपमधील ही वैचारिक क्रांति आमच्याकडे स्वातंत्र्यापूर्वींच रुजू झाली होती. युरोपचा आदर्श ठेवून त्याची प्रतिकृति स्वतंत्र भारतांत बनविण्याचा आम्ही चंग बांधला. लोकशाहीची सर्व मदार औद्योगीकरणावर असल्यामुळें आणि आम्ही लोकशाहीचा हिरीरीनें स्वीकार केल्यामुळें युरोपच्या बऱ्या-वाईट अनुभवांकडे बुद्धया कानाडोळा करूनहि औद्योगीकरणाचा खोटा पुरस्कार करणें आमचें एक आद्य कर्तव्य होऊन बसलें. याचाच परिणाम म्हणून शेती करणें हें मागासलेपणाचें लक्षण असल्याचें लोकांच्या मनांत भरवून देण्यांत आलें. जनतेला पराधीन ठेवून तिची वेसण आपल्या हातीं ठेवणें हें लोकशाही सरकारचें आद्य कर्तव्य होतें. कारण शेतीनें व तदनुषंगिक घरगुती धंद्यानें जनता स्वतंत्र राहिली असती तर लोकशाही सरकार तत्काळ कोलमडून पडलें असतें.

औद्योगीकरणानें बेकारी नष्ट होते व जीवनावश्यक वस्तूंची समृद्धि होते ही खोटीं करणें औद्योगीकरणाच्या पुष्टयर्थ दिलीं जातात. औद्योगीकरणानें मनुष्यशक्ति, उत्पादन आणि गरज यांचें व्यस्त प्रमाण होत असल्यामुळें कमींत कमी माणसें कामास लागून जास्तीत जास्त माणसें बेकार रहातात आणि अनावश्यक वस्तूंचें अनावश्यक उत्पादन केलें जातें. जें जीवनावश्यक वस्तूंचें थोडेफार उत्पादन होतें तें गरजेपेक्षां भरमसाट असून त्यामुळें आर्थिक क्षेत्रांत प्रश्न उत्पन्न होतात. या गोष्टी अमेरिकेवरून व ऑगस्ट १९६३ च्या पार्लमेंट सभेमध्यें नंदांच्या बेकारी कमी करूं शकलों नाहीं आणि ती वाढली आहे, या कबुलीवरून स्पष्ट होतें. अमेरिकेनें जर इतर देशांस मदत दिली नाहीं आणि चलन व उत्पादनाचा सांठा अशा तऱ्हेनें घटविला नाही तर अमेरिकेचा आर्थिक ऱ्हास कोणत्याहि क्षणीं ठेवलेला आहे. इतकें उत्पादन आणि औद्योगीकरण होऊनहि तेथें बेकारी आहेच. यांशिवाय जगांतील सर्व देशांचा अनुभव असा आहे कीं औद्योगीकरणानें लोकसंख्येंत एकदम वाढ होते.

आमच्यापेक्षां या बाबतींत चार पावसाळे जास्त खाल्लेल्या युरोपीय देशांच्या अनुभवाकडे डोळेझांक करून औद्योगीकरणासाठीं आम्हीं आमची समाजरचानाहि बदलण्याची महत्त्वाकांक्षा ठेवली आहे. हिंदु समाजरचनेंत जी अर्थव्यवस्था आहे ती अर्थातच मागासलेली म्हणून त्याज्य ठरवावी लागली. आमच्या भिक्षेंत झालेला फरक हें या बदलत्या समाजरचनेचें लक्षण आहे. समाजाची अर्थरचना ही समाजाच्या तत्त्वज्ञानावर आधारलेली असावी लागते. रशियांत स्टॅलिनवाद बदनाम होत आहे याचा अर्थ रशियांतील स्टॅलिनशाही अयशस्वी होती. म्हणजेच रशियाचें समाजाविषयीचें तत्त्वज्ञान चुकीचें होतें. आणि तें चुकीचें असलें तरी केवळ सत्ता व पैसा यांचे बळावर ते आतांपर्यंत कसेंबसें तग धरून ठेवलें होतें. पण पैशाचें सोंग फार दिवस करतां येत नाहीं. त्यामुळें रूश्चेवला आपलें धोरण आमूलाग्र बदलावें लागलें. तात्पर्य, आमची अर्थव्यवस्था बदलल्याबरोबर समाजविषयक तत्त्वज्ञान बदलणें अपरिहार्य होतें. त्यांतूनच जुन्या श्रद्धांचा नायनाट झाला.

प्रत्येकानें काम केलें पाहिजे हा वृद्धया खोटा केलेला प्रचार लोकशाही

सरकारांस आत्मघात करणारा ठरणार आहे. देशांतील प्रत्येकानें उत्पादक काम करूं म्हटलें तर सरकारला प्रत्येकास काम देणें अशक्य आहे. त्यांतहि प्रत्येकजण म्हणजे कोण ? लोकशाहीच्या नाड्या आपल्या हातीं राहण्यासाठीं वैयक्तिक व आर्थिक स्वतंत्र्य दिल्यावर जो हातपाय हलवूं शकतो तो वा ती लहानापासून मोठ्यापर्यंत कामास उमेदवार होऊं शकते. त्या प्रत्येक व्यक्तीला काम मिळालें पाहिजे. सरकार तें देऊं शकलें नाहीं म्हणजे एवढे सर्वजण बकारांत जमा करण्याची पद्धति आहे. कोणत्याहि सरकारास अशा प्रत्येक व्यक्तीला काम देणें शक्य नाहीं. रशियानें कृत्रिम कामें काढून सर्व उमेदवारांस काम मिळवून दिलें. हें करण्यासमुद्धां रशियाला बरींच वर्षे खर्ची घालावीं लागलीं. पण रशियानें तोंपर्यंत भीक मागणें हा कायद्यानें गुन्हा ठरविला नव्हता. अर्थात् या कृत्रिम कामांतून रशियाचें उत्पन्न वाढूं शकलें नाहीं. तात्पर्य, देशांतील प्रत्येक माणसानें काम करूं म्हटलें तर सरकारचीच चारी दिशांनीं त्रेधातिरपीट उडेल. यांत्रिक युगांत ही कल्पना तर अगदी मूर्खपणाची आहे. त्यांतल्या त्यांत शेतीप्रधान आणि अमाप लोकसंख्या असलेल्या भारतांत या मूर्खपणास तोड मिळणार नाहीं.

परंतु आमच्या देशांत हा मूर्खपणा प्रतिष्ठितपणें चालू आहे, तो चालू राहावा म्हणून आमच्या समाजविषयक तत्त्वज्ञानाला तिलांजलि दिली. त्याग, भक्ति आणि सेवा हें आमचें समाजविषयक तत्त्वज्ञान होतें. या तत्त्वज्ञानाप्रमाणें प्रत्येकानें काम केलें पाहिजे असाच दंडक होता. पण हें काम औद्योगिक युगांतील कामाप्रमाणें अर्थोत्पादनासाठीं नव्हे तर आत्मशुद्धीसाठीं. त्याचप्रमाणें अर्थोत्पादन करून देणारें काम तेवढेंच काम हीहि कल्पना नव्हती. जें प्रत्यक्ष अर्थोत्पादन करून देत नाही आणि दिसत नाहीं असेंहि काम असूं शकतें. तेंहि बजावणें प्रत्येक व्यक्तीचें काम आहे. ही गोष्ट परिस्थितीनें नाडल्यावरच रशियांत आतां समजूं लागली आहे. औद्योगिक युगाप्रमाणें मुलगा मिळवता होऊन लग्न झालें म्हणजे स्वतंत्रपणें राहतो. अर्थात् म्हातारे आईबाप अर्थोत्पादन करूं शकत नाहींत व अडगळहि होतात. परंतु प्रत्येक वस्तू मिळविण्यास चार चार तास ओळींत उभे राहावें लागत असल्यामुळें व तसा वेळ मजूर झालेल्या तरुण जोडप्यांस नसल्यामुळें सोयीनेंच तेथें पुन्हां एकत्र कुटंब

पद्धति चंचुप्रवेश करूं लागली. म्हातारीं माणसें आतां विभक्त तरुण जोडप्यांस उपयुक्त वाटूं लागलीं. आणि मुलें सांभाळणें, ओळींत उभें राहून सामान आणणें अशीं अनुत्पादक कामें त्यांचेकडून करवून घेऊं लागली. आमच्या समाजविषयक तत्त्वज्ञानाप्रमाणें वयोवृद्धांनीं मार्गदर्शन, आतिथ्य, गृहव्यवस्था आणि देखरेख अशीं अनुत्पादक कामें करावयाचीं असतात. अर्थोत्पादन आयुष्यांतील विशिष्ट वयांतच करावें व तेंसुद्धां आवश्यक असलें तर. उतार वयांत अर्थोत्पादनाचा हव्यास न धरतां निवृत्त होऊन कमींत कमी गरजांत भागवून ईशचिंतनांत वेळ घालवावा. मुलांनीं विद्यार्जन हें माधुकरी मागून करावें. ज्याच्यावर संसाराची जबाबदारी नाहीं त्यानें खुशाल सन्यास घ्यावा किंवा भूतदयेनें प्रेरित होऊन सेवावृत्तीनें कांहीं समाजकार्य करावें व चरितार्थ माधुकरीवर भागवावा.

भिक्षा ही आमची श्रद्धा होती. या दृष्टीनें कीं आमच्या धर्माप्रमाणें संन्याशानें कशाचाहि संचय करावयाचा नाही. संचय करणें हा त्याच्या आध्यात्मिक साधनेंत अडथळा होता. त्यामुळें ज्यांनीं प्रत्यक्ष संन्यास घेतला नाहीं परंतु परमार्थसाधना हें ज्यांचें ध्येय होतें त्यांनींहि संचय दूर केला. या आदर्शाचा परिणाम समाजावर असा झाला कीं, समाजकार्य करणारे, एवढेंच काय जे वयानुपरत्वें आपल्या संसारांतून मनानें निवृत्त झाले तेहि संचय दूर करूं लागले. त्याचप्रमाणें ब्रह्मचाऱ्यानेंहि संचयापासून अलिप्त राहावयाचें असतें. विद्यार्जन हें अशा संन्यस्त वृत्तींत पुरें करावयाचें असल्यानें विद्यार्थ्यानें नोकरी करून पैसा मिळविणें अयोग्य होतें. या असंचयांत कर्तव्यबुद्धि होती आणि त्याग-बुद्धि होती. त्यामुळें विद्यार्जन काय किंवा कोणतेंहि सार्वजनिक कार्य काय, त्यांत द्रव्याचा लोभ किंवा उदरंभरणाचें साधन अशी भावना नव्हती. त्यामुळें अशा त्यागी पुरुषांबद्दल समाजास साहजिकच पूज्य भाव होता. अशा तऱ्हेनें एखादा भिक्षेकरी दाराशी आला तर तो कोणी सर्वसंग त्याग केलेला संन्यासी किंवा कोणी लोकहितकर्ता किंवा कोणी ब्रह्मचारी बटू असेल म्हणून मोठ्या अदबीनें यजमान किंवा यजमानीण भिक्षा घालीत असे. भिक्षा मागून राहणें ही गोष्ट सोपी नव्हती. ऐहिक जगाविषयीं निरिच्छा, निरपेक्षवृत्ति आणि अत्युच्च ध्येयाची साधना यांची तपश्चर्या

भिक्षेच्या मागें उभी असे. भिक्षा ही पोट भरण्याचें साधन म्हणून उपयोग करावयाचा नव्हता. तेव्हां लाचारी चर्येवर कुठून दिसणार? ज्या भिक्षेला थोर संत–महात्मे यांची पवित्र परंपरा आहे, अवधूत श्री दत्तमहाराज, विरागी सिद्धपुरुष नवनाथ, विश्वाची चिंता करणारे रामदासस्वामी इत्यादि सत्पुरुषांच्या भिक्षेनें जी झोळी कायमची पावन झाली आहे त्या झोळीत लाचारीचा वास कुठून येणार? ज्याप्रमाणें संपत्तीचें दान करणें ही भारतांतील नित्याची गोष्ट, पण कार्ल मार्क्सला तिनें आश्चर्याचा धक्का बसला व भारतांत कम्युनिझम जरूरहि नाहीं आणि शक्यहि नाहीं म्हणून भारतापासून तो दूर राहिला, त्याप्रमाणें भारताला समजावून घेतल्याशिवाय या भारतीय झोळीची उदात्तता पाश्चात्य उद्योगपतींना कशी समजणार?

भिक्षा नुसती श्रद्धाच नव्हती, भिक्षेंत अर्थशास्त्रीय अर्थहि भरलेला होता. काम करून दिला जाणारा एका माणसाचा पगार कमींत कमी कुटुंबांतील ३ ते ४ माणसें पोसतां येतील अशा हिशेबानें दिला जात असतो. कारण पगार हा काम करणाऱ्या एकट्या माणसाचा निर्वाह भागविण्यासाठीं नसतो. त्याच्या कुटुंबाचें पोषण एकट्याच्या पगारांत व्हावें असाच हिशेब समाजवादी राष्ट्रांतूनहि केला जातो. अशा स्थितींत त्याच्या कुटुंबांतील माणसेंहि काम करूं लागलीं तर तीं सर्व आणखी ३–४ माणसांची कामाची जागा अडवीत असतात. या तीनचार जणांत वयस्कर आईबाप असतील, बायको असेल, मुलेंहि असतील. या सर्वांनीं जरूर नसतांना काम करणें म्हणजे दुसऱ्यांच्या पोटावर पाय देणें होय. एवढेंच नव्हे तर संपत्तीची अकारण गोठवण करणें आहे. परंतु आर्थिक आणि वैयक्तिक स्वातंत्र्य त्यांस स्वस्थ बसूं देत नाहीं. भारतीय समाजविषयक तत्त्वज्ञानांत हें बसत नाहीं. शिकणाऱ्या मुलांनीं नोकरी केल्यास अहंकार निर्माण होईल; वर्तन बिघडेल, वृत्ति बेजबाबदार होईल, व याचा परिणाम विद्येवर होईल. विद्येचा दुरुपयोग होईल. काम करावयाचेंच असल्यास तें सेवावृत्तीनें व त्यागबुद्धीनें करावें. तें उत्पन्नाची बाब होऊं नये. युरोप–अमेरिकेंत बालगुन्हेगारी वाढण्याचें कारण मुलें स्वतः अर्थोत्पादन करून शिक्षण घेत असतात. कोणतीहि व्यक्ति सांस्कृतिक चाकोरींत ठाकठीक घडल्याशिवाय अर्थोत्पादन

करणें हा सामाजिक गुन्हा ठरविला पाहिजे. लांचलुचपत, कर्तव्यनिष्ठेचा अभाव, बेजबाबदारपणा आणि सुशिक्षितांतहि गुन्हेगारीवृत्तीची वाढ यांपासून सर्व्यांचीं सरकारें पछाडलीं आहेत. याचें कारण सांस्कृतिक चाकोरींत बदली गेल्याशिवाय कोणीहि व्यक्ति अर्थोत्पादन करूं शकते.

नोकरींतून एकदां निवृत्त झालेल्यांनीं पुन्हां नोकरी करणें, घरीं वेळ जात नाहीं म्हणून स्त्रियांनीं नोकरी करणें आणि स्वतःच्या पायावर उभें राहून विद्यार्थ्यांनी विद्यार्जन करावें म्हणून नोकऱ्या करणें या तीनहि गोष्टी सामाजिक गुन्ह्यांत मोडल्या पाहिजेत. या तिन्ही जातीच्या लोकांचा नोकरीच्या उमेदवारांत समावेश करतां कामा नये. विभक्त कुटुंब पद्धतीमुळें या तिघांचा समावेश बेकारांत होऊन बेकारीचा निष्कारण बाऊ केला जातो.

यांतच भर म्हणून शेती ही Unfashionable होऊन शेती पडीक टाकून शेतीचा मालकहि नोकरीच्या शोधार्थ शहरांतून हिंडत असतो. हा आणखी एक बेकार! वास्तविक एका शेतीवर अनेक जणांचें पोट भरतें. म्हणजे अनेक जणांच्या नोकरीच्या जागा रिकाम्या होतात. शेती-प्रमाणेंच निरनिराळे प्राप्तीवरील करांचे कायदे बेकारी वाढविण्यास मदत करीत असतात. प्रत्येक व्यक्तीनें स्वतंत्र राहावें अशीच करांची आंखणी केलेली असते. जे कोणी चुकून एकत्र राहात असतील त्यांसहि या करांमुळें वेगळें राहणें भाग पडतें. जे शेती सोडून आणि जरूर नसतांना बाहेर पडतात ते नोकरी पतकरून पराधीन होऊन गुलाम तरी होतात किंवा दलाली, वकिली, वैद्यकी, फडणीशी आणि जाहिरात–कलेसारखे इतर अनुत्पादक उद्योग सुरू करतात. हे अनुत्पादक उद्योगी देशाला धान्यहीन आणि निरुद्योगी बनवितात.

जे भिकारी धंदेवाले आहेत कीं ज्यांच्या जीवनांत पोटासाठीं भिक्षा मागण्यापलीकडे दुसरें ध्येय नाहीं याहि भिकाऱ्यांची गणना बेकारांतच करीत असतात. अशी भीक मागून आपला निर्वाह करणें हें केव्हांहि वाईटच. या भिकाऱ्यांत कांहीं धट्टेकट्टे, काम करण्यास लायक असेहि लोक असतात. त्यांनीं भीक मागून खाणें हें त्यांस व्यक्तिशः दूषणावहच आहे. परंतु त्यांची लाज आतां पार लयाला गेली आहे. किंबहुना जन्मतःच ते भिकारी झालेले

असतात. स्वभिमान अणि कष्ट या गोष्टी जणूं त्यांच्या जगांत नसतातच. हें सर्व खरें आहे. परंतु जोंपर्यंत आपण अजून ज्यांची लाज गेलेली नाहीं, स्वाभिमानाची टोंचणी सतत सलत आहे आणि जे रात्रंदिन कष्ट करीत आहेत, करण्याची तयारी आहे अशांना काम देऊन त्यांच्या गरजा भागवीत नाहीं—भागवूं शकत नाही—तोंपर्यंत ज्यांचा स्वाभिमान जन्मतः झोंपलेला आहे व जन्मजातच कष्ट करून खाण्याचा स्वभाव नाहीं अशांना हलवून जागें करावयाचें आणि मग त्यांस खावयास मिळत नाहीं म्हणून त्यांच्या जीवनाचा अन्त घडवून आणावयाचा यांत काय न्याय किंवा माणुसकी आहे? आधीं सलज्ज लोकांस काम मिळवून द्यावें व मग निर्लज्जांकडे मोर्चा वळवावा. अशा स्थितींत भिकाऱ्यांस समाजांतील जन्मजात दानबुद्धीचा फायदा करून देणें हेंच अर्थशास्त्रीय दृष्टचा हिताचें आहे. काम करून निर्वाह केलेल्या वृद्धांससुद्धां पाश्चात्य देशांतून वृद्धवेतन मिळतें. हीसुद्धां भिक्षाच नाहीं काय?

भिक्षा ही एक अत्यंत उपयुक्त संस्था आहे. परंतु तिचें तेज पडण्यासाठीं समाजांतील मूल्यें पुन तपासून घ्यावीं लागतील. आर्थिक स्वातंत्र्याच्या व व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनांना मुरड घालावी लागेल. शेतीला प्रतिष्ठा प्राप्त करून द्यावी लागेल. आणि कुटुंबसंस्थेचीं छकलें करणारे घटस्फोट, वारसा, प्राप्ति कर, इत्यादि कायदे बदलावे लागतील. आमची अर्थव्यवस्था चलनावर आधारलेली असल्यामुळें जीवनावश्यक वस्तूंची टंचाई व महागाई, अनावश्यक वस्तूंची मोठ्या कारखान्यांतून पैदास, अनुत्पादक व्यवसायांची भरमसाट वाढ या अनिष्ट गोष्टींचा फैलाव होऊन लोक केवळ चलनाच्याच मागें लागतात. त्यामुळें अर्थव्यवस्थेचा पाया बदलावा लागेल. असें झाले तरच समाजांतील नैतिक तत्त्वांना प्रतिष्ठा प्राप्त होईल आणि समाजाचीं रचना त्याग व सेवा यांवर उभारली जाईल. भारतीय राज्यघटना ही व्यक्तीच्या हक्कांवर आधारलेली असून सर्व कायदे त्या हक्कांच्या अंमल-बजावणीसाठीं तयार झालेले आहेत. त्यामुळें माणसाच्या मूळ स्वार्थ व कलह-बुद्धीला आवाहन केल्यासारखें होतें. याचें प्रत्यंतर, देशांतील निरनिराळे लोक गटागटानें एकदम येऊन किंवा व्यक्तिशः ते परस्परांशीं व सरकारशीं आपा-

पल्या हक्कबजावणीसाठीं भांडत असतात; प्रत्यक्ष जरूर नसली तरी केवळ कायद्यानें भांडण्याचा हक्क दिला आहे म्हणूनच वरीचशीं भांडणें होत आहेत. आणि सरकारहि जनतेशीं त्याच हक्काच्या जोरावर भांडत राहत आहे. पण चलनप्रधान अर्थव्यवस्थेंत, विशेषत: लोकशाहीच्या राज्यांत हें अटळ आहे.

भिक्षा या संस्थेचें महत्त्व चालू अर्थव्यवस्था बदलल्याशिवाय कळणार नाहीं आणि चालू अर्थव्यवस्थेंत भिक्षेशिवाय गत्यंतर नाहीं. समाजांतील प्रत्येक मनुष्यास काम देणें हें कोणत्याहि सरकारला शक्य होणार नाहीं. आणि मग तो ताण कमी करण्यासाठीं वृद्धवेतन, बेकार-भत्ता, कामगारविषयक कृत्रिम कायदे, बोनस, प्रॉव्हिडंट फंड, इत्यादि भिक्षेच्या नव्या आवृत्त्या तयार करतात. वानप्रस्थवृत्तीनें वृद्ध आणि संन्यस्तवृत्तीनें विद्यार्थी राहिले आणि सुखवस्तु स्त्रिया नोकऱ्या न करतील व गृहिणी म्हणून काम करतील तर समाजावरील केवढा आर्थिक ताण कमी होईल ! आम्हास वाटतें निम्म्या तरी बेकारांस काम मिळूं शकेल. पण कृत्रिम अर्थव्यवस्थेंत धोका असतो हें धोका येऊनहि आम्ही मान्य करणार नाहीं. लोकांच्या धर्मबुध्दीला वाव देऊन सहज, स्वेच्छेनें आणि कायम होतात त्या गोष्टी लोकांवर जाचक कर लादून आणि कायदे करून सफल होत नाहींत. सरकारला शिक्षणकर देण्यापेक्षां विद्यार्थी जर आपणहोऊन माधुकरी मागावयास लागले तर लोक आपखुषीनें माधुकरी घालतील.

# १७. प्रजाधिष्ठान राज्यपद्धति

पाकिस्तानमध्यें राज्यक्रान्ति होऊन प्रे. आयुबखान सर्वसत्ताधारी झाल्यावर लोकशाहीच्या ढांसळणाऱ्या बुरुजाला वास्तविक भारताच्या दृष्टीनें एक मोठा धक्का बसला होता. हें अंतर्यामीं पटूनहि राज्यकर्ते आणि त्यांचे राजकीय भाट असा देखावा करीत कीं हिंदुस्थानांतील लोकशाहीला ह्यामुळें भीति वाटण्याचें कांही कारण नाहीं. राज्यकर्ते स्वतःचें आसन सांवरण्याच्या दृष्टीनें ही सारवासारव करीत होते तर इतर राजकीय पक्ष उद्यां आपल्या वरहि ही पाळी येईल अशा भीतीनें राज्यकर्त्यांची री ओढीत होते. ह्यांत असाहि सूर होता कीं पाकिस्तानमधील हें एकतंत्री राज्य सर्वतोपरी अनिष्ट-कारक आहे. जरी तात्कालिक राज्यकारभार सुखाचा वाटला तरी तें लक्षण कांही शुभ नाहीं. आणि त्यामुळें पाकिस्तानच्या हिंदुस्थानविषयक धोरणांत यत्किंचित्हि फरक पडणार नाहीं.

ही सर्वच विचारपध्दति आत्मवंचना करणारी आहे. जो सदसद्विवेक करील त्याला जगांतील एकूण लोकशाहीचेंच स्थान किती ढांसळत चाललें आहे हें समजून येईल. जगातील एकूण देशांकडे आपण चोखंदळ नजर टाकल्यास असें दिसेल कीं, आतां लष्करी क्रान्ति झालेल्या देशांची संख्या भराभर वाढत आहे. एवढेंच नव्हे तर पुष्कळ ठिकाणीं आंतून क्रान्तीचें काय चालूहि असेल. स्वित्झर्लंड, इंग्लंड यांसारख्या देशांतील लोकशाही सोडून दिली तर इतर देशांत काय अवस्था आहे? पंचवीस वर्षांपूर्वी रशियांतील लोकशाहीची शंका घेणारा मनुष्य मूर्खांतच मोडला गेला असता. पण तिचें कपटी स्वरूप आतां एकदम उघडें पडलें आहे. अमेरिकेंत हिंदुस्थानप्रमाणेंच

लोकशाहीची कमी प्रमाणांत–पण विटंबनाच चालू आहे. पूर्वी जर्मनीचा व इटलीचा फॅसिस्ट म्हणून तिरस्कार करणाऱ्या रशिया, हिंदुस्थान, इ. देशांनी लोकशाहीला फॅसिझमची दासी बनविलें आहे. आतां लोकशाही हें जनतेच्या स्वराज्याचें व सुराज्याचें साधन राहिलें नसून सत्तालोलुप, महत्त्वाकांक्षी पक्ष-पुढाऱ्यांच्या फॅसिझमचें साधन झालें आहे.

पुढें येऊन हातीं सत्ता घेऊन राज्यकारभार सुरळीत चालवूं शकेल असा आजच्या काळांत फक्त लष्कर हाच एक देशाचा भाग शिल्लक राहातो; म्हणून लोकशाहीच्या बजबजपुरीच्या काळांत लष्करी क्रान्ति ही अटळ अवस्था आहे. कोणत्याहि पक्षानें आमच्या देशांत लष्करी क्रान्ति अशक्य आहे अशी ग्वाही देऊं नये.

दुसरें असें लष्करी सत्ता तत्काळ कितीहि चांगली वाटली तरी अंतिम ती वाईटच हें म्हणणें जनतेची दिशाभूल करणारें आहे कारण कीं ज्याला तात्कालिक चांगुलपणा म्हटलें आहे तो खरा तात्कालिक नसून वाटतो तितका सहजसाध्य व उपेक्षणीयहि नाहीं. जीवनावश्यक वस्तु योग्य किंमतींत भरपूर प्रमाणांत मिळणें, लांचखाऊपणा, काळाबाजार कमी होणें आणि सरकारी कारभार व न्याय जनतेच्या सोईचा व सुलभ होणें ह्या जनतेच्या गरजा तात्कालिक नसून चिरंतन स्वरूपाच्या आहेत, तशाच महत्त्वाच्या व दुर्लभ आहेत. ज्या देशांत ह्या गरजा भागविल्या जातात त्या देशांतील जनता ७५ टक्के सुखी म्हणावयास हरकत नाहीं. आणि ही गोष्ट आमच्या सरकारास कांहीं करतां येत नाहीं. नागरिक स्वातंत्र्य व सामाजिक न्याय वरील गरजांहून मोठ्या आहेत हें खरें; परंतु केवळ ३० टक्के जनतेसच स्वातंत्र्य व न्याय मिळावा अशी अपेक्षा हिंदुस्थानसारख्या देशांत करणें योग्य होणार नाहीं. सरकारी योजना जनतेच्या गरजांपेक्षां सरकारी गरजा आहेत. या योजनांमधून ज्या गोष्टी जनतेच्या जिव्हाळ्याच्या गरजा म्हणून भासविल्या जातात त्या गरजा कधीं भागविल्या गेल्या नाहींत. बेकारी नष्ट करणें, राहणीचें मान वाढविणें. लोकसंख्येला आळा घालणें, उद्योगधंदे वाढविणें, शेती उत्पादन वाढविणें, इ. प्रश्न पुढे ठेवून सरकारी योजना आंखल्या जातात. त्यांतील कांहीं प्रश्नांचा निष्कारण बाऊ केला जातो तर कांहींना

बेमालूमपणें बगल दिली जाते. अशा निष्फळ योजनांचा फांफटपसारा वाढवून त्यांवर खोटा प्रचार व व्यर्थ खर्च करण्यांत आमचें लोकशाही सरकार गुतलेलें आहे.

त्याचप्रमाणें पाकिस्तानांत लष्करी क्रांति झाली म्हणून त्याच्या हिंदुस्थानविषयक धोरणांत कांहीं फरक पडणार नाहीं. हाहि समज असाच अविचारदर्शक आहे. जणुं कांहीं पाकिस्ताननें राज्यक्रांति केली ती हिंदुस्थानच्याच हिताकरितां! कोणतेंहि सरकार आलें तरी तें हिंदुस्थानसंबंधीचें आपलें धोरण बदलणार नाहीं. धोरण बदलावें ही कल्पनाच मूर्खपणाची आहे. पाकिस्तानचा जन्मच मुळीं जेथें अविचारांत आहे तेथें त्याची भूमिका अविचाराचीच राहणार हें पाकिस्तानच्या जन्मदात्या हिंदु पुढाऱ्यांस कसें समजणार ? लोकशाहींत कोणताहि गुन्हा देशभक्तीच्या नांवाखालीं कसा पचला जातो ह्याचे पाकिस्तान-निर्मिति हें अनेक उदाहरणांपैकीं एक उदाहरण आहे.

तात्पर्य, जगांतील एकामागून एक होणाऱ्या लष्करी क्रांतींकडे आपणास दुर्लक्ष करून चालणार नाहीं. आधुनिक काळांत सुधारलेल्या राष्ट्रांतहि लोकशाहीचा मोहरा असा मागें फिरविला कां जातो याचा खोल व सारासार विचार करावयास हवा. लोकशाहीला आज आपण इतकें उचलून धरलें आहे त्या लोकशाहीचा पिंड कसा पोसत आला आहे व तो निरोगी आहे किंवा काय याची छाननी करणें उद्बोधक होईल.

"फ्रेंच राज्यक्रांतींतून लोकशाहीचीं तत्त्वें उदयास आलीं. भौतिक शास्त्रांच्या औद्योगिक प्रगतीमुळें युरोपांतील आर्थिक आणि सामाजिक घडी बदलूं लागली. वाफेवरचीं यंत्रें व कापडाच्या गिरण्या यांमुळें उद्योगपति व मजूर निर्माण झाले. पूर्वीचा सरदार वर्ग नामशेष होऊं लागला. पुढें यंत्र, वीज व रसायनशास्त्राचे औद्योगिक आणि शेतकी यांतील शोध यांमुळें आणखी एक औद्योगिक क्रांति झाली. औद्योगिक शहरें निर्माण झालीं. संपत्तींत बेसुमार वाढ झाली. जलद वाहतुकीचीं साधनें तयार झालीं व भांडवलाचा पुरवठा होऊं लागला. त्यामुळें जागतिक दृष्ट्या व्यापाराचें क्षेत्र वाढत चाललें. परंतु या जागतिक व्यापाराबरोबरच वारंवार मंदीची लाट

व बेकारी यांसहि सुरुवात झाली. या नवीन आर्थिक घडीचा परिणाम सामाजिक व राजकीय जीवनावर झाल्याशिवाय राहिला नाहीं. औद्योगिक शहरांतून लोकसंख्या वाढू लागली त्यामुळें शहरी लोकांत एक प्रकारची सामाजिक जीवनाची जाणीव निर्माण झाली. ते राजे व सरदार यांस दूर सारूं शकले. शैक्षणिक संस्था सुरू होऊन शिक्षणाचा फैलाव झाला. जीवनांत नव्या गरजा व नवीं साधनें वाढूं लागलीं, परंतु त्यांपासून समाधान मिळण्यापेक्षां नवीन वाढणाऱ्या गरजांमुळें व नवीन आकांक्षांमुळें जीवनांतील उणीवा जाणवूं लागल्या. त्यामुळें ठिकठिकाणीं असंतोष पसरला. आपल्या जीवनांत जाणवत असलेली कमतरता किंवा दारिद्र्य ही दैववशात् नसून सरकारच्या नाकर्तेपणामुळें आहे ही जाणीव भौतिक शास्त्रांच्या प्रगतीमुळें लोकांस आली. वदललेल्या आर्थिक व्यवस्थेंतील यांत्रिक कारखान्यांमुळें गरीब व श्रीमंत यांतील आर्थिक अंतर दोन टोंकांस जाऊन पोंचलें. या नवीन वर्गभेदामुळें लोकांतील असंतोषांत भर घातली गेली. अखेर कामगार संघ, साम्यवाद, समाजसत्तावाद, इ. संघटनांद्वारा या असंतोषास वाचा फुटली. यांतूनच पुढें लोकशाही सत्तेवर आली.

"लोकशाही एक राज्यघटनापद्धति आहे यापेक्षां आर्थिक प्रश्न सोडविण्याचा आणि सामाजिक चळवळीचा एक राजकीय मार्ग या दृष्टीनेंच फ्रेंच क्रांतीपासून जनतेची कल्पना झाली होती. त्या काळांत कांहीं देशांत आर्थिक प्रश्न सोडविण्याचे कामीं लोकशाहीचा चांगला उपयोग झाला. हा अपवाद सोडून दिल्यास लोकशाही राज्यें अयशस्वीच म्हणावी लागतील. एकीकडे श्रीमंतांची श्रीमंती वाढत होतीच तर दुसरीकडे अपुरें वेतन व वारंवार येणारी वेकारीची लाट देशांतील बहुसंख्य जनतेस भेडसावीत होती. सामाजिक सुधारणांबाबत मतदारांस दिलेलीं आश्वासनें सत्ताधारी पक्षांस पुरीं करतां आली नाहींत. अस्थिर सरकार व राजकीय पुढारी यांचेबद्दल जनतेंत अविश्वास निर्माण झाला. लोकशाहीचें तंत्र इतके चमत्कारिक होतें कीं देशापुढील इतर प्रश्न मागें टाकले गेले व मतदारांचा बुद्धिभेद झाला.

युरोपांतील इतर देशांतून कम्युनिझम फैलावत होता. इटलींत फॅसिस्ट व जर्मनीत नाझी पक्ष प्रबळ होऊन बसले होते. त्यांतच राजकीय पुढाऱ्यांनीं व लेखकांनीं भिन्नविभिन्न तत्त्वें प्रतिपादन करून जनतेंत वैचारिक गोंधळ माजविला. 'Laisses-faire' सारखीं हीं तत्त्वें कितीहि विद्वत्तापूर्ण आणि सद्‌बुद्धींतून निघालेलीं असलीं तरी जेव्हां तीं व्यवहारांत उतरविण्याचा राजसत्तानीं प्रयोग केला तेव्हां तीं चुकीचीं व घातक आहेत हें दिसून आलें. उदाहरणार्थ, अर्थशास्त्रांत मागणी तसा पुरवठा या नियमांसारखे जे परिस्थितिजन्य नियम असतात त्यामुळें उत्पन्न होणाऱ्या आर्थिक घडामोडींत सरकारने हस्तक्षेप करूं नये; सरकारनें कामगारांच्या हिताकडे, लोकांच्या घरबांधणीच्या गरजांकडे किंवा इतर सामाजिक प्रश्नांत ढवळाढवळ करूं नये, आणि औद्योगिक क्षेत्रांतील अनिर्बंध स्पर्धेनेंच सामाजिक प्रगति शक्य आहे, अशासारखीं तत्त्वें सरकारने स्वीकारल्यावर तीं समाजास अपायकारकच झालेलीं आहेत.

" पुढें डार्विननें जीवशास्त्रांत शोध लावले. त्याचीं तत्त्वेंहि राजकारणांत लावण्यांत चूकच झालीं. नॅचरल सिलेक्शन, स्ट्रगल फॉर एक्झिस्टन्स आणि सर्व्हायवल ऑफ दि फिटेस्ट या तत्त्वांनीं समाजांतील निरनिराळया वर्गांतील कलहांस मान्यता मिळाली मालकांनीं मालकांविरुद्ध अनिर्बंध स्पर्धा करावी, मजुरांनी मजुराविरुद्ध, एका वर्गाने दुसऱ्या वर्गाविरुद्ध अशा अनिष्ट स्पर्धांस उत्तेजन मिळत गेलें. सरकार यापासून अलिप्त राहात असे. याचीच पुढे परिणति होऊन एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राविरुद्ध प्राणांतिक झगडा करणें इष्ट वाटू लागलें. ही विरोधविकासाची प्रक्रिया नैसर्गिक असून ती अटळ आहे. प्रथम जरी ही प्रक्रिया दुष्ट वाटली तरी अन्तीं हितकारकच होईल याच कल्पनेमुळें कारखान्यांतूत वेतनमान कमी झालें, कामाचे तास वाढले, लहान मुलांस मजूर केलें गेलें आणि बेकारी भेडसावूं लागली.

पुढें मिलनें सरकारच्या अलिप्ततावादास ( Laisses-Faire ) मर्यादा घातली ( १८३३ ). परंतु स्पेन्सरनें या तत्त्वाचा पुन्हां जोरानें पुरस्कार केला ( Social Status, १८५१ 'Man versus the state ) तथापि जनतेनें स्पेन्सरच्या या मताचा तितकासा आदर केला नाहीं. जरी

सरकारचें बंधन दूर झालें तरी अर्थशास्त्राच्या तत्त्वाप्रमाणें प्रत्यक्ष व्यवहारावर परस्परविरुद्ध परिस्थितीचें बंधन पडतेंच हें पुढें अनुभवानें सिद्ध झालें. हळूं हळूं 'अलिप्ततावाद' मागें पडूं लागला. सरकारनें देशांतील व्यवहारापासून अलिप्त राहणें हें चूक होतें तर या तत्त्वाची जागा घेण्यास तितक्याच हिरीरीनें दुसरे विरुद्ध तत्त्व पुढें आलें, ते म्हणजे सरकारनें सर्व व्यवहार नियमित करणें. आतां व्यक्तिस्वातंत्र्यवाद जाऊन मार्कसचा समाजवाद पुढें आला होता. पुन्हा एकदां जनतेचा लोंढा या नवीन तत्त्वांकडे वळला. जणूं कांहीं हें नवीन तत्त्व म्हणजे 'तर्कशुद्ध' त्रिकालाबाधित व सर्व सामाजिक व आर्थिक समस्यांवर रामबाण औषध म्हणून सरकारनें याचा हिरीरीनें स्वीकार केला. परंतु शंभर वर्षांच्या अनुभवावरून वादविवादानंतर मार्कस्चें एकहि मूलभूत तत्त्व विचारवतांत मान्यता पावूं शकलें नाहीं. मार्कसचा राजकारणांत लावलेला हेगेलप्रणित युक्तिवाद, आर्थिक मूल्य (Economic Value), मानवसमाजासंबंधीचा त्याचा भौतिकवाद, इतिहासाला दिलेला अर्थशास्त्रीय रंग, सामाजिक क्रान्तीचा मार्ग, इ. पैकीं कोणतेंहि तत्त्व कसोटीला टिकलेलें नाहीं. तथापि समाजवादाची विद्वत्तापूर्ण मांडणी भोळ्या जनतेत प्रमाण मानली गेली. आणि त्रस्त जनतेच्या असंतोपाचा फायदा मिळून मार्कस्वाद प्रबळ होऊं लागला. परंतु रशियाला कडक मार्क्सवादामुळें जो फायदा झाला तो अन्य मार्गानेंहि मिळूं शकला असता. इतर देशांतून कम्युनिझमची प्रतिक्रिया सुरू झाली. राईट ऑ. सॅम्युएल म्हणतो,

"Communism has contributed not a little to create that confusion in European politics which has been a principal cause of the set-back to democracy."

युरोपांत लोकशाही ही चुकीच्या मार्गानें त्रस्त जनतेच्या चळवळीच्या पुढाऱ्यांवर चालत आली. तिला तात्त्विक अधिष्ठान कधीं मिळालेंच नाहीं. लोकशाही राज्यांची कमकुवत विचारप्रणाली लोकशाहीचें आसन अस्थिर करण्यास कारणीभूत झाली, त्याप्रमाणें लोकशाहींतील घटनात्मक दोषहि तितकेच कारणीभूत झाले. जपानच्या राज्यघटनेने लष्कर प्रबळ झाले,

जपानच्या लोकसभेंत जनतेचें प्रतिनिधित्व असलें तरी लष्कराच्या विशेषाधिकारामुळें वरचेवर उलथापालथ होऊन सरकार अस्थिर झालें. जर्मनींत अनेक पक्ष व अनेक मतदार संघ यांमुळें स्थिर मंत्रिमंडळ अशक्य होऊन पार्लमेंटपद्धति अपयशी ठरली. अमेरिकेनें इंग्लंडच्या राज्यघटनेच्या पावलावर पाऊल टाकलें. विधिमंडळ व न्यायालय हीं एकमेकांपासून पूर्ण स्वतंत्र असावींत या मॉंटेस्क्यूच्या तर्कदुष्ट विचारसरणीवर अमेरिकन घटनाकारांचा भरंवसा होता. परंतु वस्तुत परस्परांपासून पूर्ण स्वतंत्र असे घटक कधींच अस्तित्वांत येऊं शकले नाहींत. अमेरिकन घटनाकारांनीं हें तत्त्व अंमलांत आणलें आणि अमेरिकन राज्यघटना कांहीशी दुर्बळ व प्रसंगीं खटकणारी अशी करून ठेवली. अध्यक्ष व कॉंग्रेस हे वरेच वेळां परस्परविरुद्ध धोरणाचे येतात. या दोहोंचें धोरण एक झालें तर सुप्रीम कोर्ट आपल्या निर्णयानें त्याला सुरुंग लावतें. यामुळें अमेरिकेच्या लोकशाही प्रगतींत बराच अडथळा येतो. लोकसभापति श्री. अयंगार यांनीं एकदां दिल्ली येथील एका परिसंवादांत भारतीय राज्यघटनेंतील काहीं ढोबळ दोष सांगितले. ३८ कोटी जनतेच्या लोकसभेस ५०० प्रतिनिधि असतात. सभेला किमान संख्या ५० आहे. त्यांतील (सरकार पक्षाचे) २६ सदस्यांनी ठरावास संमति दिली म्हणजे तो कायदा होतो. ३८ कोटींचें भवितव्य या २६ जणांचे हातीं असतें. त्यांतहि हे २६ जण व ३८ कोटीजण यांच्यांत हित-मत यांचा परस्पर कांहींच संबंध नसतो. किंबहुना परस्परांच्या हितांत व मतांत वरेच वेळा विरोधहि असतो! याचा परिणाम असा होतो की राज्यकारभार जनतेच्या हिताचा होत नाहीं. मग राजकीय पक्षपुढारी व लोकशाही यांवरील जनतेचा विश्वास उडून जातो. अनुभवानें प्राप्त झालेला त्यांनीं दुसरा दोष असा सांगितला कीं सरकार लोकसभेच्या पकडींतून निसटण्याचा वारंवार प्रयत्न करतें. कायद्यांतच अशी तरतूद ठेवलेली असते कीं त्यामुळे उरलेला न्यायालयांचा मार्गहि खुंटतो. न्यायालयांवरील हें आक्रमण व लोकसभेला डावलण्याची वृत्ति भारतीय लोकशाहीस धोका उत्पन्न करणारी आहे.

भारतांत तरी बहुमत म्हणून सत्तेवर येणारा एकूण जनतेच्या जेमतेम ३०

टक्के मतें मिळवून आलेला असतो. तीं तीस टक्के मतें तरी कितपत खरीं असतात याची अनुभवानें जबरदस्त शंका येते. याचा परिणाम देशाचा पंतप्रधान निवडण्यावर होतो. आपल्या देशाची तरी घटना अशी आहे कीं देशाचा पंतप्रधान हा एका लहानशा प्रांतामधून प्रथम निवडून येतो व नंतर मोजक्या लोकाच्या गटानें त्यास निवडून दिलेलें असतें. यांत अखिल देशांतील जनतेचा कांहीं संबंध येत नाहीं जनतेला तो नको असला तरी निमूटपणें मानावा लागतो. शिवाय पंतप्रधानाच्या निवडीच्या मर्यादाहि फार. जो स्वतः उभा राहतो व ज्याला त्याच्या पक्षाचा गट निवडून देतो त्यास सर्व जनतेस पंतप्रधान म्हणून मानावें लागतें. म्हणजे जनतेला जो हवा तो निवडून देतां येत नाहीं. पुष्कळ वेळां–म्हणजेच–पक्षांच्या विशिष्ट पुढाऱ्यांच्या व्यतिरिक्त देशांत पुष्कळ कार्यक्षम व अधिक पात्र अशा व्यक्ति असतात. परंतु निवडणुकीचें हें तंत्र आड येत असल्यामुळें जनता त्या व्यक्तीस निवडून देऊं शकत नाहीं. कांहीं पक्षपुढारी व इतर कार्यक्षम व्यक्ति मोकळेपणानें जनतेपुढें ठेवल्यास जनतेचा कौल भलताच लागण्याचा संभव आहे ! जनतेचे प्रतिनिधी लोकसभेंत असतात. लोकसभेनें दिलेला निर्णय म्हणजेच जनतेचा निर्णय. ही भाषा तात्त्विकदृष्ट्या किती खरी असली तरी लोकसभेचा निर्णय व प्रत्यक्ष जनतेचा निर्णय यांत जमीन-अस्मानाचें अंतर पडतें. लोकसभेच्या सभासदांनीं दिलेला निर्णय म्हणजे लोकसभेच्या बहुमतानें दिलेला. बहुमत म्हणजे सरकारपक्षाचें मत. याचा अर्थ एकदां एका बारीक गटानें पंतप्रधानाची निवड केली म्हणजे तो म्हणेल तें प्रमाण. आणि सरकारचा निर्णय हा बहुधा जनतेच्या विरुद्धच असतो. जोपर्यंत निर्णयास सरकारपक्षाव्यतिरिक्त इतर पक्षांच्या अमुक एका मतसंख्येची आवश्यकता घटनेंत नाहीं आणि महत्त्वाच्या प्रश्नावर तत्संबंधी जनतेचे अनुकूल मत घेतलेलें नाहीं तोंपर्यंत अमुक एक कायदा हा लोकसभेनें संमत केला आहे या म्हणण्यांत अर्थ नाहीं. तांत्रिक बहुमतामुळेंच सत्ताधारी पक्ष आपल्या पक्षीय राजकारणाच्या सोयीप्रमाणें घटना बदलूं शकतो, निवडणुकीसंबंधीं, पक्षास मतें मिळण्याच्या दृष्टीनें सोयीस्कर असे कायदे करूं शकतो. यामुळें सरकार-

पक्ष पुन्हा निवडणूक जिंकतो. यासारखी लोकशाहीची दुसरी विटंबना नाहीं. एका विशिष्ट प्रश्नावर जननेंत प्रक्षोभ निर्माण होणें वा सत्याग्रह करण्याची परिस्थिति निर्माण होणें म्हणजे लोकशाही स्वराज्याची चेष्टा होय.

या घटनात्मक दोषांप्रमाणेंच ' राजकीय पक्ष ही लोकशाहीला चिकटलेली एक अटळ आपत्ति आहे. ' जगांतील निरनिराळ्या राज्यकारभारांचा अभ्यास केला म्हणजे उत्तम राज्यकारभाराची यंत्रणा एकाच पद्धतीनें चालते हें समजेल ( For forms of Government let fools contest what'er is best administered is best.--Pope ). राज्यकारभाराचीं तत्त्वें देशकालपरिस्थित्यनुसार वदलत जातात. त्यांत वास्तविक अमुक एका पक्षाचा विशिष्ट आग्रह धरून चालत नाहीं. असें असतां सत्तांकित पक्षाव्यतिरिक्त इतर पक्षांस कांहीं वेगळें तत्त्व असणें संभवत नाहीं. म्हणूनच पक्षाचें तत्त्वज्ञान आणि प्रत्यक्ष राज्यकारभार ह्यांत तफावत पडते आणि ती तफावत जनतेला जाणवून पक्षास धक्का पोंचूं नये म्हणून तत्त्वांच्या नांवाखालीं भोंगळ व असत्य भाषा, मूर्ख कल्पना व एखाद्या वकीलाला लाजवतील अशा शब्दार्थाच्या कोलांट उड्या ऐकून घेण्याची जनतेवर पाळी येते. अशा स्थितींत सर्व राजकीय पक्षांचें ध्येय ठरतें तें हें कीं सत्ता काबीज करणें. परंतु एकहि पक्ष असा दिसत नाही कीं जो सुसघटित व सुसज्ज असून तात्त्विक व व्यावहारिक भक्कम पायावर उभा आहे आणि जो सत्ता घेऊन राज्यकारभार सुरळीत चालवूं शकेल. लोकशाहींतून यामुळें अराजकाचें वातावरण निर्माण होतें.

" पक्ष हा असलाच पाहिजे. तो कार्यक्षम सरकारचें एक अंग म्हणून राहावा. पण जनतेच्या हितापुढें पक्ष गौणच ठरावा. प्रसंगीं जनहिताकरितां त्या पक्षाचें विसर्जनहि झालें पाहिजे." देशहित हें जर सर्व पक्षांचें ध्येय असेल तर इंग्लंडप्रमाणें आणीबाणीच्या वेळीं सर्वपक्षीय सरकार यशस्वी होऊं शकेल. परंतु फ्रान्स, जर्मनी, इटली आणि स्पेन या देशांत सर्वपक्षीय सरकार गडगडलें आणि तेथें लोकशाहीला उतरती कळा लागली. पुष्कळ वेळां राजकीय पक्ष नादान आणि अप्रामाणिक लोकांचे हातांत जातात. पक्षांत अंतर्गत फूट पडून अनेक गट तयार होतात व पक्ष कमकुवत होतो. देशाच्या

आणीबाणीच्या प्रसंगीं, ज्यावेळेस सर्व पक्षांचें ऐक्य अवश्य असतें, अशा वेळेस आपसांत वादतंटे कायमच राहून शेवटीं देशाचा नाशहि होण्याचा संभव असतो.

लोकशाहीचा इतिहास व तिच्यांतील अनुभवसिद्ध अंतर्भूत दोष आपण पाहिले. आतां आपल्या देशाच्या दृष्टीनें लोकशाहीच्या मलभूत तत्त्वांत दोष काय आहेत तें पाहूं.

प्रत्येक व्यक्तीनें देशाच्या राजकीय व्यवहारांत भाग घ्यावा किंवा त्याला त्या विषयांत बौद्धिक अंग असतें ही कल्पना चुकीची, अशक्य व घातक आहे. प्रत्यक्ष व्यवहारांत तर या कल्पनेचें निखालस विडंबन होतें हें आपण निवडणुकांतून पाहातच आहोंत. याच कल्पनेमुळें राजकीय पक्ष आपआपले अनुयायी जमवितात, देशभक्तीच्या नांवावर अनेक तरुणांचें जीवन बरबाद करतात आणि बरीचशी जीवनशक्ति पक्षांपक्षांतच लढण्यांत व्यय होते.

जणूं कांहीं देशांतील प्रजेला राजकीय चळवळीव्यतिरिक्त दुसरें जीवनच नाहीं. सामाजिक व वैयक्तिक जीवनांत राजकारणच भरलेलें आढळतें. परंतु हें राजकारण सामाजिक व वैयक्तिक जीवनाच्या समस्या सोडवूं शकत नाही. मनुष्याच्या जीवनांत शिक्षण आणि व्यवसाय या दोहोंनीं सर्व जागा पटकावलेली असते. तथापि राजकारण त्यावर मात करून शिक्षणाचा खेळखंडोबा व व्यवसायाचे तीन तेरा करून टाकतें कांहीं थोडे लोक राजकारणाच्या वाहत्या गंगेंत आपले हात धुवून घेतात, पण सर्वसाधारण जनतेस स्वतःचे जीवन स्वतंत्रपणें जगणें कठीण होतें. वस्तुतः देशकारण हें केवळ संबंधीं लोकांनींच चालवावयाचें आहे. त्यांत इतरांची कांहींहि जरुरी नाहीं. लोकशाही म्हणजे लोकांनी राज्यकारभार चालविणें. लोकांनीं राज्यकारभार चालवावयाचा म्हणजे स्वतःच्या जीवनाचा व राज्य--कारभाराचा नाश करण्यासारखें आहे. हें विधान निदान आमचे देशावरून तरी करण्यास हरकत नाहीं.

लोकशाहींत प्रत्येकाच्या मताचा आदर केला पाहिजे, प्रत्येक व्यक्ति समान व प्रत्येक मताला सत्तेवर येण्याचा अधिकार आहे या कल्पनेमुळें

देशाचा राज्यकारभार अधिकच कठिण करून ठेवला आहे. यामुळेच निरनिराळ्या पक्षांना मान्यता मिळूं शकते. एखादा पक्ष देशद्रोही मताचा आहे हें माहीत असूनहि त्यावर सर्रास बंधन घालतां येत नाहीं. भिन्न भिन्न पक्षांतील यादवी सार्वमतमान्यतेमुळेंच उद्‌भवते. ह्याचाच परिणाम सामाजिक जीवनावर होऊन सराईत गुन्हेगारसुद्धां एकाद्या सभ्य नागरिकाप्रमाणें संभावितपणें आपली तार्किक बाजू मांडूं शकतो. कोणत्याहि मतास मान्यता म्हणजे तें मत मांडणारा अपरिपक्व, मूर्ख, द्रोही अगर घातक असला तरीहि तो केवळ सूक्तासूक्त प्रचारानें आपल्या मताला जनतेंत प्रतिष्ठा मिळवूं शकतो. संस्कार आणि विद्या यांचेद्वारां तत्त्वशुद्ध मत तयार होणें ही क्रियाच बंद होते. लोकशाहीचा कारभार बहुमतानें चालतो हेंहि साफ खोटें आहे तो नेहमीं अल्प मतानेंच चालत असतो त्यांतहि एक विशिष्ट गटच पक्षानुयायांच्या मतांची पर्वा न करितां कारभार करीत असतो. सत्तेवर येणारा पक्ष जरी सर्व पक्षांत जास्त मतें मिळविणारा असला तरी त्याचीं मतें एकूण सर्व पक्षांच्या मतांचेहून कमी असूं शकतात. म्हणजे कारभार करणारा पक्ष हा अल्प मतांत असून त्याच्या व्यतिरिक्त पक्ष हे बहुमतांत असूं शकतात.

लोकशाहींतील मताधिकार हा शिक्षणावर, पेशावर, सुसंस्कृतपणावर किंवा राजकारणाच्या अभ्यासावर नसून वयांत आलेल्या सर्व स्त्रीपुरुषांस असल्यामुळें व सुसंस्कृत व सुशिक्षित स्त्रीपुरुष विरळाच असल्यामुळें जो उमेदवार सामान्य मनुष्यांचीं मतें मिळवूं शकतो तोच निवडून येतो. अशा मतदारांच्या मतांवर निवडून येणाऱ्या उमेदवाराची पात्रताहि तशीच असणार. म्हणून राज्यकारभार हा निकृष्ट माणसांचेच हातीं जातो. सुमारे १९३५ मध्यें प्रसिद्ध विचारवंत डॉ. कॅरेल यानें असा शेरा मारला आहे कीं जगांतील लोकशाही राष्ट्रांतील मुत्सद्यांची पातळी अगदीं खालावत चालली आहे व लोकशाहीची परिस्थिति चिंताजनक आहे. आतां तीस वर्षांनंतर नेत्यांची काय अवस्था असेल याची कल्पनाच केलेली बरी !

लोकांच्या मतावर निवडून यावयाचें असल्यामुळे संबंधी लोकांना खूष ठेवणें हा सत्ताधारी पक्षाचा एक अटळ व्यवसाय होऊन बसतो. त्याच-

प्रमाणें कोणताही राजकीय पक्ष पैशाचे अभावीं आपली संघटना व प्रचार करूं शकत नाही. भांडवलदार व राजकीय पक्ष यांचे विशिष्ट संबंध अनिवार्य आहेत. म्हणून राज्यकारभार व्यापाऱ्यांचे हितसंबंधानुसार चाललेला असतो. लिमिटेड कंपन्यांनीं राजकीय पक्षांस मदत करण्याची मुभा देणारा कायदा म्हणजे उघड उघड दरोडेखोरी आहे. हा कायदा म्हणजे निवडणुकीसाठीं व्यापाऱ्यांचेकडून घेतलेल्या लांचेला बिनधोक करण्यासारखें आहे. लोकशाहीतील राजकीयपक्ष निरपेक्षपणें व निःपक्षपातीपणें राज्यकारभार करूं शकत नाहीं. कारण तो पक्ष देशांतील कोणत्या तरी एका गटाशीं हितसंबंधानें बद्ध झालेला असतो. या गटाच्या जोरावरच तो पक्ष पुढें आलेला असतो. म्हणून लोकशाही सत्ताधारी पक्षानें समाजवादासारख्या घोषणा करणें फोल आहे. असा पक्ष काळाबाजारवाल्यांस फांशीं देऊं म्हणतो पण फांशीं देत नाहीं. साठेबाजांस देशद्रोही म्हणतो पण देशद्रोही ठरवीत नाहीं. कर चुकविणारे गुन्हेगार आहेत असें दरडावतो पण त्यांस कोर्टांत खेंचीत नाहीं. उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयकरण करणार म्हणून गर्जना करतो पण शेवटीं पळवाट काढीत काढीत ती गर्जना तो विसरावयास लावतो. एवंच लोकशाही म्हणजे कांहीं लोकांनीं कांहीं लोकांचेकरितां सर्व लोकांवर गाजविलेलें राज्य.

लोकशाहींतील राज्यकर्ता लोकांनीं निवडलेला असतो आणि लोकांना पाहिजे असेल तर तो बदलतांहि येतो. लोकाभिमुखी म्हटल्या जाणाऱ्या लोकशाहीचा हा एक डिंडिमा वडविला जातो. परंतु राज्यकर्ता खऱ्या अर्थानें लोकांच्या निवडीचा कसा नसतो हें आपण वर पाहिलेंच आहे. लोक राज्यकर्ता बदलूं शकतात हेंहि तितकेंच खोटें आहे. लोकशाहीमुळेंच एकेक पंतप्रधान दहा-दहा वीस-वीस वर्षे अनेक पातकें करूनहि पंतप्रधानकीवर लोकांना नको असला. तरी राहूं शकतो.

लोकशाही कारभारांत गुणी माणसें यावींत असें अभिप्रेत आहे. परंतु लोकशाहींतील पौरोहित्य पक्षपुढाऱ्यांकडे असतें. त्यांनीं आपल्या पक्षांत गुणी माणसेंच घ्यावींत असा त्यांचेवर दंडक नाहीं. प्रचाराला जो उपयोगी पडेल त्या गुंडाला पुढारी जवळ करतात. त्यालाच उमेदवारी बहाल केली जाते. त्यांत एखादा गुणी येऊं शकेल. परंतु तो पक्षाच्या तंत्रांत ठाकठीक

बसता झाला तरच त्याचें पाऊल पुढें सरकलें म्हणावें. तात्पर्य, पक्षांत केवळ गुणी व कार्यक्षम माणसेंच घेतलीं जातात असें नाहीं. किंबहुना त्याना फार कमी महत्त्व असतें. लोकशाही राज्यांत बहुधा पक्ष हेंच एक प्रवेशद्वार असतें. गुणीजनांना तें बंद झालें तर लोकशाहींत गुणी माणसें अडगळींत पडल्यास नवल काय ? बरें, गुणी माणसांनीं स्वतंत्र उभें राहावें किंवा स्वतत्र पक्ष स्थापन करावा तर गुणी माणसांच्या स्वभावात ही उठाठेव बसत नाहीं असा जगाचा आजपर्यंतचा अनुभव आहे. मागे राहणें किंवा स्वत.च्या गुणाची जाहिरात न करणें हा त्यांचा स्वभावच असतो. त्यांना कोणी तरी आवाहन करावें लागतें. त्यांची योग्य ठिकाणी योजना करुन उपयोग करुन घेणारा कोणी तरी योजक लोकशाहींत लुप्त झाला आहे. त्यांचा उपयोग केला गेलाच तर तो देशाच्या नव्हे तर पक्षाच्या आणीबाणीच्या वेळीं केला जातो. पक्षाचें काम झालें किंवा त्याच्यामुळें पक्षाच्या हितसंबधास बाध येतो असे दिसलें कीं, तो देशाच्या दृष्टीने कितीही उपयुक्त असला तरी, त्याला बाजूला सारलें जातें. लोकशाहीच्या यशास गुणी माणसें अभिप्रेत धरलीं आहेत, पण प्रत्यक्षांत लोकशाही आणि गुणी माणसें यांचा छत्तिसाचा आंकडा दिसतो ! डॉ. कॅरेलच्या उपरिनिर्दिष्ट विधानाची कारणमीमांसा कदाचित, ही असू शकेल,

लोकशाहीतील हे सर्व दोष लोकशाहीच पाहिजे या अट्टाहासामुळें आलेले आहेत. वास्तविक लोकशाही ही राज्यकारभाराची अनेक पद्धतीपैकीं एक पद्धति आहे. देशांतील जनता ज्या प्रतीची असेल त्याप्रमाणें राज्यपद्धति त्या देशाला लावली गेली पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत कोणतीही किंमत देऊन लोकशाहीच स्वीकारली पाहिजे असा त्रिकालाबाधित गुण लोकशाहींत नाहीं. युरोपांतील भौतिक झगझगाट पाहुन आमचे डोळे दिपून गेले व अंधपणें जीं अनेक खुळें युरोपपासून आज शंभर वर्षे घेत आहोंत त्यांपैकीच लोकशाही हें एक खूळ आहे. ही लोकशाही इंग्लंडपासूनहि घेतली नाहीं तशी प्राचीन भारतापासूनहि नाहीं. ही फ्रेंच व रशियन राज्य-क्रान्तींतून आम्ही घेतली. त्या क्रांत्या जुलमी राजशाहीच्या प्रतिक्रिया होत्या हें कांहीं आम्ही जाणू शकलों नाही. प्रतिक्रिया कधींहि मूलभूत तत्त्व होऊं

शकत नाहीं लोकशाही या शब्दांतच प्रतिक्रियेचें प्रतिबिंब ओतप्रोत भरलेलें आहे. लोक हा शब्द आम्ही युरोपीय क्रांतींतील लोकप्रिय शब्द पीपल या शब्दापासून घेतला. शाही या शब्दात राजशाहींतील मदान्ध सत्तेचाच वास येतो. राजाच्या सत्तेऐवजी लोकांची सत्ता एवढाच फरक. जुलूम असतो तो सत्तेंत असतो. माणसांच्यांत नसतो. माणूस बदलला म्हणून जुलूम टळला असें होत नाहीं. राजाचा जुलूम जाऊन मंत्र्यांचा जुलूम आला हाच काय तो फरक! मंत्री महत्त्वाकांक्षी असला म्हणजे तो हुकुमशहा होतो व कर्तृत्ववान् नसला म्हणजे तो नालायक ठरतो. परंतु जुलूम जाऊन केवळ लोककल्याणच राहील असें तत्त्व क्रांतींतून निपजूं शकलें नाही. निपजलें असलें तर तें लोकशाहीच्या धुमधडाक्यांत डोके वर काढ़ शकलें नाहीं.

लोकशाही म्हणजे डेमॉक्रसी डेमॉक्रसी म्हणजे लोकाभिमुखी राज्यपद्धति. लोकाभिमुखता हा मनुष्यस्वभावाचा गुण आहे. तो इंग्लंडशिवाय इतर देशांत आढळत नाहीं. इंग्लंडमध्येंच लोकशाही यशस्वी झाली आहे असें म्हणावें लागेल. याचें श्रेय लोकशाहीला नसून तेथील जनतेच्या लोकाभिमुख स्वभावाला आहे.

लोकांपासून जास्तींत जास्त अलिप्त राहून त्यांचे व्यवहारावर नियंत्रण ठेवणारी राजसत्ताच निरपेक्ष आणि निपक्षपाती कारभार करूं शकते. लोकशाही नेमकी या तत्त्वाच्या विरुद्ध आहे. राजसत्तेचें स्वरूप शक्यतों एकमूर्ती, एकमुखी असें आटोपशीर असावें. कारण राजसत्ता ही संस्था अशी आहे कीं तीवर अनेक जीव अवलंबून असतात. अशा वेळीं जितक्या जणांचे हातीं कारभार असेल तितक्या जास्त प्रमाणांत कारभारी मनुष्यांच्या दैव-वशात् मिळणाऱ्या चांगुलपणावर अनेक जीवांना अवलंबून राहावें लागतें. कदाचित् हा चांगुलपणा क्वचित् जुळून आला तरी तेवढ्यावरून तो सर्व-काळ जुळेल असें नाहीं. आणि असें नसलें म्हणजे बहुमुखी राजसत्ता पशु-तुल्य मानवी सहजप्रवृत्तींवर चालत असते. अशी राजसत्ता–तिनें कितीहि लोककल्याणाची वल्गना केली तरी–व्यक्तींच्या सहजप्रवृत्तीपलिकडे जाऊं शकत नाहीं. त्यांतहि बहुमुखी राजसत्तेंत समाजांतील शक्य ती सर्व सत्ता

एकवटून आलेली असते. त्यामुळें समाजाचें अहित सुलभतेनें होतें. असें अहित झाल्यास त्याची तक्रार कोणाकडे गुदरणार? कारण बहुमुखी सत्ता म्हणजे लोकांचीच सत्ता. कोण तक्रार करणार आणि कोण शिक्षा करणार? वास्तविक राजसत्तेचें कार्यक्षेत्र फार मर्यादित आहे. पण लोकशाहींत लोकांना आकर्षून घेण्यासाठीं आणि लोकांवर अधिकाधिक सत्ता गाजविण्यासाठीं राजकीय पक्षांनीं व त्याच्या सरकारांनीं आपले समाजव्यापी कार्यक्रम जनतेपुढे ठेवले. कायदा करणें, व्यापार-उदीम करणें, कायदे करून लोकांच्या खाजगी जीवनांत ढवळाढवळ करणें, चलनांचा पुरवठा करणें आणि अंतर्बाह्य संरक्षण आणि शांतता राखणें यामुळें आजच्या राजसत्तेंत सत्तालोभाचा परिपाक दिसतो

वास्तविक भारतीय राज्यशास्त्राप्रमाणें राजाला कायदे करण्याचा अधिकारच नाहीं. शास्त्रोपंडितांनीं दिलेल्या निर्णयांची अंमलबजावणी पाहणें एवढेंच राजाचें काम. व्यापार उदीम करून राज्याचें दिवाळें काढणें हेंहि राजाचें कार्य नाहीं. लोकांच्या खाजगी जीवनांत ढवळाढवळ करण्याचें तर राजाला कांहींच प्रयोजन नाहीं. संरक्षण, शांतता आणि सुव्यवस्था एवढ्यापुरतेंच राजसत्तेचें कार्यक्षेत्र मर्यादित आहे आणि असें असेल तरच जनतेंतील महत्त्वाकांक्षी व्यक्तींना असलेल्या राजसत्तेचा लोभ निर्माल्यवत् होईल आणि मग लढाया करून पराक्रम गाजविणें हा केवळ कांहीं शूरांचा शोक होऊन बसेल. आज निरपराधी जनता राष्ट्र या खोट्या कल्पनेपायीं युद्धाच्या खाईंत कायम भरडली जात आहे त्यांतून तिची सुटका होईल. लोकजागृति, लोकस्वातंत्र्य, लोकसत्ता, लोकराज्य या कल्पनांनीं एके काळीं युरोपीय जनता भारली होती. परंतु लोकशाहीच्या सुमारें १५०-२०० वर्षांनंतर तीच युरोपीय जनता राजकीय पुढाऱ्यापासून अलिप्त राहूं पाहत आहे. त्या जनतेला 'राष्ट्रीय राजकारभार', 'राष्ट्रीय जीवन', 'राष्ट्रीय अभिमान', 'राष्ट्रीय तत्त्व', आणि 'राष्ट्रीय कर्तव्य' यांचा आतां वीट आला आहे. या 'राष्ट्रीय पुढाऱ्यां' पासून व त्यांतून उद्भवणाऱ्या जागतिक युद्धांसारख्या आपत्तींपासून निवारण कसें करावें या विवंचनेंत ती जनता आहे. आतां दिवसानुदिवस अशी वेळ येत आहे कीं, जगांतील, राष्ट्रांतील जनता एकत्र

येऊन त्यांच्या राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेविरुद्ध एक आवाज निर्माण करील. हिंदुस्थानांत लोकशाहीचा अनुभव नवीनच असल्यामुळें अद्यापि युरोपमधील ही अवस्था इकडे यावयाची आहे. परंतु ही तिची चाहूल मात्र लागली आहे हें निश्चित. युरोपीय बांधवांना मिळालेला धडा आपण जितक्या लवकर शिकूं तितक्या लवकर आपला सर्वनाश टळेल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 73883 वि: आ.व्या
क्रमांक 2079.

# १८. सेक्युलर स्टेट

सेक्युलर राज्य ही खुळचट पण केवळ सत्तेच्या बळावर प्रबळ झालेली कल्पना आहे. या कल्पनेस तात्त्विक अधिष्ठान नाहीं. ज्या पाश्चात्त्यांकडून ही उसनवारी घेतलेली आहे त्या पाश्चात्यांच्या इतिहासांतहि आम्ही ज्याला सेक्युलर म्हणून डोक्यावर घेतों तशी कल्पना सांपडत नाहीं. ही स्वदेशी कल्पना तर नाहींच नाहीं. ही जर कांहीं असेल तर आमच्या इतिहासावर श्रद्धा नसल्याचें आणि आमच्या इतिहासाचा अज्ञानयुक्त निरभिमान असल्याचें हें एक जगांतील श्रेष्ठ राष्ट्रीय प्रतिक आहे !

पूर्वी यूरोपवर किंवा ख्रिश्चन जगावर ख्रिस्ती धर्मगुरु पोप याचें राज्य असे. म्हणजे असें कीं, पोप हा जरी धर्मगुरु असला तरी त्याची केवळ धर्माचे बाबतींत सत्ता चाले असें नाहीं, तर राजसत्ताहि पोपचेच हातीं असे. देशोदेशींचे निरनिराळे राजे असले तरी त्या त्या देशींच्या पोपच्या प्रतिनिधीचें म्हणजे बिशपचे हुकुमावरून राजा राज्य करीत असे. परराष्ट्र राजकारण आणि लढायासुद्धां पोपच्या धोरणाप्रमाणेंच चालत. पुढें कांहीं राजे व पोप यांच्यांत कांहीं कारणानें वितुष्ट निर्माण होऊन पोपविरुद्ध बंड झालें. इंग्लंडचा राजा आठवा हेन्री हा या बंडखोरांत प्रमुख होता. पोपची सत्ता झुगारून देणें इंग्लंडसारख्या बलाढ्य देशासहि सोपें नव्हतें. कालांतरानें आठव्या हेन्रीनें पोपपासून स्वातंत्र्य मिळविलें व इंग्लंडवर इंग्लंडच्या बिशपची सत्ता चाले ती संपुष्टांत येऊन आठवा हेन्री स्वतंत्र राज्य करूं लागला. या बंडखोरीलाच सेक्युलर राज्य असें म्हणतात. हळू

हळू ही साथ सर्वत्र पसरली. बहुतेक सर्व यूरप पोपपासून स्वतंत्र होऊन सेक्युलर झाला. सेक्युलर या शब्दाचा अर्थ आणि इतिहास वास्तविक हा असा आहे.

१९४७ च्या ब्रिटिशांच्या निर्गमनानंतर आमचें राज्य हें सेक्युलर राज्य आहे अशी घोषणा करण्याचें कारण काय पडलें तें समजत नाही. सेक्युलर म्हणविल्यानें शंकराचार्यांविरुद्ध आपण सरक्षण मिळविलें काय? सत्तेला प्रतिस्पर्धी म्हणून जुन्या संस्थानिकांची सरकारला ज्याप्रमाणें भीति वाटे त्याप्रमाणे हिंदुस्थानांतील शंकराचार्यांची चारी पीठें उठाव करून अनायासें आपल्या हातीं आलेली सत्ता बळकावतील अशी तर सरकारला भीति वाटली नाहीं ना? कीं येथें राहिलेल्या ख्रिश्चनांकरवी पोप आपली हिंदुस्थानांत गाजविणार होता?

हिंदुस्थानचें राज्य जोंपर्यंत कोणत्या एका धर्मगुरूच्या हातीं गेलें नाहीं व त्यास शह देण्याची पाळी आली नाहीं तोंपर्यंत आम्ही सेक्युलर आहोंत या म्हणण्यास अर्थ नाहीं. सेक्युलरचा विरुद्ध पक्षी अर्थ धर्मगुरूची सत्ता असा होतो. राज्यांत कोणत्या धर्मांचे लोक आहेत व राज्यकारभार कोणत्या धर्माचे लोक करतात याच्याशीं सेक्युलर कल्पनेचा कांहींहि संबंध नाहीं. पाकिस्तानचें राज्य हें केवळ मुसलमानी धर्मीयांचेंच राज्य मानलें तरीही पाकिस्तान सेक्यूलरच आहे. शिवाजीनें मुसलमानांविरुद्ध लढून हिंदूंचें स्वतंत्र राज्य स्थापिलें तेंहि सेक्युलर. राजसत्ता व धर्मसत्ता हीं ज्यावेळीं एक होऊन धर्मगुरु हा धर्मगुरु म्हणून राज्य चालवितो आणि शासनाचा पाया आध्यात्मिक किंवा धार्मिक असतो त्याच वेळीं सेक्यूलरच्या भाषेंत तें राज्य धर्मराज्य म्हणता येतें. आजच्या युगांत हिंदुस्थानमध्यें एकहि राजकीय पक्ष असा नाहीं कीं ज्याचें ध्येय शंकराचार्यास दिल्लीच्या तख्ता-वर बसवावें. असें आहे एवढेंच नव्हे, तर सर्व राजकीय पक्ष चेंबरच्या इंग्रजी शब्दकोषातील सेक्युलरच्या अर्थाप्रमाणें राज्य हें सिव्हिल असावें असेंच म्हणतात. अशा स्थितींत आम्हीं सेक्युलर आहोंत असें म्हणण्यांत मतलब काय? देशांतील सर्व पुरुषांनीं आम्ही पुरुषच राहणार म्हणून घोषणा करण्याइतकें ते हास्यास्पद आहे.

अनेक लोकांस हिंदु या शब्दाची चीड आहे. हिंदु हा वैदिक शब्द नाहीं असाहि अनेक पंडित युक्तिवाद करतात. हिंदु शब्द वैदिक नाहीं एवढेंच नव्हे तर तो शब्द परक्यांनीं आम्हांस दिलेलें नामाभिधान आहे असेंहि त्यांचें म्हणणें असतें. जणूं कांहीं आजहि प्रत्येक वैदिक शब्द ते श्रद्धेने मानावयास तयार आहेत. परंतु आम्हांस आजच्या घटकेस हिंदूसारखा दुसरा योग्य शब्द सांपडत नाहीं. हिंदु हा अवैदिक आहे हें मान्य आहे. परंतु कोणता वैदिक शब्द आज योग्य ठरेल ? आजच्या ' हिंदु ' या संज्ञेचें मूळ वैदिक आर्यांच्या धर्मांत आहे. त्या लोकांचें नांव आर्य. धर्म आर्य. संस्कृति आर्य. परंतु आज आम्ही आर्यच आहोंत हें कोणता पंडित मान्य करील ? आर्यांचा मूळ धर्म अत्यंत शुद्ध व तात्त्विक स्वरूपांत होता. त्या मूळ धर्मांत व आजच्या प्रचलित धर्मांत बाह्यतः पुष्कळ अंतर आहे. पण अधिकाधिक लोकसंग्रह, अधिकाधिक संग्राहकवृत्ति, सामाजिक गुंतागुंत आणि सर्व प्रकारच्या सामान्य मनुष्यांस बरोबर घेऊन पुढें जाण्याची वृत्ति यांमुळें मूळ तत्त्वज्ञानाची अधिकाधिक व्यावहारिक उकल समजण्यास, स्वीकारण्यास आणि आचरण्यास सुलभ अशीच घाटणी कालानुसार त्या धर्मास घ्यावी लागली. इतिहासाची चाल लक्षांत घेतां मूळ तत्त्वांचें सातत्य टिकावें म्हणून विशिष्ट चाकोरींतील आचारप्रधान धर्माचें स्वरूप म्हणून प्रचलित धर्म हा मूळ धर्मावरील कांहीं जळमटें लक्षांत घेऊनहि मूळ धर्माचें प्रगल्भ स्वरूप मानावें लागेल. किंबहुना मूळ शुद्ध धर्माची परंपरा अनेक सहस्र वर्षांनंतर व अनेक परचक्रांनंतर आजहि टिकून राहिली त्याचें श्रेय केवळ सामाजिक उपचार व आचार यांनाच द्यावें लागेल. एरव्हीं शुद्ध आर्यधर्म केवळ समजण्यास व आचरण्यास दुर्लभ, किंबहुना सामान्य माणसांस अनावश्यक वाटणारा म्हणून लोकांतून केव्हांच उठून गेला असता. ज्याला आज निरर्थक आचार म्हणतात तो वास्तविक मूळ तत्त्वाचा वाहक आहे. या दृष्टीनें मूळ गंगोत्रीचा प्रगल्भ प्रवाह म्हणून ज्यास ऐतिहासिक दृष्ट्या यथार्थतेनें म्हणतां येईल असा फक्त हिंदु हा एकच शब्द आहे या प्रगल्भ प्रवाहांत मुळांतून वाढलेली अशी संस्कृति आहे. हिंदु हा शब्द टाळण्यासाठीं पण लोकांच्या भावनेचा अनादर होईल या

भीतीनें एक चतुर शब्द या लोकांनीं शोधलेला आहे. ते या प्रगल्भ संस्कृतीला हिंदु संस्कृति न म्हणतां भारतीय संस्कृति असें म्हणतात. अनेक संकटांतून, गुंतागुंतींतून आणि काळाच्या चाळण्यांतून जे नवीन अनुभव आले त्यांना तोंड देऊन मूळ धर्माचा गाभा कायम ठेवण्यासाठीं नवीन उपचार व आचार प्रचलित झाले. त्यांतून एक विशिष्ट संस्कृति निर्माण झाली. ती संस्कृति मूळ आर्यांच्या संस्कृतींत उगम पावली तीच हिंदु संस्कृती. सर्व मतांचे लोक तिचा आदर करतात; पण तिला भारतीय म्हणून स्वतःचें खोटें समाधान करून घेतात. भारतीय म्हणण्यानें ती आर्य नाही हें उघडच आहे! पण त्याचबरोबर ती हिंद्वेतरांची नाहीं हेंहि ते जाणतात. हिंदी-प्रमाणेंच भारतीय म्हणण्यानें केवळ भौगोलिक क्षेत्राची मर्यादा दर्शविली जाईल असें त्यांस वाटतें. या मर्यादेंत मुसलमान आणि ख्रिश्चन या संस्कृतींचाहि समावेश होऊं शकेल अशी त्यांना आशा असेल. तथापि जेव्हा ते भारतीय संस्कृतीचें वर्णन करतात तेव्हां ते हिंदुसंस्कृतीचेंच फक्त असतें. परंतु त्यांना ' हिंदू ' चा विटाळ !

जर ' हिंदु 'ला आपण टाळूं लागलों तर आपल्या सामाजिक, धार्मिक सांस्कृतिक, एवढेंच काय, राष्ट्रीय जीवनांतहि न सुटणाऱ्या समस्या निर्माण होतील. आजच्या राष्ट्रीयत्वाची सीमा ही याच समस्येचें एक भेसूर स्वरूप आहे.

वास्तविक हिंदु या शब्दांत लाज वाटण्यासारखें कांहीच नाही. हिंदु संस्कृतीने अनेक उदात्त तत्त्वें आचारांत बिंबवून दाखविलीं आहेत. हिंदु संस्कृतींत शौर्य भरपूर दिसलें आहे. त्याचप्रमाणें क्षमाशीलताहि प्रत्ययास आली आहे. हिंदु संस्कृतीची अस्मिता इतिहासाला चांगली माहीत आहे. हिंदु संस्कृतीचें औदार्य अनेकांनीं उपभोगलें आहे. सहिष्णुतेनें तर कित्येकांना जीवदान दिलें आहे. हिंदुसंस्कृतींतील कौटुंबिक परंपरा जगांत तोड नाहीं अशा आहेत. हिंदु संस्कृताने साम्राज्यें उभारली त्याचप्रमाणें जगाला सतत मार्गदर्शन करून दिलासा देतील असे विश्वबंधुत्ववादी संतहि निर्माण केले आहेत. वैदिक संस्कृतींतील आर्यांच्या पश्चात् या खंडप्राय देशांतील विविध परंपरा आणि समाज एकत्र आणून आर्यधर्माच्या एका माळेंत गुंफण्याचे

अवघड कार्य हिंदु संस्कृतीनें केलें आहे. हें कार्य आर्यांच्या ' कृण्वन्तो विश्व-मार्यम् ' पेक्षांहि कठीण आणि प्रगल्भ होतें. कोणत्याहि तऱ्हेनें हिंदु संस्कृति ही संकुचित, कोत्या मनाची, स्वार्थी, अज्ञानी आणि जुलमी अशी कधींच नव्हती. आज ज्या एवढ्या मोठ्या लोकसंख्येचें एक राज्य आम्हीं पाहत आहोंत त्याचें श्रेय सर्वस्वी आर्य संस्कृतीच्या पायावर उभारलेल्या हिंदु संस्कृतीलाच आहे. एरव्हीं आमच्या या ' भारतीय ' देशाचा युरोप होण्यास काय वेळ लागला असता ?

हिंदु या शब्दास जी परंपरा आहे, इतिहास आहे आणि विविधतेंतून एकत्वाचा साक्षात्कार आहे तें हिंदी या शब्दांत नाहीं. ' हिंदू 'मध्यें जी समान समस्या आहे, समान जीवन आहे, आणि समान श्रद्धा आहे त्यामुळें हिंदू म्हणून एकत्र येण्यास तितकीच समान भूमिका निर्माण होते. राष्ट्राच्या संरक्षणाचा प्रश्न कणखर आणि अकृत्रिम राष्ट्रीयत्वानेंच सुटला जातो असा जगाचा अनुभव आहे. हें कणखर, अकृत्रिम आणि एकजिनसी राष्ट्रीयत्व हिंदूशिवाय दुसऱ्या कोणत्या शब्दांत सापडणार नाहीं. आज राष्ट्रीयत्वाकडे पाहण्याची दृष्टि फक्त राजकीय आहे. कारण आमच्या राष्ट्रीय कल्पनेचा उगम पारतंत्र्यांतील राजकारणांत झालेला आहे. हें राजकीय राष्ट्रीयत्व दोन राष्ट्रांच्या मैत्रीसारखें उपरें, तात्कालिक, कृत्रिम आणि एकमेकांपासून सावध राहणारें आहे. राष्ट्रीयत्व हें राजकीय असूं नये आणि असूं शकत नाहीं याची कल्पनाच कांहीं लोकांस नाहीं असें दिसतें. हिंदी हें राजकीय सख्य आहे. तें एकजिनसी राष्ट्रीयत्त्व कदापि होणार नाहीं हें सरकारला पाकिस्तानच्या धोरणामुळें कांही एतद्देशीय मुसलमानांवरून, मिशनऱ्यांच्या कारवायामुळें ख्रिश्चनांवरून व चिनी आक्रमणामुळें चिन्यांवरून आंतून पटलेंच असेल.

हिंदु हा स्वार्थाकरितां दुसऱ्याला लुबाडणारा असूं शकतो, गुन्हेगारहि असूं शकतो. पण तो व्यक्ति म्हणून हें सर्व करीत असतो. हिंदु म्हणून करीत नसतो. परंतु चिन्यांची हालचाल चिनी म्हणूनच होऊं शकते, ख्रिश्चनांची ख्रिश्चन म्हणून आणि मुसलमानांची अंतःस्थ पाकिस्तानी म्हणून होऊं शकते. याचा प्रत्यय आम्ही स्वतः राज्यकारभार चालवीत नव्हतों

त्यावेळीं कसा येणार ?

हिंदी राष्ट्रीयत्वाचा पुरस्कार करतांना आम्ही हिंदु संस्कृति बुद्धया विसरतों आणि ' हिंदी ' त्वाचा पाठपुरावा करतों. पण हिंदु संस्कृति ही ज्याप्रमाणें आर्य संस्कृतीहून भिन्न असली तरी तिच्यांत उगम पावून अनार्य, शक, हूण इ० अनेक परंपरांचा एक प्रगल्भ संगम पावते, त्याप्रमाणें हिंदी हिंदु, मुसलमान आणि ख्रिस्ती या तीन संस्कृतींचा संगम दर्शवीत नाहीं. या तीन संस्कृतींच्या मिलाफांतून एक नवी संस्कृति निर्माण झाली असती तर हिंदी या शब्दास फारच महत्त्व प्राप्त झालें असतें. आणि मग आमचें राष्ट्रीयत्व हिंदीच म्हणावें लागलें असतें. परंतु इतिहासाचा दाखला असा आहे कीं, या तीन संस्कृति समान तत्त्वावर, समान आचार किंवा समान श्रद्धा घेऊन कधीच एक झाल्या नाहींत. उलटपक्षीं त्या परस्परांपासून भिन्न राहिल्या एवढेंच नव्हे, तर परस्परांच्या श्रद्धेंत विसंगति कायम ठेवून अलग राहिल्या. प्रसंगीं परस्परविरोधीहि झाल्या. वास्तविक ख्रिस्ती मुसलमानांच्याहि फार पूर्वीचे हिंदवासी. पण शक–हूणांप्रमाणें ते आमच्यांत आत्मसात् न होतां सुमारें पावणेदोन हजार वर्षें त्यांनी आपला अलगपणा कायम ठेवला आहे. या अलगपणाचे आणि विरोधाचे दाखले इतिहासाजवळ भरपूर आहेत. याचा परिणाम असा होत आहे कीं, त्यामुळें आमचें राष्ट्रीयत्व बदलत आहे—किंबहुना तें जुन्याच भूमिकेवर निश्चित करावें लागत आहे.

मग ही हास्यास्पद घोषणा कशासाठी ? तर आमच्या राष्ट्रीयत्वाच्या सीमाचें कोडें अधिक गुंतवून ठेवण्यासाठी; ज्या देशाच्या पुढाऱ्यांना देशाच्या भौगोलिक सीमा राखणे हेसुद्धां कमीपणाचे वाटतें त्यांना राष्ट्रीयत्वाच्या सीमा निश्चित करणें किती घृणास्पद वाटत असेल त्याची कल्पनाच केलेली बरी. ज्या सीमान्त भूमीवर गवतसुद्धां उगवूं शकत नव्हतें तेथें रणगाडे उगवले, तोफा उगवल्या, बंदुका लटकूं लागल्या. लाखों सैनिकांचीं रोपें टरारून उभीं राहूं लागलीं आणि सहारांत एखाद्या नारळीच्या ऊंच झाडास नारळ लोंबकळावेत त्याप्रमाणें त्या नापीक भूमीवर विमानें लोंबकळूं लागलीं ! ! आणि देशाच्या सीमाच काय पण गाभासुद्धां भंगण्याची वेळ आली ! !

आमच्या राष्ट्रीयत्वाची सीमा अशीच भंग पावत आहे. आमच्यावर विश्वास-घातकी आक्रमण करणारा चिनी शत्रू हा आमच्या देशाचा राष्ट्रीय नागरिक होऊं शकतो. हिंदुस्थानला पाण्यांत पाहणारा पाकिस्तानी हाहि हिंदुस्थानांत राहिला म्हणजे राष्ट्रीय बनूं शकतो. बहुसंख्य हिंदूंना अल्पसंख्य करून पुन्हां पाश्चात्य राज्याचें स्वप्न पाहणारा ख्रिस्ती हासुद्धां तितकाच राष्ट्रीय ! मग प्रश्न असा येतो कीं एकूण जगाच्या व्यवहारांत आमचा भारत देश म्हणून टिपून घेण्यास जगाच्यांत आणि आमच्या देशांत निराळेपण तें काय राहिलें ? आणि मग जागतिक राज्यांत आमचा देश म्हणणे कितपत शोभेल ?

अशा परिस्थितींत आमचें राष्ट्रीयत्व काय ? जग विरुद्ध देश यांत निर्णय घ्यावयाचा झाल्यास त्या त्या देशाच्या नेटिव्ह लोकांसच राष्ट्रीय म्हणण्याचा आन्तरराष्ट्रीय प्रघात आहे. नागरिकत्व आणि राष्ट्रीयत्व यांत पाश्चात्य देश फरक करीत असतात. देशाचा राजा किंवा अध्यक्ष हा नेटिव्हच असावा लागतो. परकीय नागरिक फार तर मंत्री होऊं शकेल. पण त्यापलीकडे तो जाऊं शकणार नाहीं हा आन्तरराष्ट्रीय प्रघात जगांतील सर्व देशांत पाळला जातो. म्हणूनच आपल्या देशांत अजूनपर्यन्त मुसलमान राष्ट्रपति होऊं शकला नाहीं. आन्तरराष्ट्रीय रीतिरिवाज नाइलाजानें पाळावे लागत आहेत. परंतु ते पाळूनहि या देशाच्या नेटिव्हांस खास राष्ट्रीय म्हण-ण्यास आम्ही तयार नसतों. कारण नेटिव्हांस राष्ट्रीय म्हणणें हें मागा-सलेपणाचें लक्षण असल्याचे कोणीं तरी आमचे डोक्यांत भरवून दिलें आहे.

हें सर्व सूर्यप्रकाशाइतकें स्वच्छ असूनहि आज अनुभवास मात्र विपरीत येत आहे. त्याचें कारण आमच्या स्वराज्याची उभारणी खोल आणि भक्कम पायावर कधी केली गेली नाहीं. आणि आमच्या स्वराज्याचा पाया आमच्या पारतंत्र्यांत परकीय राजकारणावर घातला गेला. परकीय सत्ताधाऱ्यांनीं राजकारणांतील डाव म्हणून स्वराज्याची एकमुखी मागणी आमचेकडून मागितली. ती आम्ही राजकारणांतील डाव म्हणून न घेतां आमच्या भावी स्वराज्याचा तात्त्विक मूलभूत सिद्धांत म्हणून स्वीकारली. कोणतेंहि राष्ट्र राजकीय युक्तिवादावर कधीं उभारलें जात नाहीं हें अननुभवी राज्य-कारभाऱ्यांना कसें समजणार ?

परंतु हा विचार कोणीं कोणास बोलून दाखवावयाचा ? आणि तें पटणार कोणाला? कारण खरें कोणीच बोलत नाहीं. सर्व घोषणा दांभिक तत्त्वांच्या. आपण बोलतों तें स्वतःला तरी पटतें का याचा कोण विचार करितो? राजा बोले आणि दळ हाले. चालू जमान्यांत सत्ता काबीज करावयाची म्हणजे चालू प्रवाहाला आडवून भागणार नाहीं. म्हणूनच विरोधी पक्षसुद्धां आमच्या राष्ट्रीयत्वाचा प्रश्न कधी उकरून काढीत तर नाहींच परंतु चालू जमान्याशीं जुळवून घेऊन जास्तींत जास्त मतदार कसे पटकावतां येतील एवढेंच पाहत असतात. विशाल राष्ट्रीयत्व, जागतिक राज्याचें स्वप्न, समाजवाद, जातीयवाद, उद्योगवाद, सहजीवनवाद, शांततावाद, सहकारवाद, उंची जीवनमान, साक्षरता, इत्यादि गोष्टी आमच्या तोंडीं लाळेसारख्याच अगदीं सहजतेनें घोळत असतात. तथापि या गोष्टी बोलणाऱ्या व्यक्तीचा किंवा राजकीय पक्षाचा आचार आणि अनुभव मात्र अगदीं विरुद्ध असतो. बोललेली गोष्ट अनुभवास कधीच येत नसते. उलटच अनुभव सदा येतो. कोणत्याहि व्यवहारांत त्याचा प्रत्यय येत नाहीं. जगांत कोणीहि त्याचा प्रत्यय आलेला सांगत नाहीं. पण मंत्र जपायचा तो मात्र या आमच्या 'अनंतशीलांचा !' असल्या बिनबुडाच्या बोलण्यास उत्तर तरी कोण व कसें देणार? कारण प्रामाणिक कोणीच बोलत नाहीं आणि अप्रमाणिक आवाज मात्र आमच्या कानांवर सारखा आदळला जातो. जी गोष्ट कधी कोठे आणि कोणालाहि अनुभवास किंवा अनुमानाला आली नाहीं, जी प्रत्यक्ष सांगणाऱ्यालाहि सुसंगत सांगतां येत नाहीं, इतकेंच काय, पण जिच्याविरुद्धच अनुभव दिवसानुदिवस प्रत्ययाला येत आहे ती दांभिक गोष्ट तरीहि बिचाऱ्या नागरिकांवर लादावयाची, म्हणावयाला लावायची व सांगावयाला लावायची हा केवढा अत्याचार! पण हा अत्याचार लोकशाहींतच खपूं शकतो. कारण बहुमतवाले बिनडोकपणें 'अन्नदात्यांची' री ओढीत असतात व अल्पमतवाल्यांस लोकशाहींत कोणी विचारीत नसतें.

परंतु जोंपर्यंत आमचें राष्ट्रीयत्व अनिश्चित आहे तोंपर्यंत आमच्या देशाच्या सीमारक्षणाचें कार्य सुकर होणार नाहीं. शत्रु पोटांत घुसूं लागला तरी घटनेनें तो आमच्या राष्ट्रीयत्वास बांधला असल्यामुळें आम्हांस तोंड

.. १४

दावून बुक्क्यांचा मार सहन करावा लागेल. हिंदुत्वाची आम्हांस लाज वाटते म्हणूनच हिंदी हा सर्वव्यापी, भोंगळ आणि घातकी पर्याय आम्हीं शिरोधार्य मानला. हिंदी शब्दाची व्याख्या सोयीस्कर व्हावी आणि कोणी हिंद्वेतरांस मज्जाव करील या भीतीनें आमची सेक्युलर राज्याची घोषणा झाली आहे. परंतु स्वतंत्र सेक्युलर राज्याच्या विधात्यांनीं हें ध्यानांत ठेवावें कीं सेक्यूलर राहूनहि आमचें राष्ट्रीयत्व हिंदुच राहूं शकतें. चिनी आक्रमणानंतरच्या आमच्या पंतप्रधानांच्या कांहीं पश्चात्तप्त भाषणांत प्रतीत झाल्याप्रमाणें आम्हांस आजपर्यंत स्वतंत्र राज्याचा अनुभव नव्हता. परंतु काळाच्या कपाटीं आम्हांस चिनीसारखा जों जों अनुभव येत राहील तों तों मुखानें जरी उच्चार हिंदीचा झाला तरी सरकारचा व्यवहार प्रत्यक्ष हिंदु राष्ट्रीयत्व म्हणूनच केला जाईल !

वास्तविक आमच्या राष्ट्रीयत्वाचा वाद तसा नवीन नाहीं. किंबहुना हा जुना वाद सेक्युलरच्या नांवाखालीं बुद्ध्या गाडून टाकला जात आहे. पण आतां आम्ही पारतंत्र्यांतील पोकळ अलर्डूर गर्जवीत नसून आतां स्वराज्यांतील कळा सोसत आहोंत, सोसणार आहोंत. समर्थ आणि दक्ष असें आमचें सरकारच हा प्रश्न अनुभवानें पण बिनबोभाट सोडवील.

# १९. नव्या पिढीचीं पाउलें

सुमारें ८० वर्षांपूर्वी केसरीच्या पहिल्या अंकाच्या अग्रलेखांत आपल्या नवजात पत्राचें ध्येयधोरण विशद करितांना लोकमान्यांनीं म्हटलें होतें कीं सध्यां शिक्षणाचा दर्जा इतका खालावला आहे कीं शिक्षणक्षेत्रांतील ही दुरवस्था दूर करणें हेंहि आमच्या पत्राचें एक कार्य राहील.

**श्रेष्ठत्व खालावत आहे**

७५ वर्षांपूर्वीच्या पिढीनें कितीतरी नामांकित पुरुष निर्माण केले होते. तथापि लोकमान्यांचा ओरडा त्या शिक्षणावरहि होताच. लोकमान्य आज स्वर्गातून खाली उतरले तर आजचें शिक्षण पाहून त्यांस काय वाटेल त्याची कल्पनाच केलेली बरी. ५० वर्षांपूर्वींपेक्षां आज हरएक क्षेत्रांतील श्रेष्ठत्व किती तरी खालावलें आहे. फरक एवढाच कीं आजच्या निकृष्ट पुरुषास जें दिगन्त कीर्तीचें श्रेय लाभत आहे तें श्रेय ५० वर्षांपूर्वी उत्कृष्ट पुरुषासहि मिळणें कठीण होतें. तथापि जाहिरातीची कला आणि साधनें यांनीं समृद्ध असलेल्या या युगांत कीर्तीची दिगन्तता हा उत्कृष्टतेचा निष्कर्ष मानतां येणार नाहीं. याची जागतिक स्वरूपाची जाणीव १९३५ सालींच सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. कॅरेल यांस झाली होती. राजकारणासह प्रत्येक क्षेत्रांत दर्जा खालावला आहे हीच त्यांची तक्रार होती (Man the unknown). सार्वत्रिक शिक्षण आणि मागासलेपणा हें नोकरीच्या निवडीचा निकष ठेवणाऱ्या धोरणामुळें खालावलेला दर्जा अधिकच उठून दिसत आहे. त्याचे कटु परिणाम सामान्य जनतेस आणि राष्ट्रासहि भोंवल्यावाचून राहत नाहींत. लष्करी उमेदवारांच्याविषयीं लष्करी तज्ज्ञांनीं केलेल्या तक्रारी, Indian

Administrative Service च्या परीक्षकांनीं प्रसिद्ध केलेलें विद्यार्थ्यांचें अज्ञान,न्यायालयांतील नवीन न्यायाधीशांसंबंधीचे तज्ज्ञांचे अहवाल, शाळा आणि कॉलेजांतील नवीन शिक्षकांतील विद्वत्तेचा अभाव आणि इतर सामाजिक, राजकीय व वाङ्मयीन क्षेत्रांत जाणवत असलेल्या श्रेष्ठ विभूतींच्या रिकाम्या जागा यांवरून सामाजिक व राष्ट्रीय हानि अपरिमित होते हें स्पष्ट आहे.

**लोकशाहींत शिक्षणाचें ध्येय–' सामान्य मनुष्य ' तयार करणें**

विभूतींची नवीन पिढी शिक्षणांतून निर्माण होत असते. परंतु हें तत्त्व लोकशाहींत बुद्धया बाजूस सारलें जातें. कारण तसें केलें तर सामान्य मनुष्य कधींच मोठया पदावर येऊं शकणार नाहीं. 'सामान्य मनुष्य'च तयार करणें हें जणुं लोकशाहींतील शिक्षणाचें ध्येय ठरलेलें असतें. सर्वच शिक्षणाची आंखणीहि ' सामान्य मनुष्य ' तयार होईल अशीच केलेली असते. परंतु कोणतेंहि राष्ट्र केवळ ' सामान्य मनुष्या 'वर उदयास येत नाहीं हें अप्रिय सत्य भारतीय लोकशाहीला सांगणें अवश्य आहे. कदाचित् भारतीय लोकशाहीस असें वाटत असेल कीं जर शिक्षणांतून विभूती निर्माण झाल्या तर त्यांतून येणारे सरकारी वरिष्ठ नोकर आपल्यास डोईजड होतील आणि राजकारणांत प्रतिस्पर्धी उभे ठाकतील. किंवा समर्थ लष्करी अधिकारी आपल्याला पदच्युत करतील ! सरकारी वरिष्ठ नोकरांची आणि मंत्र्यांची ज्या रीतीनें निवड केली जात आहे त्यावरून तर ही भीति अधिकच बळावते. शिक्षणाच्या कारखान्यांतून ' सामान्य मनुष्यां 'ची पैदास झाली व ती सार्वदेशिक झाली म्हणजे आपणास हवे तसे नंदीबैल तयार होतात हा आमच्या सरकारचा अनुभव आहे. म्हणून स्वराज्यांतील शिक्षणाचा हेतु विभूति तयार करणें हा नसून 'सामान्य मनुष्य' तयार करणें हा राहिला आहे. इंग्रजी राज्यांत अशी ओरड असे कीं इंग्रजी शिक्षण हें कारकुनी शिक्षण आहे. ज्या तथाकथित देशभक्तांनीं व शिक्षणतज्ज्ञानीं ही गर्जना इंग्रजी राज्यांत केली तेच देशभक्त व तेच शिक्षणतज्ज्ञ आज देशाचा राज्यकारभार व शिक्षण यांचे गाडे हांकीत आहेत. परंतु १७ वर्षानंतरहि त्या कारकुनी शिक्षणांत आपण क्रांति करूं शकलों नाहीं. जी काय केली

असेल ती ही कीं या शिक्षणांतून कारकुनाचे ऐवजी चपराशी तयार करीत आहोंत. या एकाच कारणावरून त्या देशभक्तांच्या देशभक्तीविषयीं कोणी शंका उपस्थित केली तर त्याचें समाधान करण्यास आमचेजवळ उत्तर नाही.

**शिक्षणसंस्था—राजकारणाचें एक साधन** :

यामुळेंच भारतीय लोकशाहींतील शिक्षणांत फार मोठे दोष शिरले आहेत. सार्वत्रिक शिक्षणाच्या नांवाखाली सरकारचा कर्जाऊ पैसा निष्कारण वांया जात आहे. विद्यालयांस अल्पस्वल्प आर्थिक साहृच दिलें जातें. त्याचा गैर-फायदा घेऊन विद्यालयांवर सरकारी धोरणांचीं बंधनें निष्कारण लादलीं जातात, एवढेंच नव्हे तर त्यांचा राजकीय दृष्टीनें गैरवापरहि केला जातो. शिक्षणक्षेत्रांतील स्वातंत्र्य नष्ट होऊन पाठ्यपुस्तकें हीं सरकारचीं मुखपत्रें बनतात. आणि मग मुलांच्या बौद्धिक आणि सांस्कृतिक विकासासाठीं अवश्य असलेलीं मूलभूत नीतितत्त्वें, ईश्वरावरील व धर्मावरील श्रद्धा निर्माण करणारीं तत्त्वें हीं मुलांच्या समोर ठेवण्याऐवजीं पक्षीय धोरण व व्यवहार यांच्या कथा पुस्तकांत घालतात. एवढेंच नव्हे तर आपणच आपलीं चरित्रें लहान मुलांच्या पुस्तकांत देऊन स्वतःची जाहिरात करीत असतात. साहजिकच लहान मुलांच्या मनावर परिणाम असा होतो कीं जगांत सर्वश्रेष्ठ पुरुष म्हणजे फक्त आमच्या देशांतील राज्यकर्त्या पक्षांचे पुढारी. त्यांच्या पलीकडे तत्त्वज्ञ, शास्त्रज्ञ, त्यागी, धर्मवीर इत्यादि लोक अगदीच क्षुल्लक. मुलांच्यापुढें असा प्रचारकी आदर्श ठेवणें हें अत्यंत घातक आहे. शिक्षण हें एक राजकारणाचें साधन गणल्यामुळें सत्ताधीश राजकीय पक्षाचीं जीं मतें त्यानुसार देशाच्या संस्कृतीला, धर्माला व इतिहासाला रंग देऊन त्यांतील मोजका भाग मुलांचे पुढें येईल असे धडे पुस्तकांत घालणें हेंहि तितकेंच धोक्याचें आहे. गुणमापन हा परीक्षांचा मूळ हेतु. पण सुलभप्रसार हेंच परीक्षांचें लक्षण दिसून येतें.

**सार्वत्रिक शिक्षण एक खूळ** :

प्रत्येकास रोजगार मिळवून देण्याचें आश्वासन देण्याचें जसें लोकशाही सरकारचें एक खूळ आहे त्याचप्रमाणें प्रत्येकास सुशिक्षित करण्याचें धोरण ठेवणें हें दुसरें खूळ आहे. प्रत्येकजण साक्षर कशाकरितां झाला पाहिजे

हेंच समजत नाहीं. साक्षर आणि सुशिक्षित यांत आतां फारसा फरक राहिला नाहीं. सामान्य मनुष्य साक्षर झाला म्हणजे त्यास जास्त काय समजतें तेंच समजत नाहीं. त्याच्या बुद्धीमध्यें फरक पडत नाहीं. सुसंस्कृतपणांत तर नाहींच नाहीं. त्याच्यांत कांही विशेष निराळें सामर्थ्य प्राप्त होतें असेंहि नाहीं. सुशिक्षित झाल्यानें तो जणुं उदरनिर्वाह करण्यास पात्र झाला असेंहि नाही. किंवा राज्यकारभार समजण्याची अक्कल येते असेंहि नाहीं. नोकरीसाठीं शैक्षणिक पात्रता जास्त ठेवतात. त्यामुळें गरीबांस महाग शिक्षण घेणेंच भाग पडतें. दारिद्र्यांत आणखी भर. शाळाकॉलेजांतून बाहेर पडलेले विद्यार्थी एकाच चाकोरींतून बाहेर पडतात. त्या सर्वांची नोकरीसंबंधी अपेक्षा व लायकी सारखीच असते. या सर्वांना एकाच चाकोरीच्या नोकऱ्या मिळणें अर्थात्‌च अशक्य. सरकारहि इतक्या लाखों मुलांना लगेच नोकऱ्या तयार करून ठेवीत नाहीं. एकाच चाकोरींतून सारख्याच लायकीचे बाहेर पडणारे विद्यार्थी बेकारींत भर घालीत असतात. कारण एकाच आवडीनिवडीच्या नोकऱ्या असून किती असणार ? पण सार्वत्रिक शिक्षण हें एक राजकीय खूळ आहे. जनतेस साक्षर केल्यानें आपण कांहीं विशेष पुण्य केल्याची भावना त्यांचे मनांत वावरत असावी. कर्जबाजारी सरकारनें कृत्रिम व निरुपयोगी साक्षरतेच्या कार्यक्रमासाठीं अर्धपोटी जनतेचे कोटयवधि रुपये वांया घालवावेत हें योग्य नाहीं. त्यांत सरकारचा खोटा अहंकार आहे, खोटें समाधान आहे.

**उतरती भांजणी**.

कृत्रिम साक्षरतेचा कार्यक्रम आपल्या ध्येय-धोरणाचा एक भाग समजल्यामुळें देशापुढें पर्यायानें वरीलप्रमाणें प्रश्न निर्माण होतात. शिवाय सार्वत्रिक शिक्षणामुळें शाळांचे शिक्षक व इमारती यांची भरमसाट वाढ होऊनहि त्यांचा कायम तुटवडा भासतो. त्यामुळें शिक्षक बौद्धिक व सांस्कृतिक दृष्टया लायक असावा लागतो याची आठवण करणेंसुद्धां शक्य नसतें. हलक्या पगारावर पोटभरू अर्धबेकार शिक्षकांचा एक असंतुष्ट, निरुपयोगी व उपेक्षित वर्ग आपण निर्माण करीत असतों. ज्या शिक्षकाचा पगार कारकुनाच्या श्रेणीचा आहे व त्यामुळें ज्याची गणना कारकुनापेक्षां जास्त कांहीं

होत नाहीं तो आपली विद्वत्ता, मानसिक उंची व नवी पिढी घडविण्याइतकें सांस्कृतिक सामर्थ्य कितीसें ठेवणार ? आणि विद्यार्थ्यांनीं तरी आपल्या-समोर आदर्श कोणाचा आणि कसा ठेवावा ? निकृष्ट शिक्षकांमुळें विद्यार्थी निकृष्ट होतात. विद्यार्थी निकृष्ट झाले म्हणजे देशाचें भवितव्य धोक्यांत आलें असें समजावें. कारण शास्त्रज्ञ, विचारवंत, न्यायाधीश, समाजसेवक, कुशल कारभारी, लष्करी अधिकारी आणि प्रतिष्ठित नागरिक हे सर्व विद्यार्थ्यांमधूनच निर्माण होत असतात. विद्यार्थी निकृष्ट झाले कीं देशाचे हे सर्व खांबहि कमकुवत झाले असें समजावें. शिक्षण सार्वत्रिक झालें की निर्बुद्धांना शिक्षणांत सवलती व पुढें तांत्रिक नोकऱ्यांतहि सवलती सुरू होतात. याचे दुष्परिणाम सध्यां आपण भोगत आहोंच. कुशाग्रबुद्धि असलेल्या विद्यार्थ्यास सार्वत्रिक शिक्षणांत वाव मिळत नसतो. त्यामुळें बुद्धिमान विद्यार्थी मागें पडून फुकट जातात व देशांत तज्ज्ञांची उणीव पडते. उच्च प्रतीची शास्त्र–विद्या सार्वत्रिक शिक्षणांतून लुप्त होते. या विद्येचा लोप झाला कीं शास्त्रीय दृष्टीचे विद्यार्थी निपजत नाहींत. हीच भोंगळ पिढी पुढें निरनिराळ्या अधिकारांवर यावयाची. आणि मग विद्वत्तेची धार बोथट होते. शास्त्रांतील ततोतंतपणा ढोबळ होतो, तत्त्वज्ञानातील खोली उथळ होते. धर्मांतील पावित्र्य गढूळ होतें आणि लष्करांतील तीव्रता मिळमिळीत होते. आज आपण प्रत्यक्ष अनुभवत असलेली लष्करी आघाडीवरील माघारयुक्त तडजोड, व्याकरण,ज्योतिष, वैद्यक, स्थापत्य, यांसारख्या शास्त्रीय विषयांतहि तडजोड, राष्ट्रगीत, राष्ट्रीय नामाभिधान, राष्ट्रीयत्व यांतहि तडजोड. एवढेंच काय, देशद्रोही, गुन्हेगार यांच्याशींहि तडजोड. या सर्वांची मीमांसा एकच. ती म्हणजे तज्ज्ञ शिक्षणाचा अभाव. म्हणूनच तत्त्वशुद्ध पायावरील असावी लागणारी विचारांची झेप त्रिकालाबाधित सत्य शोधण्याइतकी आणि त्यावर निष्ठा बाळगण्याइतकी समर्थ राहूं शकत नाहीं. त्याचबरोबर परिस्थितिजन्य व्यवहाराचें सम्यक् ज्ञानहि होऊं शकत नाहीं.

## स्वराज्यांतहि इंग्रजांची ' री '.

आमच्या शिक्षणाचें मूळ इंग्रज राज्यकर्त्यांच्या राजकीय हेतूंत आहे. आज ज्याप्रमाणें विधानसभा व लोकसभा यांचे उमेदवार निवडतांना तो उमेदवार

बुद्धीनें बेताचा, कर्तृत्वानें मंद, स्वभावानें खालच्या मानेचा आणि खच्ची केलेल्या बैलाप्रमाणें राजकारणांत निरिच्छ व निरुपयोगी असलेला असा पाहून घेतात, त्याप्रमाणें इंग्रजांनीं इंग्रजी शिक्षणाची आंखणी अशा प्रकारें केली कीं, इंग्रजी पदवीधर, मेकॉलेनें म्हटल्याप्रमाणें, स्वाभिमानशून्य, बुद्धीनें इंग्रजधार्जिणा परतु अभ्यासानें राज्यांतील कारकुनी कारभार जाणण्याइतपतच बहुश्रुत व्हावा. अपवाद सोडून दिल्यास अशा शिक्षणांतून स्वतंत्र बुद्धीचा राज्यकर्ता, पंडित किंवा शास्त्रज्ञ निघणें कठीणच. भारतांत ज्या कांहीं हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या विविध क्षेत्रांत विभूती झाल्या त्याचें श्रेय जुन्या पिढींतील संस्कृत संस्कारांनाच द्यावें लागेल. हे संस्कार जों जों कमी होत गेले तों तों विभूतींची संख्या आणि प्रत दोनहि कमी झाली. चालू जागतिक व्यवहार समजण्याइतकी नीतिनिरपेक्ष विविध माहिती देणें इतकेंच या शिक्षणाचें कार्य दिसतें. विभूतिमत्त्व घडविणें व ह्याकरितां विद्यार्थ्यांस संस्कारबद्ध करणें याचा जणुं चालू शिक्षणाशीं कांहीं संबंध नाहीं. विद्यार्थ्यांतील वाढता बेशिस्तपणा, गुन्हेगारी आणि गुन्हेगारीप्रवृत्ति यांचा दोष नीतिनिरपेक्ष, धर्मनिरपेक्ष आणि केवळ विविध माहिती पुरविणाऱ्या यांत्रिक शिक्षणाकडे जातो.

**शिक्षणाचें विडंबन** :

कोणत्याहि लोकशाही राज्यांतील शिक्षण राज्यांतील सत्ता गाजविणाऱ्या राजकीय पक्षाच्या उद्देश व ध्येयांवर अवलंबून असतें. समाजाविषयींचें जें ध्येय राजकीयपक्षाचें असेल तें नव्या पिढीत बिंबविण्यासाठीं शिक्षण हें एकमेव प्रभावी साधन आहे. राजकीय पक्ष हा बोलून चालून राजकारणी पक्ष. कोणत्या तरी सामाजिक व राजकीय निमित्तानें जडलेली योग्य वा अयोग्य अशी स्वतःची एकांतिक निष्ठा ही जगतामध्यें अत्युच्च प्रमाण मानून व त्या निष्ठेची कुवत व पांचपोंच लक्षांत न घेतां इतरांस जबरदस्तीनें ती मानावयास लावून देशामध्यें त्या निष्ठेचा साचार प्रचार करणें हा आपला जणुं जन्मसिद्ध हक्क असल्याचें त्या पक्षास वाटत असतें. याचें रशियांतील कम्युनिझम पक्ष हें एक उत्तम उदाहरण आहे. पुढील पिढी आपल्या मताप्रमाणें व्हावी या एकाच उद्देशानें रशियांतील शिक्षण एकांतिक केलें होतें. एवढेंच

नव्हे तर शास्त्रज्ञ, तत्वज्ञ व साहित्यिक यांनींसुद्धां त्याच तत्त्वाचा पुरस्कार केला पाहिजे असा सक्तीचा आग्रह होता. असहिष्णु व जुलमी सत्तेच्या जोरावर रशियानें आपल्या राजकीय तत्त्वांचा जबरी प्रचार देशांत आरंभिला. तोच थाट जागतिक प्रचाराचा. विद्वान व प्रचारक भाड्यानें घेऊन व अंतर्गत वंडाळीच्या धमकीवर जगांतील सर्व देशांत आपल्या तत्त्वांचा जहरी प्रचार केला. यामुळें रशियाच्या या राजकीय पक्षाच्या नेत्यांची तत्त्वनिष्ठा कितीहि वाखाणण्यासारखी सकृत्दर्शनीं वाटली तरी नितकीच जबरदस्त शंका अशी उभी राहाते कीं जर यांचें तत्त्वज्ञान इतकें उपयुक्त, उच्च व त्रिकालाबाधित सत्य असें आहे तर त्यास धाक व दाम यांची जरुरी काय ? कोणतेंहि शुद्धतत्त्व कालाच्या पोटीं नष्ट होऊं शकत नाहीं असा जगाचा सांस्कृतिक इतिहास सांगतो. आपल्या तत्त्वाचा प्रचार करण्यासाठीं द्रव्याचें आमीष व रक्ताचा अंकुष यांची जरुरी लागते. याचाच अर्थ त्या तत्त्वांत कुठें तरी लंगडेपण स्वतःलाच जाणवत आहे. मग हें लंगडे-पण लपविण्यासाठीं जुलमाच्या जोरावर सक्तीनें 'हो' म्हणावयास लावणें हा एकच मार्ग त्यांच्यापुढें उरतो. किंवा विरोधकांना ठार करून जुलमानें प्रचार करणें ही तत्त्वनिष्ठा कीं सत्तालोलुपता याचीहि शंका येते. जगांतील मार्क्सवादी पक्षांच्या राज्यांतील शिक्षण एकांगी असतें. मानवी समाजाचा इतिहास मार्क्सी रंग लावून शिकविला जातो. वस्तुस्थितीचा विपर्यास केला जातो. आणि भौतिक शास्त्रें चुकीच्या सिद्धांतानें पढविलीं जातात. पण मार्क्सी तत्त्वज्ञान हें स्वयंभू नसून प्रतिक्रियात्मक आहे हें ते विसरतात. प्रति-क्रियेची प्रतिक्रिया मानवी समाजाच्या क्षितिजावर नित्याप्रमाणें उगवूं लागली म्हणजे पहिल्या प्रतिक्रियेवर उभा राहिलेला मार्क्स कोलमडून पडेल त्यावेळीं मार्क्सी विचारानें पढविलेले विद्यार्थी 'आ' वासून क्षितिजाकडे नुसते बघत राहतील व पुनः मार्क्सचें नांव घेण्यास ते धजणार नाहीत. रशि-यांतील नवीन आन्तर्बाह्य बदलतें धोरण या नवीन प्रतिक्रियेचा पुरावाच आहे.

**हें राजकीय पक्षांचें काम नव्हे :**

इतका विस्तार करण्याचें कारण कीं देशाच्या राज्यकर्त्यांचें जें ध्येय असेल त्याचीच सांवली पुढील पिढीच्या पाउलांवर पाडलीं जाते व पाउलें

त्या सांवलीच्या चालीवर पडत जातात. राजकीय पक्षांचें ध्येय देशाच्या तात्कालिक सामाजिक व राजकीय परिस्थितीवर आधारलेलें असल्यामुळें ध्येयाचें स्वरूप चिरन्तन व अत्युच्च असूं शकत नाहीं. जनतेला भुलविण्यासाठीं जर तसें ध्येय एखाद्या पक्षानें ठेवलें तर तें अव्यवहार्य व अहितकारक असतें. आणि मग त्या पक्षाच्या राज्यकारभारांत दुटप्पीपणा, भोंगळपणा, बौद्धिक गोंधळ, पढतमूर्खपणा आणि विसंगति भरून जाते. समाजविषयक आणि अर्थविषयक रचना आणि तत्त्वज्ञान हीं एकमेकांवर अवलंबून असतात. हें तत्त्वज्ञान किंवा ही रचना एकाद्या व्यक्तीच्या प्रेरणेनें किंवा प्रचारानें समाज स्वीकारीत नसतो. जबरदस्तीनें किंवा कृत्रिम तऱ्हेनें तसा प्रयत्न केल्यास समाजाचा तो एक कृत्रिम अभिनय ठरेल. पण आंतून वस्तुस्थिति निराळाच आकार घेत असेल. यासाठीं सामाजिक क्रांति ही विचारवन्तांनी कालपरिस्थितीप्रमाणें आवश्यक झालेल्या सुधारणांवर साधकबाधक विचार मांडून योग्य त्या सुधारणा जनतेच्या गळीं उतरविणें व अशा तऱ्हेनें कालानुरुप समाज ताजातवाना ठेवणें हेंच श्रेयस्कर आहे. सत्तेच्या व लष्कराच्या बळावर सामाजिक क्रांति घडवूं पाहाणें म्हणजे समाजाविषयींचें अज्ञान प्रकट करण्यासारखें आहे. जुल्म-जबरदस्तीनें ४० वर्षांपूर्वी केलेल्या रशियांतील सामाजिक क्रांतीची प्रतिक्रिया आज आपण पाहात आहोंच. सत्तेच्या बळावर घडवून आणलेली ती क्रांति रशियन समाज कधींच पचवूं शकला नाहीं व शेवटीं रशियाला आपलें ध्येयधोरण बदलावें लागलें.

तात्पर्य, हातीं सत्ता आहे म्हणून समाजविषयक एकाद्या तत्त्वाचा सक्तीनें अंमल गाजविला तर तो यशस्वी होत नाहीं. म्हणून शिक्षणानें मुलांची मनें अशा बाबतींत एकांगी करूं नयेत व त्यांच्या स्वतंत्र बुद्धीला खोडा घालूं नये. याच दृष्टीनें इंग्लंडमध्यें सरकारनें ६० टक्क्यांपेक्षा अधिक आर्थिक मदत देऊनहि संस्थांना शैक्षणिक स्वातंत्र्य दिलें आहे.

**शुद्ध शिक्षणाची रूपरेषा–१. प्राथमिक शिक्षण**

एकदां राज्यकर्त्यांच्या तावडींतून शिक्षणाची सुटका झाली म्हणजे खऱ्या शिक्षणाची वाढ होऊं लागेल. प्रत्येकानें शिक्षण घेतलेंच पाहिजे हा मतलबी आग्रह कोणाचाच राहणार नाहीं. ज्याला विद्येची आवड आणि बौद्धिक कुवत

आहे तोच शिक्षणाच्या मागें लागेल व तोच चमकेल. शिक्षणाचा आमूलाग्र कायापालट होईल. कृत्रिम शाळांचें स्तोम बंद होईल. आणि मग शिक्षणाला असें वळण लावावें कीं नोकरीकरितां व्यावहारिक शिक्षण निराळें व बुद्धिमान विद्यार्थ्यांसाठीं विद्यासंपन्न शिक्षण निराळें होईल. व्यावहारीक अंकगणित आणि मातृभाषेंतून व्याकरणशुद्ध लेखन व वाचन एवढें प्राथमिक शिक्षण सुशिक्षित स्त्री–पुरुषांनीं खासगीरीत्या शिकवण्यांच्या रूपांत शिकवावें. याचबरोबर मातृभाषेचें वाचन म्हणून संतांचे भक्तिपर काव्य, आरत्या व पुराणांतील आदर्श स्त्री–पुरुषांच्या निवडक कथा करवून घ्याव्यात. यासाठी सरकारला कांहींहि खर्च येणार नाहीं व अनेक अर्धपोटी लोकांस अर्थोत्पादक काम मिळेल. हें प्राथमिक शिक्षण वयाच्या दहाव्या वर्षापर्यंत पूर्ण व्हावें.

२. व्यावसायिक शिक्षण

दहाव्या वर्षापासून १८ व्या वर्षापर्यंत द्रव्यार्जनास लागणारे शिक्षण द्यावें. त्यांत निरनिराळया व्यावसायिक विद्या त्या त्या मुलाच्या घरचा पिढीजात व्यवसाय पाहून व त्याची आवड-कुवत पाहून शिकवाव्यात. कचेऱ्यांच्या कामाची पद्धति, हिशेब, विविध तांत्रिक व्यवसाय, लष्करी, इत्यादिकांचा समावेश त्यांत व्हावा. त्या शिक्षणासाठीं खाजगी तज्ज्ञांच्या संस्था असाव्यात. त्यांत सरकारनें ढवळाढवळ करूं नये. सवलती मात्र द्याव्यात. हा सरकारचा खर्च अनाठायी होणार नाहीं. सरकारला लागणारे कारकून, अधिकारी आणि तंत्रज्ञ याच शिक्षणसंस्थांतून मिळणार आहेत. निरनिराळ्या अभ्यासक्रमांच्या परीक्षा सरकारनें अत्यंत माफक खर्चात घ्याव्यात व विद्यार्थ्यास प्रमाणपत्रे द्यावींत. या व्यावसायिक शिक्षणसंस्थांत धार्मिक वाङ्मय व आचार, देशाची भौगोलिक व ऐतिहासिक माहिती व चालू जगाविषयीचें सामान्य ज्ञान हे विषय ज्यांनीं पुरे केले आहेत व ज्यांस सद्वर्तनाबद्दल उत्तम दाखला आहे अशांनाच सरकारी परीक्षेस बसण्याची परवानगी असावी व उत्तीर्ण होण्यास कमींत कमी सत्तर टक्के गुण ठेवावेत. हा अभ्यासक्रम म्हणजे मुलांकडून प्रत्यक्ष काम करून घेणें. त्या त्या विषयांची तात्त्विक माहिती काम करीत असतांना करून द्यावी. ज्याच्या घरची शेती आहे त्यास या परीक्षेस बसण्यास परवानगी देऊं नये. उद्देश हा कीं शेती

सोडून शहरांतील कारखान्यांतून नोकऱ्या करण्याच्या अनिष्ट सांथीला आळा बसावा व शेती ओस पडूं नये. हा अभ्यासक्रम मॅट्रिक, डिप्लोमा या प्रतीचा असावा. कांहीं आवश्यक उद्योगधंदे व सरकारी कारभाराची सध्याची पद्धति चालू राहाणार तोंपर्यंत हें व्यवसायिक शिक्षण आवश्यक आहे. घरची शेती असणाऱ्या मुलांस परीक्षा देण्याची बंदी केल्यामुळें शहरी भागांत निष्कारण बेकार तरुणांचा भरणा होणार नाहीं.

३. तात्त्विक शिक्षणाचें माध्यमिक सत्र

बुद्धिमान् विद्यार्थ्यांसाठीं तात्त्विक शिक्षणाच्या माध्यमिक शाळा असाव्यात. यांतील विद्यार्थी पुढें शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, साहित्यिक, प्रतिष्ठित सुविद्य नागरिक, शिक्षक, राज्यकारभारी व्हावयाचे आहेत ह्यांचें शिक्षण हें बुद्धीला मूलग्राही, दूरदृष्टि करणारें, शोधक आणि निष्ठावंत असें हवें आहे. नवव्या वर्षापर्यंत अंकगणित, मातृभाषेंतून व्याकरणशुद्ध लेखन व वाचन, संस्कृत वर्णमाला, संस्कृत पाठांतर, इ० पूर्ण व्हावयास पाहिजे. दहाव्या वर्षापासून अठराव्या वर्षापर्यंत देशाची भौगोलिक माहिती व ऐतिहासिक माहिती व चालू जगाविषयीचें सामान्यज्ञान यांजबरोबर संस्कृत पाठशाळांच्या शास्त्रीपद्धतीनें संस्कृत साहित्य व शास्त्रें यांचें पठण व्हावें. त्यांत षट्दर्शनांचे सहा स्वतंत्र विषय शिकवितांना त्या त्या संदर्भात इंग्रजींतील तीं तीं आधुनिक शास्त्रें व तत्त्वज्ञान यांची ओळख करून द्यावी. त्याचप्रमाणें संस्कृत साहित्य व भाषाशास्त्र शिकवितांना इंग्रजी वाङ्मयाचा तौलनिक अभ्यास व्हावा. या अभ्यासक्रमांत मुलांच्या वागणुकीकडे विशेषलक्ष देऊन त्याच्याकडून सद्वर्तनाचे धडे वागवून घ्यावेत. ही परीक्षा पदवीपरीक्षा असावी व परीक्षेस बसण्यास सद्वर्तनी मुलांसच परवानगी द्यावी. किंबहुना शिस्तीच्या बाहेर वर्तन करणाऱ्यास शाळेंत ठेवूं नये. सध्यांच्या परीक्षांप्रमाणें ही परीक्षा मुलांच्या क्षणिक स्मृतीवर व समयसूचकतेवर आधारलेली नसावी. सबंध विषय आत्मसात् व्हावा. त्या दृष्टीनें मुलांची तयारी करून घ्यावी. वेळेचें फारसें बंधन नसावें. नापास होणें ही क्रियाच नसावी. अठराव्या वर्षी हें माध्यमिक शिक्षणसत्र संपावें.

### ४. तात्त्विक शिक्षणाचें वरिष्ठ सत्र

वय १८ ते २४ पर्यंत वरिष्ठ शिक्षणाचें सत्र सुरू व्हावें. माध्यमिक शिक्षणांत मुलाच्या बुद्धीचा पाया भक्कम शास्त्रावर तयार झालेला असतो. त्या कालांत विविध शास्त्रांचीं मूलभूत तत्त्वें अवगत करणें हाच उद्देश आहे. शास्त्रें अवगत करून बुद्धीला पुढील कार्यासाठीं सज्ज करणें हाच प्रमुख उद्देश आहे. जे विद्यार्थी पुढील उच्च शिक्षण घेणार नाहींत ते सुसस्कृत विद्यासंपन्न म्हणून राहतील. ज्यांस विशेष बौद्धिक कार्य करावयाचें आहे ते उच्च शिक्षणास आरंभ करतील. या सत्रांत एखादा विषय निवडून त्यांत प्राविण्य संपादून कांहीं शक्य झाल्यास भर घालावी ही अपेक्षा आहे. यादृष्टीनें प्रथम त्या त्या विषयांतील अद्ययावत् ज्ञान करून देऊन पूर्ण तयार झाल्यावर त्या वादग्रस्त प्रश्नांचीं उत्तरें मुलांसच शोधावयास सांगावीत. त्या त्या विषयांतील वाद घेऊन त्यावर निबंध-प्रबंध मुलांकडूनच तयार करून घ्यावेत. निबंध आणि समस्या हेंच दोन मार्ग बुद्धि प्रगल्भ करणारे आहेत. शाळेच्या वाचनालयांत अवान्तर विषयांवरील चांगले ग्रंथ ठेवून त्याचा मुलांनीं आपलें ज्ञान वाढविण्यास व बहुश्रुत होण्यास उपयोग करावा. या ग्रंथांचें जितकें वाचन होईल तितका भरीवपणा व विशाल दृष्टिकोन मुलांच्या निबंधांतून दिसून येईल.

### 'महाजन' निर्माण करणारें विद्यापीठ

माध्यमिक सत्र व वरिष्ठ सत्र यांच्या परीक्षा विद्यापीठांकडे असाव्यात विद्यापीठ दरडोई लोकशाहीवर उभारलेलें नसावें. विद्यापीठांत व्यापारी कारखानदार, चळवळे पुढारी यांचें कांहीं काम नाहीं. विद्यापीठ मंडळांत विद्यापीठाचे पदवीधर व विद्यापीठबाह्य विद्वान यांचे प्रतिनिधि असावेत. विद्यापीठाचा प्रमुख राज्यपाल असूं नये. विद्यापीठ कायद्यानें तयार झालेलें असावें. पण सरकारचें त्यावर बंधन नसावें. ही 'स्वतंत्र' विद्यापीठें विद्येची आणि संस्कृतीची जोपासना करणारीं आगरें व्हावीत. समाजांतील सुसंस्कृतपणा आणि विद्यासंपन्नता हीं निर्भेळ आणि निर्वेध राहावींत हाच अशीं स्वतंत्र पीठें स्थापण्याचा उद्देश आहे. या विद्यापीठांचें महत्त्व पर्यायानें फार आहे. समाजांतील बुद्धिमान व सुसंस्कृत वर्ग याच विद्यापीठांमुळें वर्धिष्णु

आणि निकोप राहणार आहे. याच वर्गातून देशाला तारणाऱ्या विभूति लाभणार आहेत. सामाजिक आणि राजकीय जीवनाचें स्वास्थ्य याच वर्गावर अवलंबून आहे. सांस्कृतिक आदर्श निर्माण करणें ही समाजाची पहिली नड आहे. राजकीय पुढारी ती नड भागवूं शकले नाहींत म्हणूनच मजूर संघटना गुंडांचे अड्डे झाले आणि व्यापारी संघटना रक्तशोषक बँका बनल्या. या दोहोंचा परिणाम असा कीं सामान्य माणसाचें जीवन असुरक्षित आणि आर्थिकदृष्ट्या पिळवटून निघालें आहे. हें असें होतें याचें कारण मजूरवर्गास, नोकरवर्गास आणि व्यापारी वर्गास ज्याच्याकडे पाहून चालावें असा आदर्शच राहिला नाहीं. "लोकस्तदनुवर्तते" असें गीतेंत म्हटलें आहे, पण अनुकरण कोणाचें करणार ? श्रद्धा कशावर ठेवणार ? "महाजनो येन गतः स पन्थाः" अशी सामान्य माणसांची प्रवृत्ति असते. पण समाजांत "महाजन" च नसतील तर माणसाच्या नैसर्गिक प्रवृत्तीला जें हवें असेल तसे वागण्यास माणसास मोकळेपणा वाटतो. विद्यापीठांचा हेतु हे "महाजन" तयार करण्याचा आहे, पण हें साधण्यासाठीं वर म्हटल्याप्रमाणें विद्यापीठांचा आमूलाग्र कायापालट होणें अवश्य आहे.

वर विवेचन केलेला शिक्षणाचा मूलभूत हेतु डावलून शिक्षण हें राजकीय पक्षांच्या प्रचाराचें साधन म्हणून असेंच चालू ठेवलें तर नव्या पढीचीं पाउलें कोणत्या घसरगुंडीवर घसरतील हें सांगतां येणार नाहीं.

## २०. जिवन्त ललित वाङ्मय

मूक सुखदु:खांना वाचा फोडण्यांतूनच ललित वाङमयाचा खरा उगम होतो. अर्थात् अशी वाचा फोडून जीवनांतील रस उकलून समजावून देणे आणि मूक व ओसाड जीवनाला रसरशीत करणें हें ललित वाङमयाचें एक महत्वाचें कार्य होऊन बसतें. यामुळें ललित वाङमयाचा विषय मानवाचें जीवन व्यापून टाकणारा तर आहेच, पण जीवनाच्या पलिकडे जाऊन त्रिकाल खंडांत जीवनाचें क्षितिज ओलांडून तेथून जीवनाचें करतलामलकवत् दर्शन घडवून जीवनाची समस्यापूर्ति करणारा खरा विषय आहे.

अर्थात्च जीवनाचें सम्यक् दर्शन घडविणें आणि अनुभूतीला नवीन अर्थ लावणें या मर्यादा ललित वाङमयाला पडतात.

सहस्रावधि वर्षे माणसाचें जीवन चालू आहे. तेव्हांपासून माणसाच्या मूळ भावनांत फरक पडलेला नाहीं. आणि अन्न, वस्त्र व आसरा या मूलभूत गरजांतहि बदल झालेला नाही. आतांच सांगितल्याप्रमाणें ललित वाङमयास पडलेली ही एक मोठी मर्यादा होय. कालानुरुप जीवनांतील अंगोपांगांत कांहीं बाबतींत तपशीलात कांही काल फरक पडला म्हणून तेवढ्यानें ललित वाङमयाचा विषय बदलूं शकत नाही. आणि माणसाच्या भावना वरील गरजांवरच आधारलेल्या असल्यामुळें केवळ भावनांनीं विषयांतर होत नाहीं. व्यक्ती तितक्या प्रकृती म्हणून फुलोरा वाढेल एवढेंच. त्याचप्रपाणें ललित वाङमय जीवनांत भरून उरलें असलें तरी जीवनांतील प्रत्येक घटना किंवा तात्कालिक भावना ही ललित वाङमयांत

उत्तरविण्यासारखी नसते. जी अनुभूति मूळभावना वा मूळ गरजा यांना स्पर्शून जात नाहीं ती ललित वाङ्मयाचा खरा विषय होऊं शकत नाही. अफाट पसरलेल्या वनश्रींतून वैद्य एकादीच वनस्पति हुडकून काढतो की जिच्या सेवनानें मनुष्याचें पोषण व्हावें किंवा एकादा शरीररिपु नष्ट व्हावा. मानवी जीवनाच्या अफाट अनुभूतींच्या असीम वनश्रीच्या गर्तेंत जीवनाचें पोषण करणारी आणि जीवनाच्या रिपूंचा नाश करणारी अशी वनस्पति थोडीच असते. निरुपयोगी आणि उपद्रवी झाडेझुडपेंच फार. म्हणून जीवनाची अनुभूति असीम असली तरी ललित वाङ्मयाचा विषय सीमांकित आहे. जी अनुभूति माणसाला चटका लावून जाईल किंवा जी कोणत्याहि काळांत कोणत्याहि माणसास क्षणभर विचार करावयास लावील तीच अनुभूति ललित वाङ्मयांत उतरूं शकेल. किंवा आपण रोज हरएक गोष्टी करीत असतों. पण झांपडें लावलेल्या घाण्याच्या बैलाप्रमाणें आपली सुखदुःखें आपण हरघडी उपभोगीत असतों. आनंद वाटतो, शोक करतों, सुख अनुभवितों. पण बव्हंशीं तो एक दैनंदिन जीवनांतील व्यवहार म्हणून. उजाडल्यावरोबर पुष्कळ माणसें आपल्या नोकरीच्या कामावर जातात जातांची सूर्योदयाची रम्य वेळ, शांत थंड वातावरण, पूर्वेकडील रंगीत आकाश, शुद्ध ताज्या हवेची मजा, झाडाफुलांचा मंद सुगंध, पक्ष्यांची गोड किलबिल, इत्यादि अनेक मनोहारी सौंदर्यातून ते जात असतात. पण 'सकाळी' रस्ता बरा असतो, दमायला होत नाहीं. या पलिकडे त्या सौंदर्याची घाण्याला जुपलेल्या माणसास काय किंमत ?

पण हें कशाला ? प्रत्येक घरांत दर दोनचार वर्षांनीं लग्न होत असेल परिसरांत तर दरवर्षी अनेक लग्नें होतात. लग्न ठरलें म्हणजे प्रत्येक सौभाग्यकांक्षिणीची एकच मानसिक स्थिती असते. पण तिच्या मनांतील भावी पतिसहवासाचीं गोड स्वप्नें, या स्वप्नरंजनांत रात्रंदिवस मन रमलेलो पण तें बोलून दाखवितां येत नसल्यामुळें तिच्या मनाची होणारी गोड कुचंबणा, मुखावर येणारें उगाचच लाजरें स्मित, उगाचच लाजरें चालणे-बोलणें आणि या सर्वांमुळें तिच्या मुखावर झळकणारें तेज हें सर्व गोडपण पाहायला आणि बोलून दाखवायला तिच्या खास मैत्रिणीशिवाय, व्यवहारांत

गुरफटलेल्या माणसांस वेळ कोठें आहे? आणि समजा, एकाद्याला वेळ असला तरी त्याकडे शिष्टाचाराच्या भीतीनें कोण लक्ष देणार ? पण लक्ष्मी पूजनानंतर मुलगी सासरी निघतांना वेळहि भरपूर असतो आणि शिष्टाचारहि आड येत नाहीं. कांहीं मुलींचे बाप मुलीबरोबर अक्षरशः डोळ्यांतून अश्रू गाळीत असतात. पण हें सर्व मूकपणेंच चालतें. वातावरण करुण गंभीर असतें. बराच वेळ गेल्यावर शेवटीं स्वतःच रडणारा बाप मुलीला म्हणतो, "रडूं नकोस, जा." पण या प्रसंगाचें भावना हेलावणारें वर्णन खास वेळ ठेवूनहि मूकपणेंच चालतें. त्या मूकगंभीर वातावरणाचा भंग 'रडूं नकोस, जा.' या तीन शब्दांनींच होतो. कारण प्रत्येक सुख आणि प्रत्येक शोक बोलून दाखवितां येत नाहीं.

हें होतें संकोचामुळें. पण सृष्टिसौंदर्य पाहाण्यांत तर कांहीं संकोच असू नये ! तथापि उन्हाळ्यानंतर पडणाऱ्या पहिल्या धो धो पावसाकडे तान्हें मूल जसें रांगतां रांगतां मुद्दाम थांबून बघत राहतें तसें किती मोठीं माणसें मुद्दाम बघत राहत असतील ? तीं आपल्या कोंदट घरांत बसून हातानें यंत्रासारखें रुक्ष रोजचें काम करीत एकीकडे फार तर तोंडानें म्हणतील, 'आतां जरा हवेंत गारवा आला.' दऱ्याखोऱ्यांतून डोंगरकपारीवर पावसाळ्यांतील हिरव्या शालूंत भरघोंस नटलेली, कोंवळ्या उन्हाच्या रूपानें मादक हसणारी, कोकिळेच्या कंठानें मधुर पण मुग्ध भाषण करणारी, क्वचित् विद्युल्लतेच्या रूपानें मिष्किलपणें डोळे मिचकावणारी, क्वचित् खालीं उतरलेल्या ढगांच्या आणि धुक्याच्या रूपानें आपल्या गोंडस मुखावर तलम पदर ओढून उगाचच लाजल्याचें सोंग करणारी वनश्री तेथेंच राहणारीं किती माणसें उपभोगीत असतील ?

असें आपण जीवनांतील सुख आणि सौंदर्य डोळे मिटून अनुभवीत असतों. कारण कांहीं कां असेना ! आपल्याला त्याचा रसास्वाद घेतां येत नाहीं. तान्ह्या मुलाच्या हातांत एक खुमासदार जिलेबी द्यावी आणि त्याने त्या जिलेबीकडे दुर्लक्ष करून हातांतून टाकून द्यावी किंवा ती हातानें मोडून चिरडून टाकावी व आपल्या केशरी बोटांकडे गंमतीनें पाहात बसावें तसें आपण जीवनांतील सौंदर्याचें पुष्कळ वेळां करीत असतों.

जसें सौंदर्याचें तसेंच दुःखाचें. दुःखाकडेहि आपण पुष्कळ वेळां व्यवहारांत गुंतून दुर्लक्ष करीत असतों. कुटुंबांत कोणी मेलें तर त्याचा आपण फार शोक करीत बसत नाहीं. लगेच आपल्या कामधंद्यास लागतों. दुःखाला विरंगुळा म्हणून नव्हे तर व्यवहाराचें ओझें असतें म्हणून. स्मशानांतसुद्धां गांभीर्य, कारुण्य यांचें दर्शन दुर्लभ झालें आहे. थट्टा, विनोद व व्यावहारिक बोलणीं यांनीच स्मशानांतील शांततेचा भंग होतो.

ही जशी कांहीं दुःखें आपण अनास्थेनें अनुभवीत असतों तशीं कांहीं दुःखें परिस्थितीच्या दडपणानें वा समंजसपणानें मूकपणेंच अनुभवीत असतों. लहान भावंडांपैकीं एकजण मृत्यु पावला तर त्यांपैकीं दुसऱ्या भावाच्या मनाची जी अवस्था असते ती मुकीच राहते. घरांत अठरा विश्वें दारिद्र्य असलें म्हणजे कांहीं समंजस लहान मुलें आपल्या इच्छा दाबून ठेवून जें मिळेल तें खाऊन बिचारीं अर्धपोटीं मुकाटयानें राहतात लग्नाचें वय झालेली, नोकरी करून आपल्या आईला व लहान भावंडांस पोसणारी मुलगी वयानुरूप उसळणाऱ्या भावना दडपून मूकपणेंच हा कोंडमारा सहन करीत असते. कुटुंबावर येणाऱ्या भावी संकटाची चाहूल कांहीं वेळां कर्त्या पुरुषास आधींच लागत असते. परंतु त्याचा उच्चार करण्यास मन धजत नाहीं. अशा वेळीं आपल्या हसऱ्या-खेळत्या कुटुंबांत वागतांना त्याची किती कुचंबणा होत असेल ? परतु हेंहि मूकपणें त्यास सोसावें लागतें.

तात्पर्य, जीवनांतील अशीं किती तरी सुखें व दुःखें कधीं न उकलतां, कधीं न समजतां, समजून पण न बोलतां आपण अनुभवीत असतों. माणसाला जसें सुख भोगतां आलें पाहिजे तसें दुःखहि भोगतां आले पाहिजे. जीवनांतील सुखें व दुःखें सारख्याच आस्थेनें उपभोगिलीं पाहिजेत.

माणसानें सुख व दुःख दोनहि आत्मीयतेनें उपभोगलीं पाहिजे हें खरें आहे. पण सुखदुःखं हीं केवळ वर्तमानाच्या एकाच काळांत वावरत नसतात. भूतकालीन अनुभूतींच्या स्मृतीहि सुखदुःखांना जन्म देतात. त्याचप्रमाणे मना-मध्यें भविष्यत् कालांतील कांहीं गरजा व त्यांतून उत्पन्न होणाऱ्या भावनाहि वावरत असतात. त्या गरजा शेवटपर्यंत अफलित राहिल्या किंवा भावना अतृप्त राहिल्या तर माणसाच्या जीवनावर त्या जरूर परिणाम करतात.

कित्येक लोकांना आपल्या भावी जीवनाविषयीं फार आकांक्षा असतात. परंतु परिस्थितीच्या प्रतिकूलतेमुळें, पुरेशा उत्तेजनाच्या किंवा योग्य मार्गदर्शनाच्या अभावी आकांक्षांचीं स्वप्नें अर्ध्या वाटेंतच विरून जातात. किंवा प्रत्यक्ष महत्त्वाकांक्षा नसली किंवा ती पुरी झाली नसली तरी बरेच लोक असे असतात कीं ते सामान्य प्रतीचे जीवन जगतांना दिसत असले तरी जे अतुल्य पराक्रम गाजविणारे, विशिष्ट विद्येंत प्रविण्य संपादन केलेले, सामान्य माणसास दिसणार नाहीं अशा लांब व अदृश्य पल्ल्याचें आपल्या बुद्धीनें दर्शन घडविणारे, आपलें ऐश्वर्य अत्युच्च खानदानी नेकीनें उपभोगणारे, जे आपल्या नैसर्गिक सामान्य भावनांना ओलांडून भूतमात्रावर आत्मवत् दृष्टि ठेवणारे, अशा सर्व प्रकारच्या विभूतिमत्त्वाचे पुरुष दिसायला कसे असतात, वागायला कसे असतात, ते आपला दैनंदिन व्यवहार कसा करतात, ते जिव्हाळ्याच्या माणसाशीं कसे बोलतात हें सर्व त्यांना पाहाण्याची इच्छा असते. आपल्याला जें जमलें नाहीं तें ज्याला जमलें त्याचें साक्षात् चित्र पाहाण्याची नैसर्गिक ओढ असते. किंवा आपण जसें असावयास पाहिजे असें वाटतें त्याचें प्रत्यक्ष रूप कसें असेल हेंहि पाहण्याची माणसास उत्कंठा असते. जीवनांतील हें सर्व स्वप्न, समस्यापूर्ति आणि मानसपूर्ति या सर्वांचें प्रतिबिंब ललितवाङमयांत पडलें पाहिजे. म्हणून भावनांनीं आणि वेंचक अनुभूतींनीं जितकें जीवन समृद्ध तितकें ललितवाङमय समृद्ध होईल यांत शंका नाहीं. पण ललितवाङमयांत चितारलेली भावना जर जीवनापासून अलग झालेली असेल तर तें वाङमय जीवन्त न राहतां केवळ कागदावरील निर्जीव चित्र राहील.

ललितवाङमय हें केवळ वाङमय न राहतां ज्या वेळीं प्रत्यक्ष जीवनाचें सहज प्रतिबिंब बनतें त्याचवेळीं ललितवाङमयास कांहीं अर्थ निर्माण होतो. ललितवाङमय आणि जीवन यात जितकी फारकत होईल तितकें जीवन रुक्ष, निर्जीव आणि मागासलेलें राहील. तर ललितवाङमय हें कागदावर काढलेलें निष्प्राण, कृत्रिम, तकलादू चित्र म्हणून राहील. समृद्ध आणि जागृत जीवन, हा ललितवाङमयाचा आत्मा आहे. अशा जीवनामुळेंच ललितवाङमयाला जीवन्तपणा येतो. ललित वाङमय वाङमय म्हणून लिहिलें कीं तें जीवनापासून लांब जाऊं लागतें. त्यागमय जीवन, प्रेमानें समर्पित झालेलें जीवन, सृष्टीच्या

रागरंगांनीं रसरसलेलें जीवन, दुःखानें पिडून गेलेलें जीवन, वासना आणि विद्वेष यांना बळी गेलेलें जीवन, महत्त्वाकांक्षेनें उफाळून आलेलें जीवन आनंदानें बेहोप झालेलें जीवन हें सर्व प्रकारचे जीवन म्हणजे साक्षात् ललित वाङ्मयच आहे. पण या विविधांगांनीं मुसमुसलेल्या जीवनाकडे त्या दृष्टीनें पाहावयास पाहिजे आपण दैनंदिन जीवनांत इतकें बुडून जातों आणि लज्जा, शिष्टाचार व व्यवहार यांनीं इतके जखडून जातों कीं जीवन म्हणजे काय हेंच आपणास समजेनासें होतें.

जी कोणत्याहि काळांत कोणत्याहि माणसास क्षणभर विचार करावयास लावील तीच अनुभूति ललितवाङ्मयांत उतरूं शकेल. अशी अनुभूति हुडकून काढणें किंवा तिच्यांतील महत्त्व शोधणें व ती लालित्यानें मांडून दाखविणें हें प्रतिभेचें काम आहे. पण हें साधलें नाहीं म्हणजे ललितवाङ्मयास वास्तवतेशिवाय दुसरा विषय शिल्लक राहत नाहीं. आणि मग जीवनांतील बीभत्स, क्षुद्र आणि निरर्थक अनुभूतींचें वर्णन घोळविणें एवढेच उरतें. जीवनाच्या क्षितिजापर्यंत दृष्टि पोचूं शकली नाहीं आणि जीवनाचें विहंगमावलोकन करण्याइतकी उंच भरारी मारतां आली नाहीं म्हणजे नव्या प्रतिकांच्या नांवाखालीं निरर्थक, पोकळ आणि भोंगळ शब्द–संभार फुलविण्याशिवाय गत्यंतर उरत नाहीं.

पण ललितवाङ्मय हें लिहिण्यापेक्षां अनुभवण्यांतच खरें स्वारस्य आहे. अभिजात ललितवाङ्मय त्याचवेळीं निर्माण होते कीं ज्या वेळीं ललितवाङ्य जीवनांत प्रत्यक्ष जगलें जातें आणि वाङ्मयांत त्याचें प्रतिबिंब म्हणून वठविलेलें दिसतें. एऱ्हवीं जीवनाच्या कोऱ्या पाटीवर लिहिलेल्या शब्दांस बाराखडीहून अधिक महत्त्व नाहीं. ललितवाङ्मयांत अवतरणारें उत्कट प्रेम, निस्सीम त्याग, कठोर ध्येयनिष्ठा आणि अत्युच्च जीवनाविषयीं आत्यंतिक तळमळ आणि धडपड हीं प्रथम प्रत्यक्ष जीवनांत अवतीर्ण झालीं असलीं पाहिजेत. निदान ज्याच्या जीवनांत हीं अवतीर्ण झालेलीं आहेत त्याच्याशीं तितक्याच समरसतेनें आपण तल्लीन होऊन जावयास हवें. नाहीं तर ललितवाङ्मय म्हणजे शब्दकोशांतील मोठे शब्द निवडून त्यांचा पाल्हाळिक अर्थ सांगण्यासारखें होईल.

## २२. माझी व्यथा

मी अेक निराळ्या अभिरुचीचा मनुष्य आहे. मला नकली माल आवडत नाहीं. जें थोडक्यांत, निष्कारण काटाकाट केलेलें, अस्सल नाहीं पण अस्सलाची नक्कल करण्याचा प्रयत्न केलेलें असें मला कांहींच रुचत नाहीं. जी वस्तु रुचिहीन, अगदीं अज्ञ व्यक्तीपर्यंत पोंचलेली आहे, केवळ तेवढ्यामुळेंच त्या वस्तूवरून माझें मन उडतें. ज्या वस्तूंत वैशिष्ट्यच नाहीं, दुर्लभता नाहीं व जी केवळ सदभिरूचीच्या उच्च प्रतीच्या श्रेष्ठ पुरुषाजवळच पाहावयास मिळेल अशी नाहीं ती वस्तु माझ्या मनाची पकड घेत नाहीं. जी वस्तु स्वयंसुंदर नाहीं, आणि जिच्यांत भव्यता नाहीं तिच्याकडे माझें मन ओढ घेत नाहीं ज्या वस्तूच्या निर्मितींत तिची उपयुक्तता, योग्यता, भव्यता आणि सुरूपता यांकडे लक्ष न देतां व्यापाऱ्याच्या राक्षसी अर्थोत्पादनाचा केवळ अेक बळी म्हणूनच जी सुलभतेनें माझ्या हातांत पडते ती तितक्याच सहजतेनें टाकावीशी वाटते. अेकादी उपयुक्त वस्तु सुंदर करणें अवघड नसतें. पण तें सौंदर्य निष्कारण, भरमसाऽ आणि झटपट उत्पादन करणाऱ्या यंत्रास मानवत नाहीं म्हणून केवळ ती वस्तु अगदींच सामान्य आणि बोजड होईल इतका साधेपणा तिच्यांत आणलेला असतो त्या वस्तूंत मुळांत जर आरोग्यवर्धक किंवा टिकाऊ गुण असेल तर तो यंत्राच्याच सोयीसाठीं काढून टाकलेला असतो. कांहीं वेळेला तर नवीन कृत्रिम तयार केलेल्या पदार्थांत

आरोग्यवर्धक गुण असणें हें पाहाणें अवश्यक आहे याची जाणीवहि असलेली दिसत नाहीं.

पोषाकांत सौंदर्यदृष्टीबरोबरच भव्यता नष्ट होत चालली आहे. पुरुषांचा आणि स्त्रियांचा दोघांचा पोषाक कृत्रिम, बोजड आणि रुचिहीन बनत चालला आहे. सौंदर्य हें आकृतीवर अवलंबून असलें तरी औचित्य आणि प्रतिष्ठेची भावना या दोन गोष्टी त्यामागें असल्याशिवाय नुसती आकृति ही कांहीं वेळां वेचव लागते. सौंदर्यानें दृष्टीला आल्हाद होतो तसा औचित्यानें मनाला आल्हाद होतो. दृष्टि आणि मन हीं समरस झाल्याशिवाय सौंदर्याचा उपभोग निर्भेळपणें घेतां येत नाहीं. औचित्य हें प्रत्येक ठिकाणीं निराळें असतें. सौंदर्य हें सुसंस्कृतपणाचें लक्षण आहे हें विसरून चालणार नाहीं. सुसस्कृत मनुष्याचा आचार व विचार विशिष्ट प्रतीचा असतो. औचित्याला याच विशिष्ट प्रतीच्या आचार विचाराचा निकप लागतो. याच निकपावर अमुक अेक सौंदर्य पाहिलें असतां अमुक अेक भावना पुलकित होते. अेकाच सुंदर स्त्रीमुळें तिचा पति, तिचें मूल आणि तिच्या सख्या या तिघांच्या भिन्न भिन्न भावना पुलकित होतील. पण याउलट मन आणि दृष्टि यांच्यांत वैषम्य आलें तर यांपैकीं कोणालाहि आल्हाद होणार नाहीं. याच न्यायानें न्यायाधिशाचा पोषाक, प्रोफेसराचा पोषाक, तरुणाचा पोषाक, आणि इतर सभ्य गृहस्थांचा पोषाक त्या त्या स्थानाचें औचित्य न ठेवतां जर सर्वांचे सारखेच गोल पँट आणि मॅनिला घातलेले असले तर औचित्यहानीमुळें माझ्या मनाला आल्हाद होत नाहीं. मीं जेव्हां अेका डिस्ट्रिक्ट जज्जला पँट व बुशकोटांत पाहिलें, हायकोर्ट जज्जला भोंगळ धोतरावरील बुशशर्टमध्यें पाहिलें, महाराष्ट्राच्या राजपुरुषास बावळटपणें सोगा सोडलेलें जाडें भरडें धोतर, त्यावर जाड कुडतें व वर वेडीवांकडी टोपी अशा थाटांत पाहिलें त्यावेळीं या औचित्यहानीनें माझ्या दृष्टीला केवढा ताण पडला ! ज्या नऊवारी साडीमध्यें अंगचें सौंदर्य खुलविण्याचें सामर्थ्य आहे आणि मूळचा वेढबपणा सौम्य व सुसह्य करण्याचा गुण आहे ती साडी सोडून जेव्हां वयांत आलेली मुलगी लांडी इस्तरीची लुंगी (स्कर्ट) गुंडाळून चाललेली पाहतों, पोक्त व स्थूल ४५–५० वर्षे वयाची स्त्री रंगीत उपर्णे उभें लावून रस्त्यानें नाटकी थाटात

जातांना पाहातों त्यावेळीं अभिरुचीनें सासुरवासास कंटाळून आत्महत्या केली कीं काय अशी अभद्र शंका मनात डोकावल्यावाचून राहत नाहीं. जेमतेम निर्वाहापुरतें मिळविणारा कारकून आणि संपत्ति वांया चालली आहे असा लक्ष्मीपुत्रहि पाहिला आहे. पण उभयतांच्यामध्यें भेद असा कांहींच जाणवत नाहीं. दोघेहि सिनेमा पाहतात, दोघेहि निष्कारण हॉटेलमध्यें खात बसतात आणि दोघांच्याहि हातांत सिगरेट असते. आर्थिक अडचण सौंदर्याच्या आड येते म्हणतात तें यामुळेंच मला पटत नाहीं. अेवढें मात्र खरें, नीट विचार करून राहणें याला आर्थिक अडचण चांगली सांपडते. वास्तविक सौंदर्यदृष्टि म्हणजे देशाच्या आर्थिक तपमानाचा थर्मामीटर आहे. त्यादृष्टीनें आमचा देश बाकी फारच दरिद्री म्हणावा लागेल. आमच्या देशाचे राजपुरुष हे या दारिद्र्याचे उत्तम प्रतिनिधि आहेत. पोषाकांत शक्य तितका बावळटपणा, वागण्यांत बेडौलपणा आणि राहण्यांत कोणत्याहि गांवंढ्यावर पाहावयास मिळेल अशी वाचाळता व असा 'साधेपणा' हें भारताच्या कोणत्याहि राजपुरुषाचें डोळे मिटून लक्षण सांगावें. या राजपुरुषांवरून भारतीय जनतेची प्रत अजमावण्यासारखी आहे. आपल्या अधिकाराप्रमाणें रुबाब न ठेवणें हें बौद्धिक दारिद्र्याचेंच लक्षण समजलें पाहिजे.

जेवण-खाण्याचीहि हीच गत. अस्सल आणि पौष्टिक खाणें हें आतां मागासलेपणाचें झालें. गिरण्यांचा माल घेतला तरच तो सुधारक ! गव्हाचा व तांदळाचा पौष्टिक कोंडा टाकून पॉलिश करून आम्ही धान्य वापरतों. घरच्यापेक्षां दुकानचा अस्वच्छ आणि निःसत्त्व आहार, गायीपेक्षां म्हशीचें दूध आणि म्हशीपेक्षां विलायती दुधाची पूड ही जास्त मॉडर्न आहे ! गोल्ड-स्पॉट, लेमन टाकून अस्सल लिंबाचा रस आणि संत्र्याचा रस घेणें हें जास्त गावटीपणाचें आहे. कारण त्यांत आरोग्यदायक गुण आहे, नैसर्गिक आहे, त्याला यंत्रांतून पावन केलेलें नाहीं, आणि मुख्य म्हणजे तें पराधीन नाहीं. याच कारणाने विलायती सेंट व इसेन्सपेक्षां वेलदोडा, केशर, जायफळ, इ. अस्सल वापरणें हें मागासलेपणाचें लक्षण होय ! मुक्या मेव्यापेक्षां जवळ जवळ त्याच किंमतीचें रबर व सरस चघळीत राहणें, ताकावरील लोण्यापेक्षां क्रीमचें लोणी, साजूक तुपापेक्षां डालडा आणि अस्सल मसाल्यांच्या जिनसां-

पेक्षां त्यांचे कृत्रिम अर्क खाणें हेंहि तितकेंच नव्या युगाशीं जुळतें घेण्याचें व म्हणून मोठेपणाचें आहे ! तात्पर्य, जितकें कृत्रिम, जितकें पराधीन व जितकें आरोग्याला आणि सौंदर्याला हानिकारक तितकें सुधारणेचें श्रेष्ठ लक्षण गणलें जातें. जसा आहार बिघडला तशी आहार घेण्याची पद्धतिहि बेडौल झाली आहे. चुलीपाशीं गोल कोंडाळ्यांत जेवायला बसून आपल्या हातानें वाढून घेणें किंवा पाश्चात्य संस्कृतीचा सत्कार करून टेबलावर किंवा टेबला-सारख्या घडवंचीवर जेवणें यांत कांहीं विशेष मोठेपणा, औचित्य किंवा सौंदर्य आहे असें नाहीं. पण हें आतां सर्रास चालू आहे. त्यामुळें मला लोकाकडे जेवावयास जायला आवडत नाहीं. टेकायला पाट, बसायला पाट, ताटाखालीं पाट, चांदीचें लोटीभांडें, केळीचें पान, रांगोळी, उदबत्ती आणि नऊवारी लुगड्यांतील आटोपशीर, मर्यादशील आणि आस्थेवाईकपणें आग्रह-करून वाढावयास तत्परतेनें आणि नम्रपणें उभी असलेली सुस्त्री हा थाट आतां कोठें मिळणार नाहीं.

जसें लोकाकडे जेवायास जाणें म्हणजे मला संकट वाटतें तसें समाजांत वावरणें म्हणजे सुद्धां पंचाईत पडूं लागली आहे. गल्लोगल्लीं दुधाकरितां, रॉकेलकरितां केवढाल्या ओळी लागलेल्या असतात ! बिचाऱ्या सभ्य स्त्री-पुरुषांना भल्या पहांटें हातांत भांडें घेऊन रस्त्यावर थेंबभर पीठपाण्याकरितां तासन् तास उभे राहिलेले पाहून मला पोटांत कसेंसेंच होऊं लागतें. मला वाटते सभ्यपणांतून स्वाभिमान व प्रतिष्ठा हीं उणी केली म्हणजे जी बाकी राहाते ती म्हणजे आपलें ध्येय असलेलें व आतां साकार होत चाललेलें लोकशाहीचे फळ ! या दुधाप्रमाणेंच चित्रपटगृहांत जागा मिळविण्यासाठीं त्याहून चौपट मोठाल्या ओळी. असभ्य व संधिसाधू पुरुषांच्या बेताल स्पर्शानें पावन झाल्या-खेरीज कुलीन स्त्रीला ओळींत जणुं स्थानच नाहीं. याचीहि स्त्रियांना चांगली संवय झालेली असावी. पण मला कांहीं अजून अशी संवय होत नाहीं. ओळ पाहिली कीं, मी आपला सिनेमाचा बेत रद्द करतों. पण माझा त्यामुळें फारसा विरस होतो असेंहि नाहीं. कारण मी मनापासून सिनेमा पाहाण्यास उत्सुक नसतोंच. ओळींत उभें राहतांना अंगणांत हवा तरी मोकळी असते. पण आंत हजारों माणसें हवाबंद डब्यांत मोहोरबद केलेलीं

असतात. त्या अंधार कोठडींत नाना कलाचे लोक असतात. प्रत्येकजण आप-आपल्या प्रफुल्लित भावना आपआपल्या मगदुराप्रमाणें आविष्कृत करावयास पूर्ण स्वतंत्र असतो. त्याचप्रमाणें त्या अंधारांत चिंचोळ्या चिकटून असलेल्या खुर्च्यांवर कोणीं कोठें बसावें याला आर्थिक बंध सोडले तर दुसरा धरबंध नाहीं. मी सपत्निक बसलों असलों तर पत्नीच्या शेजारीं कोणताहि हरीचा लाल येऊन बसलेला असतो. आणि इतकी ही कुचंबणा कशासाठीं तर प्रकाशाच्या व ध्वनीच्या निर्जीव सावल्या यंत्रानें कशा बरोबर जुळविल्या जातात हें पाहाण्यासाठीं ! शिवाय त्या मोहरबंद डब्यांत अनेक अभिरुचीचे व प्रतींचे लोक असतात. त्या सर्वांना आवडेल अशा अेका समान कढईंत परतलेली बेचव खिचडी चघळण्यासाठीं. मी विचार केला या सर्व प्रकारांत माझ्याजोगतें असें कांहींच नाहीं.

चित्रपट पाहाण्यास आवडत नाहींत म्हणून माझें पाऊल अेकादे वेळेस वाचनालयाकडे वळतें. पण तेथेंहि माझी कुचंबणाच होते. मी दिवसभर काम करून दमलेला असतो. संसारांतील काळज्या असतातच. बरें, आतांचा संसार हा कांहीं सुखाचा व स्वास्थ्याचा राहिलेला नाहीं हें सर्वजण मान्य करतीलच. महागाई आहे. जिन्नस सगळे मिळत नाहींत व आवकहि पुरी पडत नाहीं. अशा स्थितींत माझी बौद्धिक झेंप व संस्कृतीची चाड हीं अडून राहिलेलीं असतात. त्या बुद्धीला आणि सुसंस्कृत हृदयाला रोजच्या रामरगाड्यांतून डोकें वर काढायला वेळच मिळत नाहीं. त्यामुळें आंतून मी अतृप्त, असंतुष्ट, रोखून धरल्यासारखा असा असतों. ही माझी रुखरुख रोजच्या सामाजिक जीवनापासून क्षणभर बाजूला जाऊन, उंचावून डोकावून पलिकडील अथांग क्षितिजावर दृष्टिक्षेप टाकून सुसंस्कृत पण दडपलेल्या अतृप्त महत्त्वाकांक्षा स्वतःच्या नाहीं तर दुसऱ्याच्या कोणाच्या सुफलित झालेल्या पाहिल्या, किंवा बुद्धीची झेंप, मनाची महानता अेकादा दैववान् आपल्या प्रत्यक्ष जीवनांत दाखवूं शकतो हें पाहिलें तर अेक प्रकारचा अंतर्यामीं फुलून येणारा, सह-अनुभूतीचा आनंद मिळतो. किंवा रोजच्या व्यवहारांत प्रेम, शोक, आनंद, इ. भावना आपण खरेंपणानें व्यक्तवीत नाहीं. कारण त्याला व्यवहाराचें बंधन पडतें. तसेंच रीतभातहि सांभाळावी लागते त्यामुळें या सर्व भावना संयमित

आणि नियमित असतात. किंबहुना पुष्कळ वेळां कांहीं दृश्य प्रसंगांचें वैशिष्ट्यच किंवा महत्त्वहि आपण व्यवहारांत समजूं शकत नाहीं. तें वैशिष्ट्यच, महत्त्व उकलून आणि खुलवून दाखविणारा कोणी प्रतिभावन्त भेटला तर काय मजा येईल म्हणून वाचनालयांत आतुरतेनें अेकेक पुस्तक घ्यावें तों काय! मी रॉकेलसाठीं ओळींत कसा उभा राहतों, माझेकडे कोण कोण बघतात. मग दुकानदार कसा खेंकसतो, वायकोला किती पातळें आणलीं तरी कशी अपुरीं पडतात. मुलांचा गोंधळ कसा नकोसा करतो आणि शेजारची बाई किती चावट आहे याचेंच सगळें वर्णन. मी असें अैकलें आहे कीं, याला वास्तववाद म्हणतात. मला कांहीं हे वाद आणि विवाद समजत नाहींत. पण या साऱ्या मुळ्या मला असें वाटतें कीं लेखकाचें पुस्तक म्हणजे जणु अेकादें तीक्ष्ण भिंग असावें. म्हणजे असें कीं त्या भिंगांतून भिंतीपलिकडलें आणि आमच्या गांवच्या डोंगरापलिकडलेंहि दिसावें. त्याचप्रमाणें तें भिंग हातांत घेतलें म्हणजे सर्व संसार पारदर्शक व्हावा. अेरव्हीं नुसत्या डोळ्यांना जें दिसत नाहीं तें या भिंगांतून पाहिल्यावरोबर कांचेप्रमाणें संसाराच्या आंतील गुपित स्वच्छ दिसावें. विहिरीवर ऊन पडावें आणि मग संथ पाण्यांतून जसा विहिरीचा तळ स्वच्छ दिसतो त्याप्रमाणें. मग आपल्या हरवलेल्या वस्तूहि विहिरींत पडलेल्या दिसूं लागतात. पण हातीं असलेल्या पुस्तकाचा कागद इतका दगडासारखा असतो कीं, पलिकडलें राहोंच पण त्या पानावर काय लिहिलें आहे हें सुद्धां कांहीं वेळां समजत नाहीं.

मासिकें तरी पुस्तकांपेक्षां वेगळीं काय असणार ? मासिक हें अेक नको असलेल्या आणि नकोशा वाटणाऱ्या जाहिरातीचें साधन आहे. सर्वत्र मासिक प्रत्यक्ष जाहिरात आणि अप्रत्यक्ष जाहिरात यांनीं भरलेलें असतें. खरें मनोरंजन किंवा बुद्धिविलास औषधालाहि मिळणें कठीण. वास्तविक मासिक हें वाङ्मयांत मोडत असतें. पण तें 'वाङ्मय' त्यांत क्वचित्च मिळतें. सुसंस्कृत आणि सुबुद्ध माणसाची वाङ्मयीन भूक शमेल असे कांहीं मासिक मला अजून सांपडत नाहीं. वाचनालयांतून मासिकांचीं मुखपृष्ठें ओळीनें प्रदर्शित केलेलीं असतात. त्यांतील बहुतेक चित्रें स्त्रियांचीं असतात. सौंदर्य फक्त स्त्रियांतच असतें हा कोणीं शोध लावला ? स्त्रीमध्यें जें सौंदर्य आहे—निदान मासिकांवर

दाखविलें जातें तें पुरुषाच्या दृष्टींतून. मग स्त्रीच्या दृष्टींतून पुरुषाचें सौंदर्य कां नाहीं दाखवीत ? ज्या दृष्टीनें स्त्री ही सुंदर असते, त्या दृष्टीनें पुरुषहि नितकाच सुंदर असतो. पण हें असें सापेक्ष सौंदर्य काय म्हणून दाखवितात ? त्याचप्रमाणें रस्त्यांतील सिनेमांच्या जाहिराती. शयनमंदिरांत स्त्री पतीसमवेत जशी वागते त्याचीं कांहीं तुटक चित्रें निवडून रस्त्यातून जाहिरात म्हणून ठेवतात. खरोखर हीं चित्रें पाहिलीं म्हणजे मला नुसतें लाजल्या सारखेंच होतें असें नाहीं तर अेक प्रकारचा उबग येतो. ज्याचें सौंदर्य केवळ अेकान्तांत आणि दुकटद्यापुरतेंच आहे तें जाहीररीत्या रस्तोरस्तीं मांडलें म्हणजे त्या सौंदर्यातील रामच गेला. औचित्याशिवाय सौंदर्याला किंमत नाहीं. जे सौंदर्याची अनाठायी मांडणी करतात त्यांना स्वतःलासुद्धां हें पटत असेल. पण तरीहि आपल्या प्रामाणिक भावना दडपून केवळ व्यापारासाठीं हें केलें जातें. आपल्याला मेजवानीला जावयाचें आहे. बेत जिलेबीचा आहे. जेवावयास जातांना मध्यें कांहीं जिलब्या गटारांत पडलेल्या आहेत. अेकादा रोगट भिकारी मातींत मळलेली अेकादी जिलबी आपल्या गलिच्छ हातानें ओंगळ तोंडांत घालीत आहे, अेकाद्याच्या पायाखालीं जिलेबी चिरडून जात आहे अशीं दृश्यें पाहिलीं तर पुढें पानावर बसल्यावर समोर जिलेबी दिसली तर रस्त्यावरच्या आठवणीनें मनांत किळस उत्पन्न झाल्यावाचून राहाणार नाहीं. गुलाबाच्या झाडाला सुंदर फुलें देणारें अेकादें खत कितीहि उत्तम असलें तरी तें आपण वशींत घेऊन खात नाहीं. किंवा श्रीखंड फार मधुर झालें म्हणून तें दिवाळींतील उटण्यासारखें अंगाला चोळीत नाहीं. सौंदर्याला जसें औचित्य तसें सुंदर वस्तूला विशिष्ट कार्य असतें. कार्याप्रमाणें सौंदर्याची बैठक बदलते. कार्य आणि औचित्य सोडलें तर सौंदर्याला अस्तित्वच राहणार नाहीं. पण यंत्राच्या भरधाव चाकामागोमाग पिळून निघणाऱ्या आणि पळून जाणाऱ्या माणसास हें सांगून काय पटणार ? अशा माणसाच्या जीवनांत माधुरीहि नाहीं आणि आस्थाहि नाहीं. त्याला ही व्यथा सांगून काय उपयोग ?

अनुक्रम .............. वि: ..................
.................... नों ..................

# विद्वानांचे कांहीं अभिप्राय

**समाजजीवन** ( पृष्ठ संख्या क्राऊन ३३२. मूल्य ५ रु. समाजरचनेसंबंधीं तात्त्विक प्रश्नांवर मीमांसा करणारा ग्रंथ. )

" तुमचा ग्रंथ स्वतंत्र असून त्यांतील विचार व सिद्धांत तुमचे तुम्ही केवळ समाजनिरीक्षणानें ठरविल्यासारखे वाटतात...पुस्तकाची भाषा सोपी व सुंदर आहे. असें असून ती सिद्धांत प्रतिपादनास उणी पडत नाहीं "

**—साहित्यसम्राट कै. न. चिं. केळकर.**

" रमातनयांची आपल्या समाजाकडे पाहण्याची दृष्टि सखोल, विस्तृत आणि दूरगामी आहे. आपला समाज कसा होता, कसा आहे आणि कसा होणार या तळमळीनें लेखकानें आपल्या समाजाचें या पुस्तकांत सर्व बाजूंनी निरीक्षण केलें आहे आणि विचारवंतांसाठीं योग्य ती भूमिका तयार करून ठेवली आहे. "

**—' रविवार सकाळ '**

" या ग्रंथाचें मोल असें आहे कीं, त्याबद्दल त्यांना ( रमातनयांना ) समाजशास्त्राच्या अभ्यासांतील पीएच्. डी. ची पदवी द्यावी. या पुस्तकातील अनेक किंबहुना बहुतेक विचार अत्यंत उपयुक्त व वेंचे उतरून देण्यासारखे असून भाषा इतकी सुबोध, सोपी व सहज आहे कीं त्यांत लेखकाचें विशेष कौशल्य दिसून येतें. समाजाची पुनर्रचना कशी करावी याचा विचार करणाऱ्यांनी या लेखकांच्या विचारांचा परामर्श अवश्य घेतला पाहिजे. "

**— ' काळ ' ( श्री. शं. रा. दाते )**

" विवेचनासाठीं हातीं घेतलेला विषय ' समाजजीवन ' हा अतिशय गुंतागुंतीचा आहे. अशा कठीण व तात्त्विक विषयाची मांडणी त्यांनीं सुव्यवस्थित आणि निर्भीडपणें केली आहे हें त्यांस भूषणावह आहे. ' समाजजीवन ' शास्त्राची यापुढें उपेक्षा करून चालणार नाहीं, हें समाजाच्या गळीं उतरविण्यास आणि समाजाला या शास्त्राकडे वळविण्यास हा ग्रंथ कारणी-

भूत होईल हें निर्विवाद आहे. श्री. रमातनय यांनीं हें 'समाजजीवन' पुस्तक प्रसिद्ध करून भारतीय संस्कृतीच्या अभिमान्यांच्या विचारांना नवी चालना दिली आहे."

—'केसरी' (श्री. ज. स. करंदीकर)

**वन्दनीय महाशय** (मूल्य १ रु. सह्याद्रि, प्रा. म. म. पोतदार, ना. गो. चापेकर, श्री. म. माटे आणि ललितवाङ्मय यांस उद्देशून त्यांच्या शब्दचित्रात्मक अनावृत्तपत्रांचा छोटा संग्रह.)

"अनावृत्तपत्रांचा हा संग्रह छोटा असला, तरी ठसठशीत वैशिष्ट्यांनीं नटलेला असल्यानें तो चटकदार वाटतो"

—विविधवृत्त

"आपल्या अपेक्षा नमूद करतांना लेखकाची विचारशीलता चांगली व्यक्त झाली आहे. लेखनविषयाचा चिकित्सकपणें केलेला अभ्यासहि ठिकठिकाणीं व्यक्त झाला आहे."

—वाङ्मयशोभा

**ज्ञान आणि विज्ञान** (मूल्य १ रु. प्रा. माटे यांच्या 'विज्ञान-बोधाच्या प्रस्तावने'ची दुसरी बाजू. ज्ञान आणि विज्ञान यांचें तौलनिक परीक्षण करणारा प्रबंध.)

"प्राध्यापक माटे यांनीं मांडलेल्या विषयाची दुसरी बाजू कोणी तरी मांडणें अवश्य होतें. श्री. रमातनय यांनीं तें कार्य या पुस्तकद्वारें केलें आहे. त्यांनीं मांडलेले बहुतेक मुद्दे विचारार्ह आहेत. या पुस्तकानें ज्ञानविज्ञान या विषयाच्या दुसऱ्या बाजूकडे लोकांचें लक्ष वेधून त्या विषयाच्या यथार्थ ज्ञानास मदत होईल यांत शंकाच नाहीं"

—प्राचार्य सोनोपंत दांडेकर

" महाराष्ट्रीय संतांच्या कामगिरीचें मूल्यमापन लेखकानें योग्यरीतीनें केलें आहे. पुस्तकाची भाषा स्वच्छ व सूत्रमय आहे. याहून अधिक विस्तारानें ज्ञानविज्ञानाचा समन्वय करणारा ग्रंथ लेखकानें लिहावा. "

—श्री. दा. न. शिखरे

**ओघळलेलें मंगळसूत्र** : ( मूल्य १। रु. स्फुट कवितांचा संग्रह. )

" कवीच्या भाषेची तारीफ रसिक पहिल्यानें करील. ध्येयनिष्ठ पण मृदु प्रकृति असें कवीचें व्यक्तित्व सर्व कवितांतून प्रकट होतें. आपल्या भावनांचा आविष्कार कसा करावा याचा अंदाज व कौशल्य कवीच्या अंगीं भरपूर दिसतें. "

—महाराष्ट्र साहित्य पत्रिका

" गद्यप्रातांत शिलेदारी करीत असलेले कसलेले लेखक श्री. श्रीकृष्ण नारायण चाफेकर आतां कवि रमातनय म्हणून नव्यानेंच महाराष्ट्रीय रसिकांपुढें येत आहेत याबद्दल मला व्यक्तिशः आनंद व अभिमान वाटत आहे. यापुढें याच बीजास जोमदार अंकुर फुटून याचा वाढीस लागलेला वेल वाऱ्यावरोबर स्वैरपणानें नाचत बागडत आपल्या डौलदार व सुगंधित फुलांनीं रसिकांचीं अंतःकरणें आपल्याकडे ओढून घेत आहे असें चित्र माझ्या मनःचक्षुसमोर आजच स्पष्ट दिसलें तर त्यांत काहीसे आश्चर्य आहे.

—अज्ञातवासी

REFBK-0014847

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. 78C86
43993 आ. क्र.
209 ग. क्र. 613167